महाराष्ट्रकवि-आनंदतनयकृत

# कवितासंग्रह.

हा

जनार्दन बाळाजी मोडक, बी. ए.

व

वामन दाजी ओक

यांनीं अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन शुद्ध केला.

आणि

मुंबईंत निर्णयसागर छापखान्याचे मालक यांनीं आपल्या

छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.

१८९१.

किंमत १२ आणे.

# अनुक्रमणिका.


| | काव्यनाम. | ग्रंथसंख्या. | पृष्ठसंख्या. |
|---|---|---|---|
| १ | विश्वामित्राभिगमन. .... .... .... .... | ३० | १ |
| २ | ताटकावध. .... .... .... .... .... | २० | ४ |
| ३ | विश्वामित्रयज्ञरक्षण. .... .... .... .... | ३८ | ७ |
| ४ | सीतास्वयंवर. .... .... .... .... .... | ८३ | ११ |
| ५ | शबर्याख्यान. .... .... .... .... .... | २१ | २५ |
| ६ | सेतुबंध..... .... .... .... .... .... | ४१ | २७ |
| ७ | बालचरित्र. .... .... .... .... .... | १५ | ३३ |
| ८ | पूतनावध. .... .... .... .... .... | ४३ | ३४ |
| ९ | कंदुकाख्यान. .... .... .... .... .... | ३२ | ४१ |
| १० | कृष्णचरित्र. .... .... .... .... .... | ४० | ४५ |
| ११ | सुदामचरित्र. .... .... .... .... .... | ४४ | ४९ |
| १२ | गणिकोद्धार. .... .... .... .... .... | १३ | ५५ |
| १३ | उमारमासंवाद. .... .... .... .... .... | १३ | ५६ |
| १४ | मार्कंडेयाख्यान..... .... .... .... .... | ६० | ५८ |
| १५ | शिबिचक्रवर्त्याख्यान. .... .... .... .... | ४६ | ६६ |
| १६ | पदसंग्रह (भगवत्स्तुतिपर.) .... .... .... | २० | ७० |
| १७ | पदसंग्रह (उपदेशपर.) .... .... .... .... | ३८ | ७७ |
| १८ | पदसंग्रह (प्रासंगिक.) .... .... .... .... | १३ | ८७ |
| १९ | संस्कृत पद. .... .... .... .... .... | १ | ९२ |
| २० | हिंदी पद. .... .... .... .... .... | १ | ९३ |
| २१ | स्फुट सवाया. .... .... .... .... .... | ४ | ९३ |
| २२ | विषयपंचक. .... .... .... .... .... | ६ | ९४ |
| २३ | मृगीचरित्र. .... .... .... .... .... | १३ | ९७ |
| २४ | महाबळचरित्र. .... .... .... .... .... | ५० | ९९ |
| २५ | गोरसक्रीडा. .... .... .... .... .... | ४३ | १०७ |

| | काव्यनाम. | ग्रंथसंख्या. | पृष्ठसंख्या. |
|---|---|---|---|
| २६ | नवरसचरित्र. .... .... .... .... .... | ५३ | ११३ |
| २७ | भक्तिपर पदे. .... .... .... .... .... | १२ | १२० |
| २८ | उपदेशपर पदें. .... .... .... .... .... | ४७ | १२३ |
| २९ | प्रासंगिक पदें. .... .... .... .... .... | ३९ | १३७ |
| ३० | आरती .... .... .... .... .... .... | १ | १४९ |

# आनंदतनयकृत पदांची सूची.


| पदें. | पृष्ठें. |
|---|---|
| अग मुरदाडे दाढी सोड ... ... | १०९ |
| अघटित घटित ज्या विभुचीं माया. | १४२ |
| अजि मज वनमाळी ... ... | १२२ |
| अजि सकुमारा नंदकुमारा ... ... | १०६ |
| अततततत धनु विशाळ मोठें ... | १३८ |
| अद्वयानंद शौरी ... ... ... | १२८ |
| अभिनव हे नव हो... ... ... | १२९ |
| अशाला आशा नाचविते ... ... | ८५ |
| अहाहा अदृष्टा ... ... ... | १४८ |
| आत्मारामीं मन भरलें ... ... | ८४ |
| आधीं मन आंवारें ... ... | १३२ |
| आहा हें काय बरें मानवा ... ... | ८० |
| ऐक राया दे रघूत्तम ... ... | ८८ |
| ऐका हो अद्भुत देणें ... ... | ८३ |
| ऐशी देखिली द्वारका ... ... | ५१ |
| ऐसें करिं कांहीं ... ... ... | १२५ |
| कनकचैल हरि कुचैलपाउलें ... | ५२ |
| कमलनयन घनश्यामतनू ... ... | १३८ |
| करूं काय अशाला... ... ... | १२९ |
| कर्मोचा योग चुकेना ... ... | १११ |
| कल्याणं कुरु कार्मुकपाणे ... ... | १२० |
| कसि गति झाली ... ... ... | १४० |
| कां रे नाठविशी कमलनयन ... | ७८ |
| कां लाड देशी हो ... ... ... | १४५ |
| किति तुज विनवूं वारंवार ... ... | १३३ |
| कृष्णासि लावीं शिक नंदमामा ... | १४४ |
| कैसेंही कीर्तन करितां ... ... | ८४ |
| कोठें हो कोठें बाळ... ... ... | ३८ |
| कोण तुझ्या मनासि येतो ... ... | १५ |
| खंजनाक्षी त्या मंजुतरा वाणी ... | ८७ |
| खंडपरशु हृत्सरोज ... ... ... | ७६ |
| खेळे ब्रह्मभूपाळ ... ... ... | ११३ |
| खेळे माधव खेळे ... ... ... | १४२ |
| गणराज गजानन ... ... ... | ७० |
| गाईन आवडिनें ... ... ... | १२७ |
| गुज त्यासि पुसा रे ... ... ... | ८२ |
| गोकुळ धन्य जगीं ... ... ... | १४१ |
| गोविंदा गोपाळा कृष्णा ... ... | ७४ |
| गौरीहरतनया गुणालया ... ... | ७० |
| घडि घडि काय सांगूं ... ... | १४७ |
| घालूं मी कवणा भार ... ... | १२१ |
| चला चोरुनि गोरस खाउं ... ... | १०७ |
| चाल गे निज गेहा ... ... ... | १४२ |
| चाल लौकरी ... ... ... | १४६ |
| चाल सजणा राजिवनयना ... ... | १२१ |
| चाला गे वनवासा ... ... ... | ११४ |
| जगजिवना जिववी ... ... ... | ११९ |
| जगवीर विरागी ... ... ... | ८५ |
| जगिं तोचि विलासी ... ... | १२९ |
| जन्मुनि उगले कां मरती ... ... | ८१ |
| जय जय जगदंबे ... ... ... | १२० |
| जय जय रघुवीरा ... ... ... | ७० |
| जयदेव जयदेव ... ... ... | १४९ |
| जय नंदकुमारा ... ... ... | १२२ |
| जा विनवा तुम्हीं ... ... ... | १४६ |
| जो नर नटका ... ... ... | ८१ |


१. आनंदतनयकृत काव्यांतील ९५-९६ पृष्ठांवर दिलेल्या पदांच्या सूचीचा यांत संनिवेश झाल्यामुळें तीं पृष्ठें रद्द असें समजावें.

| पदें. | पृष्ठें. |
|---|---|
| तव किशोर नंदा फंद करी... | १०८ |
| तव यादवरावो | १४३ |
| तसा हरि आम्हां सांपडला... | १३० |
| तांडव नृत्य करी | १३२ |
| तारीं रघुराया लागेन तुझ्या | ९२ |
| तिथी वार नक्षत्र घटित | १०१ |
| त्रिभुवन व्यापुनि झाला | ८५ |
| तुझे कोपे कैसे जगजीते | ११२ |
| तें चिर माझें टाकुनि दे | ९२ |
| ते नर तारियले श्रीमुकुंदें | १२८ |
| तैसा लोक पिडे | ८२ |
| तो श्यामसुंदर धनुष्यवाला... | १४९ |
| त्यांचा संग नको | ८३ |
| त्याला इहलोकीं परलोकीं | ८६ |
| त्याला शिव कैसा | १३० |
| दाखवीं दिव्य पाय... | ७० |
| दीनबंधु पालय | ७२ |
| दृढ धरीं चंचळ हें मन | १२६ |
| देइं देइं दान | १४७ |
| देव करील दया | ८१ |
| देव जाणे हा भाव | ८८ |
| देवाधिदेव देखियला डोळां... | १२७ |
| धन्य झाली ते वनीं... | १४१ |
| धन्य दशरथरायजी | १३५ |
| धरावा साधुसमागम | १२५ |
| धांव धांवण्या ये धण्या | ७४ |
| धिग् धिग् मति त्याची | १२९ |
| नका नका घरीं ठेऊं नका | १०३ |
| नंदहृदानंद चिदानंद | ७५ |
| नंदाचा सुत गा | १२३ |
| नंदा मूल बरवें न दिसे | १०२ |
| नयनीं शंकर देखिला | १३४ |
| नव लाव कसा हरिचा | १०५ |
| नाचत गोपगडी | ११६ |

| पदें. | पृष्ठें. |
|---|---|
| निजघरीं कोंडिला परमात्मा | १४४ |
| निजरे निज बाळा गोपाळा | १४१ |
| निजभावें तुज मागें | १४३ |
| निति जनकाप्रति काय वदावी | १३९ |
| निशिदिनीं ध्यान | १५२ |
| पतिश्री पतिते तुम्ही मागा... | १४७ |
| पवनतनय परमविनय | ७७ |
| पाउलापाउलीं निजमनीं | ७९ |
| पाय गुरूचे धरा | ७८ |
| प्रभु भास्करकुळिंचा | ७१ |
| प्राण्या सावध रे सावध रे | १२५ |
| बरवें समजा रे उमजा रे | ७७ |
| बाई हे हरिची अवखुण | ११० |
| बालं भावय तं | १२४ |
| बोला रे राम बोला रे | ७८ |
| बोले यशोदा वाणी... | १४४ |
| ब्रह्मविचार करा | ७७ |
| ब्रह्मादि वंदिति ज्याचे पाय | ७४ |
| भज भज गोविंदं | १२४ |
| भज मन रघुविर प्रीति | ८० |
| भज मानस भज मानस | १२३ |
| भजरे गोपालं | १२४ |
| भज रे मनप्राण | १२४ |
| भज राघवपाया | १२३ |
| भटजी निबर निट कांस | १०६ |
| भाग्य मोठें... | १४१ |
| भासे आजि दिठी | ८६ |
| भुलल्या त्या नंदगोपति | ९१ |
| भुवनीं मज रंका नाथा | ७१ |
| मग कैंची शंका | १३० |
| मदनतात मनमोहन | ९१ |
| मर मर तिहिं लोकीं | १३० |
| मर मर रे प्राण्या | ८० |
| माझा कृष्ण देखिला काय... | ८९ |

| पदें. | पृष्ठें. |
|---|---|
| माझा पांडुरंग मायबाप ... ... | ७६ |
| माभळभट मी ... ... ... | १०४ |
| म्यां काय सांगावें ... ... ... | १३१ |
| मार बसे अनिवार ... ... ... | १०४ |
| मीपण हेंचि पिसें ... ... ... | १३१ |
| या घोर संसारीं ... ... ... | ८३ |
| या जगीं तुम्हिच बहु बरवे... ... | १०० |
| या जगिं मी रणशूर... ... ... | १०० |
| या विषयाची काय गोडी ... ... | १३० |
| याहुनि गारुड काय दिसे ... ... | ८२ |
| याहोनि लाभ काय... ... ... | ७९ |
| ये दयाळा सदय हरी ... ... | १२२ |
| येरवीं ब्रह्म सनातन... ... ... | ८५ |
| ये रे ये रे मल्लारीराया ... ... | ७६ |
| ये रे ये रे गोविंदा रामा ... ... | ७५ |
| ये रे ये रे राघोबा माझ्या ... ... | ७१ |
| योगी असला रुसला ... ... | १३१ |
| योगियांच्या रानीं घेतला ... ... | १४० |
| रंगनाथचरणयुगुलिं ... ... | ८६ |
| रघुपति दीनजनां ... ... ... | १३१ |
| रघुराज जिवीं वरिला ... ... | १३८ |
| रघुवल्लभ कार्मुक वोढी ... ... | १३९ |
| रत हरिपदकमलकंद ... ... | ७९ |
| रसने नीलनीरद ... ... ... | १३२ |
| राजराज विहगराजवहन ... ... | १२७ |
| राजसभा डौरे ... ... ... | १३८ |
| राघव गमन करी ... ... ... | १४० |
| रामचंद्र कविचकोरचंद्र ... ... | ७२ |
| राम दिसेना नयनीं... ... ... | १४० |
| रामनामाची गती ... ... ... | ८१ |
| रामसखा रुसविलास ... ... | १३९ |
| रामा काय कवतुक पाहसि... ... | १३३ |
| रामा कृष्णा गोविंदा ... ... | १३२ |
| लवकरि धांव सख्या ... ... | १३४ |
| लागा रामपदीं लाज हरुनि... ... | ७९ |
| लाडिस नाडिन गे ... ... ... | ११६ |
| लावी थानीं भुलोनिया ... ... | १४५ |
| वनमाळी गोपीबाळी ... ... | १४३ |
| वसुदेवाचें भाग्य थोर ... ... | १३६ |
| वंदूं गोविंदा हरि ... ... ... | ८९ |
| वरि दिसतो बरवंटा ... ... | ८२ |
| वारिसि ना विपदा ... ... ... | ११५ |
| विश्वामित्रा स्वामी ... ... ... | १३७ |
| वृंदावनिं वाजवि मुरली ... ... | ९० |
| वेणु वाजे युवतिकरेणु माजे ... | ८९ |
| शंकरजी मैं बाल तुमारो ... ... | ९३ |
| शाबास भला रे ... ... ... | १२५ |
| शिव शिव देवा ... ... ... | १३४ |
| श्रीरंगा ये रे ... ... ... | १२२ |
| श्रीरामा जयरामा ... ... ... | १५१ |
| श्रीरामा मंगळधामा ... ... | १२० |
| श्रुतकीं श्रुतकृत हरिची करणी ... | १०७ |
| शोधीं आपणा साजणा ... ... | १२६ |
| सकळकळाभिराम कांत नये ... | १४६ |
| सकुमार दयानिधि रे ... ... | १२४ |
| संत कृपा फळली ... ... ... | ८५ |
| सदया येईं उदारा ... ... ... | १२२ |
| स्मर प्राणिया रघुराया ... ... | ७८ |
| स्मर सीतारमणं ... ... ... | ९२ |
| साजणी गे माझे मनिंचें ... ... | ८७ |
| साधु घराप्रति आले ... ... | ८५ |
| सार्वभौमा निजजनपूर्णकामा ... | ७३ |
| सुटलें मन माझें ... ... ... | १३१ |
| सुमतिमति कागमति ... ... | ११४ |
| सुभट भट बरवा ... ... ... | १०१ |
| सोडिं आतां व्याकुळ झाला ... | ८८ |
| सोसुं किती सांग वो बाई ... ... | १४७ |
| हरहर ऐसें कोण सोशी ... ... | १४५ |

| पदें. | पृष्ठें. | पदें. | पृष्ठें. |
|---|---|---|---|
| हरि दर्शन मला हरि दे रे ... ... | १३३ | हें काय केलें रे ... ... ... | १२६ |
| हरिपदीं लागा मागा ... ... | ५० | हें डंब कशाला ... ... ... | ७९ |
| हरि मज तारीं दीना ... ... | ७३ | हे बांधूं इच्छी मातें ... ... ... | १११ |
| हा आमुचा यजमान ... ... | १३८ | होणाऱ्या प्रारब्धासि ... ... | ८४ |
| हा कोण धिंगा रे ... ... ... | १३२ | क्षणही विषयसुखानें नेघ ... ... | ८७ |
| हे कांहीं कर्म चरे ... ... ... | १४४ | | |


## आनंदतनयकृत आणखी उपलब्ध झालेलीं पदें.

### पद १ लें.

केंवी भव तरसी । मना तूं ॥ केंवी० ॥ ध्रुवपद. ॥
वाढविसी किती गाढ अहंकृती । गाढवसा चरसी. ॥ मना० ॥ १ ॥
तर्किशी नागुण कर्कश काननीं । मर्कटसा चरसी. ॥ मना० ॥ २ ॥
आनंदात्मज शिकवि तो कवि । व्यर्थ भरीं भरसी. ॥ मना० ॥ ३ ॥

### पद २ रें.

पांवा वाजवितो मुनिजनमनमोहन हरी. ॥ ध्रुवपद. ॥
तारी पाषाण तृणें । खेळतसे बाळपणें. ॥ पांवा० ॥ १ ॥
गोपी गोपाळ गाई । नमिती श्रीकृष्ण पायीं. ॥ पांवा० ॥ २ ॥
आनंदतनय म्हणे मनीं । विसरूं नका दिनरजनी. ॥ पांवा० ॥ ३ ॥

# आनंदतनय.

**'आनंदतनय अरणीकर शोभवि कवन फार यमकांहीं ।
तत्सूक्ति पाठ ज्याला त्याचें पाहे न भवन यम कांहीं ॥'.**

**मोरोपंत**–'सन्मणिमाला.'

प्रत्येक कवीचे ग्रंथ समग्र छापून झाले म्हणजे त्या कवीविषयीं जी माहिती मिळण्यासारखी असेल ती मिळवून वाचकांस सादर करावी, असा आम्हीं संकल्प केला आहे. त्यास अनुसरून **आ**नंदतनयाची कृति उपलब्ध झाली तितकी छापून प्रसिद्ध झाली म्हणून, जी अल्प माहिती त्याच्या संबंधानें उपलब्ध आहे ती येथें देण्याचा आमचा विचार आहे. ही माहिती वृद्धवचन, प्रस्तुत कवीचीं काव्यें आणि इतर प्रसिद्ध ग्रंथ यांच्या आधारें एकत्र करून दिली आहे. यास्तव प्रकृत लेख कविचरित्ररूप नसून, तद्रूप लेख लिहिणारास साहाय्यभूत व्हावा, असा हा स्वल्प प्रयत्न आहे; अथवा प्रस्तुत कवीविषयीं आम्हांस जें कांहीं वाटतें त्याचें हें छोटेंसें टांचण आहे. चरित्रपर लेख लिहिण्यास ज्या प्रकारची माहिती पाहिजे ती मिळत नाहीं, ही गोष्ट शोचनीय होय; तेव्हां सद्यःस्थिति जोंपर्यंत अशीच कायम राहील, तोंपर्यंत असल्याप्रकारचे लेख अपूर्णच समजावयाचे. संशोधनानें आणि कालांतरानें मात्र यांत पडली तर भर पडून हे कदाचित् परिपूर्णतेस यावयाचे.

**आ**नंदतनयाविषयीं खरी माहिती म्हटली म्हणजे अभावरूपच होय. त्याचें नांव, कुलशील, जन्ममरणशक, जन्मभूमि, संतति, विद्यमान वंशज, इत्यादि अनेक गोष्टींतून कोणत्या एकीविषयीं सुद्धां खात्रीलायक असें कांहींच सांगतां येत नाहीं. असें आहे, तथापि जें कांहीं सांगण्यासारखें आहे तें येथें यथामति सादर करण्याचें योजिलें आहे.

**जीवनवृत्त**—**वि**जापुरच्या राज्यांतील **क**र्नाटक प्रांतांत **अ**रणी म्हणून एक गांव आहे. हें **अ**रणी गांव '**अ**रणी एथील लढाई' या ऐतिहासिक गोष्टीवरून सर्वांस श्रुत आहेच. तेथें **आ**नंदराव नामक ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण कुळकर्णीचें काम करून राहत होता. त्यास **गो**पाळराव म्हणून एक मुलगा होता; तोच हा **आ**नंदतनय कवि होय. त्यानें आपला कुलवृत्तांत पुढील लोकांस समजावा अशी तजवीज करून ठेविल्याचें कोठेंही दिसत नाहीं. फार तर काय? यानें आपल्या नांवाचाही स्पष्ट उल्लेख आपल्या काव्यांत कोठें के-

लेला आढळत नाहीं. मी 'आनंदात्मज,' 'आनंदतनय,' 'आनंदसुत,' 'आनंदाचा बाल,' 'आनंदाख्यतनय,' म्हणजे 'आनंदरावाचा मुलगा' इतकाच उल्लेख तो आपल्या काव्यांच्या किंवा पदांच्या अखेरीस करीत असतो. यानें आपलें खास नांव आपल्या काव्यांत कां संनिविष्ट केलें नाहीं आणि बापाचेंच नांव कां पुढें केलें, याचें खरें कारण समजत नाहीं. कदाचित् 'आत्मनाम गुरोर्नाम नामातिकृपणस्य च । श्रेयस्कामो न गृह्णीयाज्ज्येष्ठापत्यकलत्रयोः ॥' अशी समजूत आनंदतनयाची असावी, किंवा शालीनता फार असावी. परंतु वडिलांचें किंवा गुरूचें नांव घालून आपलें पुत्रत्व किंवा शिष्यत्व याचा मात्र उल्लेख करण्याचा प्रघात प्राचीन व अर्वाचीन कविमंडलांत बराच दिसतो. हा प्रघात कोणी पाडला हें सांगणें इतर अस्मद्देशीय ऐतिहासिक प्राचीन गोष्टीप्रमाणेंच फार कठिण आहे. आनंदतनयाप्रमाणेंच एका सर्वमान्य संस्कृत ग्रंथकारानें केल्याचें प्रसिद्ध आहे. प्रख्यात संस्कृत 'कादंबरी'कार बाणभट्ट याच्या पुत्रानें आपली कृति आपल्या बापाच्या नांवानें प्रसिद्ध असावी हा उद्देश मनांत धरून 'कादंबरी'ग्रंथाच्या उत्तरार्धांत आपलें नांव कोठेंही दाखल केलें नाहीं. तसेंच यानेंही केलें असावें असें वाटतें. ही कल्पना जर संभवनीय आणि समर्थनीय असेल, तर या नाममौन्यावरून याची पितृभक्ति ढळढळीत दिसून येते. कसेंही असो, या गोष्टीवरून याची स्वाभाविक विनयबुद्धि आणि आपल्या नांवाचा डंका वाजवून न घेण्याची उत्कट इच्छा या व्यक्त होतात. आनंदतनय हा शककर्ते शिवाजी महाराजांच्या वडिलांचा म्हणजे शाहाजीचा गुरु होता असें म्हणतात. ज्याअर्थी कोल्हारबाळापुरप्रांतीं शाहाजीस विजापुरसरकाराकडून जहागीर होती, असें इतिहासावरून सिद्ध आहे, त्याअर्थी पूर्वोक्त गोष्ट संभवनीय दिसते. शाहाजीचा जन्म इ० स० १५९४ त झाला, व तो इ० स० १६३७ नंतर कर्नाटकांत गेला, यावरून इ० स० १६४० च्या सुमारास त्यानें आनंदतनयाला आपला गुरु केला असावा असें वाटतें. यापुढें याची ख्याति कांहीं वर्षांनीं म्हणजे सुमारें इ० स० १६५० पासून झाली असावी. हा वृत्तांत सत्य मानून चाललों तर इ० स० च्या १७ व्या शतकाच्या उत्तरार्धांत आनंदतनय होता असें मानण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. यानें अरणीच्या लढाईंत शिपाईपणा गाजविला होता, ही गोष्ट 'पूतनावध'काव्याच्या शेवटील श्लोकांत (पृ० ४१ श्लो० ४३) 'आरणीचा शिपायी' असें शौर्यदर्शक विशेषण यानें आपल्यासच लाविलें आहे, त्याजवरून व्यक्त होतें. आनंदतनय आणि प्रसिद्ध 'नलदमयंतीस्वयंवराख्यान'कार रघुनाथपंडित हे व्याही

व्याही होते, अशी माहिती उपलब्ध आहे. पण ती संदिग्ध आहे. तिजवरून **आ**नंदतनयाच्या मुलास **र**घुनाथपंडिताची मुलगी दिली होती किंवा **र**घुनाथ-पंडिताच्या मुलास **आ**नंदतनयाची मुलगी दिली होती याचा निर्णय होत नाहीं. तथापि हे दोघे व्याही होते इतकीच गोष्ट जरी खरी असेल, तर हे दोघे समकालीन असून **र**घुनाथपंडितही इ० स० च्या १७ व्या शतकाच्या उत्तरार्धांत होता असें निष्पन्न होतें. **आ**नंदतनयानें '**सी**तास्वयंवर' काव्य रचिलेलें पाहून **र**घुनाथपंडितास '**नलद**मयंतीस्वयंवराख्यान' रचण्याची स्फूर्ति झाली असें म्हणतात. '**ता**टकावध'काव्यांतील 'केव्हां कोठुनि घेतला शर करीं, केव्हां गुणीं योजिला' इत्यादि श्लोक (पृ० ६ श्लो० १८) पाहून **पं**डितांनीं 'कदा नेणो ओढी शरधितुनि काढी शर कदा' हा श्लोक रचिला असाही लोकप्रवाद ऐकू येतो. मनुष्याच्या हृदयांत दुसऱ्याचें पाहून तसें करण्याची इच्छा म्हणजे अनुकरणेच्छा जात्याच प्रबल आहे आणि त्याचे बहुतेक व्यापार याच वृत्तीचे कमजास्त मानानें परिणाम आहेत, तेव्हां पूर्वोक्त गोष्टी खऱ्या असण्याचा संभव नाहीं असें कोण म्हणेल? वृद्धजनांच्या माहितीवरून आणखी असें कळतें कीं **मु**रारपरब्रह्म अथवा **मु**रारपंत या नांवाचे एक ब्राह्मण गृहस्थ मोठे नामांकित साधु होते, त्यांचा **आ**नंदतनय हा शिष्य होय. **पं**तांच्या '**स**न्मणिमालें'त आणि '**स**न्नामगर्भरामायणां'त **आ**नंदतनयाची गणना आहे. यावरून तो **पं**तांस **अ**रणीकर आणि यमकरचनाकार '**सं**त' अथवा '**सू**क्ति'कार **स**त्कवि या नात्यानें माहित होता असें दिसतें. **क**र्नाटकांत **वै**ष्णवमताचें प्राबल्य होतें व आहे, तथापि **आ**नंदतनय हा **वै**ष्णवमतानुयायी नसून **शि**वोपासकच होता असें ऐकण्यांत आहे व अशी अटकळ त्याच्या कांहीं पद्यांवरून करतां येते.

**कवितासंग्रह**—**आ**नंदतनयाचीं जीं काव्यें आमच्या संग्रहीं होतीं व जीं रसिकवर्य सन्मित्रांनीं काव्यरसाच्या अनुपम आस्वादास भुलून अथवा पूर्वजपूज्यबुद्धीस स्मरून आजपर्यंत आस्थेनें बाळगून आमच्याकडे औदार्यानें पाठवून दिलीं त्या सर्वांचें प्रकाशन करून तीं आज महाराष्ट्रकाव्यरसलोलुपजनांस सादर अर्पण करीत आहों. या कवीनें श्रीम**द्भा**गवत, **रा**मायण, आणि **पु**राणें या लोकमान्य ग्रंथांतून कांहीं हृदयंगम कथानकें अशा चातुर्यानें आणि खुबीनें निवडून घेतलीं आहेत कीं त्यांत चित्तवेधक असे अनेक प्रसंग असल्यामुळें त्यांचीं वर्णनें सुरस उतरलीं आहेत. **रा**मचरितांतील, **कृ**ष्णचरितांतील आणि **मा**र्कंडेयादि-

---

१. 'विधिसहि दुर्लभ जें तें **आ**लिंगन वात**नंद**ना दे हा ।
गाती पुरा**तन य**ती या कपिच्या विहितनंदना देहा ॥.'

पुराणांतील मिळून सुमारें २० आख्यानें आणि सुमारें १७० पदें–इतकीच कायती या ग्रंथकाराची कृति उपलब्ध आहे. ही ग्रंथसंख्या पुष्कळ आहे असें दिसतें, पण त्या मानानें पद्यसंख्या जितकी असावयास पाहिजे होती तितकी नाहीं, ही खेदाची गोष्ट होय. बहुतेक प्रकरणें लहान लहान असल्यामुळें पद्य-संख्या ९०० पेक्षां ज्यास्त होणार नाहीं. पदें म्हटलीं तर अनेकविषयात्मक आहेत. कांहीं भगवत्स्तुतिपर, बरींचशीं उपदेशपर, आणि थोडींशीं प्रासंगिक. पण ही जी कविकृति लोकांस सादर केली आहे तीपेक्षां आणखी बरीच काव्यरचना कवीनें केली असून ती आज दुर्दैवानें अनुपलब्ध आहे असा तर्क करण्यास जागा आहे. एक तर या संबंधानें कवीच्या ग्रंथांतच प्रमाण असून त्यास लोकवार्ताही अनुकूळ आहे. '**सी**तास्वयंवरां'तील अखेरच्या पद्यांत (पृ० २९ श्लो० ८३) कवीनेंच जो उल्लेख केला आहे त्याजवरून आमचा तर्क दृढ होऊं पाहतो. तसेंच प्रासंगिक पदांवरूनही **आ**नंदतनयाची आणखी कविता असावी या साधार तर्कास बळकटी येते. आज जीं पदें 'प्रासंगिक' या माथाळ्याखालीं आम्ही दाखल केलीं आहेत तीं खरोखर तशीं नसून, त्यांतील कांहीं पदें तरी सांप्रत अनुपलब्ध अशा काव्यांतील असावींत असें अनुमान करण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. कारण याच कवीनें जर '**सी**ता-स्वयंवर,' 'नवरसचरित्र,' 'गोरसक्रीडा,' '**म**हाबळचरित्र' इत्यादि काव्यांत पदांची योजना केल्याचें दिसून येतें, तर तोच प्रकार त्यानें अन्यत्रही केला असावा. हें अनुमान जर केवळ भ्रांतिमूलक नसून समर्थनीय आणि म्हणूनच आदरणीय असेल, तर या पदांची व्यवस्था विषयानुरोधानें करतां येण्यासारखी आहे. पृ० १३७ पद ६० हें 'विश्वामित्राभिगमनां'तील; पृ० ८७ पदें ५९–६०, पृ० ८८ पद ६१, पृ० १३८–१३९ पदें ६१–६७, हीं '**सी**ता-स्वयंवरां'तील असावींत; पृ० १४१ पद ७३ हें 'शबर्याख्यानां'तील; पृ० ८८ पद ६३ हें '**पू**तनावधां'तील; पृ० ८९ पद ६६, पृ० ९० पदें ६७–६८ हीं '**वे**णुसुधे'तील; पृ० १४२–१४५ पदें ७८–८७ हीं '**कृ**ष्णचरित्रां'तील; पृ० ९२ पद ७० हें '**का**त्यायनीव्रतां'तील. या कल्पनेस लोकवार्ताही साधक आहे. यापुढें महाराष्ट्रीयांच्या सुदैवानें याचीं आणखी काव्यें प्रसंगवशात् उप-लब्ध झालीं अथवा जीं उपलब्ध आहेत त्याच्या समग्र हस्तलिखित प्रती उद-यास आल्या, तर आमच्या अनुमानाची सत्यता दिसून येणार आहे.

**सरणी**—**आ**नंदतनयाची कविता बरीच प्रौढ, सुरस, सुबोध आणि स्थलवि-शेषीं डौलदार अशी आहे. त्याची वर्णन करण्याची शैली मोहक आहे. कोठें कोठें

शब्दांची ठेवण इतकी खुबीदार आणि वर्णन इतकें प्रलोभक आहे कीं तें स्थल पाहत असतां मन क्षणभर तन्मय झाल्याशिवाय राहावयाचें नाहीं. तात्कालिक मनोरंजनाचें साधन जें शब्दालंकारविशिष्ट चित्रकाव्य त्याजकडे यानें विशेष लक्ष पुरविलें आहे. यद्यपि चित्रकाव्य हें संस्कृत अलंकारशास्त्रकारांनीं कनिष्ठ गणिलें आहे, तथापि ज्या अर्थी फार प्राचीन काळापासून कालिदास, माघ, भारवि, यांजसारख्या सन्मान्य व सहृदयवर्य संस्कृतकविजनांनीं त्याचा प्रेमपुरःसर अंगीकार केला आहे, आणि महाराष्ट्रकविवर्य मोरोपंत यांनीं अष्टोत्तरशत रामायणें रचून त्याजविषयींची आपली आदरबुद्धि दर्शविली आहे, त्या अर्थीं तें खरोखर त्याज्य आणि अनादरणीय नसून लोकमनोरंजनाचें अत्यंत सुलभ साधन होय. श्रवणमात्रेंकरूनच आनंद उत्पन्न व्हावा अशी रचना आनंदतनयानें केल्यामुळें लोक याच्या काव्यावर लुब्ध झाल्यावांचून खचित राहणार नाहींत. अर्थालंकारापेक्षां शब्दालंकाराकडे याचें लक्ष ज्यास्त, तथापि बाह्यशोभेच्या नादीं लागून आपले काव्यास दुर्बोधांकित केलें आहे अथवा रसहानि केली आहे असें स्थल फारच विरळ आढळेल. अंतःशोभादायक जे अर्थालंकार त्यांजकडे अगदींच लक्ष पुरविलें नाहीं असेंही नाहीं. वस्तुस्थितीचें अथवा व्यापाराचें हुबेहुब वर्णन ज्यांत केलें असतें असा जो स्वभावोक्ति नामक अलंकार त्याची योजना आनंदतनयानें अनेक ठिकाणीं केली आहे. यामुळें तीं तीं स्थलें वाचीत असतां मनास कांहीं विलक्षण आनंद होतो, आणि मनाचा असा ग्रह होतो कीं, काव्यरचनेस जी स्वाभाविक प्रतिभाशक्ति आवश्यक लागते ती याच्या अंगीं कांहीं अंशीं होती. निदान प्रतिभादेवीच्या मंदिरांत याचा प्रवेश झाला असून तदुपासक भक्तांच्या दुसऱ्या अथवा तिसऱ्या वर्गांत याची गणना करण्यास हरकत नाहीं. या विधानाविषयीं फारसा मतभेद पडणार नाहीं. या उल्लेखाच्या समर्थनास अनुकूल अशीं अनेक स्थलें आनंदतनयाच्या कवितेंत आहेत, तीं आमच्या वाचकांसाठीं निर्दिष्ट करावयास पाहिजेत असें नाहीं. तरी अशा स्थलांचा मुळींच निर्देश न करणें रास्त नाहीं. 'सीतास्वयंवरां'तील रावणाची दर्पोक्ति (पृ० १७ श्लो० ३१–३२) त्या राक्षसाधिपाच्या स्वभावास अनुरूप नाहीं असें कोण म्हणेल? तसेंच याच काव्यांतील रावणपतनाचें वर्णन (पृ० १९ श्लो० ४३–४६) आणखी हुबेहुब तें कसें उतरणार? 'कोण तूझ्या मनासि येतो, सांग हो सीते!' हें पद (पृ० १९) तालसुरावर गाऊन आमचे हरिकीर्तनकार गोंसावी आपल्या रंगदेवतेस आणि श्रोतृमंडळास कसे प्रसन्न करतात, याचा अनुभव कोणास नसेल? तसेंच वि-

श्वामित्राच्या पवित्र अरण्याचें वर्णन (पृ० ९ श्लो० ७), मृकंडुमुनिपत्नीचें उत्तर (पृ० ९९ श्लो० १०–१३), शिबिभूपाचें कपोताशीं भाषण (पृ० ६७), इंद्राग्नींचा त्याला आशीर्वाद (पृ० ६९ श्लो० ३९–४१), उमारमा यांचा अन्योन्यप्रत्यारोपक संवाद (पृ० ९६–९८), व्याधानें आणि अग्नीनें घेरलेल्या मृगीची धांदल (पृ० ९७ श्लो० ६–७), महाबळाची गोकुळांतील गौळ्यांनीं केलेली गाळण (पृ० १०४–१०६)–इत्यादि प्रकरणें मनोरंजक नाहींत असें कोण म्हणेल? 'दाखवी दिव्य पाय' (पृ० ७० पद ४), 'बरवें समजा रे! उमजा रे!' (पृ० ७७ पद २१), 'ब्रह्मविचार करा' (पृ० ६७ पद २२), 'कां रे! नाठविसी कमलनयन वासुदेव' (पृ० ७८ पद २३), 'रत हरिपदकमलकंद सेविं मनोभ्रमरा!' (पृ० ७९ पद ३१), 'माझा कृष्ण देखिला काय, कोणी तरि सांगा हो!' (पृ० ८९ पद ९४)–इत्यादि पदांच्या श्रवणानें क्षणभर कांताकनकादि ऐहिक विषयांचें विस्मरण होऊन प्रभुपदारविंदीं मिलिंदायमान झाला नाहीं असा कोण आहे? अस्तु. तर वाचकांस क्षणभर मोहून टाकणारीं अशी स्थलें आनंदतनयाच्या काव्यांत मधूनमधून अनेक आहेत. याच कारणास्तव आम्ही असें म्हणतों कीं, आनंदतनयाची कविता ही आमच्या हरिदासांची अन्नदात्री होय. या कवितोद्यानांतील मकरंद हा हरिदासांच्या हातीं ऐहिक जीवनकलहशमनाचे आणि पारलौकिक सुखसाधनाचे जे अनेक उपाय आहेत त्यांतील एक आहे.

येथें एका मोठ्या प्रश्नाचा विचार कर्तव्य आहे. तो प्रश्न हा कीं, 'आनंदतनय अरणीकर शोभवि कवन फार यमकांहीं' असा जो उद्गार पंतांनीं 'सन्मणिमालें'त काढला आहे त्याची व्यवस्था काय करावयाची? या प्रश्नाचा उलगडा थोडक्यांत करून हें प्रकरण पुरें करूं. आनंदतनयाच्या उपलब्ध काव्यांचें अवलोकन केलें तर त्यांत प्रास, अनुप्रास, यमक इत्यादि शब्दालंकारांची गर्दी उडाली आहे असें जरी आढळत नाहीं तरी त्यांचा भरणा बराच आहे. दोन अक्षरांपासून सात अक्षरांपर्यंत यमक साधला आहे अशीं पद्यें अनेक आढळतात, आणि त्यांतही यमक साधण्यासाठीं शब्दांची आणि त्यांबरोबर अर्थाची फारशी ओढाताण केली आहे असें म्हणवत नाहीं. पद्य 'पायां नमीं, देइन वंशसारा' (पृ० ३ श्लो० २३) हें एकादशाक्षरात्मक यमकाचें उत्तम उदाहरण आहे. यांत प्रथमचरणाची द्वितीयांत आणि तृतीयाची चतुर्थांत यथाक्रम आवृत्ति आली आहे. आनंदतनयानें अनुप्रासांची मात्र बरीच गर्दी उडवून दिली आहे असें वाचकांस वाटल्यावांचून राहणार नाहीं. तूं, ला, टी, डे, डा, के,

ति, र्णा, भी, ट, था, रो, इत्यादि अक्षरांची आवृत्ति वारंवार ज्यांत झाली आहे अशीं उदाहरणें याच्या काव्यांत विपुल आहेत. यावरून पंतांच्या म्हणण्याची प्रतीति बरीच येते. आतां याचीं कांहीं काव्यें अनुपलब्ध असावींत, असा जो संशय आम्ही घेतला आहे, तो जर खरा असेल आणि त्याप्रमाणें पंतांच्या काळीं उपलब्ध असून सांप्रत अनुपलब्ध असलेलीं काव्यें जर पुनः उदयास आलीं, तर पंतांचें विधान अक्षरशः सत्य होण्याचा संभव आहे. 'या महीमंडळीं' इत्यादि पद्य (पृ० ३१ श्लो० २८) हें निर्यमक आहे.

**भाषा**—**आ**नंदतनयाची भाषा सरस आणि प्रौढ आहे, तथापि कोठें कोठें थोडीशी अव्यवस्थित आहे. आमच्या कवीस प्रौढपदरचनेची बरीच आवड असल्यामुळें त्यानें आपल्या कृतींत मोठमोठ्या संस्कृत शब्दांची आणि लांबलांब समासघटित पदांची योजना बरीच केली आहे. तथापि त्यायोगें सरळपणास धक्का पोंचला आहे अशी शंका कोणी अभिज्ञ वाचक घेईल असें वाटत नाहीं. जुने अप्रसिद्ध शब्द आणि शब्दांचीं जुनीं रूपें ज्यांत नाहींत असें त्याचें एकही काव्य आढळावयाचें नाहीं. 'जिर्णता,' 'प्रणियला,' 'भोजे,' 'दिठीं,' 'पर्णितां,' 'लाहो,' 'शेखीं,' 'दीधला,' 'खेंव,' 'लाधला,' इत्यादि जुने शब्द आणि रूपें बरींच सांपडतात. 'वैश्वानरू', 'धर्मेकरू' अशीं अकारांत नामांचीं उकारांत रूपेंही क्वचित् दृग्गोचर होतात. ज्या जुन्या कर्मणिरूपांचा प्रचार **मु**कुंदराज आणि **ज्ञा**नेश्वर यांच्या ग्रंथांशिवाय अन्यत्र फारसा पाहण्यांत येत नाहीं तीं रूपें—'वदिजे,' 'आज्ञापिजे,' 'कथिजे,' 'वर्षिजे,' 'तारिजे,' 'पाचारिजे,' इत्यादि—या कवीच्या ग्रंथांत अनेक स्थलीं योजिलेलीं आहेत. **आ**नंदतनयाच्या काळीं **य**वनांचें प्राबल्य या देशांत असल्यामुळें त्यांच्या राज्याधिकाराच्या प्रसाराबरोबर ओघाओघानें **म**राठीभाषेंत व्यवहाररूढ झालेले **आ**रबी किंवा **फा**रसी शब्द—'सवदा,' 'हवेल्या,' 'वजीर,' 'तमाशा,' 'हैराण,' 'मजूर,' 'पैजार,' 'जामानिमा,' इत्यादि—प्रस्तुत कवीच्या कृतींत अनेक स्थलीं दृग्गोचर होतात. याप्रमाणें याच्या वाणींत स्वदेशीय आणि परदेशीय शब्दांचा आणि जुन्या आणि नव्या शब्दरूपांचा भरणा आहे. याच्या भाषेंत मोठा दोष म्हटला म्हणजे भाषेच्या शुद्धतेकडे दुर्लक्ष. पण ज्याकाळीं त्यानें काव्यरचना केली त्याजकडे विचारपूर्वक दृष्टि पुरविली असतां या दोषाचें महत्व बरेंच कमी होतें. महाराष्ट्रकविमंडळांत **मो**रोपंतांशिवाय कोणताही अन्य कवि घेतला, तरी त्यानें भाषेच्या शुद्धतेकडे लक्ष दिलें आहे असें दिसून येत नाहीं. **आ**नंदतनयाला **सं**स्कृत

भाषा चांगली येत होती असें दिसतें, तसेंच त्यास हिंदीचेंही बरेंच ज्ञान असावें, तेव्हां हा दोष त्याला सहज टाळितां आला असता. पण टापटिप, टाकठिकी, बेतबात यांजकडे सूक्ष्म दृष्टि देऊन मुद्देसूद संगतवार मजकूर लिहिणें,—हा जो कारकुनी बाणा,—त्याचा अभाव आमच्या भाविक महाराष्ट्रकविजनांच्या ठायीं बराच असल्यामुळें त्यांच्या कवितावधूचें स्वरूप जितकें साजरें उतरावें तितकें सर्वत्र उतरलें नाहीं. कवितावधूची स्थिति तरी कांहींशी पतिव्रतेसारखीच म्हणावयाची. तिचें सगळें लक्ष पातिव्रत्याकडे असतें, त्यामुळें तिचा ओंचापदर फारसा टेकटेकीचा नसतो—किंबहुना गलबलीत असतो—त्यामुळें सामान्य सुरूपतुष्ट जनांस ती दर्शनीय वाटत नाहीं; परंतु, पातिव्रत्यभक्तांस, तो गबाळेपणा दोषरूप असा दिसत नाहीं, एवढेंच नव्हे, तर त्या गबाळेपणानेंच त्या पातिव्रत्यास विशेष शोभा आल्यासारखी त्यांस दिसते. तसें अर्थाच्या मार्मिक भोक्त्यांस ह्या बाह्य टापटिपेची फारशी पर्वा नसते आणि तें पुष्कळ अंशीं खरें वाटतें. कवितेच्या बाह्य सौंदर्याकडे आमच्या कविजनाचा ओढा फारच कमी दिसतो. शब्दशुद्धि नसो, छंदोभंग होवो, प्रयोग बिघडो, दूरान्वय होवो, सरासरी अर्थबोध झाला म्हणजे आपलें काम झालें असें एकंदर महाराष्ट्रकवींचें धोरण दिसतें. या कारणास्तव वृत्तसुखार्थ न्हस्वाचें दीर्घ आणि दीर्घाचें न्हस्व, असंमत समास म्हणजे प्राकृत आणि संस्कृत शब्दांचा समास, शब्दांची ओढाताण करून रूप बदलणें, इत्यादि दोषात्मक प्रकार आनंदतनयाचे ग्रंथांत आढळतात. निदान त्यांजकडे जितकें लक्ष पुरविलें पाहिजे होतें तितकें त्यानें पुरविल्याचें दिसत नाहीं. 'बाहूबळें,' 'करांबूजें,' 'यमूनाजळीं,' 'कपीकरमुक्त,' 'दितीज,' 'सूपुत्रपणें, 'समिप,' 'करिणिसंग,' 'रघुविर,' 'प्रितीनें,' 'अनन,' अशांसारखीं ओढाताण करून बनविलेलीं रूपें अनेक सांपडतात. 'शक्तीहिना,' या एकाच उदाहरणांत उभय दोष दृष्टीस पडतात. कित्येक स्थळीं याहूनही भिन्न प्रकार आढळतो—'स्मरशुनि,' 'हरषुनि,' 'वरुषति' इत्यादि. 'भवसागरडोहीं, 'भवचाकीं' 'सत्कर्मधर्माथिला,' यासारख्या समासघटितपदांचें दर्शन मधून मधून होतेंच. क्वचित् स्थलीं संस्कारहीनत्व हा दोषही दृष्टोत्पत्तीस येतो. ज्या पदांस व्याकरणाच्या नियमाप्रमाणें संस्कार झाला पाहिजे त्यांस तसा संस्कार न करतां त्यांचा प्रयोग केला आहे अशीं उदाहरणें—'शशिआननानें' 'भयअन्त'—आढळत नाहींत असें नाहीं. संस्कृत भाषेच्या नियमाप्रमाणें सामासिक शब्दांचे संधि करणें आवश्यक आहे, पण तसें न केल्यामुळें संस्कारहीन अशा शब्दांची योजना

झाली आहे. छंदोभंग झाल्याचीं उदाहरणेंही अनेक आहेत. अश्लीलत्व, ग्राम्यत्व, अप्रयोजकत्व, क्लिष्टत्व, इत्यादि दोष मात्र सांगण्यासारखे आढळत नाहींत. **आ**नंदतनयाच्या भाषेंत इतका दोषावह भाग आहे, तथापि तो क्षम्य आहे. कारण त्याची कविता अशी दोषग्रस्त असली तरी ती आज २००।२५० वर्षे हरिदासांच्या आणि त्यांच्या श्रोतृमंडळाच्या सप्रेम आदरास, समाधानास आणि मनोरंजनास साधनीभूत झाली आहे. दुसरें असें कीं, हा दोषाविष्कार प्रकार प्रस्तुतच्या मराठी भाषेच्या स्थितीकडे पाहून केलेला आहे ही गोष्ट अगदीं विसरतां कामा नये. वास्तविक प्रकार असा आहे:—मराठी भाषेला जें कांहीं हल्लीं पात्रत्व आलें आहे त्या पात्रत्वाला कारण हे प्राचीन कवि होत. हे कवि हे कुलाल होत व मराठी भाषा हें पात्र होय. तेव्हां आव्यांतून तावून सुलाखून निघालेलें व जिल्हई केलेलें भांडें हातीं घेऊन त्याची व निरनिराळ्या अवस्थांतून जात असलेल्या कच्च्या अशा भांड्याची तुलना करून त्या कुलालास दोषी ठरविणें अप्रशस्त आहे. वास्तविक त्याची तारीफच केली पाहिजे, कारण त्यानें निष्काम श्रम केले म्हणून नुसती मृत्तिका पात्रत्वाच्या धोरणास लागली. या दृष्टीनें पाहिलें तर **आ**नंदतनयादि कवींचे व्याकरणविषयक दोष दोषरूप नसून गुणरूप आहेत व महाराष्ट्र भाषेचीं रूपें कशीं बदलत गेलीं हें दाखविण्यास अत्यंत अनुकूल साधनें आहेत व म्हणूनच अभिनंदनार्ह आहेत.

**विद्वत्ता—आ**नंदतनय हा भाषापंडित होता असें जरी म्हणतां येत नाहीं, तथापि त्यास **म**राठी, **सं**स्कृत, आणि **हिं**दी या भाषा इतक्या चांगल्या अवगत होत्या, कीं त्या भाषांत काव्यरचना करण्यासारखी त्याच्या आंगीं निपुणता होती. प्राकृत काव्यांत अनेक ठिकाणीं योजिलेलीं लांब लांब समासबद्ध पदें पाहून त्याचें संस्कृतभाषाज्ञान चांगलें होतें, असें कोणीही कबूल करील. 'किसलयसमकरकमलरुचिरपदकुवलयदलनिभ नयनयुगलें,' 'परमदृढ**मृ**डकोदंडचंडाभिमानखंडपांडित्य,' 'अद्भुतनाद्यकोलाहलवेणुवीणादिवादनविलास,' 'तर्कव्याकरणादिनाटककलालंकारशास्त्रांतरीं,' 'निजनिटिलनयननिर्गतज्वलनज्वालाभस्मीकृतस्मरा', यासारखे सामासिक पदसमुदाय आणि विशेषतः चूर्णिकेंत संनिविष्ट केलेले मोठमोठे शब्दसमूह हे **आ**नंदतनयाच्या भाषाज्ञानाची उत्तम साक्ष देतात, असें म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. कित्येक पदें आणि '**सी**तास्वयंवर,' '**उ**मा**र**मासंवाद,' **शि**बिचक्रवर्त्याख्यान,' '**मा**र्कंडेयाख्यान,' इत्यादि काव्यें यांचें सूक्ष्मदृष्ट्या परीक्षण केलें असतां, त्यास महाराष्ट्रभाषेचें मर्म कितपत कळत होतें याचाही निर्णय

होतो. त्याला भाषेप्रमाणें शास्त्राचें आणि व्यवहाराचें चांगलें ज्ञान होतें. यामुळें त्याच्या स्वाभाविक काव्यरचनाबुद्धीस उत्तम साहाय्य झालें. त्याचा छंदःशास्त्राशीं चांगला परिचय होता. संस्कृत भाषेंतील प्रचारांत असणाऱ्या अनेक गणवृत्तांत त्यानें काव्यरचना केली आहे. संस्कृतांतील छंदांप्रमाणें महाराष्ट्रभाषेंत—इंद्रवज्रा, उपेंद्रवज्रा, शालिनी, स्रग्धरा, स्वागता, तोटक, स्रग्विणी, पंचचामर, मालिनी, पृथ्वी, द्रुतविलंबित, वसंततिलका, शार्दूलविक्रीडित, इत्यादि लहान मोठ्या अक्षरगणवृत्तांत मनोहर कविता प्रथमतः रचण्याचें आणि तद्द्वारा महाराष्ट्रभाषेच्या आंगीं संस्कृत भाषेचा डौल आणून तिला तिच्या जोडीस बसविण्यासाठीं प्रथम यत्न केल्याचें श्रेय आनंदतनयासच आहे. यावरून महाराष्ट्रभाषेवर आणि तदनुषंगें महाराष्ट्रीयांवरही त्याचे स्मरणीय उपकार झाले आहेत. दुसरें, केवळ प्राकृत कवितेंत मात्र येणारे सुप्रसिद्ध छंद—ओवी आणि दिंडी--यांचाही यानें आदर केला आहे. जशी याला छंदःशास्त्राची ओळख होती, तशीच अलंकारशास्त्राचीही ओळख असावी, असें दिसतें. याच्या कृतींत सरळ वाक्यरचना, अर्थाची सुबोधता, शब्दांची प्रसंगोचित योजना इत्यादि गुण चमकत आहेत, हें मार्मिक वाचकांच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. उपमा, स्वभावोक्ति, वगैरे अगदीं साध्या व प्रसंगानुरूप आहेत. कविसंप्रदाय, ज्यांस 'कविसंकेत' असेंही म्हणण्याची रूढि आहे, व जे मोठमोठ्या काव्यांत आढळतात, त्यांचा अंगीकार प्रकृत कवीनें केला आहे. प्रस्तुत कवीला लोकव्यवहाराचेंही ज्ञान चांगलें होतें या म्हणण्यास आधार 'सीतास्वयंवरां'त, 'मार्कंडेयाख्यानां'त आणि 'उमारमासंवादां'त चतुर वाचकांस पुष्कळ सांपडेल. सारांश भाषा, शास्त्र आणि व्यवहार यांत आमचा कवि बराच निपुण होता, असें दिसून येईल.

आनंदतनयाच्या तर्फे या ठिकाणीं आणखी एका गोष्टीचा विचार करणें अवश्य आहे. ती ही कीं, आनंदतनयानें प्राकृतांत अक्षरगणवृत्तात्मक काव्यरचना करण्याची सुरवात केली. त्याच्यापूर्वी अशा प्रकारची काव्यरचना कोणी केल्याचें फारसें दिसत नाहीं तेव्हां हा त्याचा महाराष्ट्रभाषेवर मोठा अनुग्रह होय. कित्येक हा मान मुक्तेश्वरास देऊं पाहतात. मुक्तेश्वर हा कालमानानें पाहतां आनंदतनयाच्या नंतरचा, तेव्हां तो मान त्यास प्राप्त होणें वस्तुगत्या अशक्य होय. एक तर मुक्तेश्वराचें 'रामायण' जरी अनेकवृत्तात्मक आहे, तरी त्यांतील वृत्तांची संख्या आनंदतनयाच्या काव्यांतील वृत्तांच्या संख्येपेक्षां कमी आहे, आणि दुसरें असें कीं मुक्तेश्वराचें अक्षरगणवृत्तात्मक कवितारचनाकौशलही पुष्कळअंशीं आनंदतनयाच्या बरोबरीचें नाहीं. तेव्हां कालमान

आणि गणवृत्तयोजनाचातुर्य यांजकडे लक्ष देऊन अक्षरगणवृत्तें महाराष्ट्रभाषेंत उतरण्याच्या संबंधानें अग्रपूजेचा मान **आ**नंदतनयासच दिला पाहिजे.

**आ**नंदतनयाच्या कवितेविषयीं येथवर जें विवेचन केलें त्याजवरून त्या कवीविषयीं आमच्या समजुती काय झाल्या आहेत आणि त्याच्या कवितेची योग्यता आम्ही किती समजतों हें अभिज्ञ वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. आतां हें गुणदोषदर्शक विवेचन अपुरें असेल, यांतील प्रतिपादनाची दिशा कोठें चुकली असेल, यांत कमज्यास्त करण्यासारखें पुष्कळ असेल, 'भिन्नरुचिर्हि लोकः' या न्यायानें कोठें कोठें रुचिभिन्नत्वामुळें मतभेद पडेल—हें सर्व आम्ही जाणून आहों. पण आरंभीं निर्दिष्ट केल्याप्रमाणें प्रस्तुत कवीविषयीं आम्हांस जें कांहीं वाटतें त्याचें हें छोटेसें टांचण येथें सादर केलें आहे. तेव्हां या लेखांत जें कांहीं गैर दिसेल तें काढून टाकून याची दुरुस्ती करावी अशी आमची इच्छा आहे. यास्तव ज्या कोणास यांत कांहीं सदोष अथवा गैर दिसेल तें त्यानें कृपापूर्वक मनांत यत्किंचित् ही संकोच न धरतां आम्हांस कळवावें अथवा छापून प्रसिद्ध करावें म्हणजे त्याचा उपयोग आम्हांस अथवा भावी महाराष्ट्रकविचरित्रकारास होण्याचा संभव आहे. जशी **पं**ताच्या मधुर वाणीनें या लेखाची सुरुवात केली तशी त्यांच्याच वाणीनें विद्वज्जनांस सविनय सूचना करून या लेखाची समाप्ति करतों. सूचना म्हणून इतकीच कीं—

'पुरुषाचा धर्म भ्रम म्हणून कांहीं पडेल येथ उणें, ।
पूर्ण करावें शोधुनि [आशय जाणोनि] सज्जनें निपुणें. ॥'

**मोरोपंत**—'भगवद्गीता.'

# आनंदतनयकृत काव्यें.

## रामचरित्रांतील आख्यानें.

### विश्वामित्राभिगमन.

(चूर्णिका.)

श्रीमत्सूर्यवंशसंभवभूपालमस्तकिंचा मध्यमेरुमणि, दीनमनोरथसंपत्तिपूरक चिंतामणि, भक्तभयापहारी, शमदमविलसितमुनिजनहृदयसदनविहारी, त्रिभुवनजनसुमतिनयनप्रतिबद्धकारण, निबिडतरदुरिततिमिरें[1] हरावया, परम दुर्मदरक्षोवृंदाचिया, प्रतापतपनस्पर्शमुकुलितसुरमनकुमुदावरि ज्योत्स्नो[2]ज्जृंभण कराया, क्षीरार्णवापासुनी, पूर्वदिशोदरीं श्रीराम चंद्रापरी, दशरथगुणसमुद्रापासुनी, कौसल्यागर्भगुहेमाजी अवतरला. ॥ १

नेणो तें वि[3]बुधविभवभांडार प्रकटलें, कीं मनोहर मनुजाकृति सहस्रकरसहस्रतेज गोठलें, कीं किसलयसमकरकमलरुचिरपदकुवलयदलनि[4]भनयनयुगलें, अतिमृदुपदतळ झळझळ तळपति, किळ बहुविधमणिगणखचित मुकुटतटी, छतपटविलसितकटी, सकळिं हि अवयविं नग झगझगिती, मघमघित विराजिती माळा, ऐशिया श्रीपुरुषोत्तमाला, अंकीं घेउनि खेळवी दशरथभूपाळ देवआगळा, मोक्षासि अटकरूप तुटली पुन्नामनरकींची अर्गळा, आनंदसमुद्रीं संक्रीडत घडिघडि रोमांच विजृंभती. ॥ २

तों कोणेके अवसरीं, कनकनिकेत[6]नामां[7]झारी, जैसा द्विजगणांमाझारि क[8]ळाधरू, कीं पद्मिनीस्तो[9]मगणीं होय स[10]हस्रकरू, कीं भू[11]भृत्कुलीं निजृंभमाण हे[12]मधराधरू, दशरथ पृथ्वीवल्लभ लखलखित सिंहासनारूढ विराजे. ॥ ३

(श्लोक.)

तों, आकस्मिक तीव्र सेवक सभाप्रांतीं, नृपा वंदुनी,
वार्ता सर्व निवेदिती द्रुतगती, गा[13]धेय आला मुनी. ।
पायीं वाजति पादुका चटचटां; आपादमाथां जटा;
वाटे धू[14]र्जटि पातला; दशरथें तो देखिला भूतटा. ॥ ४

---

१. अंधकार. २. चांदणें. ३. देव. ४. सदृश. ५. प्रकटती. ६. गृह. ७. आंत. ८. चंद्र. ९. समूह. १०. सूर्य. ११. पर्वत. १२. मेरु. १३. गाधीचा पुत्र. (विश्वामित्र.) १४. शिव.

(अश्वधाटी.)

माला करीं, हृदयभालासि तें भसित, ज्याला मृगाजिन कटीं;
लोला जटा रुळति डोला परी, परम कोलाहल ध्वनि उठी; ।
लीला अशी, म्हणुनि नीलालका सुकृतशीला तयासि नमिती;
आला मुनी निजघराला म्हणूनि, मग झाला पुढें नरपती. ।। ५
पांटीर हेममय वाटींत घे, विनय ताटीं फळें फुल जळें;
हाटीं च, रत्नमय पाटीं, मुनीसपरिपाटी पुजी करतळें; ।
दाटी सहीत अग्रवाटीं अणूनि च, ललाटीं पुजी करतटीं;
थाटी च ये स्तुति च साठीं, उदारतर भाटीं च भूप निकटीं. ।। ६

(चूर्णिका.)

त्यानंतर वदनाभिरामवदनारविंदविलोकनपरिपूर्णमनोरथ, राय दशरथें कर्पूरकुसुमसुगंधगंधाक्षतकेसरादि परिमलद्रव्य, नानामुक्ताफलादि सुवर्णद्रव्य, परमपवित्र विचित्रचरित्र विश्वामित्र षोडशोपचारें पूजिला. ।। ७

जोडोनि करतल, सुरसरिताजलविमलहृदय अजतनय सविनय पुसे, 'काय आज्ञा, अगा हे मुनिकुलप्राज्ञा! भूतभविष्यवर्तमानत्रिकालज्ञा! निगमागमसारपारज्ञा! जी जी सकलराजसंभारअगणिततुंगतुरंगमत्तमातंगसौधमंडित चतुःसमुद्रवलयांकित भूमी, हा विषय आपुला जी स्वामी! मज दासाप्रत सांप्रत मनोरथ प्रकटिजे'. ।। ८

(दिंड्या.)

'ऐक राया! सौभाग्यघनाकाशा! अम्हां काशासी दारधनीं आशा? ।
काय योगी गुंतती मोहपाशा? जिहीं वरिल्या संपत्ति अविनाशा. ।। ९
सौध सद्में आम्हांसि पर्णशाळा; स्फटिक रुद्राक्षा मुक्तमणीमाळा; ।
भस्म अंगीं पाटीर योगियाला; उणें केवीं वैराग्यवैभवाला? ।। १०
ऐक माझा वृत्तांत महीपाला! राक्षसांचा यज्ञांत उठे पाला. ।
विघ्न करिती मोडून यज्ञशाला; येथ आलों यालागिं धीविशाळा! ।। ११
यज्ञ रक्षाया दक्ष तुझीं बाळें; राक्षसांतें शासिती बाणजाळें. ।
यागसिद्धी होईल शीघ्रकाळें; ऋषी होती संतुष्ट अल्पमाळें. ।। १२
करूं शिकतिल त्वत्तनय सुसंग्रामा; कीर्ति शोभा येईल रामग्रामा. ।
पुन्हा येतों घेऊनि राम ग्रामा; पूर्णकामा कल्याणगुणग्रामा'. ।। १३

१. भस्म. २. हरणाचें चर्म. ३. चंदन. ४. दशरथ. ५. वेदशास्त्र. ६. हत्ती. ७. गच्ची. ८. गृह. ९. मोती. १०. समूह. ११. बुद्धि. १२. अल्पानें. १३. गांव. १४. समूह.

'पुत्र द्यावा' हा शब्द पडे कानीं; खेद मोठा भूपाळ मनीं मानी. ।
शून्य मानी त्रैलोक्य राजधानी. 'काय मागा? हे थोर गमे हानी. ॥ १४
तपें केलीं निःपाप मुलांसाठीं म्यांहि संवत्सर सहस्र शतें साठी. ।
गुणीं[1] योजूं नेणती चापकोटी; राक्षसांशीं भांडतां लक्षकोटी.' ॥ १५
म्हणे, 'जी! जी! सर्वज्ञ! तपोरासी! कसे देऊं या सांग किशोरासी[2]? ।
नाहिं केला अभ्यास धनुष्याचा; मार्ग नेणे कीं मंत्ररहस्याचा.' ॥ १६
कथा ऐशी भूपाळ वदे कांहीं, 'मीचि येतों भीडण्या बळें बाहीं. ।
वाहिनींचा[3] संभार सुखें पाहीं. विघ्न हरती संदेह दुजा नाहीं. ॥ १७
**रा**म नेदीं.' म्हणवोनि मुनीनाथा; पदें **सा**केताधीश नमी माथां. ।
उठे कोपें **गा**धेय 'तूज गोथा' म्हणे 'राया! निःसत्व वृथा चोथा. ॥ १८
माग आधीं बोलोनि सरे मागें, भूप ऐसा देखिला नाहिं मागें. ।
सुखें नांदें सूपुत्रपणें रागें.' करी डोळे विस्तीर्ण महारागें. ॥ १९

(श्लोक.)

'कशासि आम्हां धनवस्त्रभूमी? निष्काम निर्धूतभव प्रभो! मी. ।
केला मखीं[4] घोर निशाचरांनीं[5]; आलों कराया न निशा च रानीं. ॥ २०
अंभोजेक्षण[6], **राम**लक्ष्मण, तुझे हे, दक्ष रक्षोगणा
शिक्षाया, शत लक्ष लक्ष करिती एक्या क्षणीं मार्गणा. ।
हे द्यावे मज लक्षलक्षणनिधी संरक्षणाकारणें,
कांक्षे[7] नेर्घ[8] सपक्ष ही क्षितिपती त्वत्क्षात्र संरक्षणें. ॥ २१

(सवाई.)

केवळ हे सकुमार कुमार, बहू रजनीचरभार[9] वनीं;
युद्धमखीं रिपु वध्य न यांसि, असाध्य अबोध्य तिहीं भुवनीं; ।
नेणति हे परलोक, विलोक न कोकनदा[10]सम पाणिपदें;
वंशि तुझ्या अवतंस[11] मुलें, मज संशय हा चि कसा न वदें. ॥ २२

(श्लोक.)

पायां नमीं, देइन वंशसारा[12]; पा यां न मी दे इनवंश[13] सारा. ।
न या वयामाजि[14] भला जनां दे. न यावया मी[15] जिभ लाज ना दे.'॥ २३

---

१. दोरी. २. बालक. ३. सेना. ४. यज्ञांत. ५. राक्षसांनीं. ६. कमलनेत्र. ७. शंकेस. ८. घेऊं नको. ९. समूह. १०. कमल. ११. भूषण. १२. उत्तमांश. १३. सूर्यवंश. १४. वयामध्यें. १५. 'न'कार.

दशरथ नृप बोले 'राम नेदीं कदापी.'
मुनिवर मग बोले; कोपला तीव्रतापी. ।
'बहुत बहु बरें गा ! तूं सुखी पुत्रदारा-
सहित सदनिं नांदें सूर्यवंशीं उदारा!' ॥ २४
वचन वदुनि ऐसें, चालिला चार पांडें;
तंव भुमिरव झाला, फूटलें जेंवि भांडें. ।
जलधिसहित मेरू आणि भूकंप झाला;
कुलगुरु नृपगेहा तीव्र धांवोनि आला. ॥ २५

(दिंडी.)

'बरें येतों' म्हणवोनि उठे, चाले; तदा झाला भूकंप, धरा हाले; ।
वसिष्ठादी धांवोनि ऋषी आले; 'कासया हे उत्पात नृपा! झाले?' ॥ २६

(श्लोक.)

वसिष्ठ बोले, 'न पडें अपायीं. द्यावीं मुलें शीघ्र, पडोनि पायीं. ।
हा कोपल्या जाळिल लोक सारा. कां नेणसी भूपति नीतिसारा?' ॥ २७

(दिंड्या.)

ज्ञानदृष्टी पाहोनि म्हणे, 'राया! भाव नेणें हो मनीं मोह माया. ।
रामचंद्रा देवोनि पडा पायां. विजयि तेणें होईल नव्हे वायां. ॥ २८
पुत्र देईं गाधेयकरीं आधीं. समाधानें कार्यार्थ बहू साधीं.' ।
गुरुवाक्यें परिसोनि सर्वसाधी; कौशिकातें भूपाल समाराधी. ॥ २९
रामसौमित्री वीर चापपाणी पदीं मुनिच्या लागती सौख्यखाणी. ।
ऋषी झाला सानंद सभास्थानीं. नामघोषें आनंदतनय वानी. ॥ ३०

---

## ताटकावध.

(श्लोक.)

रघुपती दिधला मुनिकारणें सह सुमित्र दुजा, अवधारणें. ।
मग नरेंद्र म्हणे, 'ऋषि कौशिका ! उभयतां प्रतिपाळ किजे निका.' ॥ १
'नमुनि मुनिपदातें, लक्ष्मणा आणि रामा,
सरस यश वराया, देइं लोकाभिरामा. ।

---

१. दुःखी. २. पूजी. ३. वर्णी, ४. चांगला.

तनय नय[1]गुणाचे शीघ्र घेवोनि येतों'.
सकृप नृप उठावे लोक सारा पहातो. ॥ २

धांवतां नृपति तीव्र गती घे. लागती मुनिपदाप्रति तीघे. ।
दीधला **द**शरथें सुत भावें. हांसला मग मुनी अनुभावें. ॥ ३

आनंदे मुनिवृंद सुंदर जयध्वानें[2] **अ**योध्यापुरा
आशीर्वादुनि, साधु साधु वचनें, आले तदा गोपुरा. ।
वाद्यें वाजति भेरि दुंदुभि; सभासद्मीं[3] गुढ्यातोरणीं;
नारी आरति आरत्या करिति त्या, जैशा **र**तीधोरणी. ॥ ४

संफुल्ल मल्लिका[4]पुष्पें हर्षें वर्षति सुंदरा ।
भाट[5] आधाट भाटी वा(?) भासती भव्य भूवरा. ॥ ५

थोपितां मुनिवरें सहसा रे, राहिले नृप जनादिक सारे. ।
चालिला त्यजुनि दूर **अ**योध्या. शौर्यमंडित समागमिं योद्धा. ॥ ६

जातां नीट, अचाट दाट अटवी वाटे दिठीं[6] लक्षिती;
पक्षिश्वापद कूट थाट नटती, बोभाटती, लक्षिती; ।
सिंह व्याघ्र वृकादि[7] सूकर[8] मृगें दंती[9] दरी राहती.
वृक्षीं पक्षि सहस्र लक्ष फिरती, हे कौतुकें पाहती. ॥ ७

दोघां **दा**शरथींस चालत पथीं शस्त्रास्त्रविद्या कथी.
जेणें चंड रथी रिपूस उलथी, पृथ्वी करी पालथी; ।
झाले शिक्षित वीर दीक्षितमुखें, तोषोनि, त्या कौतुका,
पायां वंदिति चापपाणि मग ते, शिष्यांसवें, देशिकां[10]. ॥ ८

एवं **रा**म, मुनींद्र, **ल**क्ष्मण, तिघे गांभीर्यलीलागती
जातां, कौतुक एक अद्भुत दिसे; पक्षी नभीं लागती. ।
स्वैर श्वापदसंघ[11] धांवति भयें, दंती दिगंताप्रती
जाती, लंघिति काननीं, 'कवण हा कोल्हाळ जी संप्रती ?' ॥ ९

'वारा कां सुटला ? निनाद फुटला ? कां देश बोभाटला ?
मेघाच्या पटलापरी उमटला पांशू[12] नभीं दाटला ?' ।
बोले **रा**म मुनीसि, पाय नमुनी, 'आज्ञा करा नेमुनी;
काळातें दमुनी, न सोडिन शरा क्षेमस्थिती कां मुनी ? ॥ १०

१. नीति. २. ध्वनीनें. ३. गृहीं. ४. मोगरी. ५. स्तुतिपाठक. ६ दृष्टीनें. ७. लांडगा. ८. डुकर. ९. हत्ती. १०. गुरु. ११. समूह. १२. धुरळा.

ऐशी व्याकुळ वाट कां ? मुनिवरा ! हे धांवती थाट कां ?
मोठा घोर अचाट काननतटीं वंश क्षिती दाट कां ?' ।
'रक्षोरूप जुनाट कामिनि[1] फिरे, साधूजनीं कंटका;
ऐकें चिन्मयनाटका रघुपती ! आली दिसे ताटका'. ॥ ११
वार्ता ऐकति रामलक्ष्मण अशी, तों धांवली कर्कशी
घोराकार, करालदंष्ट्रवदना, तद्दृष्टि बालार्कशी. ।
हाडांच्या अ[2]ळुमाळ डोलति गळां माळा, कटीं कांबळा;
जिव्हा लोळतसे मुखीं लळलळां, येते धरोनी बळा. ॥ १२
दंतीं चावित सिंह कुंजर मृगें, हातीं कितेकां धरी.
पातीं झांकुनि ऊघडी घडिघडी, माती कै[3]चाग्रांवरी. ।
कोरांकाटलिया मुखीं कटकटा, ढोरांचियां शोणितें
घोरावेशशरीर एक नटली, थोरा भया आणिते. ॥ १३
बाळें देखुनि रामलक्ष्मण, पुढें चाटी अवाळेपरी;
हुंकारी, क्षण हा करीत, तंव ते वाढे, उडे अंबरीं. ।
अट्टाहासुनि, मट्ट मट्ट करिते, श्रीरामसंघट्टणीं
धांवे, तों क्षितिकंप, हा रव उठे देवांचिये पट्टणीं. ॥ १४
येतां सन्मुख राक्षसी लघुलघू, क्ष्मा[4]पालवंशाग्रणी
क्रोधें दुर्धर वीर राम उठला, शिक्षावया तत्क्षणीं. ।
तूणीं बाण गुणीं धरोनि सहसा, कर्णांत आणी, रणीं
हाणी, तों धरणीवरी उलथली, उत्साह धा[5]ता गणी. ॥ १५
लागतां हृदयिं बाण खणाणा, ताटका उलथली च दणाणा; ।
त्या ध्वनीस्तव रवींदु गळाले; यक्ष राक्षस पिशाच पळाले. ॥ १६
नेणो कोसळला कडा, उमळला चंपद्रुमांचा थवा;
किंवा वज्रनिपातपर्वततटीं मानी मनीं माधवा. ।
होतां हृद्गत राम बाण, मिरवे मानें विमानावरी;
शोभे दिव्य शरीर, भव्य वचनीं रामस्तुती आदरी. ॥ १७
केव्हां कोठुनि घेतला शर करीं, केव्हां गुणीं योजिला;
केव्हां वोढुनि घातला चि न कळे, कीं वेगळा दाविला. ।

---

१. स्त्री. २. विस्तृत. ३. केंस. ४. राजा. ५. ब्रह्मा.

गेला सायक, पावकासम फिरे, तूणीमधें संचरे.
शौर्या साधुनि आर्यकार्य बरवी दासा स्थिती आचरे. ॥ १८
'हो जी ! शोभत तूज राजरमणा ! हो क्षेम या सायका.
हो कल्याण सदा तवांघ्रिकवचा, **रामा** ! **रमानायका** ! ।
हो जी ! मंगल संगरांगणतटीं या बाहुदंडद्वया.
आशीर्वाद वदे असा मुनि तया सच्चिद्धना अद्वया. ॥ १९
केला जयध्वनि नभीं तयिं निर्जरांनीं, वर्षाव फुल्लसुम निर्भर जर्जरानीं. ।
थोवे मुखें स्तविति गर्जुनि सज्जनांचे; **आ**नंदनंदन कवी मग सज्ज नाचे. ॥ २०

## विश्वामित्रयज्ञरक्षण.

(श्लोक.)

त्यानंतरें मुनि म्हणे, 'विजयाभिरामा ! आतां चला निजपथेंचि विपद्विरामा. ।
यज्ञाविना दिवस विप्र न ते सहाती. सिद्धाश्रमीं सकळ वाट तुझी पहाती. ॥ १
निष्कंटका वनतती भुजविक्रमानें केली, द्विषद्वधु वधूनि पराक्रमानें. ।
ऐसेचि येथुनि निशाचर ते क्रमानें मारूनि, राज्यधर हो, प्रभु! **श**क्रमानें. ॥ २
हे **ता**टिका वनमृगादिजिवांसि कांटा, होती वनीं करित भक्षुनि पाप सांठा; ।
हे राक्षसी कुलतरूंतिल एक फांटा त्वां तोडिला; तरु समग्र तुझा चि वांटा.' ॥ ३
नेली **शुं**भवधू वधूनि विलया, हे मात पैं **मा**तली
देखे दृष्टिसि, पुष्पवृष्टि गगनीं देवावली पातली. ।
गाती किंनर, कीर्ति वर्णिति मुखीं अत्युन्नता कंधरीं.
कीजे भारिव थोर वाटिव तुझी गंधर्वविद्याधरीं. ॥ ४
आली पूर्ण कळावयासि सकळां नागां मृगां हे नगा.
झाला उत्सव, ऊर्ध्व पुच्छ करुनी, जाती अगा हे नगा. ।
ऐसा दावित तोष, भावित मनीं चाले मुनी बोलतां.
'जी स्वामी !' म्हणती धनुर्धर पथीं ते चालतां चालतां. ॥ ५
तेव्हां **रा**म पुसे, पुढां वन दिठी देखोनि दूर क्षिती;
'शोभे शाद्वल, पुष्पकुड्मल-फळीं शाखा खगा रक्षिती. ।
वल्ली, गुल्म, सुफुल्ल पल्लव, तरू व्योमीं च उंचावले.
मोठें चित्रविचित्र पाहुनि दिठी आलोक लांचावले. ॥ ६

१. अग्नीसारखा. २. बाण. ३. पाय. ४. देवांनीं. ५. शुंभाची स्त्री. (ताटका.) ६. नेत्र.

या हिंडती निबिड ते मृग विप्रदेशीं; झाडातळीं घन निकुंजतरू विदेशी.' ।
'माझ्या सख्या! समज आश्रम हा च, लाहो घेती मृगादिक हि, आश्रम हा, चला हो.' ७

तोषे राघव, दोघ जे निरखिती आरण्य उत्तुंगसें;
जेथें व्याघ्रमृगें, मृगाधिपकरी, जाती, फणीमुंगसें, ।
जाती स्वैर, जनासि वैर मिळुनी प्रेमास्पदें रक्षिती.
तों येती द्विजराज सन्मुखगती त्यांतें दिठी लक्षिती. ॥ ८

जे आश्रमीं सकळ वाट पहात होते, आले मुनी जवळि, जोडुनि हात, हो ते. ।
तेजोभरें तपनरूप तपोनिधी ते, ज्याचा स्वधर्मरत शुद्ध तपोनि धीतें. ॥ ९

ते जों वंदिति गाधिनंदनपदा, त्यांच्या पदा वंदिती
राजीवेक्षण रामलक्ष्मण, तयां ते गाढ आलिंगिती. ।
ऐशीं देत, यथाविधि, प्रतिपदीं आलिंगनें, वंदनें,
जाती; तों रघुराज आश्रम दिठी पाहे, वनें पावनें. ॥ १०

कुंजीं गुंजति पुंज पुंज अलिंचे, मंजु ध्वनी गुंजती.
बर्हीं ते नटती, कपोत घुमती, त्या कोकिला कूजती; ।
हंसादि द्विज झंकृती, वृकशिवासिंहादिंच्या हुंकृती,
कुंभी भीष्कृति, सर्प फूत्कृति, वनीं तैशा च नानाकृती. ॥ ११

ऋषी सांगे, 'रामा ! बहु दिवस मी एथ चि असें;
तपें जाती सिद्धी, म्हणुनि पद सिद्धाश्रम असे. ।
महर्षी ते हर्षें तप करित सानंद वसती;
परंतु श्रीरामा ! निशिचरकुलध्वंसवसती. ॥ १२

येति संघ बहु पापजडांचे; देख हे ढिग अनेक हडांचे; ।
भक्षिलीं द्विजकुळें अवलोकीं; राक्षसीं कपटकृत्रिमलोकीं.' ॥ १३

ऐशी सांगत मात, हात धरुनी, ते पातले शालिका.
येती सन्मुख विप्र आणि सुमुखी विप्रांगना बालिका. ।
त्यांहीं, पाय धुवूनि, अर्चुनि, यथान्यायें च, नीराजना
केली राघवलक्ष्मणासि, हृदयीं आनंद-संजीवना. ॥ १४

गेले ब्रह्मसभेस, सर्व बसले, राजे महालक्षणी.
'आतां यावरि काय तें चि गुरुजी ! आज्ञापिजे ये क्षणीं.' ।
कौसल्येय वदे; तदा मुनिथवे उल्लासले ईक्षणीं.
तों गाधेय म्हणे, 'समर्थ चि तुम्हीं साधू जगद्रक्षणीं. ॥ १५

यज्ञारंभ उद्यां, सहा दिवस या कर्मा मिती, तों वरी
आम्हा लीन असा, महा नियम हा, शालाप्रवेशावरी. ।
यज्ञीं विघ्न करावया प्रगटती, त्या दुष्ट रक्षोगणा
रक्षीं, रक्षुनि धर्म, धार्मिकमती ! सज्जीं धनुर्मार्गणा.' ॥ १६

त्यानंतरें गाधिकुमार दीक्षा धरी, मखीं कर्म-शिखीसमक्षा. ।
शिक्षावया राक्षस लक्ष साठी दीक्षा धरी, रामनृपाळ मोठी. ॥ १७

रचून ते मंडप कुंड वेदी, तत्तद्विधी ज्ञाननिधी निवेदी. ।
गाधेय आधीं सुमुहूर्त साधी; आराधितां अंतरिं वृत्ति साधी. ॥ १८

व्योमीं होमसुधूम भूमि भरतां, उद्दाम वेदध्वनी
दिग्देशीं घुमला, महोत्सव भला आरंभला तद्दिनीं. ।
गेल्या पांच निशा अशा; मग दिशा, आकाश, हे मेदिनी,
आले व्यापित ते निशाचर तशा पूर्णाहुतीच्या दिनीं. ॥ १९

आला मारीच मारा करित च गगनीं, ऊर्ध्वबाहू सुबाहू,
हाहू गर्जे चमू, तों, प्रभु शर चढवी राम आजानुबाहू. ।
होतां टंकार, शंका धरिति रिपुकुळें, काळघंटा म्हणूनी
मूढा हुंकार हुंकारुनि उठति दळें, चंड शत्रू गणोनी. ॥ २०

आले वर्षत अस्थिमांसरुधिरा जों स्तोम होमावरी,
तों आधीं च सवेग मार रचुनी बाणोत्करीं सांवरी; ।
वाराही न शिरे, अणू न विचरे, ऐसा चि भारी गुरू
मांडी मंडप कांडमंडिततळीं कोदंडदीक्षागुरू. ॥ २१

आले शुंभ, सुबाहु, अन्य हि, तसा मारीच, अभ्रीं उभे.
सेना ही ककुभेमधें पसरिली, कापट्यकर्मीं दुभे. ।
खालीं, यज्ञसभेंत, सुज्ञ मुनि तो शोभे सवें वल्लभे,
कीं ज्याला न लभे चि भीति, भजतां यज्ञक्रिया दुर्लभे. ॥ २२

काळे कर्कश मेघसंघ गगनीं फांकोनि झांकोळले;
तैसे दाहि दिशा निशाचर महासंदोह आंदोळले; ।
द्वारीं राघव दोघ लाघवगती टंकारितां कार्मुकें;
तेणें घोर घन प्रघोष घुमतां ते कांपती कौतुकें. ॥ २३

---

१. ब्रह्मांड. २. दिशा.

म्हणे राम तो लक्ष्मणा बंधुराया, 'क्षणामाजि निर्दाळितों मी धुरा या; ।
उगा तूं पहा कौतुकें बाणलीला.' म्हणे तों चि आरंभ झाला कलीला.॥ २४
गाढा वीर गुढारल्या निजरथीं संमूढ आरूढला.
मारीचाख्य पुढारला, भुजबळें झुंजावया रूढला. ।
तों रामें महुजास्त्रमंडितशरें वक्षस्थळीं ताडिला.
तेणें शंभर योजनें उडविला, सिंधूतटीं पाडिला. ॥ २५
कांहीं चिंतुनि कार्यभाग न वधी; रक्षी तयातें बळें;
तों आला सहसा सुबाहु समरीं, संगें दळें तुंबळें; ।
तों उद्दंड अतिप्रचंड चढवी कोदंड रामावरी;
श्रीरामें रणकर्कशें निरखिला तो ये पुढें तोंवरी. ॥ २६
आला सन्मुख तो रिपु प्रमुख, तों लीलालघू लाघवें,
आग्नेयास्त्र नियोजुनी निजशरीं, संप्रेरिलें राघवें. ।
तेणें चूर्ण चि शीर्ण तूर्ण पडली भूमी तनू, लोटली.
वर्णूं काय ? सुखार्णवीं जग रिघे, टाळी सुरीं पीटली. ॥ २७

(सवाया.)

प्रभु बाहुजकुलमणि[1], बाहुनि समरिं सुबाहुसि दमुनि च, बाहु-करें,
अजि बाहुनि, विरदल बाहुनि, गुरु शर बाहुरहित करि बाहु नरें. ।
हयवारणगत परिवार न मग अनिवार उठति, परिवार तते.
अनिवार हि चढति सवार, धरुनि तरवार, करिति परि वारति ते.॥ २८
रघुवीर, नृपतिकुलहीर, सुभट, रणधीर, निबिडतर तीर जसा
शरभार गगनिं अनिवार रचुनि, भडिमार करित सुकुमार कसा. ।
रिपुधूर उठति भरपूर, सकळ अविदूर भरिति शरपूर तदा.
चकचूर करिति कर ऊर चरण शिर सूरकुलज[2] रणशूर तदा. ॥ २९
अरिनिकर निकट, गजतुरग शकट जंव करिति लगट, रघुरमणकरीं
शर सुटति सणण, रव उठति खणण, रिपु पडति दणण, रणधरणिवरी. ।
वरि वदति अमर, 'अजि! असम समर करि नृपतिकुमर, जय विजयि भला.'
गजबजति असुर, दरि दडति निसुर, मग वसुमतिसुर[3] परिवंदि सकळा.॥ ३०
मनिं धरुनि पडप, नभिं लपुनि गडप वरि हाणिति झडप, रिपुनिकर करें.
परि रघुपविशिख तळपुनि नखशिख तनु खिळति सनखशिख शिखिसम रे.।

---

१. क्षत्रियकुलश्रेष्ठ. २. सूर्यवंशांतील. ३. ब्राह्मण.

रणनिपुण सुघड रिपु पडति दुघड, तृण धरिति उघड मग रदनिकरें.
सुर वदति 'विजय', नर म्हणति 'अभय', मुनि नटति निलयतटिं निजगजरें. ३१

(श्लोक.)

गेला राक्षस सर्व भार विलया, संपूर्ण यज्ञक्रिया
झाली, सिद्ध समस्त ही अवभृथस्नानादिक प्रक्रिया. ।
विश्वामित्रमहाऋषिप्रमुख ते सारे सभामंडळीं
श्रीराम स्तविती, पराक्रम असा नाहीं च आखंडळीं. ॥ ३२
'बोद्धा, शस्त्रशरास्त्रमंडित, महायोद्धा, अयोध्यापती
श्रद्धालु प्रभु यज्ञदेवविबुधीं वृद्धांसहा संपती. ।
बद्धां मोचक तूं च साच' म्हणुनी बद्धांजळी राघवा
सिद्धार्थी द्विजसंघ वर्णित उभे, सिद्धाश्रमीं आघवा. ॥ ३३

गाधेय गर्जत वदे, 'रघुरामचंद्रा! झालों कृतार्थ बहु, चित्तचकोरचंद्रा ! ।
गेला चि तो विहित यज्ञ समग्र सिद्धी; सिद्धाश्रमासि तरि आज खरी प्रसिद्धी'. ॥३४
'जी! जी!' म्हणे रघुकुलेश्वर 'आणि कांहीं आज्ञापिजे, दमिन ये क्षणिं आणिकां ही;।
निष्टंक कार्य कथिजे, तव किंकरांनीं कीजेल जी! मग असाल निशंक रानीं'.॥ ३५
ऐकोनि हें, निजभुजीं ऋषिराजराजी आलिंगिती हृदयिं बाणधनुर्धरा जी. ।
'कल्याण हो, परम मंगल हो, कृपाळा!' तो सर्वशोभन म्हणे द्विजदेवपाळा. ॥३६

सारें सारुनि नित्यकर्म, करुनी देवार्चनें, भोजनें,
देती हारतुरे, विडे, मग उटी धूपादिदिव्यासनें; ।
संफुल्लायतलोचना, शशिमुखी, त्या ब्राह्मणी बायका,
आनंदें, मग आरत्या करिति त्या रामा जगन्नायका. ॥ ३७

आतां पुढील रचना परिसा कशी ते; भंगोनि चाप रघुराज वरील सीते. ।
निर्दोष हे करिल रामकथा मनातें; आनंदनंदन कवी विनवी जनातें. ॥ ३८

---

## सीतास्वयंवर.

(श्लोक.)

चिद्धाग्र्यें अथिला विदेह मिथिलाभूपाळ भूपावली
पाचारूनि, विचारुनी मनिं, कथी साचार वाचावली. ।

---

१. यज्ञसमाप्तिसमयींचें स्नान. २. इंद्राचे ठायीं. ३. समूह. ४. ज्ञानभाग्यानें. ५. आश्रय केलेला. ६. जनक. ७. नगरविशेष. ८. नृपसमुदाय.

'जो हें त्र्यंबकचाप[1] भूप उचली, त्या आपुली कन्यका
केली अर्पण, हें समर्पक[2] वरा, हो नोवरा जी निका[3].' ॥ १

हें ऐकोनि निकें, सकाम[4] सकलक्षोणीपती[5] पातले;
जैसे देव महेंद्रमंडितसभे येती मदें[6] मातले. ।

यत्नें त्या जनकें सुरत्नकनकें शृंगार रंगांगणीं
केला, केवळ कौतुकें, मग सभा व्यापे नृपांच्या गणीं[7]. ॥ २

राजे अंगकलिंगवंगमहिचे काश्मीरकर्णाटकी
गौडी गुर्जर निर्जरोपम सभे आले भले नाटकी. ।

राजा धार्मिक 'शैवकार्मुक[9]' म्हणे 'आणा सभामंडळीं.'
आज्ञा मानुनि सुज्ञ सेवकगणीं तें आणिलें अंगणीं. ॥ ३

(चूर्णिका.)

जैसे सकल कुलाचल[10] मिळाले एक्या स्थळीं, कीं लक्षावधि पूर्वे[11] वारांनिधि[12]-जळीं, कीं कामरूप पन्नग[13]भार पाताळीं, कीं नानाविमानसंघें[14] गगनमंडळीं, कीं नानाफलसमूह टाहळीं, तेवि मुकुटांगद[15]केयूर[16]कटक[17]मुक्ताहारतोडर[18]नूपुरहंसकादि भूषणीं विराजमान[19] भूपाल, जनकसभामंडळीं, सकळही एकवटले. ॥ ४

(श्लोक.)

पूर्वी भार्गवदत्त[20] जें, बहु बरें, भारी, घरीं मांदुसे[21]
होतें अर्चित धूपदीपकुसुमीं, जें इंद्रचापा रुसे. ।

जें सातां शकटीं[22], महाबळकटीं, वाहूनि, बाहूबळें
चालीं चालविलें सभेसि सकळीं, जें शैलशृंगागळें[23]. ॥ ५

मत्तेभ[24], मल्ल, हय[25], बैल, हेले[26], धनुष्या लावूनि ओढिति, बळें नढळे मनुष्यां.।
गाड्यांसि त्यासि दृढ बांधुनि चारि नाडे[27] आकर्षिती, धरुनि हर्ष, म्हणोनि नोडे[28].६

गाडा ओढिति 'बाप बाप' म्हणुनी, तें चाप सापापरी.
धापा देत नृपाळही उतरले भूपांत नानापरी. ।

---

१. शिवधनुष्य. २. द्यावयाचें वस्तु. ३. उत्तम. ४. कामातुर, आशाभरित. ५. पृथ्वीपती. ६. गर्वें. ७. समुदाय. ८. देवांसारिखे. ९. शिवधनुष्य. १०. हिंदुस्थानांतील सात मुख्य पर्वत. ११. नौका. १२. महासागर. १३. सर्प. १४. समुदाय. १५. बाहुभूषणें. १६. प्रगंडभूषण. १७. कडीं. १८. चरणभूषण. १९. शोभायमान. २०. परशुरामानें दिलेलें. २१. पेटींत. २२. गाडा. २३. पर्वतशिखराहून अधिक. २४. मातलेले गज. २५. घोडे. २६. रेडे. २७. दोर. २८. न अडे.

राजे देखुनि दंग भंगति मनीं; ‘[1]सारंगनेत्री कशी
    होते लभ्य?’ म्हणोनि सभ्य वदती. राजा बलातें [2]केशी. ॥ ७
हेमाद्रीवरि हेमनिर्मित जशा [3]संफुल्ल [4]वेल्ली भल्या,
    तैशा आभरणीं अपार तरुणी [5]सौधांगणीं शोभल्या. ।
मध्यें कल्पकवल्लरीसम दिसे [6]शीतांशुबिंबानना
    सीता [7]शीलवती शुभा, नृपसभा लक्षी [8]जना कानना. ॥ ८
वार्ता [9]वार्तिक कीर्तिती प्रभुपुढें ‘जी! जी! [10]धराधीश्वरा!
    आले [11]गाधिनृपाळनंदन पुरा, संगें ऋषींचा [12]फेरा.’ ।
हें [13]आकर्णुनि, पूर्ण [14]तूर्ण [15]विभवज्ञानार्णव, [16]क्ष्मापती
    चाले सन्मुख, सप्रधान, अवघे मागें पुढें धांवती. ॥ ९
रायें दूरुनि देखिल्या [17]ऋषिघटा, माथां जयांच्या जटा;
    [18]शाटी [19]बंधन, वल्कलाजिनें[20] पटा, त्या पादुका [21]वाजटा. ।
[22]शुद्धाच्छ [23]स्फटिकाक्षहार डुलती, भूति प्रभा बोलती;
    सारे चित्रचि साग्निहोत्र झुलती, आनंदले चालती. ॥ १०

(चूर्णिका.)

ऐशिया ऋषिराजसमूहामाझारी विराजमान, विद्वज्जनसार्वभौम, विमलांतःकरण, विश्वविख्यात, [24]महानुभाव, सिद्धाश्रमविहारी, जो महातपाचा तेजोराशि[25], परंतु उदयास्ता वेगळा; आल्हादकारक [26]कलानिधि, परंतु वृद्धिक्षयारहित, नित्यागळा; अत्यंत समर्थ [27]शतक्रतु, परि नातळत परदारपातकविटाळा; सृष्टिकर्ता [28]चतुरानन, परंतु निजदुहितागमनदोषासि निराळा; असो. ऐसा परमपवित्र विश्वामित्र [29]सुकृतराशि, स्वयंवरमहोत्सवविलोकनविलासी, धर्मादि[30]सद्गुणोत्कर जनकें विदेहदेशाधिपजनकें, देखोनि, साष्टांग दंडवत वंदिला. ॥ ११

---

१. मृगनयनी. २. कसास लावी. ३. पुष्पित. ४. वेली, वनस्पती. ५. राजगृहांगणांत. ६. चंद्रबिंबमुखी. ७. उत्तमस्वभावाची. ८. जनरूप अरण्यास. ९. वार्ता सांगणारे भाटबंदीजनादि. १०. हे पृथ्वीपते. ११. गाधिराजसुत. (विश्वामित्र.) १२. समुदाय. १३. ऐकून. १४. त्वरित. १५. पराक्रम आणि ज्ञान यांचा सागर. १६. पृथ्वीपती. १७. ऋषिसमुदाय. १८. छाटी, वस्त्रविशेष. १९. कोपीन. २०. मृगचर्म. २१. वाजणाऱ्या. २२. अत्यंत स्वच्छ. २३. काचमणी आणि रुद्राक्षहार. २४. उदार. २५. सूर्य. २६. चंद्र. २७. इंद्र. २८. ब्रह्मदेव. २९. पुण्यराशि. ३०. सद्गुणांची खाण.

(श्लोक.)

'बा! रे! हो विजयी' म्हणे मग मुनी, 'सारे धरे हो धणी.'
थारे भूत सदा यदंघ्रिभजनीं[1], **ता**रेशवंशाग्रणी[2], ।
मोठा **वे**द**वि**धीस जो, मग तशा सोळा[3] विधीं पूजिला
भोळा **शं**करसा; चला म्हणवुनी डोळा खुणे योजिला. ॥ १२

अत्युद्दाम[4] भले भले क्षितिपती रायें पणीं गोविले;
मानें आदरिले, सभे बसविले, ठेले बिले नेविले. ।
ज्ञानें पूर्ण अगाध **गा**धिसुत जो **वे**धा[5] जसा बैसला.
पाठीं तो ऋषिथाट दाट नटला, पद्मासनीं बैसला. ॥ १३

जो कल्याणगुणी गुणीच अगुणी, भूतें मणी ज्या गुणीं[6];
ज्याच्या रूपगुणीं सदा गुणगुणी **शं**भू रिवे निर्गुणी; ।
सृष्टी चित्त गुणीं जयास्तव गणीं, माया जया ठेंगणी;
तो कोणा न गणी, वसे ऋषिगणीं, श्री**राम** रंगांगणीं. ॥ १४

जो वाहे धरणी, प्रपंच भरणीं वानीत वाग्धोरणी,
देवाची करणी, प्रतिप्रकरणीं लुब्धे जगत्कारणी; ।
जो कां आदि **फ**णी[7], विषें फणफणी, रत्नें जयाच्या फणीं;
तो रामानुज[8] **राम**चंद्रनिकटीं[9] शोभे सभारंगणीं. ॥ १५

(सवाई.)

या परिचे भवतापविमोचन, चापशरांकित, भव्यमती,
पाहुनि, सर्वनृपांहुनि उत्तम, लाहुनि तोष, पुसे नृपती; ।
'कोण असे महिपालक बालक? हे जनचालकसे सुचले;
सांग मला सहसा, गमनाशय चांग मनासि मला रुचले.' ॥ १६

(श्लोक.)

हांसोनियां नृपसभे मुनिराज बोले. स्वानंदसंभ्रमभरें हृदयांत डोले. ।
'हा जी नृपा! बहुत भाग्य जगीं उदेलें; यांच्या गुणें दुरित दैन्य समस्त गेलें. १७
**सा**केताधिपबाल[10] हे; रणतटीं रक्षोगणा[11] काल हे;
दीनाचे कनवाळ हे; प्रतिपदीं राया! जगत्पाल हे; ।

---

१. ज्याचे पाय. २. चंद्र. ३. षोडशोपचारें. ४. अतिगर्विष्ट. ५. विधि. ६. दोरींत. ७. शेष. ८. रामभ्राता. (लक्ष्मण.) ९. जवळ. १०. अयोध्यापतिदशरथपुत्र. ११. राक्षससमुदाय.

पूर्ते हे शुभलक्षणी, रत सदा धर्मैकरूरक्षणीं;
आनंदाब्धि अनुक्षणीं भरतसे, यांच्या कृपाईक्षणीं. ॥ १८

यांहीं दुःसह ताटिका निर्वटिली; निष्कंटका मेदिनी
केली काननिं; यांचि हो शरगती पाताळभूभेदिनी; ।
तो मारीच नभीं झुगारुनि शरें, केला सुबाहू पुरा;
नेला सिद्धिस यज्ञ; ते प्रवर हे आले तुझ्याही पुरा. ॥ १९

चापा नृपा! आणि महोत्सवातें आले पहाया बल वैभवातें; ।
मार्गी अहल्या विपिनांत रामें केली शिला मुक्तमनोभिरामें.' ॥ २०

परिसुनि मन राया दाटलें रामपायीं;
म्हणत मनिं, 'करावा सोयरा हा उपायीं; ।
कठिण तरि पणाचा व्यर्थ संकेत केला;
रघुवर नवरा हो धन्य या कन्यकेला.' ॥ २१

भूपांतें निरखी दिठीं, निजसखीसंगें रमेसारिखी
शोभे, तेविं उखी विखी शशिमुखी माडीवरी पारखी; ।
झाली बुद्धि फिकी, नृपाकृति निकी मानीचना आन कीं,
लक्षी राघव, कौतुकीं तंव तुकी माथा मनीं जानकी. ॥ २२

(पद.)

'कोण तुझ्या मनासि येतो, सांग हो सीते!' ॥ ध्रुवपद. ॥
'पैल कुसुंबी दुस्तर ल्याला?' । 'बाई! तो काय नव्हे.' ॥
'पांघुरला नवरंग दुशाला?' । 'बाई! तो काय नव्हे.' ॥
'विड्या देत हडपेकर ज्याला?' । 'बाई! तो काय नव्हे.' ॥
'माथां मंदिल झळकत शेला?' । 'बाई! तो काय नव्हे.' ॥ १ ॥
'तोरा बहुवस पैल तुऱ्याचा?' 'बाई! तो काय नव्हे.' ॥
'मनोहराकृति मदन, वयाचा?' । 'बाई! तो काय नव्हे.' ॥
'ल्याला पोशाक कंदर्पाचा?' । 'बाई! तो काय नव्हे.' ॥
'अभिनवकंकणहस्त जयाचा?' । 'बाई! तो काय नव्हे.' ॥ २ ॥

---

१. धर्माचरण करणाऱ्याच्या. (हा प्रयोग जुन्या काळांतील दिसतो. जसें, यात्रेकरू म्ह० यात्रा करणारे.) २. क्षणोक्षणीं. ३. कृपायुक्त नेत्रांत. ४. मारिली. ५. राक्षसविशेष. ६. श्रेष्ठ. ७. दृष्टीनें. ८. उत्तम. ९. दुसरी. १०. हालवी. ११. वस्त्र.

'पद्मासनि करिं धरुनि कटारी ?' । 'बाई ! तो काय नव्हे.' ॥
'ल्याला बारिक दस्त दुतारी ?' । 'बाई ! तो काय नव्हे.' ॥
'गौर धराधिप त्या शेजारीं ?' । 'बाई ! तो काय नव्हे.' ॥
'दिक्करिसा नृप दोंदिल भारी ?' । 'बाई ! तो काय नव्हे.' ॥ ३ ॥
'तो ऋषिमंडळिं दिव्य धनुर्धर ?' । तेव्हां न ह्मणे नव्हे. ॥
'मेघःशाम श्रीराम मनोहर ?' । तेव्हां न म्हणे नव्हे. ॥
'दाशरथी नृपराज धनुर्धर ?' । तेव्हां न म्हणे नव्हे. ॥
'आनंदात्मज पूर्ण परात्पर ?' । तेव्हां न म्हणे नव्हे. ॥ ४ ॥
'बाणली निज खूण तन्मय तुझी गे सीते !' ॥ कोण तूझ्या० ॥ २३

(श्लोक.)

'जो शोकाब्धितरी, नतांसिं उतरी, तत्पादपद्मीं तरी
क्रीडें मी भ्रमरी, म्हणोनि अमरी मानीन तैं पामरी; ।
कैसें सज्ज करी धनू झडकरी ? हे फार चिंता करीं;
मातें कोविं वरी ?' म्हणोनि विवरी माडीवरी नोवरी. ॥ २४

हा वरी मज अशी गती चिंता आवरीन कशि ? लागलि चित्ता. ।
बावरी मति कशि स्थिर राहे ? यावरी सुचवि मात घरा हे. ॥ २५

'चतुर म्हणविसी तूं, बोलसी काय सीते ?
वरिन म्हणसि रामा मातही कायसी ते ?' ।
बहुत दिवस बापें नेमिलें या पणातें.
रघुपति पति होतो तो कसा आपणातें ? ॥ २६

ऐशी ते वदतां वधू, मग पुढें कैशी कथा वर्तली,
जैशी चंडमरुद्भरें वनतटी, तैशी सभा नर्तली. ।
शंकाहीन, मदें महोद्धत, महा हंकार ज्याचा भला,
डंका दुंदुभि वाजवीतचि सभे लंकापती पातला. ॥ २७

वेष्टिला वट जसा विटपांनीं, ये भुजीं निबिड तो विट पानी; ।
दंष्ट्रमंडित तया मुखरा जी राजते मदभरें मुखराजी. ॥ २८

---

१. हत्तीसारखा. २. प्रणतजनास. ३. देवांगना. ४. नीच. ५. विचार करी. ६. वेडी. ७. गोष्ट. ८. प्रचंड वायूच्या जोरानें. ९. नटली. १०. डाहळ्यांनीं. ११. धूर्त. १२. दाढांनीं शोभायमान. १३. तोंडाळास. १४. शोभते. १५. मुखपंक्ति.

(सवाई.)

दैत्य धुरंधर तो [1]दशकंधर जो [2]नृपगंधिरजास न साहे;
मस्त समस्तहि मस्तक डोलवि, हस्त गदांकित हालविताहे; ।
धीट सभांतरिं नीट रिघोनि, अवीट बसे, कवणास न साहे;
ढाल [3]फिरंग विशालधनू शर चालत चालवि दोनहि [4]बाहे. ॥ २९
[5]व्यग्र नृपाल समस्त सभेंत [6]उदग्र दशानन लक्षितसे;
वंदिति सर्वहि बंदि जसे, परि नंदिसमान उगाचि बसे; ।
[7]पर्वतसंनिभ गर्वनिधी मग सर्व सभे 'पण काय' पुसे;
तों लघु नम्र सखोल सभापति बोलत बोल तया मृदुसे. ॥ ३०

(श्लोक.)

'या चापा ऐक बापा! चढविल गुण जो पूर्ण [8]आकर्ण राजा;
हे कन्या त्याचि धन्या कृतिसि [9]निरेविली साच त्याचीच भाजा.' ।
लंकालंकार तेव्हां दशवदन वदे, 'ऐक [10]एकैक माझ्या
लीलेचा खेळ राया! न पुरति सुर ते [11]चंडदोर्दंडकाजा. ॥ ३१
दंतीं म्यां [12]देवदंती धरुनि मुरडिला; शैल कैलास [13]गाढा
घेतां हस्तीं समस्तीं कडकडति कडे; काय ती कालदाढा? ।
तेथें या [14]कांबिटाचा गरिब गुण किती? प्रौढिही कोण येणें?
माझे गाजोनि [15]भोजे म्हणति मज असा कायसा कास घेणें? ॥ ३२
पाहीन डोळां नवरी वराया; आणा' म्हणे रावण राव, 'राया.' ।
विदेह बोले, '[16]जिणतां पणातें वरील ते आपण आपणातें.' ॥ ३३
लंकानायक सायकासन गुणीं सज्जावया [17]सजला;
तों सीता भयकंपिता; जन महाचिंतांबुधीं मज्जला; ।
झाल्या म्लानमुखी [18]मनोरम सखी, तो जों भुजा सांवरी;
तों आकार धिकार देखुनि उठे हाकार माडीवरी. ॥ ३४
तो जेव्हां कडकावला धनुवरी, ठेला उभा भूतसा,
सीतेला धडका उठे निजमनीं कीं बोलवेना तसा; ।

---

१. दहा ग्रीवा ज्यास. २. राजांच्या वासाच्या लहान कणास. ३. तरवार. ४. बाहू. ५. व्याकुल. ६. उंच, क्रूर. ७. पर्वतासारिखा. ८. कर्णपर्यंत. ९. दिधली, नेमली. १०. एक एक. ११. प्रचंडभुजांच्या कार्यास. १२. ऐरावत. १३. अचल, दृढ. १४. लघुत्वाची धनुष्यार्थी शब्द. १५. भुज. १६. जिंकतां. १७. तयार झाला. १८. मनोहर.

ते बोले, 'पण कासयासि जनकें केला सख्यांनो! असा?
कैसें कारण काय कीं, कटकटा, आतां प्रयत्नीं असा. ॥ ३५

वीरासनी, [१]कनककार्मुकबाणपाणी टेंकूनि ढाल, कर घालुनियां [२]कृपाणीं, ।
जो बैसला द्विजगणांत [३]कलानिधी तो म्यां आपणें [४]प्रणियला [५]गुणवारिधी तो.॥ ३६

रघुपतिजलधीतें मी नदी जाण वाहें;
उचित म्हणुनि त्याचें वाक्यही आण वाहें. ।
जननिजनककानीं गूज हो! जाणवा हें.
न तरि सखि न ठेवीं प्राण मी आण वाहें. ॥ ३७

पण म्हणुनि पित्यानें घातला कोण पाया?
कवण वधु वरीते [६]कश्मला [७]कोणपा या?' ।
सखि म्हणति, 'धरीते बुद्धि हे तूज सीते!
पुरविल परमात्मा बुद्धि हेतू जशी ते. ॥ ३८

हा कोण शैवधनुपारखि येर मेला; हा काय योग्य तुज सारिखिये रमेला; ।
कीं हेम[८]वल्लिसुरधामतरूपमानें तूं आणि राम जनसंमत रूपमानें.' ॥ ३९

[९]सौधांगीं [१०]विबुधांगनाचि वदती तैशा सख्या तीप्रती;
तों तेथें [११]भुजराजिमंडिततनू आला धनुष्याप्रती; ।
शेषाकार अशेषभूषणगणीं शृंगारिलें देखिलें;
दृष्टीं कार्मुक रोंखिलें, मग मदें तेणें हळू लेखिलें. ॥ ४०

हातें थापटिल्या भुजा, 'मज असा नाहीं त्रिलोकीं दुजा,
मेरूही मजशीं [१२]खुजा, सुरवरीं माझीच आधीं पुजा.' ।
ऐसा जल्पुनि, चाप जाड, उचलों जातां, न हाले कदां.
जैसा शैल मतंगजासि न ढळे. पाहे विदेह[१३]आत्मजा. ॥ ४१

एका दों नढळेचि कार्मुक करें, हें नेटकें जों कळे,
लावी हात बळें समग्रहि, तदा, तों कांहिंसें आकळे; ।
मोठी [१४]आरभटी करूनि, चुकटी दंतावळी चावुनी,
आक्रोशे, अतिविक्रमें, क्षितितळीं जानुद्वया लावुनी. ॥ ४२

---

१. सुवर्णधनुष्यबाण हातीं ज्याच्या. २. तलवारीच्या ठायीं. ३. चंद्र. ४. वरिला. ५. गुणसमुद्र. ६. पाप्यास. ७. राक्षसास. ८. सुवर्णवल्ली आणि कल्पतरू यांच्या उपमेनें. ९. माडीवर. १०. देवस्त्रिया. ११ बाहूपंक्तीनें शोभायमान देह ज्याचा तो. (रावण.) १२. लहान, क्षुद्र. १३. सीता. १४. ओढाताण.

विसां करांहीं धनु तें न तोले; न सांवरे यास्तव देह डोले;।
भारें तयाच्या बहु खाय झोले; त्याहीमधें रावण काय बोले. ॥ ४३

'या भूपें पण जिंकिला; उभविलें कोदंड चंडाकृती;
मद्दोर्दंड उदंड दंड करिती; शाबास माझी धृती; ।
डोले, बोलत बोल, तों न धरवे, गेलाचि झोला भला;
आलें चाप अपाप त्यावरि उरीं, तो भूतळा पातला. ॥ ४४

आला भूमितळासि गर्वपुतळा, पिंजारुनि कुंतळा;
चापातें उखळावया बळ खळा नाहींच उत्संखळा; ।
सर्वांगींच कळा, विटे मुखकळा, झाला भुजामोकळा;
वाजे ऊर गळा, स्वदेह सगळा झिंझाडितां आगळा. ॥ ४५

ओकी रक्त भडाडुनी, दडपतां वक्षःस्थळाची फळी;
सर्वांगें ढकली, न लेशहि ढळे, भूमी भुजा आफळी; ।
शेखीं देखुनि अप्रयत्न, जनकें दीर्घप्रयत्नें दया
केली, ओढुनि काढितां शिवधनू, देखे स्वभाग्योदया. ॥ ४६

झाला रावण सावधान, बसला, 'पाहों' म्हणे कौतुकें,
'आतां कोण गुणीं धनू चढवितो? मी हीन झाल्या तुकें;' ।
झाले दंग नृपालपुंगव सभेमध्यें तदा आवघे;
आश्चर्यें स्तविती, कितेक नमिती, कोणी न तो आव घे. ॥ ४७

नाचे विख्यात राजा, म्हणुनि कुवलयोल्लासकर्ता कळांहीं
सर्वांहीं पूर्ण जो कां, हरुनि तम सदाकाशसंचार पाहीं; ।
शंभूला वंद्य माथां, अमृतकर विभू, जो द्विजांमाजि सांद्रा,
योग्यां उत्साह दावी, निरखिति सखिया तैशिया रामचंद्रा. ॥ ४८

गेला माज, दमूनि माज पडतां त्या राजराजानुजा;
राहे राजसमाज मंद, सुभटांमाजी नुठे कीं दुजा; ।
सारे स्वस्थ तटस्थ, कीं नृप म्हणे, 'व्यर्थ प्रतिज्ञा मुखें
केली म्यां न कळोनि, केवळ धरा निर्वीर मानूं सुखें. ॥ ४९

---

१. धैर्य. २. केंसास. ३. उचलावयास. ४. शेवटीं. ५. दोरीच्या ठायीं. ६. श्रेष्ठ. ७. सर्व. ८. धैर्य. ९. कमलांला उत्साह देणारा. १०. निबिड. ११. कुबेरबंधु. (रावण.)

सप्तद्वीपपती, महाबळनिधी, सोत्कंठ, आले असे;
सीता हेमलता वरी जरि, तिये कीर्तीसि जोडा नसे; ।
ओढीना, न झडी धरूनि तुळवी कोणी, न तोली बरा.'
निःसंदेह **वि**देह गर्जुनि म्हणे, 'निर्वीर झाली धरा.' ॥ ९०
बोले शब्द उणा **वि**देह; पिसुणामध्यें[1] तदा त्या गुणा
घेती; तों निपुणाभिराम, करुणासिंधु, प्रभू, पाहुणा, ।
गांभीर्यें वेरुणालयाहुनि[2] दुणा; दावी गुरूतें खुणा;
दृष्टीनें अरुणा[3], म्हणे, 'चढवितों या चंडचापा गुणा.' ॥ ९१
'निर्वीरा धरणी' म्हणे घरधणी, 'गोंवूनि राजे पणीं;
ऐसा शब्द झणी वदो नृपगणीं; भू हे सुवीराग्रणी, ।
मेरूतें गगनीं झुगारिति जनीं, आहेति ऐसे मणी;
नेणे कीं अवनीपती[4]' म्हणतसे श्री**राम** वीरासनी. ॥ ९२
'दे आज्ञा **शि**वसायकासन गुणीं योजीन मी, आयका.'
बोले, वंदुनि पाय, कामजनिता[5], योग्यांचिया नायका. ।
आनंदें मुनिनाथ भेटुनि भुजीं, स्पर्शोनि हस्तांबुजीं,
गर्जे, 'हो जयवंत देवमनुजीं हो भो! जया बाहुजीं[6].' ॥ ९३
ऐसा मित्रकुलाब्जमित्र[7] वदतां, तो मित्रसा लोभला;
**वि**श्वामित्र म्हणे, 'अमित्रदमना[8]! रामा! भला रे! भला; ।
होसी चंड पराक्रमी चतुरधी **चं**डांशुवंशोद्भवा[9]!
त्वंद्दोर्दंड[10] अखंड होत विजयी, घे कीर्ति चिद्वैभवा.' ॥ ९४
आनंदें फुगला नसेचि उगला, **गा**धेय[11] गर्जे सभे;
'कां कोणी न करी धृती झडकरी? प्रौढी न लाभे प्रभे? ।
आतां **दा**शरथी, महोज्वलरथी, राजा! अजी! या जया
वांछी, चाप कैशी[12], मनीं स्थिति कशी? पाहूं म्हणे राजया.' ॥ ९५

(चूर्णिका.)

**वि**श्वामित्र म्हणे, '**रा**मा! नूतननीलधाराधरश्यामा! ऋषिजनमनच्चकोरसोमा!

---

१. उणें पाहणारांमध्यें. २. समुद्राहून. ३. आरक्त. ४. पृथ्वीपति. ५. मदनाचा पिता राम. ६. क्षत्रियांत. ७. मित्रकुळरूप कमळाला सूर्य. ८. शत्रुमर्दना. ९. सूर्यकुलोत्पन्ना. १०. तुझे भुज. ११. गाधिपुत्र. (विश्वामित्र.) १२. ओढी.

सुरसार्वभौमा! [1]परमदृढमृडकोदंडचंडाभिमानखंडनपांडित्य दाखवीं; सकळभुवनवीरद्विरदमुखीं [2]अद्भुतेक्षुरस चाखवीं; निजकीर्तिचंद्रि[3]कैया ब्रह्मांड झांकवीं; [4]क्षित्युद्भवरत्न जानकी संतोषवीं; लीलाभूषणीं कविवाग्वधूसि भूषवीं; सीतामुखासितांशुरसपानचतुरचकोर व्हावया उठावें, उठावें.' ॥ ९६

(श्लोक.)

'जी! जी! याहुनि लाभ काय?' म्हणुनी भूपाळची जृंभला.
चित्तीं संभ्रम, थोर उत्सव, महा आनंद, आरंभला. ।
तेव्हां हास्यमुखें, तपोधन, सुखें डोलोनि, बोले, 'गुणीं
योजीं चापलता, धरीं चपळता, प्रौढ प्रतापीं गुणीं. ॥ ९७
[5]वीक्षारक्षितसज्जना! करिं धनुर्वल्लीपरीक्षा, [6]गुरू
किंवा फार हळू पहा, निजकरें, कोदंडदीक्षागुरू! ।
भूकन्या तरि अन्य भूमिपतितें ना लोक धन्या वरी;
ते मान्या मिरवे [7]मृगांकवदना माडीवरी नोवरी.' ॥ ९८

(चूर्णिका.)

तेव्हां राजाधिराज, [8]राजीवनयन, विराजमान, रघुराज, वीरशार्दूळ, उठावला; [9]कार्मुकोपकंठप्रांत पावला; जैसा उरगावरी पतंगराज झेंपावला; गंभीर धीर, भुज थापटुनि, लीलाबाळखेलनापरी कमठकठीण नीलकंठकंमटा मुठीं मुठाळोनि, वामकरें [10]सधरसित शरासन ओढिलें; झिंझारवें त्रिवार झाडिलें; क्रिंकार ध्वनि [11]तूर्ण पूर्ण [12]आकर्ण ओढिलें; तंव मध्यभाग मोडूनि कडकडिलें; तत्प्रतिध्वनिभरें गगन गडाडिलें; भू तटतटीत, खटखटीत [13]कृतांतदळ, दिग्गज डगमगित, [14]फणिवर सचकित, थक्कित दिनकरशशधरादि तारामंडल, बहु शंकित [15]पंकजभव, खळबळित सुरासुरकुळ, डळमळित सत्यलोक पाताळ, वितुळत घनपटल, चळचळ कांपत बलशीलभूपाल, लोकपाल व्यथितभूत असतां, मूर्च्छाभर जलचरखेचरादिक समस्तां, भेरीदुंदुभीपटहकाहलादिक नानाविधें मंगलतूर्यें सुरलोकीं उल्हास परमानंदभरपुरें, एक्याच काळीं, धिमधिमायमान धमकतीं झालीं. ॥ ९९

तंव [16]मिथिलेश्वरचित्ताचळातें विस्मयाद्यानंदोर्मी[17] माजवी; भला भला म्हणोनि

१. अत्यंत कठिण शिवधनुष्याच्या महाभिमानाचे खंडनाविषयीं पांडित्य. २. उत्तम उंसाचा रस. ३. चंद्रिका (चांदणें) याची तृतीया विभक्ति. ४ पृथ्वीपासून उत्पन्न. ५. अवलोकनानें रक्षिले सज्जन ज्याणें. ६. मोठें. ७. चंद्रमुखी. ८. कमलनेत्र. ९. धनुष्याच्या जवळचा. १०. धनुष्य. ११. त्वरित. १२. कानापर्यंत. १३. यम. १४. शेष. १५ ब्रह्मा. १६. जनकाच्या चित्तरूप पर्वतातें. १७. लहरी.

**वि**श्वामित्र वाग्देवता गर्जवी; **सी**ता निजहृदयकमळीं असुखमुकुलता विसर्जवी;
संफुल्ल[1]सारसमुखीसखीसंघ नयनकल्हारीं[2] आल्हादला[3]. ॥ ६०

(श्लोक.)

'हां जी! श्रीगुरुजी समर्थ!' म्हणुनी, मौंजीं[4] कटारी सजी;
राजीवाक्ष, अजिंक, निस्तुल, नृपांमाजी कशी कास जी. ।
माजी **राम** धजी, सभा गजबजी, हे लोकराजी[5] त्यजी
या जीवांतिल काळजी, **जन**कजी जोडा दिसे सत्य जी. ॥ ६१
ठाके **राम** उभा, सुनीळ मृदुभा देखोनि सारी सभा
झाली चित्रनिभाचि[6], चाविति जिभा साश्चर्य लक्षूनि भा[7]. ।
तेजें दाहि दिशा झळाळित; निशानाथाभमुक्तावळी[8]
नानारत्नमणीं विभूषणगणीं छाया दिसे भूतळीं. ॥ ६२
जैसा सिंह उफाळला **हि**मगिरीच्या गव्हरा[9]पासुनी;
किंवा दुर्घर धीरधिंग उठिला शार्दूळ उल्हासुनी; ।
लीले खेळत इक्षुदंड कवळें वेतंड[10]शुंडा उभी;
तैसा **राम** उठावला धनुवरी, लक्षी मृगाक्षी[11] उभी. ॥ ६३
झेंपावे जवळी, मुठीसि कवळी, तों चापघंटावळी
घोषें गाजति, रम्य वाजति, धनुःकोटी गुणीं आंवळी; ।
ओढी, तेचि घडी स्वशक्ति उघडी, गांठी मुठीची मिठी
ओढी कानवरी, तदाचि नवरी, लाजोनि, लक्षी दिठीं. ॥ ६४
**रा**में, लोकाभिरामें, **म**दनशतसमें, पूर्णकल्याणधामें,
लीलाभूभृल्ललामें[12], तुकुनि **शि**वधनू, ओढिलें, पूर्णकामें. ।
ओढी घेतां तडाडी; निबिड[13] दश दिशीं घोष मोठा झडाडी;
मध्यें भंगे; कडाडी; प्रतिनदन[14] नभीं मेघ जैसा गडाडी. ॥ ६५
विद्युल्लता पडति भूमितटीं तुटोनी; कीं ते कडे उलथले गिरिचे खुटोनी; ।
तैसा उठे धनुसि नाद, नभीं भरोनी, टाळी बसे; कवण सावध सांवरोनी? ६६
श्रीरामलक्ष्मणहि, **गौ**तमपुत्र[15], राजा, **गा**धेय[16], **जा**नकि, अशां न पिडी अवाजा.

१. प्रफुल्लकमलमुखी. २. कमळजाती. ३. हर्ष पावला. ४. कमरेंत. ५. लोकपंक्ति. ६. चित्रतुल्यचि. ७. तेज. ८. चंद्रकांतितुल्य मोत्यांची पंक्ती. ९. गुहा. १०. हत्तीची सोंड. ११. सीता. १२. राजांमध्यें शोभायमान. १३. घन. १४. प्रतिध्वनि करणारा. १५. शतानंद. (जनकराजाचा पुरोहित.) १६. विश्वामित्र.

हे मात्र सावध सहा; इतरां जिवांसी मूर्छा जडे; विकळ ते पुरदेशवासी. ॥ ६७
ओढूनि कार्मुक करें, अतिलाघवानें, कीं दाविला रस महाद्भुत राघवानें. ।
केली सभा तदविमोहित तत्क्षणानें. लक्षी सुलक्षणवधू सुरसेक्षणानें[1]. ॥ ६८
कौंडिण्य, कौशिक, पराशर, योगिराजे; शांडिल्य गोत्र, मधुकादिक, अंगिरा जे;
ते नाचती, गुणकथा कथिती गिरा जे; तो घोष, दोषहर, सद्गतिलागिं राजे[2].६९
देखोनि दोर्बलगती रघुराजयाची आनंदले द्विज; गुढी उभिती जयाची; ।
ज्याच्या पदासि वरदेवसमाज याची; तेही मुखीं करिति भाटिवकी[3] जयाची.॥७०

कोणी एक संतोष[4] नाचत उठे, 'रामा ! भला रे !' म्हणे.
एकीं वल्कल अर्पिलें रघुविरा, छाटी तिज्या ब्राह्मणें; ।
एकीं व्याघ्रकडासनें उडविलीं, कृष्णाजिनाचीं शतें;
श्रीरामें बहु मानिलीं स्वशिरसा[5]; आश्चर्य तें भासतें. ॥ ७१
तों, त्या सौधतटीं[6] सख्यांस निकटीं चांपेकळी, गोरटी,
सीता सिंहकटी ससंभ्रम उठी, कासे धटी गोमटी; ।
सज्जी चालत, सज्जनस्तुतगुणा, ते भव्य भागीरथी
पावे दाशरथी कृपाब्धि जवळी; ते कोण लीला कथी? ॥ ७२
डोळे मीन विलोल[7] ते तळपती; हस्तांघ्रि पद्में नवीं;
वक्षोजद्वय चक्रवाक[8]; केच[9] ते भृंगालिओघच्छवी[10]; ।
शैवालावलि नीलरोमलतिका; ते हंस; वाटे नदी;
वेणी ते यमुना, सरस्वति गळां माळ, स्वयें स्वर्नदी[11]. ॥ ७३
सकलहि कलहंसीसारिख्या चांगचाली
चमकति सखिया, त्यांमाजि सीता निघाली; ।
उतरति तरुणांगी सौधसोपानमाला[12];
निरखिति निजभावें आवघ्या राघवाला. ॥ ७४
सहज जंव विलोकी श्री[13] वराया वरी[14] या,
तइं निरखुनि डोळां देवरा[15] देवराया, ।
हृदयिं बहु सुखावे; पावली भावलीला;
प्रणमन करि रंगीं ते धुनी[16] मेघनीला. ॥ ७५

---

१. उत्तम अवलोकनानें. २. शोभे. ३. स्तुतिपाठकता. ४. सानंद. ५. शिरसा वंद्य. ६. माडीवर. ७. चंचल.८. स्तनद्वयचक्रवाक. ९. केंस. १०. भ्रमरपंक्तीच्या समुदायाप्रमाणें कांति ज्यांची. ११.भागीरथी. १२. जिन्याच्या पायऱ्या. १३. सीता.१४. रामा. १५. लक्ष्मणाला. १६. नदी.

समजति मनिं जीतें योगिये योगमाया,
    अतिघनगतिनें ते शीघ्र येती नमाया; ।
अंतुर[1] तरि तशी ते जानकी रामचंद्रा
    निरखि निजअपांगें, योगिहृद्व्योमचंद्रा[2]. ॥ ७६
हळु हळु अमलांगी, संगती राजबाळी,
    जवळ जवळ आली; डोलते घोंसबाळी. ।
स्वकरिं कुसुममाला घेउनी, त्या कृपाळा,
    धरुनि सुख उमाळा, लक्षिती लोकपाळा. ॥ ७७
सीतेला स्मरसा[3], धनूसि हरसा, राजा दिसे वीरसा;
    मूढांला नरसा, जनां नृवरसा[4], भक्तांसि माहेरसा; ।
देवां ईश्वरसा, रिपूंसि गरसा[5], ज्ञात्यांसि चित्सारसा;
    ऐसा सर्वरसांसि हेतु परिसा, जो सूर्यहृत्सारसा[6]. ॥ ७८
आनंदें, अळुमाळ लक्षित पदा, वेल्हाळ त्या आंगणीं
    लज्जानम्र[7] मदालसा[8] चमकतां, कोल्हाळ भूपागणीं. ।
हांसे मंद अनालसा, अलिकुलस्तोमालका[9], मंगला;
    रंगीं भव्यतमालनीलविभुच्या ते माळ घाली गळां. ॥ ७९

(चूर्णिका.)

ते करांबुजयुगीं मधुकमालिका[10] घेउनि, अंबुजनयना विदेहबालिका, कंदर्पासि रतीच्या परी, कंदर्परातीसि[11] दाक्षायणीपरी[12], कीं निर्जरनाथासि[13] इंद्रायणीपरी, कीं सत्यलोकनाथासी[14] सावित्रीपरी, कीं जगद्व्यापीनारायणासि लक्ष्मीपरि, श्रीरामसमीप पातली; तन्मनोहरमाला कंधरीं[15] घातली; तंव जयजयकार केला वृंदारकवृंदांनीं[16]. अद्भुतनाट्यकोलाहलवेणुवीणादिवादनविलास[17] मांडला किंनरकिंपुरुषगंधर्वतुंबरनारदांनीं. संफुल्लमल्लिकाकुसुमभरें हर्षोत्कर्षें वर्षिजे सुरप्रमदानीं[18]. आनंदनंद[19]हृदयारविंदभक्तिमकरंद[20] भोक्ते प्रवीर रघुनंदनमहिमा त्रिलोकीं लोक जयजयकारें गर्जती. ॥ ८०

१. आतुर. २. योग्यांच्या हृदयरूप आकाशांतील चंद्राला. ३. मदन. ४. नरोत्तमसा. ५. विषासारिखा. ६. हृदयकमला. ७. लज्जेनें नम्र. ८. मदानें आळशी. ९. भ्रमरसमुदायाप्रमाणें जिचे कुरळ केश. १०. कमळमाळा. ११. रुद्रास. १२. सती. १३. देवेंद्र. १४. ब्रह्मा. १५. कंठीं. १६. देवसमूहांनीं. १७. कल्होळ. १८. देवांगनांनीं. १९. आनंदतनय. २०. हृदयकमलांतील भक्तिरूप पुष्परस.

(श्लोक.)

वाद्यें वाजति हय तुंबळतरें, तों पद्यगद्यें भले
नेटें गर्जति भाट, भाटिव महा अर्भाटि आरंभिले; ।
हर्षें वर्षति कुंदवृंद बहुधा सौधाकरीं सुंदरी;
तों निर्दोष मुनींद्र घोष करिती वेदोक्तविद्येवरी. ॥ ८१

सीताकरांबुजसमर्पितमालिकेशीं, श्रीराम सद्गुरुपदीं नृपबालिकेशीं, ।
येऊनि वंदन करें करितां, तयानें आलिंगिला हृदयिं तो गुरुराज यानें. ॥ ८२
विध्युक्त होइल विवाह रघूद्वहाचा[1]; तो थोर उत्सव जगत्सुरभूरुहाचा[2]; ।
येईल[3] तो दशरथप्रभु शोभनातें. आनंदनंदन म्हणे परिसा जनातें. ॥ ८३

---

## शबर्याख्यान.

(श्लोक.)

निघे दंडका[4] राम कोदंडपाणी[5]; सवें चालिली जानकी कीरवाणी[6]; ।
कराया वनीं स्वामिसेवा, स्वभावें सवें चालिला लक्ष्मण स्वानुभावें[7]. ॥ १
त्वरित चरणचाली चालिला घोर[8] रानीं;
दृढतर मनिं भावे पूर्ण ज्याची शिराणी[9]; ।
प्रतिदिवसदिनासी पावती ते श्रमासी;
ऋषिवर मग त्यांसी आणिती आश्रमासी. ॥ २
तीघें यापरि चंडदंडकवनीं[10] स्वच्छंदशीं हिंडती,
तों तेथें शबरी अखंड विचरे, पापें तिचीं खंडती; ।
वाचे राघवनाम संतत जपे, तें ध्यानही अंतरीं;
वांछी दर्शनलाभ होइल कधीं ? शोधी अरण्यांतरीं. ॥ ३
आला राम वना म्हणोनि ललना[11] ऐकोनि आनंदली;
'मी वंदीन पदारविंद[12]' म्हणुनी जातां पथीं मंदली; ।
'माझा राम असेल तो क्षुधितसा चंडांशुच्या[13] आतपें[14],
त्यातें मी दृढ चित्तिं ठेविन बरा, ज्याकारणें[15] हीं तपें.' ॥ ४

---

१. रघुश्रेष्ठरामाचा. २. जगाचा कल्पतरु. ३. यावरून या कवीनें यापुढील आख्यानेंही रचलीं आहेत असें दिसतें. ४. दंडकारण्यास. ५. धनुष्य आहे हातीं ज्याच्या. ६. पोपटासारखी मधुर आहे वाणी जीची. ७. प्रभावानें. ८. भयंकर. ९. आवड. १०. भयंकर दंडकवनीं. ११. स्त्री. १२. पदकमल. १३. सूर्याच्या. १४. उन्हानें. १५. ज्या रामाकारणें.

ज्या वनीं करिति झिंकृत झिं[1]ल्ली, दाट तें हुडकि कानन भिल्ली; ।
जेथ वृक्ष बहु पक्व फळांचे, प्रां[2]त तेथ फिरती अबलांचे. ॥ ५
मोठ्या श्रमें वै[3]ळघुनी सफळातरूतें, तोडी फळें, वदनिं गात जगद्गुरूतें, ।
ओंटी भरी, चतुर ते उतरोनि भूमी, भेटी निघे, 'नयनिं पाहिन तो[4] विभू मी.' ६
दाही दिशा देउनियां निरी[5]क्षा, मार्गीं फळांची करि ते परीक्षा; ।
चाखी मुखें, गोड कडू फळा या, टोंचूनि दांतें रसही कळाया. ॥ ७
क[6]टुम्ल त्याचि रसहीनफळास टाकी; लागे मधू सरस तें व[7]सनांत झांकी; ।
आली वनानिकट उत्तम भिल्लिणी ते, जेथें जगज्जनक लक्ष्मण जानकी ते. ॥ ८
ज्याच्या मस्तकिं दीर्घ नूतनजटा, फेटा दिसे टोप तो,
मौं[8]जीं वेष्टित वल्कलें झळकती, दूजा म्हणे कोण तो? ।
आश्चर्या अति पावली, बघुनियां तू[9]णीर पाठीवरी,
रा[10]जीवाक्ष असा विलोकुनि, व[11]धू धांवे जशी बावरी. ॥ ९
देखोनि डोळां हृ[12]दयाभिरामा रामापुढें धांवतसे सुकामा. ।
पुष्टांग झाली स्वसुखें भजाया, साष्टांग वंदी रघुराजपायां. ॥ १०
रामांघ्रि[13] वंदुन नमी, न उठेच कांहीं, रामें करांबु[14]जयुगें उचलोनि बाहीं, ।
आलिंगिली स्वहृदयीं शबरी बरी ते; आनंदले अ[15]मर भाविति बावरी ते. ॥ ११
'बहू दीससी राघवा ! तूं भुकेला; तुवां पाहिजे बा ! फळाहार केला; ।
तुझ्याकारणें म्यां फळें गोड रामा ! अगा ! आणिलीं सेविं सी[16]ताभिरामा !'॥ १२
सारीं क्ष[17]तांकित फळें निरखूनि डोळां 'कां हो! अशीं?' तिस पुसे रघुराज भोळा.
'चंचूपुटेंच बहु चोखिलिं पांखरांनीं, नेणो दिला प्रतिफळास न[18]खांक रानीं.' ॥ १३
'चंचूक्षतें हीं नव्हती कृपाळा! मी कां तशीं आणिन? हा कपाळा !।
म्यां आपुल्या चावुनि शुद्ध दांतें, चाखूनि घें मीच करें तुम्हातें. ॥ १४
मधुरतर फळांची पूर्ण घेऊनि गोडी,
मग मज रघुनाथा! ठेविता होय खोडी;' ।
निरखुनि रघुराजें भाव त्या भिल्लिणीचा,
परम मनिं सुखावे नाथ तो जानकीचा. ॥ १५

---

१. मुरकुट. २. थवे. ३. चढून. ४. प्रभु रामचंद्र. ५. चांगलें पहाणें. (नजर.) ६. कडू व आंबट. ७. वस्त्रांत. ८. कटीचे ठायीं. ९. भाता. १०. कमलनयन. ११. स्त्री. १२. हृदयास आल्हादकारक. १३. पाद. १४. कमल. १५. देव. १६. आल्हादकारक. १७. दांतांच्या क्षतांनीं युक्त. १८. नखाच्या क्षताचें चिन्ह.

भिल्ली बोलुनि बोल सुंदर असे, रामाकरीं तीं फळें
घाली, नेणुनि शास्त्रषिद्ध[1] पुरुषा उच्छिष्ट देतां बळें, ।
प्रेमें प्रेमभरें, प्रसन्नहृदयें, भक्ताजनाचा पिता,
आत्माराम रमापती निजमुखीं झाला फळें अर्पिता. ॥ १६
भिल्लिच्या वनफळें मन धालें, लोकनायक म्हणे, 'सुख झालें.' ।
प्रेम रामहृदयीं बहु आलें; तोयें[2] बाष्प[3] नयनांत निघालें. ॥ १७
रामचंद्रविभु[4]आचरणासी लक्ष्मुनी, विनटली[5] चरणासी; ।
वंदितां बहु सुखेंच, वधू ते बाष्पकें[6] करुनि ते पद धूते. ॥ १८
आलिंगिली पुनरपी प्रमदा[7] किराती[8], जे अंतरीं सतत चिंतित दीसराती; ।
जोडूनि अंजलि नमी, स्तवितां, तियेतें 'मागें' म्हणे वरद, 'जें स्वमनास ये तें.' ॥ १९
'माझें मनोगत वियोग तुझा न व्हावा, रूपीं तुझ्या दृढ असेन महानुभावा[9]!' ।
स्वामी म्हणे, 'तुज वियोग कधीं न वाटे; जा, शेवटीं मिळसि चिन्मयराजवाटे.'॥ २०
देतां असे वर तिसी रघुनायकानें, झाली कृतार्थ शबरी, परिसोनि कानें; ।
आलिंगुनी, मग तिघें निघती वनातें. आनंदनंदन म्हणे परिसा जनातें[10]. ॥ २१

---

## सेतुबंध.

(श्लोक.)

ऐका सादर रामनाममहिमा, गंभीर, गंगोपमा[11],
माथां वंद्य उमापतीसि गरिमा[12], तारील पापाधमा; ।
गाती जे निगमागमादि[13] परमानंदप्रदा सत्तमा,
आत्माराम रमेश भेटवि अशी सर्वांसि सर्वोत्तमा. ॥ १
कांतालिंगनलोभलालस[14] जगद्बंधूचि सिंधूतटा
आला आपण, चंडवानरचमू[15] घेऊनि अत्युद्भटा; ।
तेव्हां भार्गवगर्वदारण[16] पुढें पाहातसे जावया,
नाहीं वाट, तटस्थ पाहति कपी निर्यत्न[17] रत्नालया[18]. ॥ २

---

१. षिद्ध म्ह० निषिद्ध. २. उदक. ३. अश्रु. ४. प्रभु. ५. रतली. ६. नेत्रोदकानें. ७. स्त्री. ८. भिल्ली. ९. मोठा आहे प्रभाव ज्याचा असा. १०. 'कथेतें' असाही पाठ आहे. ११. गंगेची उपमा ज्यास. १२. महत्व. १३. वेदशास्त्रादि. १४. स्त्रीचें आलिंगन करण्याच्या इच्छेविषयीं आसक्त. १५. प्रखरवानरसैन्य. १६. परशुरामाचा गर्वहरणकर्ता. १७. निरुपाय. १८. समुद्रास.

पाहे [1]पद्मपलाशलोचन तया वीराधिवीरांप्रती;
भासे [2]दुर्गम दुर्ग दुस्तर तयां आलोचना संप्रती; ।
देखा योजुनि योजना शत जळीं हा [3]संघ लंघी जसा,
बोले [4]**भी**मॅ **बि**भीषण **प्र**भुपुढें [5]बद्धांजली राजसा. ॥ ३
'**रा**मा ! राजकुलोद्भवा ! जलनिधी प्रार्थूनि पाचारिजे,
तेणें दाखविल्या पथा **र**घुपती [6]स्तोमावली तारिजे;' ।
**रा**में मान्य करूनि, धन्य म्हणुनी, बैसूनी दर्भासनीं,
केला योग, न ये, म्हणोनि उठिला कोपोनि [7]तच्छासनीं. ॥ ४
ओढी [8]कार्मुक वीर धार्मिक, तदां लागे पदीं [9]वारिधी;
'स्वामी ! दीनदयानिधे ! शरण मी, तूं [10]लोकशास्ता विधी; ।
[11]वारीं वीर**न**ळाकरीं जडशिळा तारीं, **सु**वेळाचळा
[12]वेळीं लंघुनि, वेळही न लगतां, जाई त्वरें श्यामला ! ॥ ५
शालिग्रामशिळा जळीं बुडवितां पूर्वी ऋषीआश्रमीं,
नित्य व्राल्य उपद्रवी म्हणुनियां त्या शापिलें [13]सत्तमीं; ।
याच्या [14]पाणितलें तरोत सलिलीं पाषाण ते स्पर्शतां,
**रा**मा ! यास्तव मार्ग दुस्तर नव्हे [15]शैलोत्करीं वर्षतां.' ॥ ६
[16]अब्धी स्तब्ध वदोनी ये रिति उभा; आज्ञापिला त्यावरी,
'जा [17]सद्मासि' [18]सुफुल्लपद्मनयनें; जो बाण होता करीं, ।
कीं तो, उत्तरदेश[19]दुस्तमजनीं टाकोनियां, शोषिला
पाणी, लोकं [20]अमोघ सायक बळें सिंधू कृपें पोशिला. ॥ ७
तेव्हां **दि**ग्पतिंसारिखे दृढ उभे बद्धांजली [21]द्युत्पती;
त्यांतें **राम** मनोभिराम निरखी [22]साकांक्ष **सी**तापती; ।
आज्ञा देउनि **चं**[23]डभानुतनया सांगे, '**न**ळाहस्तकीं
साधा सर्वेहि सिंधुबंधनिं, शिळा वाहूनियां मस्तकीं.' ॥ ८

---

१. कमलपत्रासारखे नेत्र ज्याचे असा. २. जाण्यास अशक्य असा. ३. समुदाय. ४. मारुति. ५. हात जोडलेला. ६. समूहपंक्ती. (वानरसेना.) ७. त्याचे (समुद्राचे) शासनाकरितां. ८. धनुष्य. ९. समुद्र. १०. त्रिलोकशासनकर्ता. ११. पाण्यांत. १२. किनाऱ्यास. १३. ऋषींनीं. १४. हातानें. १५. पर्वतसमुदायानें. १६. सागर. १७. घरास. १८. प्रफुल्लितकमलनेत्रें. (रामानें.) १९. वाईट लोक ज्यामध्यें अशा प्रदेशीं. २०. निरर्थक नव्हे असा. (कार्यकर्ता.) २१. तेजयुक्तवानरसेना. २२. इच्छापूर्वक. २३. सुग्रीवास.

[1]प्राज्ञाची वंद्य आज्ञा करुनि कपिभटीं, भूतटींहूनि नेटें
[2]उद्दामोद्दाम झटूती उठति बहु कपी, पैल शैलेंद्र बेटें ।
माथां घेती भडाडां, उचलुनि [3]निकरें संगिं सारे कडाडां
धांवा घेती, धडाडां रचिति, [4]रिचविती सिंधुमध्यें घडाडां. ॥ ९

भूभु:कारुनि भूतटीं, **विभुसभे** [5]जोहारुनी **मारुतें**
अभ्रीं संभ्रम किल्‌किलाट करिती, शोभा दिसे फार ते; ।
[6]कीशाली, ढगढीगसे जलदसे [7]भल्लूक, मल्लावळी
गर्जे, [8]स्फूर्तित [9]**रा**मनामनिनदें संफुल्ल [10]रोमांवळी. ॥ १०

[11]लांगूलें गगनोदरीं उभविलीं, जैसे [12]टंके नेटके;
बाहूदंड उदंड ऊर्ध्व करिती, होती ग्रहांला धके; ।
[13]झेंपावूनि, अपार पर्वतकडे काढूनि हस्तांगुळीं,
केला [14]मस्त समस्त मस्तकिं भुजीं शृंगार [15]गोळांगुळीं. ॥ ११

**ह**नुमंत जसा, कपि सर्व तसे, गिरि चालविती [16]कुळपर्वतसे; ।
जलधींत [17]तरंत अपूर्व तसेचि म्हणोनि परोपरि सर्व तसे. ॥ १२

**न**ळहस्तगुणें गिरि ते तरती, परि वाहति दाहि दिशा फिरती ; ।
जळिं एकवटोनि न ते स्थिरती, कपि देखुनि सर्व मनीं [18]विरती.॥ १३

(सवाई.)

लक्ष सपक्ष सहस्र धराधर धांवति [19]तुंगतुरंग तसे,
त्यांवरि युक्त [20]कपीकरमुक्तमहागिरिसंघ तरंगतसे; ।
चंचल वारिवरी चलती गिरिसंचय पाहुनि संघ तसा,
वाटतसे [21]सलिलाटवियेवरि [22]वाटविचार असंगतसा. ॥ १४

(श्लोक.)

अद्री फांकोनि जाती, उसळत उठतां [23]लोलकल्लोलमाळा;
नोहे सेतूसि हेतू; [24]प्लवंग विनविती सर्व **स**र्वोत्तमाला; ।

---

१. श्रेष्ठ अशा रामाची. २. उन्मत्त. ३. निकरानें. ४. ओतिती. ५. प्रणिपात करून. ६. वानरांचा समुदाय. ७. आस्वल. ८. स्फूर्तियुक्त. ९. रामनामशब्दानें. १०. रोमांचित तनु जाहली, असा अर्थ. ११. शेंपुटें. १२. निशाणें. १३. झेंप घालून. १४. पुष्कळ. १५. वानर. १६. हिमालय आदिकरून सप्त कुलाचलप्रमाणें १७. बेडूक. १८. खेद करिती. १९. मोठे घोडे. २०. वानरांनीं टाकलेला मोठा पर्वतसमूह. २१. पाणीरूपी अरण्य. २२. वाट शोधण्याविषयींचा विचार. २३. चंचल अशा लाटांच्या माळा. २४. वानर.

'रामा! कल्याणधामा! गिरिनिकर करीं मंदरातुल्य भारी
तारूं तारूंसमान स्थिरति न हिं कदां, कोण पंथा उभारी?' ॥ १५
'नळपाणितळें गिरितें शिखरीं परि विंचु भुजंग मुखीं विखरी; ।
कथितां जलधीपथिंची रचना, तुम्हि कां न विचारिलि हे सुचना?' ॥ १६
सारे वंदिति पाय, सांगति रणोपाय प्रभूराघवा,
जेणें लंघिल संघ सिंधुसलिला लीलागती आघवा; ।
लक्षी राघव लक्ष्मणासि मग तो नीला, नला, अंगदा
पूसे, ते मग पाहती रविसुता राया सुरत्नांगदा. ॥ १७
सुग्रीव भाव विनवी मग भल्लुकेशा, 'सांगें विचार मज चामरतुल्यकेशा! ।
सर्वज्ञ तूं, तुजचि सर्वहि भाव ठावा; सेतुप्रबंध जलधींत कसा उठावा?' ॥ १८
शैलासि शैल लिगटूनि जळीं न फांके; रुंदीस योजन दहा जळ सर्व झांके; ।
ऐसा उपाय वडिलीं वदिजे विचारीं; श्रीरामकार्य करिजे विविधप्रकारीं.' ॥ १९
बोले जाणुनि जांबुवंत 'परिसा धीमंत! तेजोनिधी
त्रैलोक्यीं हनुमंत एकचि असे, सर्वज्ञ जैसा विधी; ।
भक्ताग्रे सुखयुक्त सागर महाशक्ती क्षमासंपती
रामा मान्य समान धन्य असतां, कां दैन्य वाहे मती? ॥ २०
सद्बुद्धी धरणें, बळासि वरणें, सत्कीर्ति विस्तारणें,
धैर्या आदरणें, भयासी हरणें, रोगासि संहारणें, ।
जाड्यातें तरणें, सुभाष्य करणें, इत्यादि निर्धारणें
भीमाच्या स्मरणेंचि, गात्रि करणें हा वंद्य या कारणें.' ॥ २१
तेव्हां वंदिति मुख्य मुख्य सखया विख्यात सौख्यप्रदा;
'हो बापा! सकळां प्रसन्न विकळां, तूं आमुची संपदा; ।
सीताशुद्धिसि बुद्धि जेविं रचिली, सर्वांसि केलें सुखी;
तैशी भेटविं जानकी रघुविरा 'पूर्णेंदुराजन्मुखी.' ॥ २२

---

१. गलबताप्रमाणें. २. विंचु सर्प विसकटतात, असा अर्थ. ३. सर्व. ४. चंवरीप्रमाणें केंस ज्याचे अशा. ५. तेजाचे ठेवे. ६. ब्रह्मदेव. ७. रामास जे मान्य त्यांसमान ८. याचा मूळ संस्कृत श्लोक असा आहे—'बुद्धिर्बलं यशो धैर्यं निर्भयत्वमरोगता । अजाड्यं वाक्पटुत्वं च हनूमत्स्मरणे भवेत् ॥' ९. मारुतीच्या. १०. पूर्ण चंद्रासारिखें शोभणारें मुख जीचें अशी सीता ती.

ऐशी वदे सकळवानरवीर[1] वाणी; संतोषला पवननंदन भव्यठाणीं. ।
जोडोनि अंजळि, नमी रघुरायपायां 'मी दास, हे मजचि वर्णिति काय वायां ! २३
धैर्यादिशौर्यगुणवीर्य तुझ्याचि नामीं, नामीळतां समजतों गुण तद्विना[2] मी. ।
नामींच सर्व करितों, जरि लेश मानीं; तैं हा असा न गणिला सुगुणोत्तमांनीं[3]. ॥ २४

राजेंद्रा ! रामचंद्रा ! रघुकुळरमणा ! सच्चिदानंदरूपा !
भूपा ! बुद्धीअमूपा[4] ! अज[5] ! जलनिधि तूं, वर्णिशी काय कूपा[6] ? ।
या काशा जानकीशा ! मतिगति पुसशी, पार नाहीं विनोदा;
भेदाभेदप्रभेदा तवपदजलधीभृंग मी चित्प्रमोदा[7] ! ॥ २५

स्वामी ! चातक मी, सुधाजलद[8] तूं; मी भक्त, तूं अंबिका;
तूं श्रीचंद्र, चकोर मी; तपन तूं, मी कोक[9] झालों निका; ।
मी तों एक तरंग, तूं जलनिधी, मी रेणु, तूं भूमिका;
मी तंतू, पट तूं; परंतु धरिसी लौकीक लोकांधिका[10] ! ॥ २६

रामा ! नाम तुझेंचि निर्जरतरू[11]; त्वन्नाम चिंतामणी;
श्रीरामा ! तव नाम कामकपिला[12], भक्तैकसंरक्षणीं; ।
शास्त्रें, वेद, पुराणही, जप, तपें, सन्मंत्र, यंत्रादिकें,
आम्ही या जगिं योग, याग, अवघें त्वन्नाम जाणों निकें[13]. ॥ २७

या महीमंडळीं काम नाहीं दुजें, राममंत्राविना रामचंद्रप्रभू ! ।
कामरागादिकां पामरां वारिती, रामनामावळी श्यामतेजोनिधी. ॥ २८

वेद गाताति निर्वेधनामीं, झडे भेद, दे त्याचिया भेदने वोझडे; ।
मोदर्दैन्नाम[14] तें मोद सेवी तया नाद ना मुक्तिचा, ना धरी या भया. ॥ २९

चंडपापातमाचंडभानू[15] महीमंडळीं योगिहृन्मंडणा[16] ! नाम हें; ।
खंड नानाविधें दंड विघ्ना करीं; दंडपाणी! धरी दंड साधा करीं[17]. ॥ ३०

पर्वतीं पंथ हा सर्वथा व्हावया, खर्व[18] मी दास, कीं सर्वचिंतालया ।
गर्व नेघों अजी शर्वरीशानना[19] ! सर्व नामें तुझा भर्वसा जी ! मना. ॥ ३१

---

१. वायुपुत्रमारुति. २. त्याशिवाय. ३. सुगुण आणि उत्तम अशा वानरांनीं. ४. पुष्कळ. ५. जन्मरहित असा. ६. मला विहिरीला. ७. ज्ञानरूप आनंदा. ८. अमृताचा मेघ. ९. चक्रवाक पक्षी. १०. लोकांपेक्षां महान् हे रामा. ११. कल्पतरू. १२ कामधेनु. १३. बरें. १४. हर्ष देणारें ज्याचें नाम. १५. प्रखरपापरूप अंधकारास सूर्य. १६. योग्यांच्या हृदयाला अलंकार अशा रामा. १७. हातीं. १८. लहान अजाण, असा अर्थ. १९. चंद्रवदना.

नामीं तुझ्या सदृढ बांधिन पंथ रामा! **रा मा** असें लिहुनि, साधिन सेतुकामा; ।
कां मानसीं पतिसि संकट? एक नामीं या सांधतील गिरि सागरिं; मिथ्य ना मीं.' ३२

ऐसें बोलुन वंदितां **प्र**भुपदा, वीरां गमे संपदा;
'हा वारील समस्त ताप, अपदा, दावील लंकापदा;' ।
ऐसे गर्जति वीर चारुवचना, ठाकूनि आलोचना,
तों लक्षी हनुमंत सेतुरचना आणोनियां लोचना. ॥ ३३

पुच्छें पर्वत सर्व सेतुसरणीमध्यें[1] बळें आकळी;
हस्तें पुस्तकसे समस्त धरुनी, रेखीत नामावळी; ।
एक्या पर्वतिं **रा** लिहोन, दुसऱ्या रेखीतसे भव्य **मा**;
ते दोन्ही जडतां न ते बिघडती आश्चर्य वीरोत्तमां[2]. ॥ ३४

**रा**पुढें **मा** जडे, बापलीला कशी? यापरी जिंकिलें[3] आप तें साहसीं. ।
चापपाणी म्हणे, 'हा पयोधी तरा; थाप हाणूनि दुःशाप शत्रू धरा.' ॥ ३५

ऐसे सर्व गिरी क्षणांतचि करी तो सेतु दोहीं करीं;
केली वाट खरी, जडूनि शिखरी[4], उद्दामरत्नाकरीं. ।
अभ्रीं एकरितीं बुधेंद्र करिती वृष्टी फुलांची भली;
गाती **किंनरतुं**बरादिक नभीं[5]; सेना कशी शोभली? ॥ ३६

तेथें वानर ऋक्ष लक्षुनि अशी पिंगाक्ष लीलागती,
कोणी गर्जति, एक तर्जति, **वि**भूपायीं बळें लागती; ।
तोषें भेटति एकमेक, उठती लोटावया, वाटते
दाटे थाट, उलाट घेति गगनीं, थोडी तयां वाट ते. ॥ ३७

रुंदी ते दशयोजनें, दशगुणी[6] लांबी विशेषें बरी;
जातां वीर दळीं, तयां स्थळ नसे, उड्डाण घेती वरी; ।
त्यांमध्यें उदयाद्रिशृंगयुगुळीं चंद्रार्क आल्यापरी,[7]
स्कंधीं **रा**घव दोघ ते[8] मिरवती **भी**मांगदीं[9][10] तत्परीं. ॥ ३८

ऐसा अपार महिमा **र**घुराजनामीं; संवादलों अजि! तया चतुरा जना मी; ।
नामींच सेतु दृढसा रचिला, गतीसी; येणेंच भक्तजन योजिति लाग तीसीं. ॥ ३९

---

१. सेतुमार्गांत. २. वीरश्रेष्ठ वानरांस. ३. समुद्रजल. ४. पर्वत. ५. आकाशीं. ६. वानर. ७. रुंदीच्या दसपट. ८. उदयाचलाचे दोन शिखरांवर सूर्यचंद्र आल्याप्रमाणें. ९. रामलक्ष्मण. १०. मारुति व अंगद यांच्या ठायीं.

लिहूनि दोन अक्षरें, क्षणांत सेतु बांधिला;
समीरनंदनें असाध्यकार्यभाग साधिला; ।
अगस्तिसहित ती सुमध्यकथा अशी प्रवर्तली;
म्हणोनि नामकीर्तनासि बुद्धि हेचि आर्तली. ॥ ४०
श्रीरामनामगुणकीर्तन पापहारी गाती, तयां करिल पावन पापहारी; ।
आनंदनंदन म्हणे, 'जप नाम वाणी! होशी सभाग्य तुज काय सुखासि वाणी?' ४१

---

# कृष्णचरित्रांतील आख्यानें.

## बालचरित्र.

(श्लोक.)

यादवेंद्रचरितामृत सेवा लोक हो! श्रवण सज्जुनि सेवा; ।
त्या सुखें तुम्हि न माल जगीं या; भारती अजि यदर्थ मदीया. ॥ १
नाना छंद करी हरी व्रजपुरीं, बालस्थिती आदरी;
मातेला पदरीं धरी निजकरीं, मोत्यांचिया झालरी; ।
ज्याचें नाम उमा सदाशिव सदाही चिंतिती अंतरीं,
तो हा कृष्ण विभू जपे जननिची नामावळी साजरी. ॥ २
घरा येतां, जातां, दधि घुसळितां, पाक करितां,
विडे घेतां, देतां, सहज दुहितां, दुग्ध भरितां, ।
नदीपाण्या जातां, जन निरखितां ही, परिसतां,
फिरे मातेमागें, पदर धरुनी छंद नसता. ॥ ३
'फिरसि कां उगा पाठिसी हरी? सरसिजानना! सांग लौकरी;' ।
हरि म्हणे, 'मला घेउनी कडे, स्थिरपणें उगे बैस ईकडे.' ॥ ४
जननि हांसली खदखदां तदां; 'सकळ काम हें मी करूं कदां?।
करिसि कां बहू छंद बा! उगा? उठ, मुलांसवें खेळ जा उगा.' ॥ ५
'जा जा, खेळ मुलांसवें.' 'मज नको.' 'कां जेविसी?' 'तें नको.'
'कृष्णा! दूध पिसी?' 'नको.' 'निज. घरा बाहेर येसी?' 'नको.' ।
'चेंडू देउं तुला?' 'नको.' 'निजवितें, ये, ऊठ,' 'तें ही नको.'
'नारी ह्या तुज नोवऱ्या करिन मी,' तेव्हां म्हणेना 'नको.' ॥ ६

---

१. मारुतीनें. २. पापनाशक. (राम.) ३. कमीपणा. ४. कमलासारखें तोंड आहे ज्याचें असा.

‘हूं हूं यशोदे! मजलागिं तें दे; राधेउरीं कंचुकिमाजि नांदे.’ ।
हांसोनि बोले जननी यशोदा, ‘मागों नये रे! उगला मुकुंदा!’ ॥ ७
कृष्ण घेउनि कडे निजसद्मा चालिली नयननिर्जितपद्मा; ।
हालवी जननि पालखशय्या; सज्जनीं सरस गात जि ओव्या. ॥ ८
निजेला कीं जागा म्हणुनि जननी जों निरखिती,
दयाब्धीची मूर्ती तंव उघडनेत्रींच दिसती; ।
कशी येना निद्रा तुज? गुणसमुद्रा! यदुपती!
पुन्हा गाऊं लागे, तंव वदत देवो मृदुगती. ॥ ९
‘माते! मला झोंप न ये चि; कां कीं, तूं काहणी सांगसि पूर्विका कीं?।
तेणें गुणें येइल नीज माते! निजेलिया या पुरुषोत्तमातें.’ ॥ १०
कृष्णमूर्ति किति सुंदर शाहणी? ‘सांगणें’ म्हणत ‘पूर्विल काहणी.’ ।
हालवी जननि पालख माउली; ते कथा वदत शीतळ साउली. ॥ ११
‘होता राम म्हणोनि,’ ‘हूं.’ ‘क्षितिसुता तत्पत्नि,’ ‘हूं.’ ‘तत्पिता-
वाक्यें दंडक हिंडतां, दशमुखें ते चोरिली योषिता.’ ।
निद्रेलागिं कथा अशी जननि ते सांगे, हरी ऐकतां,
‘दे दे बाण धनुर्धनुष्य अनुजा!’ बोले; उठे तत्वतां. ॥ १२
‘यावें शंकरजी! बसा अजि असे, डावीकडे धातया!
स्कंदा! क्षेमें? सुराधिपा! कुशल कीं? वित्तेशजी! येथ या.’ ।
ऐसा शब्द निजेलिया हरिचिया माता मुखीं ऐकुनी,
‘कां कां वोसणसी? मुला!’ म्हणउनी धू धू करी घेउनी. ॥ १३
जागें करी जननि त्या गरुडध्वजाला; तो बैसुनी मुदित सावध शीघ्र झाला; ।
पूसी मुखांबु जननी, नयना स्वधारीं, दावी असें कपटनाटक सूत्रधारी. ॥ १४
‘मी नंदनंदन शिशु व्रजभूमिवासी’ हें नाठवे निज हिता नतबांधवासी. ।
कीं मींच राघव अशी गति दाखवी तो, आनंदनंदनविभू रस चाखवीतो.॥ १५

---

## पूतनावध.

(श्लोक.)

‘राया! सादर’ बादरायणि म्हणे ‘एकें जगत्पालकें
केलें अद्भुत बालकें, रिपुकुळां भंगोनि भृंगालकें; ।

---

१. घर. २. डोळ्यांनीं जिंकलें आहे कमल जीनें अशी. ३. पाळणा. ४. कार्तिकस्वामी. ५. कुशळ. ६. कुबेर. ७. बादरायण म्ह० व्यास, त्याचा पुत्र शुकाचार्य. ८. भृंग्यासारखे काळे कुळकुळीत आहेत केंस ज्याचे असा.

जेव्हां दुर्धर पूतना निर्वटिली, कृष्णासि तैं बारसें;
लोकाश्चर्य अनंत वीर्य मिरवे गांभीर्य नाना रसें.' ॥ १
'सांग तो मज सविस्तर गाथा; पुण्य पावन करीं मुनिनाथा!' ।
ऐक गा श्रवणभाग्यनिधाना! श्रीहरीकृतचरित्रविधाना. ॥ २

(चूर्णिका.)

श्रीमन्मंगलगुणगणकिरणसहस्रविततांशुमाळी, परिहरितदुरितकृतमाळी, श्री-वनमाळी गोद्विजसुधी सद्बंधविहित जनित कलिलग्रस्त दनुजजातसमस्तभूभार हरावया पुंडरीकनयन कुंडलीशशयन अंडजराजवाहन मोहन चंडकोटि-भानुसमान भूषणीं शोभायमान नंदाचिये मंदिरीं यशोदागगनोदरीं श्रीहरि निजलीले उदेला. ॥ ३

(श्लोक.)

जन्मोनि कृष्ण मथुरेंत, व्रजीं लपाला; तेणें भयें चकितबुद्धि तया नृपाला. ।
भासे दिठीं सजन कानन कृष्णरूपें; मानी जसा भ्रमित शुक्तिदलासि रूपें. ॥ ४
कंसभूपति असा बहु भ्याला; कृष्णरूप चि दिसे जग त्याला; ।
बैसला निजसभासदलोकीं; अंतरीं मन बुडे भयशोकीं. ॥ ५

(चूर्णिका.)

हें वर्मतत्व जाणोनि अनवरतदुरितकर्मधुरंधरें, मथुरानगरपुरंदरें, मखप्रमुख-कर्ममार्गध्वंसें, तया कंसें पाचारिली निजभगिनी पूतनाभिधानी. ॥ ६

(श्लोक.)

चाणूरमल्लादिक दैत्यकोटी तो मेळवी, भीति धरोनि पोटीं; ।
पाचारुनी पातकि पूतनेला, वधावया कृष्ण विचार केला. ॥ ७

(चूर्णिका.)

म्हणे, 'अहो जी मद्धृदयव्याधिपरिहरणदिव्यौषधे! आप्तजनसाहाय्यविषयीं निपुण गुणी पटुतर तव बुद्धि पराक्रमसिद्धे! परमप्रसिद्धे! कृष्णवधोपाय तु-झिया संमतें योजावा.' ॥ ८

(श्लोक.)

बोले रोषुनि पूतना 'प्रभु!' म्हणे 'कां वाहतां काळजी?
काळातें दमणार मी, उमगितें धुंडोनियां बाळ जी! ।
पाताळीं, नभमंडळीं, क्षितितळीं तो जेथ जैसा असे,
तैसा शोध करोनि, साधिन तुझा कार्यार्थ मानीं असें.' ॥ ९

१. मारिली. २. हकीकत. ३. शिंपला. ४. चांदी.

(दिंड्या.)

कथा ऐकें कल्याण **कौ**रवेशा ! । **बा**ळकृष्णाच्या पहा महावेशा. ॥ ध्रुवपद. ॥
**कं**[1]सरायें देऊनि चीर[2]माळा, । महा तोषाचा घेउनी उमाळा, ।
प्रेरियेली **पू**तना नाम बा[3]ळा । जगीं धुंडाया **दे**वकिच्या बाळा. ॥ १ ॥
फिरे फेरे, साहसें फार सारें । ग्राम, कुग्राम, पुऱ्या, अग्रहारें. ।
मुलें सर्वत्र हि जीं जि सुकूमारें । तयां सर्वांच्या पेटलिसे मारें; ॥ २ ॥
होति **कृ**ष्णा जन्मोनि दिवस दाहा, । तशा बाळा देखुनी उठे दा[4]हा. ।
**का**मरागादिक शत्रु जिथें साहा, । तेथ कैंचा वीवेक फारसा हा ? ॥ ३ ॥
**ह**रीसाठीं बाळकें लक्षकोटी । जिणें भक्षीलीं दीर्घ दंतकोटी; ।
**गो**कुळा आली तदा महाखोटी । दिसे भोळी, अत्यंत कपट पोटीं. ॥ ४ ॥
वयें सोळा वर्षांचि, उभी ठेली; । सुतारुण्यें तारुण्य गु[5]णठेली. ।
**नं**दपुत्राच्या दर्शना भुकेली । दिंडि ऐशी **आ**नंदसुतें केली. ॥ ५ ॥ १०

(श्लोक.)

‘एथें असेल बहुधा शिशु **कं**सहंता, शोधोनि साधिन’ म्हणे धरुनी अहंता. ।
‘**ल**क्ष्मीविलास दिसतो नगरांत भारी; तो सांपडेल मज **दा**नववल्लभारी. ॥ ११
जेथें पद्मवनें, अपार तुलसी, जेथें बहू गोधनें,
जेथें वैष्णव **वे**दघोष करिती, सद्वाक्य संबोधनें, ।
जेथें पुष्पफळीं सुपल्लवदलीं शृंगार आला वना,
तेथें क्रीडतसे **ह**री कविवरीं हे वर्णिली भावना. ॥ १२
पूर्वी हे स्थिति, हा विलास, सुख हें नाहींच या **गो**कुळीं,
आला साच गमे **ह**री, **न**रहरी, या **नं**दजीच्या कुळीं; ।
सालंकार सु[6]बल्लवी मिरवती, सौवर्णवल्ली वनीं;
तैशी होइन मी हि मंजुनयना, होऊनियां यौ[7]वनी.’ ॥ १३
झाली तत्काळ **रं**भा; दिसत मृदु जिचे ऊ[8]रु क[9]र्पूररंभा;
**गं**गेच्या चं[10]चंदंभासम तरळ गळां हार ल्याली सदंभा. ।
[11]मत्तेभाच्या निकुं[12]भोकृति कठिण उरीं दावि व[13]क्षोजकुंभा.
भासे ऐशी स्वयंभा मनिं कुटिलपणें ते **र**ती कीं स्वयंभा. ॥ १४

---

१. ‘कंसराया हो देशनिधीमाळा’ असाही पाठ आहे. २ लुगडें. ३. स्त्री. ४. आग. ५. गुणांची पिशवी. ६. गवळणी. ७. तरुणी. ८. मांड्या. ९. कर्पूरकदली. (केळ.) १०. हलणारें पाणी. ११. मदोन्मत्त हत्ती. १२. गंडस्थळ. १३. स्तनकलश.

जाती नूतननूतना व्रजवधू, तत्संगती पूतना
आली नंदनिकेतनासि[1] निरखू पक्षींद्रसंकेतना[2]. ।
तेथें गोवळराज नृत्य करिती; कृष्णास नीरंजना
बैसे त्याच सभाजनांत, निरखी योगीश[3]हृद्राजना. ॥ १५
पुढें बैसलीसे जशी मानवी ते; हरी देखुनी क्रोध दुर्मान वीते; ।
सभेमाजि सौभाग्यभा मानवीते यशोदा पुसे, 'कोण भामा नवी ते?' ॥ १६
स्वयें वदे स्वागत गोपिकांला; जें जिंकितें कंठरवें पिकांला; ।
म्हणे, 'यशोदे! तुझिया मुला मी पाहोनि धालें व्रजि भूर्लेलामीं.' ॥ १७

(दिंड्या.)

काय वर्णू लावण्य कामिनीचें? । इंद्रचंद्रा नेणवे रूप जीचें. ॥ ध्रुवपद. ॥
भूमिपर्यंत रुळे नीळ वेणी; । वरी शोभे ती भव्य नगश्रेणी; ।
चंद्र आणी शिसफूल फुलावाणी, । भाळिं भांगटिळा, नासिकीं सुपाणी. ॥ १ ॥
चुडे, कंगणिया, हातसरे, दोरे; । कटीं शोभति ते भव्य कडंदोरे. ।
फार साजे सौंदर्य दैत्यदारे; । कामिलोकांचें चित्त जें विदारे. ॥ २ ॥
बाळ्या, भोंकरें, जडित ते काप कानीं; । हार कंठीं देदीप्य माणिकांनीं. ।
करीं मुद्रा वीराजमान मानी, । कोण ऐशी देखुनी धैर्य मानी? ॥ ३ ॥
वांकि, बाहुवटें, बाजुबंद, बाळी, । त्यालि चोळी ते, मोतियांचि जाळी. ।
हेमवसनाचा घोळ तळीं घोळी; । मनीं कपटी, बाहेरि दिसे भोळी. ॥ ४ ॥
पदीं सांखळिया, नूपुरादि वाळे; । बिं[10]दी चालतसे दाखवीत चाळे. ।
डोळे मोडतांचि गोपवृंदें[11] भाळे; । जो तो पाहे तल्लीन रा[12]जबाळे. ॥ ५ ॥
ऐशि सुंदरि ते मंदहास चाली । नंदरायाच्या मंदिरासि आली. ।
द्वारपाळां टाकोनि तीव्र जाळी; । मोह पाडोनी मंदिरीं निघाली. ॥ ६ ॥
पंकजाक्षी निःशंक शांत ब[13]की । रक्षपाळां पाडुनी मोहपंकीं[14], ।
जाति झाली कृष्णासि घेउं अंकीं[15]; । जो हा दाता आनंदतनय रंकीं. ॥ ७ ॥ १८

(श्लोक.)

'संतानाविण फार दीन क्रमले, हे फार चिंता मला
होती हो! बहु, आजि देखुनि सुता हा जीव विश्रामला.' ।

---

१. घर. २. गरुडध्वज. (कृष्ण.) ३. योग्यांच्या हृदयांत राहणारा. (कृष्ण.) ४. कांति. ५. स्त्री. ६. शब्द. ७. कोकिल. ८. भूषण. ९. दागिन्यांची पंक्ती. १०. वाटेंत. ११. समूह. १२. उत्तमस्त्री. (अशा प्रकारचीं दुसरीं उदाहरणें—राजमार्ग, राजहंस, राजविद्या, रायआंवळी, इ०). १३. पूतना. १४. चिखल. १५. मांडी.

पात्रीं रत्नमणी, फळावळि, विडे, खर्जूरही, खोबरें
ठेवी वाण पुढें, म्हणे, 'मज सये! दे बाळ पाहों बरें. ॥ १९
बाई! तुझा पाहुनि कृष्ण तान्हा, आला पहा हो! मजलागिं पान्हा.'।
मिथ्या असा तेथ करूनि बान्हा, येऊनि घे शीघ्र मनोज्ञ कान्हा. ॥ २०

(पद.)

'कोठें हो कोठें बाळ यशोदे!'।
म्हणे पूतना, 'आणि एथें मजला पाहूं दे. ॥ ध्रुवपद. ॥
काय सांगों? मनामाजि। आनंद कोंदला आजि।
दाटलाहो पान्हा आणि कान्हा पाजूं दे ॥ कोठें० ॥ १ ॥
चित्त उताविळ झालें। भाग्य माझें फळा आलें।
कृष्णासि मटमटा हें दूध घेऊं दे ॥ कोठें० ॥ २ ॥
आनंदनंदनस्वामी। सर्वसाक्षी अंतर्यामी।
नेणोनी ते म्हणे आण अंकीं ठेवूं दे ॥ कोठें० ॥ ३ ॥ २१

(श्लोक.)

'झालें बहू मन उताविळ हो यशोदे! दे बाळ लौकर करीं, हृदयीं धरूं दे;।
पान्हा भरोनि न धरे मजलागिं बाई! दे दे' म्हणोनि चमके, करि फार घाई.
'बहुत आवडती मज लेंकरें' म्हणुनि खेळवुं धाविनली करें.।
त्वरित खेळवि आननकोमला; 'तुजविना मज आन नको मुला!' ॥ २३
प्रेमा ऐसा दाविते दैत्यभाजा; तेणें तोषे नंदभार्या सभाजा.।
'मी दैवाची, माझिया बाळकाला पाहों येती लोक नीलालकाला.' ॥ २४
लखलखित विराजे पाळणा हाटकाचा;
खचित मणिगणानें त्या जगन्नायकाचा.।
झळकत वरि भारी घोंस मुक्ताफळांचा,
सहज हरि निजेला माजि हंता खळांचा. ॥ २५
झडकरि मग आली घ्यावया बाळकृष्णा.
घडिभर मुख पाहे कृष्णमाता सतृष्णा.।
उचलुनि निजहातें सोयरा सज्जनांचा,
निजहृदयिं धरी ते साध्य जो साधनांचा. ॥ २६

---

१. मिष. २. सुंदर. ३. दैत्यस्त्री पूतना. ४. स्त्रियांसह. ५. निळे आहेत केंस ज्याचे असा. ६. सोनें.

नंद[1]ात्मजा त्वरित नंदकुळावतंसा देखोनि ते नखमुखाक्रंति बाहु अंसा ।
घे मांडिये भजकमानसराजहंसा; ते राक्षसी अनुमिते 'रिपु हाचि कंसा.' ॥ २७
ठावें नसे किमपि नंदनितं[3]बिनीला; दे कौतुकें म्हणुन त्या नवमेघनीला. ।
साधूजना कुटिलतेवरि काज नाहीं; नाहींच आपपर कांहिंच योजना ही. ॥ २८
तों पूतना कपटि बाष्प भरोनि डोळे; घे मांडियेवरि, हरी स्वमनांत पोळे; ।
रतें म्हणोनि भरि इंगळ जेविं खोळे[6], घे काळ बाळमति, पाहति लोक भोळे. २९

द[7]नुजयुवति बोले, 'तूं सखी ! राजबाळा
कनककुसुमगौरी केंवि व्यालीस काळा ?' ।
खदखद हरि हांसे, बोलिली सत्यशीळा;
बळदमन खळांचा दाखवी बाळलीळा. ॥ ३०
कमलनयन कान्हा घेतला हो ! रंसानें[8]
उचलुनि निज अंकीं, भावुनी बाल सानें[9]; ।
कुपितफ[10]णिपतीला हार मानूनि, तीनें
स्वकरिं धरुनि कंठीं बांधिला दुर्मतीनें. ॥ ३१

जाणोनियां भा[11]व तिची, स्वभावें झांकी हरी लोचन बाळभावें. ।
शास्ता जगाचा जरि आकळीला, तरी न बोले, धरि लोकलीला. ॥ ३२
लक्षोनि कंजे[12]रुचिरेक्षण राक्षसीला हांसे तदा खदखदां, दमि तो अशीला. ।
ते खेळवीत, चुचकारुनि, बाळ थानीं लावी सतोष मग पूर्वमनोरथांनीं. ॥ ३३
देखा, माखुनियां विषें स्तन मुखीं लावी मुखा संमुखें;
चोखी लो[13]कशिखामणी सुरसखा शोषावयातें मुखें. ।
पाखाळोनि विखा, तिच्या नखशिखा शाखांस चाखावया,
शेखीं लेखुनि खेचरी तृणशिखा जे पातली खावया. ॥ ३४
पयोधिसंक्रांतपयोधराचे परी धरी अग्र पयो[14]धराचें; ।
शोषी अशेषागरसागरा तो; ब्रह्मादिदेवोत्क[15]र ज्यासि गातो. ॥ ३५
स्तनाननीं तो जडला जळूसा; झाला तिला हा परता टळूसा. ।
मिठी प्रयत्नें न सुटे हरीची; भांबावली बुद्धि महासुरीची. ॥ ३६

---

१. नंदकुलभूषण. (कृष्ण.) २. शोभा. ३. स्त्री. ४. 'दे प्राशना स्तन मुखीं करुनी कुचाळे' असाही पाठ आहे. ५ निखारे. ६. वस्त्रादिकांची खोळ. ७. पूतना. ८. प्रीतीनें. ९. धाकटें. १०. साप. ११. कपट. १२. कमलाप्रमाणें सुंदर आहेत डोळे ज्याचे. १३. त्रैलोक्यभूषण. (कृष्ण.) १४. स्तन. १५. समूह.

(ओंव्या.)

या परी शोषिली पूतना, । तत्काळ मूकली प्राणा, ।
पांडुरता चढली वदना, । विचकी रदना भ्यासुर. ॥ १ ॥
शुष्क काष्ठाचे परी । शोषूनि केली ते असुरी; ।
तये समयीं कंस प्रेरी । हेर सत्वर गोकुळा. ॥ २ ॥
पूतनेचि देखूनी गती, । हेर चळचळां कांपती, ।
भय धरूनियां पळती, । कंसा सांगती तें वृत्त. ॥ ३ ॥
ऐकूनि कान्हयाची करणी, । कंसें भय धरिलें अंतःकरणीं. ।
येरीकडे चक्रपाणी । तये लागूनी काय करी. ॥ ४ ॥
स्तना लागूनि जडला, । मांसाचा शोष केला, ।
परतून न सोडी तयेला, । गोपीमेळा देखत. ॥ ५ ॥
यशोदा आली जवळी, । पाहे त्या जंव वनमाळी, ।
तंव पर्वतप्राय भूतळीं । पूतना पडली गतजीवा. ॥ ६ ॥
महापर्वतीं सिंह बैसला, । तैसा पूतनारूपीं जडला; ।
माय सोडवी तयेवेळां, । 'उठीं बाळा' म्हणवुनी. ॥ ७ ॥
'बारे! कैंची हे राक्षसी । आली तूतें ग्रासावयासी? ।
ईस देखोनी सळसी' । म्हणोनि त्वरेंशीं काढिला. ॥ ८ ॥
हृदयीं वाहूनि कमना, । प्रेमें लाविला स्तना, ।
मोहें स्रवतसे पान्हा, । नेला सदना तेथूनी. ॥ ९ ॥
गोपगोपी आश्चर्य करिती, । विस्मित झाला नंद चित्तीं, ।
'केवढी राक्षसी श्रीपती । पाडिली क्षिती शोषुनी! ॥ १० ॥
नव्हे बाळक केवळ, । कीं परब्रह्मचि गोपाळ! ।
आश्चर्य करिती वेळोवेळ । चकित गोपाळ पाहाती. ॥ ११ ॥
गोवळ आणी गोपनारी । म्हणती, 'यशोदे सुंदरी! ।
तुझ्या पुत्राची थोरी । काय वैखरी वदेल? ॥ १२ ॥
आनंदप्रभु हा साना, । केवढी शोषिली पूतना? ।
येणें रक्षिलें गोकुळजनां, । महाविघ्न वारिलें. ॥ १३ ॥ ३७

(श्लोक.)

रक्तातें अनुरक्त देखुनि हरी, आरक्त डोळे करी;
युक्तीनें, बहु शक्ति वेंचुनि, करीं सोडोनि घे लौकरी; ।

तों कांहीं न सुटेचि ती दृढ मिठी, दाटे भयें साहसी;
'खासी काय मला? मुला!' मग म्हणे 'शोषूं किती पाहसी?'॥ ३८
आंगीं जियेस नवनागसहस्रशक्ती, ते सोडवी कुटिल दावुनि बाळभक्ती.।
'आतां किती स्तन पिशील धरूनि कृष्णा! ऐशी असे तुज कशी मज सांग तृष्णा?'
तें बाळ दैत्यकेवळासि असे भुकेलें; 'रक्तें तिच्या' म्हण 'अपोशन आजि केलें.'।
तत्प्राण जाण हरिले निजविक्रमानें, प्राणाहुती मॉगति पांच अनुक्रमानें.॥ ४०
सौजन्यस्तन्यपानें घुटघुटुनि तिचे प्राण सत्राण नेले;
व्याघ्रें ते उग्रतेनें, चरफडुनि मनीं, शब्द निःशब्द केले.।
'सोडीं सोडीं' म्हणोनी प्रगट घडिघडी रंगणीं अंग घाली;
घोराकारें शरीरें तळपुनि पडली पूतना भूतजाळीं.॥ ४१
माथां पिंगट झिपऱ्या, मुखबिळीं विक्राळ दंतावळी;
डोळे वर्तुळ रक्त, कर्कश तनू, कंठध्वनी आंवळी;।
अभ्रीं वाढुनि वाड, धाड पडली, तेणें थरारी धरा.
मूर्छाग्रस्त समस्त. कोण धरिती कोणासि शोणाधरा?॥ ४२
गोपी, गोपाळ, गाई, पडुनि महितळीं, शब्दती तैं 'अगाई.'
ऐशी राया! नवाई, जनिं वनिं पसरे राक्षसीची अवाई.।
तों हांसे शेषशायी भवतपनतपाक्रांतसंतोषदायी;
त्या कृष्णाचेच पायीं नमन करितसे आरणीचा शिपायी.॥ ४३

## कंदुकाख्यान.

(श्लोक.)

कोणी ते प्रमदा तया व्रजपुरा जातां रणन्नूपुरा,
तेथें ये त्रिपुरारिचा प्रियसखा, तो योग वानूं पुरा.।
शोभे कल्पतरूतळीं करतळीं पांवा, तथा मोहरी;
वाजे मंजुळ, कंजलोचन जना नांदे हरी मोहरी.॥ १
ज्याची भांसुर भा प्रभाकरनिभा व्यापूनि लंघी नभा;
तो हा संतसभाभिवंदित उभा, ते दिव्य देखोनि भा;।

१. हत्ती. २. घांस. ३. विजापुरच्या राज्यांतल्या आरणीगांवचा राहणारा हा कवि होता. शिपाई म्हणण्याचें कारण यानें आरणीच्या लढाईत कांहीं पराक्रम केलेला असावा. ४. स्त्री. ५. गोकुळ. ६. खुळखुळत आहेत पैंजणें जीचीं अशी. ७. शिव. ८. वर्णूं. ९. कमलासारखे आहेत डोळे ज्याचे. १०. तेजस्वी. ११. कांति. १२. सूर्य.

म्याली बल्लववल्लभा[1], मग इभा[2]ऐशी रमावल्लभा
चाले दूरुनि, हा धरील म्हणुनी, शंके जगद्दुर्लभा. ॥ २
'याची सदां समजते बरि लोकलीला; मातें करीं धरिल देखुनि एकलीला.' ।
चाले चुकावुनि पुढें चमकोनि घोषा[3], बिंबाधरा[4] शशिमुखी पिक[5]मंजुघोषा. ॥ ३
म्याली, पुढें सरकली गजराजचाली[6]; कित्येक दूर पथ लंघुनियां निघाली. ।
ये पाठिशीं हरि दयाघन, मंद बाहे; जातां विलोलनयना परतूनि पाहे. ॥ ४
परतुनि जंव पाहे गोकुळा जातजातां,
निकट चि हरि आला वंद्य जो वेदसंतां. ।
पदर धरुनि तीचा, तो उभा ज्ञानगाभा;
पशुपयुवति झाली पात्र चिद्भाग्यलाभा. ॥ ५
ते सोडवी धरुनि अंचळ चंचळाक्षी; ओढी बळें स्वबळ बांधव लोकसाक्षी. ।
'पायीं तुझ्या हरि! पडेन' म्हणे 'कृपाळा! रे! सोडिं सोडिं मज,फार उशीर झाला.
मी योषिता[7] वंशधरा[8] सुशीळा; कां झोंबसी? वंशधरा[9]! सुशीळा!' ।
शौरी म्हणे, 'मानवतों अंशीला[10]; न स्वीकरी मानव तो अंशीला[11].' ॥ ७
प्रार्थी गोपशिखामणी[12]स रमणी 'गोपांगणीं तूं धनी;
आणी हे करणी उणीव सखया! कोणी गणीना धनी; ।
पाण्यालागुनि गौळणी बहुजणी येतील एथें झणी;
वाटे त्या धरितील तूज तरुणी, होते मला गांजणी.' ॥ ८
ऐशी बोलत ते उभी, हरि न भी, ते भीरु पाहे दिठी;
हा आभीर[13] गभीर भूपति असा, सोडी च ना ते मिठी. ।
ते ओढी, परि हा न सोडि च गडी, तैं हात जोडी सती.
ते जोडी मज भासते स्मररती दोघें तशीं दीसती. ॥ ९
येरीकडे नंदवधू यशोदा धुंडी तया भक्तदयापयोदा[14]. ।
खेळावया बाळक संगसंगें गेला असे क्रीडत रंगरंगें. ॥ १०

---

१. गवळ्याची स्त्री. २. हत्ती. ३. गवळवाडा. ४. तोंडल्यासारखा आहे खालचा ओंठ जीचा अशी. ५. कोकिलासारखा आहे मंजुल स्वर जीचा अशी. ६. उत्तम हत्तीसारखी मंद आहे गति जीची अशी. ७. स्त्री. ८. कुलीन. ९. मुरलीधर. १०. अशा प्रकारचीला. ११. शीलरहित म्ह० वाईट स्वभावाची. १२. गवळ्यांत मुख्य. (कृष्ण.) १३. गवळी. १४. भक्तांस दयारूपी मेघ.

निघाली बाहेरी हुडकित हरीतें चहुंकडे;
फिरे नाना मार्गीं, करिं धरुनि त्याचे संवगडे; ।
पुसे ज्याला त्याला, 'तुम्हि निरखिलें मूल सखये!'
उठावे खेळाया, सहज गुण त्याचा जगति ये. ॥ ११

ऐशी शोध करीत हंसगतिनें लंघीत आली पथा;
तीतें देखुनियां दुरी, मग हरी लीला करी अन्यथा. ।
गोपीतें पदरीं न सोडि च करीं, लोळे धरारंगणीं;
दावी स्फुंदुन, मंद रूदन मुखीं, भांबावली गौळणी. ॥ १२

आला राग तिला, म्हणे युवतिला, 'कां गे! खट्याळे! कशी
नाहीं लाज तुला? मुलासि धरुनी, रानीं उभी ठाकसी?' ।
'नेणें कांहिं च मी, स्वभावगतिनें मामी[1]! घरा जातसें;
मार्गीं हा पदरीं धरी मज हरी, नेणा तुम्ही कां? तसें.' ॥ १३

श्रीहरी परम स्फुंदत लोळे ; बाष्पयुक्त बहु दाखवि डोळे; ।
वाटला कळवळा जननीला; घे कडेवरि तदा घननीळा. ॥ १४

'नेणें चि मी कांहिं चि दोष दोषा' ते भीत बोले पशुपाळयोषा. ।
तेव्हां तया सज्जनलोकपोषा माता दटावीत वदे सरोषा. ॥ १५

दटाविते माय तया हरीतें, चरित्र ज्याचें दुरीतें हरीतें; ।
मारावया धांवलि कृष्णजीतें; तो वाटला त्राल्य अचाट जीतें. ॥ १६

व्रजांगना सांगत येत होत्या, यथार्थ वार्ता गमल्या अहो! त्या. ।
मारावया घे मग फोक हातीं; समग्र ही लोक तया पहाती. ॥ १७

पशुपयुवतिपाशीं दाटली लोकराजी;
अनिमिष नयनानें पाहते श्रीधरा जी. ।
तंव हरि जननीतें स्फुंदस्फुंदोनि सांगे.
'अमइ! निरखिली म्यां चोरटी चौंदिसां गे!' ॥ १८

'हे अशी च रमणी करि चोरी; मागतां प्रगटते शिरजोरी;' ।
नंदसुंदरि म्हणे तिजलागीं, 'कां असें करिसि? होसि बजागी?' ॥ १९

तेव्हां व्याकुल ते वदे कुळवधू 'हा शब्द माझ्या कुळा
कल्पांतीं न लगे चि हो, सहज मी जातां घरा गोकुळा, ।

---

१. सासूबाई.

याची मात खरी म्हणूनि धरितां, हे आण घ्या मामिसें!
नेणें कूड कदापि मी, करि हरी विस्तार नसूल्या मिसें.' ॥ २०
'आम्हीं सर्व मुलें व्रिदींत अमई! चेंडूफळी खेळतां,
अभ्रीं उंच उफाळला, क्षितितळीं तो येथ आंदोळतां, ।
तो आला इचिये घरीं, मग इणें चोरूनियां ठेविला;
नेदी; मागुति मागती, म्हणुनियां चैलांचळीं गोंविला.' ॥ २१
'अमइ! सत्य वदे किति वैखरी? गमतसे सकळांस हि ते खरी. ।
हरि वदे मनिं कल्पुनि मामिसें! मज धरी पदरीं भलत्या मिसें. ॥ २२
करूनियां विक्रय गोरसाचा, मी ये घरा, भाव असा च साचा. ।
याचा मला कंदुक तो न ठावा; माझ्या कुळा बोल असा उठावा.' ॥ २३
रोषें वदे शपथपूर्वक सारसाक्षी, 'नेणें चि मी कपट कृत्रिम, भूमि साक्षी.' ।
'मिथ्या कदापि न वदें चि' म्हणे मुरारी, 'चेंडू इच्या जवळि,साक्ष असे पुरारी.' २४
'वक्षःस्थळीं सहज उन्नतता स्त्रियांसी; हें तों तुम्हां विदित संशय कासयासी?।
चेंडू म्हणूनि बहुधा भ्रम या मुलाला; नाहीं म्हणोनि उचकीन करें फुलाला.' २५
हरि म्हणे, 'जरि सोडिल कंचुकी, तरि धरेसि पडेल नव्हे चुकी;' ।
व्रजवधू मग दाखवि ते घडी कुचपटा, चळचंचळ ऊघडी. ॥ २६
'न दावितां, दाटुनि होय चोरी; म्हणोनि जाऊं, तरि जाय थोरी; ।
आतां करूं काय? जना सामेरी ठाकूं कशी मी? हंसताति पोरी.' ॥ २७
वक्षोजगोळ अल्पमाळ तमालनीळें लक्षूनि, मंद रुदना करिजे सुशीळें. ।
माता म्हणे, 'रुदसि कां? लटकें वदोनी, चेंडू तुझा उसळला न कळे उडोनी.' २८
हरि म्हणे, 'अमये! कमळेक्षणा जरि पटा उकलील सुलक्षणा, ।
हरपला इशिं कंदुक सांपडे; अनृत हें न वदें.' धरणी पडे. ॥ २९
तों ते गोपवधू विधूतवसना सोडी निवीग्रंथिका;
झाडी वस्त्र पुनः पुन्हा गमतसे आश्चर्य या पांथिका; ।
चेंडू भव्य पटींहुनी क्षितितटीं आंदोळला कौतुकें;
देखोनी जन हांसती खदखदां, आले तदां जीतुके. ॥ ३०
गोपी तदा विसरली तनुभावनेला; कृष्णें तिचा निजगुणें तनुभाव नेला. ।
ऐशी चरित्ररचना रचिजे अनंतें; संसारसिंधु तरिजे चि जगें अनंतें. ॥ ३१

---

१. वाणी. २. चेंडू. ३. कमलासारखे आहेत डोळे जीचे ती. ४. स्तन. ५. किंचित्. ६. तमालपत्रासारखा निळा. ७. वस्त्र. ८. ओढील.

ज्याची अतर्क्य करणी धरणीधराला[1], ठावी नसे अजि! तया करुणाकराला. ।
ज्या गौळणी प्रियतमा हृदयाभिरामा आनंदनंदन म्हणे वरिताति रामा[2]. ॥ ३२

---

## कृष्णचरित्र.

(श्लोक.)

सदनिं ठेवुनि सून एकली, प्रथम यौवन सुंदरी भली, ।
कलश आपण घेउनी करीं, द्विरदगामिनि[3] जाय लौकरी. ॥ १
खेळे खेळ अनंतलील[4] करुणासिंधू नटाचे परी;
जैसें पद्मपलाश[5]सद्म[6] न जळीं, तद्रूप दावी परी; ।
ज्याचें हें ब्रिद चोरजारमुकुटोत्तंसाख्य[7] बिंबाधरा;
ज्याची वंद्य कथा, तया विनटल्या[8] त्या गोपबिंबाधरा[9]. ॥ २
व्रजपुरीं वधु एक एकदां [10]रविसुतेप्रति ये महामदा; ।
चरणिं वाजति भूषणावली; असितवाहिनि[11]तीर पावली. ॥ ३
गेली मृगांकवदना[12] उदकासि गोपी, तों ये तिच्या निजगृहा हरि विश्वरूपी. ।
धुंडूनियां कलश, भक्षितसे दधी तें; देखे तया त्वरित सून दयोदधी[13]तें. ॥ ४
ऐसा हरी जंव हरी दधि दुग्ध भारी, आली घरांतुनि तदा घरसून नारी. ।
'कृष्णा! नव्हे उचित हें, करितोसि चोरी; मी एकली घरिं असें तुज कोण थोरी?' ५
'असिस एकलि नीरजानने[14]! म्हणुनि पातलों चारु[15]यौवने[16]!' ।
वदुनि यापरि, हस्तकीं धरी; विनवितो तिस आदरें हरी. ॥ ६
धरोनी अशी गोपकांता करानें, घरामाजि नेली तया श्रीवरानें[17]; ।
पलंगीं बळें नीजवी हाटकाच्या[18]. अशा धन्य लीला जगन्नाटकाच्या. ॥ ७
अशांत शातकुंभ[19] पूर्ण घेतला शिरावरी;
तयीं कुचांबरांचला उरोभवेंचि आंवरी; ।
मंद मंद चालते नितंबकुंभ[20]गौरवें;
ठेवितां पद क्षितीस अंदु[21] बोलती [22]रवें ॥ ८

---

१. शेष. २. स्त्रिया. ३. गजासारखी मंद आहे गति जीची. ४. अंत नाहीं ज्याच्या लीलांस असा. ५. कमल. ६. गृह. ७. भूषण. ८. रतल्या. ९. स्त्रिया. १०. यमुनेप्रति. ११. यमुना. १२. चंद्रमुखी. १३. कृपासागर. १४. कमलवदने. १५. रम्य. १६. तारुण्य. १७. लक्ष्मीपतीनें. १८. सोन्याच्या. १९. सोन्याचा घट. २०. कटिपश्चाद्भाग. २१. सांखळ्या. २२. ध्वनि.

जलकलश धराया ऊर्ध्व होतांचि हात,
स्तनयुगकलशांतें ऊर्ध्व कोडें पहात. ।
'उतर उतर मूर्खा! थोर उंचावलासी.
मज सम तुं न होसी, व्यर्थ भांबावलासी.' ॥ ९
आली घरासि, युवती उदकुंभ ठेवी; जीची रतीस न लभे रुचिरत्वठेवी. ।
शोधी सुनेसि, तंव ते न दिसे पहातां; ओ दे न ते मग 'मुली' म्हणुनी बहातां.॥
अंतःपुरांत निरखी जलदृष्टि ओघें, तों मंचकीं पहुडलीं दिसताति दोघें. ।
आहे दुजा कवण अंतरिं? ठीक राया! पाहेचि तों निरखिलें अमरैकराया. ११
निद्रा दिसे उभयतां सुरतश्रमानें; देखोनियां, असुख घे स्वकुलाभिमानें; ।
जोडा दिसे सरस, यास्तव तोष मानी; दुष्कर्म कीं म्हणुनि, राग मनांत मानी.॥
उभयतांचिया दृष्टि दे मुखीं, जवळि जाउनी ऐंणिदृङ्मुखी; ।
अधरविद्रुमीं दंत रूतले, दिसति त्यांचिया रंग लोपले. ॥ १३
कंच कुचा निरीबंध सूटले; सुमनमाळिकाव्यूह तूटले; ।
घरमबिंदुचे वृंदं दाटले; अवयव भ्रमें एक वाटले. ॥ १४
देखोनि ये रिति तयां, अति कोपशीला 'झालें' म्हणे 'अहह! काय करूं? अशीला. ।
निःशंक हे रमतसे परपूरुषातें;' सूने दटावित असे धरुनि रुंषा ते. ॥ १५
'धिगी ऊठ गे! ऊठ नष्टे! खव्याळे! तुझे संगती वंश माझा विटाळे; ।
कसा आणिला बोल माझ्या कुळासी? कसें दाखवूं तोंड या गोकुळासी? ॥ १६
कृष्णा! तूं करिसी अशीं गुरुतरें कर्मे, कुला नाशकें;
ऐशा या कलहा गड्या! करिसि कां? आतां न साहूं शकें. ।
लोकांच्या सुमती मुली तितुकिया केल्या तुवां मोहिता;
या तूझ्या करणीसमान करणी लोकत्रयीं ना हिता. ॥ १७
थांब थांब अगुणा! घननीळा! सांगतें वृत तुझ्या जननीला. ।
नीज नीज बरवा, शिकवीं तें कर्म हेंच सकळांसि कवीतें.' ॥ १८
दावूनियां रिति तया अति धार्ष्टिकानें आली गृहांगणिं मग त्वरिता गतीनें; ।
घाली कवाड अति गाढ कराघोषें; लावी कुलूप खिळि, बोलतसे प्रघोषें. ॥ १९
कोंडितां यदुवरास गृहांतरीं, वाटला परम तोष अंतरीं; ।
क्रीडती वधुवरें सुनिकेतनीं; जें न सौख्य रतिमीनकेतनीं. ॥ २०

---

१. कौतुकानें. २. सौंदर्य. ३. हरिणनयन स्त्रियांत श्रेष्ठ. ४. पोंवळें. ५. कंस. ६. समुदाय. ७. क्रोध. ८. घरीं. ९. मदन.

ते पांथिकांतें बहु घेत साक्षी, आली यशोदेप्रति सारसाक्षी[1]; ।
म्हणे 'तुझा पुत्र न भी, लवेना; चरित्र त्याचें मज बोलवेना. ॥ २१
तूं वर्णिसी कृष्ण महागुणाचा; प्रभाव त्या आइक निर्गुणाचा; ।
कीं माझिया आदरुनी सुनेला, आलिंगुनी, गुंतवि वासनेला. ॥ २२
आणावया सलिल[2], मी यमुनातटासी जाऊनि यें, तंव विलोकितसें नटासी. ।
आलिंगुनी धरित मत्सुतवल्लभेला[3]; मिथ्या नव्हे, धरुनि आणिन ये सभेला. २३
नंद ही शिकविना तनुजातें[4], सद्गुणा शिकविना मन ज्यातें; ।
चित्त हो अजुनि कां न वराडी, जाहला परवधूसि बराडी. ॥ २४
अचाटकर्म हा करी, नयेचि सांगतां मला;
दिसाच गोपसुंदरी धरीतसे सुकोमला; ।
विचार ही दिसे चि ना वदों मि काय? मामिसें!
घरोघरीं हरी भरे उगाचि नाहिं त्या मिसें. ॥ २५
उगा नसे महानग, प्रभाव मी वदों किती?
स्वभाव या प्रमाणिचा समस्त लोक सांगती; ।
करीं धरी हरी प्रपंच आपणेंचि संचिता,
दुजा धरी, न सांगतो, अपाप होय नाचता. ॥ २६
सोसूं किती अगुण हे तुझिया सुताचे? ज्याच्या बळें बहुत जीव पुरस्थितांचे. ।
चोरी करो, मज न दुःख असे तयाचें; मोही मुली, म्हणुनि हेंच मनांत जाचे. ॥
लाडका करिसि यास एतुला[5]; राग ये, वदलिया सये! तुला. ।
मूल हें चपळ जाण, मी नसें, ये घरा तयिं सुजाण मीनसें. ॥ २८
तन्वंगी ते धरूनी उभय भुजयुगीं शुद्धसौख्यासि सांगे;
निद्रा घे पूर्णचंद्रानन तनय तुझा, धीट मोठा असा गे! ।
हांसे देखोनि मातें, झटक उठवितां, काय सांगूं कपाळा?
नाहीं हा भीत कांहीं,' म्हणुनि जंव वदे, तों मिळे लोकपाळा[7]. ॥ २९
यशोदा म्हणे, 'आयका बायका हो! न देखों शके हे जगन्नायका हो! ।
कसें घेतलें हेंचि बालंट मोठें? धरूं पाहते चंड वायूस मोटे. ॥ ३०
किती बोल ते बापुड्या या मुला गे! असा बोल याच्या नखा ही न लागे. ।

---

१ कमलनेत्री. २. उदक. ३. पुत्राची स्त्री. ४. पुत्राला. ५. इतका. ६. सडपातळ स्त्री. ७. समुदाय.

पहा गे ! अशी कोण गोष्टी कशाला ? निघे ना कधीं टाकुनी स[1]द्मशाला.॥ ३१
वर्णिती हरिशुचित्व पुराणें; त्यावरी अजि कशीं कुफराणें; ।
बोल ते [पशुपस्त्री]वदनाचे; नेणुनी च गुण चिद्गगनाचे. ॥ ३२
हा म्हणा अगुण ही अविचारी; ती खट्याळ कशि पैं न विचारी. ।
बोलि या उगलिया नुसत्या या दाविसी मुरहरा नसत्या या ?' ॥ ३३
ऐशी नं[2]दवधूचिया मु[3]खविधूपासूनि वा[4]क्चंद्रिका
देखोनी, प[5]शुपांगनास्यजलजीं मौनाचिया मु[6]द्रिका. ।
जों माता करि हास्य लोकपतिची, तों दं[7]तसूर्यांशुभा
लक्षूनी, अतिदक्षशी प्रकटते वाङ्माधुरीभा शुभा. ॥ ३४
'मामी ! तुम्ही काय भराल रागें ? जाणोनियां सर्व सुतानुरागें. ।
नेणा च कांहीं करणी तयाची; जो गोपिकांतें [8]स्मरराग योची. ॥ ३५
करीं धरुनि सुंदरी, करि विलास नानापरी;
करीपरि सरोवरीं करिणिसंग कीं श्रीहरी; ।
शिरे व्रजघरोघरीं, सहित खेळिये शंभरी;
हरूनि दधिघागरी, करि रित्या, मुलांतें भरी. ॥ ३६
दोघांस ही सांपडवूनि खाटे, आल्यें तुम्हां बोल खरा न वाटे; ।
प्रत्यक्ष म्यां कोंडुनियां, कवाडें लावूनि, आल्यें, निरखाल वांडें.'॥ ३७
दोघांतें धरुनी करीं, करि[11]गमा चाले महासंभ्रमें;
मागें हांसति गौळणी, हरिपुढें ह्या घेतलीसे भ्रमें; ।
तों आली सुत घेउनी लगबगां, पाशीं यशोदेचिया;
'मामी ! यास पहा, अहा' म्हणतसे 'चिन्हास ही याचिया.'॥ ३८
कांहीं हास्य न आंवरे हरिचिया मातेसि, नाना परी
बोले, 'सुंदरि ! डोळसे ! कवण हा झोंबे तुझ्या कोंपरीं ? ।
हा तूझा सुत, कृष्ण कीं ?' निरखितां, ते न प्रभा सांवळी
देखे, गौर तनू स्वकीय सुत, तैं तत्काळ भांबावली. ॥ ३९
टाळी पीटुनि हांसती सकळिका गोपी तटस्था किती,
[12]चोंकाटूनि उगीच तन्मय म्हणे श्रीकृष्ण मोठा कृती; ।

---

१. गृह २. नंदस्त्री यशोदा. ३. वदनचंद्र. ४. शब्दरूपी चांदणें. ५. गोपचीमुखकमलीं. ६. लाखेची मोहोर. ७. दंतरूपी सूर्याचे किरणांस्त्री शोभा. ८. मदनप्रेम. ९. मागे. १०. कौतुकानें. ११. गजगामिनी. १२. आश्चर्य मानून.

चित्तीं चित्त नुरे, तनूसि विसरे, ढेंकूळसेंची विरे,
तो आनंदसुतप्रभू विनटला सर्वत्र चिद्भानु[1] रे ! ॥ ४०

---

## सुदामचरित्र.

(श्लोक.)

देखूनि तुष्ट मनिं मुष्टिभरीच पोहे, त्याची कथा अनुदिनीं रसना जपो हे; ।
ब्रह्मण्यदेव द्विजपावन पुण्यराशी, माझें सदा नमन त्या जगदीश्वरासी. ॥ १

कोणी एक कुचैल[2]नामक मुनी, ज्याला रती[3] सज्जनीं,
सत्कर्मीं, यजनीं, स्वधर्मभजनीं, संध्याजपीं, मज्जनीं; ।
या रीती द्विज नीट दीसरजनी लोटी, जगद्रंजनीं
धी[4], नेदी स्वजनीं, असे परिजनीं, ज्ञाता भवद्भंजनीं[5]. ॥ २

दरिद्रि तो आणि बहू कुटुंबी, फळे जशी फार सुफुल्ल[6] तुंबी; ।
कांता[7] म्हणे रोषुनियां स्वकांता[8], 'प्रयत्न कांहीं न कराचि आतां ?' ॥ ३

कीं ऐसा दुबळा तयासि अबळा मागे चिरें कांबळा;
बाळाच्या कवळा[9]निमित्त, कबळा[10] विस्तारुनीयां, बळा[11] ।
ते बोले, प्रबळागती चळबळा, चर्चा करी, पांबळा[12]
'कां जानात बळानुजा[13]प्रति, बळारातीस[14] जो दे बळा. ॥ ४

नुस्ता पोरवडा, घरीं न कवडा, चित्तीं बरा नीवडा;
नाहीं भातवडा, तया दहिंवडा कैंचा ? ग ! तो जीवडा; ।
दारिद्यें चिवडाचि सर्व, दवडा थोरीवडापांवडा[15];
मागा तो यदुरावडा गयवडा[16] नाशील त्या आवडा. ॥ ५

चोळी[17] ना लुगडी, पळी न दगडी, टोपी न ते आंगडी,
चिंतेची सगडी जिवासि रगडी, पायां बळें वेंगडी; ।
जा जा पैलथडी, मधें गडगडी क्लेशाब्धिची सांगडी;
तो श्रीकृष्ण गडी तुम्हांसि पगडी बांधी, मला लुगडी.' ॥ ६

---

१. चैतन्यसूर्य. २. सुदामा. ३. प्रीति. ४. बुद्धि. (आपल्या मनुष्यांवरच लक्ष न ठेवितां सर्वत्रांवर ठेवी, असा भावार्थ.) ५. पुनः पुनः येणारा जो संसार त्याचे भंजनाविषयीं. ६. अतिशय फुललेली भोंपळी. ७. बायको. ८. आपल्या पतीस. ९. ग्रासानिमित्त. १०. कबरा, केशास. ११. सामर्थ्या. १२. पामरा. १३. कृष्णाप्रति. १४. इंद्रास. १५ थोरपणाची पायरी. १६. गयावया. १७. 'बाळी ना बुगडी' असाही पाठ आहे.

(पद.)

हरिपदिं लागा, मागा । धन धान्य चिरें; ॥
सुखरदायकांहीं । न पवे अचिरें[1]. ॥ ध्रुवपद. ॥

मारमनोज्ञ, उदार, दयानिधि, द्वारवतीचा राजा, । द्विजदेव भला, ॥
येइल तुमच्या काजा, । कळलें मजला, ॥
संशय न म्हणा, जा, जा, । सुमुहूर्त, चला. ॥ हरिपदिं० ॥ १ ॥

बाळपणीं जगपाळगडी तुम्हि होउनि लिहितां साळे, । बहु खेळतसां, ॥
ते खुण बोला, भाळे । प्रभु तो सहसा, ॥
कां धरुनी जपमाळे । उगलेचि बसा? ॥ हरिपदिं० ॥ २ ॥

आनंदात्मज आदिगुरु हरि आदर करितां कांहीं, । मग काय उणें? ॥
वाद नको, भय नाहीं, । लौकीकगुणें ॥
हा धरितां पथ पाहीं, । सुख होय दुणें. ॥ हरिपदिं० ॥ ३ ॥ ७

(श्लोक.)

‘नाना प्रयत्न पुरुषें स्वकरें करावा, यत्नें फळेल हरि, शब्द मनीं धरावा;' ।
‘भूपाळ, देव, गुरु यांप्रति रिक्त हातें, जाऊं नये, सदनिं काय असे पहा तें.'॥ ८
ते धुंडितां उतरडी, मुठि एक पोहे आणूनि दे; द्विज म्हणे, ‘हरियोग्य नोहे'. ।
‘हां जी असें वदति सर्व जया, हरी तो पुष्पें, फळें, जळदळें बहु तुष्ट होतो.'॥९

त्या वस्त्रीं थिगळासी कोण गणती? दंडांसि कैंची मिती?
छिद्रांचा तरि लेख कोण करिती? गांठी म्हणाव्या किती? ।
तेणें गुंडुनि मुष्टि एक पृथुका, कांखे बृहत्कंदुका-
कारें चैलें[2] कुचैल घेउनि निघे, भेटी रमाकामुका. ॥ १०

विचारित उलंघिला पथ पवित्र तो मागिला,
पुढें नवल पाहिला कनककोटनामा भला; ।
नभीं ध्वज उभारिले, फडकती टैंके[3] लाविले,
पुढें नवल पाहिलें गजरथाश्व शृंगारिले. ॥ ११

सिंधूऐसा घोष त्या पट्टणाचा, जेथेंतेथें संघ संघट्टणाचा; ।
आला द्वारा द्वारकेच्या द्विजाती, नानाजाती ज्या पथें येति जाती. ॥ १२

---

१. अल्पकाळेंकरून. २. वस्त्र. ३. निशाणें.

(पद.)

ऐशी देखिली **द्वा**रका, । दीनोद्धारका. ॥ ध्रुवपद. ॥
विविध उपवनें । मलयजपवनें । डोलति फळदळ कुसुमभरें, ॥
कुसुमित बकुळी । निबिड अळिकुळीं, । रुणझुणती अनुदिनिं निकरें, ॥
हंस [1]कोक बक । [2]शुक [3]शिखि [4]पिक मुख । उचलुनि [5]निगदिति मधुरस्वरें, ॥
परिमळ घमघम पसरतसे मग, जग [6]नगसुख अनुभविति बरें. ॥ ऐशी० ॥ १ ॥
[7]भवतिं उपपुरें, । गुढ्या, गोपुरें, । निबिड जया हें नभ अपुरें, ॥
[8]टके पटचिरें । तळपति रुचिरें, । झळकति गगनीं जंव अचिरें, ॥
[9]सौधसुशिखरें । सेविति नभ खरें । दिसति घरें मणिमय मकरें, ॥
[10]शातकुंभनवकुंभविराजित, भरति दशदिशा द्युति पसरे. ॥ ऐशी० ॥ २ ॥
[11]कनकतोरणी । कलितधोरणीं । लसति खाणि बहु त्या उपऱ्या ॥
लखलखती वरी । नसे ज्यासि सरी, । हेमविनिर्मित बुरुज चऱ्या, ॥
सघन अचाटें । वज्रकपाटें, । पुरदरवाजे मेरुदऱ्या, ॥
**आ**नंदतनय म्हणे, 'प्रतिमंदिरीं नवनिधि नांदति बहुत बऱ्या.' ॥ ऐशी० ॥ ३ ॥ १३

(श्लोक.)

द्वारें द्वारें लंघितां, ब्राह्मणा या कोणी ये ना 'कोण तूं बा ?' म्हणाया; ।
जेथें प्राणी सोडिले बंधनांहीं, ज्याच्या गेहीं [12]ब्रह्मनिर्बंध नाहीं. ॥ १४
पुढें जाउनी सांगतां सेवकांनीं, उठे ते क्षणीं ऐकतां **दे**व कानीं; ।
उभे **या**दव प्रौढ छपन्न कोटी, चमत्कारती टेंकुनी चापकोटी. ॥ १५
गाती ज्यास **शु**कादिकप्रमुख ते, ध्याती मुनी [13]संयमी,
जाती वेद वदों जया, मग उगी ठाकीत थुंका यमीं; ।
तो राजेश्वर, पूर्ण चिन्मय, पुढें थोरा सुखें धांवला;
[14]कोरान्नप्रिय विप्र, त्यासि सकळें होरा बरा भावला. ॥ १६
पायीं पैंजण रम्य वाजति, कटीं पीतांबराची प्रभा;
माजीं [15]सन्मणिदाम, [16]किंकिणिततीं व्यापे सभे क्षिप्र भा; ।
कंठीं कौस्तुभ भव्य दिव्य पदकें, भाळीं टिळा रेखिला;
माथां रत्नकिरीट तो द्विजवरें राजा दिठीं[17] देखिला. ॥ १७

---

१. चक्रवाकपक्षी. २. राघु. ३. मोर. ४. कोकिल. ५. बोलती. ६. पर्वतप्राय सुख. ७. भोंवतालीं. ८. पताका. ९. राजवाड्याचीं शिखरें. १०. सुवर्णाचे दाट कुंभांनीं विराजित. ११. सुवर्णाचीं बहिर्द्वारें जीला अशी. १२. ब्राह्मणाविषयीं अडथळा. १३ योगाभ्यासी. १४. भिक्षाप्रिय. १५. जडिताचे कंबरपट्टे. १६. घागऱ्यांचा समूह. १७. डोळ्यानें.

तेव्हां दृष्टि चुके, सुबुद्धि वचके, प्रज्ञा न थारों शके,
वाग्व्यापार थके, उगीच नटके, कांपे तनूनें धके; ।
कृष्णाभा चमके, म्हणोनि अमके हे लोकनिर्दारके.
येती ना द्विज केवळान्वय झके कृष्णापुढें द्वारके. ॥ १८

कांहीं एक, तटस्थ होउनि, सभाप्रांतीं उभा राहिला;
श्रीकृष्णें कमलेक्षणें प्रियसखा प्रेमादरें पाहिला; ।
आधीं पाय नमूनियां, मग भुजीं आलिंगिला प्रेमळें;
स्नेहें पूर्णसुधामयें निगदिलीं वाक्यें महा कोमळें. ॥ १९

'मत्पुण्य तें पूर्ण फळासि आलें, बा रे! तुझें दर्शन आजि झालें; ।
स्मरूनियां तूं मज भेटलासी, सुधानिधीसंनिभ वाटलासी.' ॥ २०

दादा! 'चला' म्हणुनी हात धरूनि, देवें सिंहासनीं बसविला मग वासुदेवें; ।
आज्ञापिली जलधिजा द्विजवंदनातें, हांसोनि ते नमितसे समजूनि नातें. ॥ २१

वामांगीं मिरवे रमा, उजवियें भागीं सुदामा सखा,
मध्यें आपण कृष्ण, लेख न तुळे ब्रह्मांड ज्याच्या नखा; ।
शोभे भीम अमूप यादव सभा उद्दाम दोहींकडे;
तेजःपुंज विराजती दशदिशा आभा न दीसाकडे. ॥ २२

त्यानंतरें देव तया सुदाम्या वार्ता विचारी विबुधासुधाम्या; ।
'आहे बरी कीं वहिनी सुवृत्ता? बाळें बरीं कीं? वद ह्याचि वृत्ता'. ॥ २३

(पद.)

कनकचैल हरि कुचैलपाउलें पुजी. ॥ ध्रुवपद. ॥
कनकचैल, महाराज, कनकगिरिसमान, धीर, ।
जनकनृपाराध्य, जगज्जनक, तनु करुनी खुजी. ॥ कनक० ॥ १ ॥
ब्रह्मगिरीशविनीत, परब्रह्म, चिदानंद, महा, ।
ब्रह्म खेळवितां करीं ब्रह्मभजनविपुळ पुजी. ॥ कनक० ॥ २ ॥
नंदयशोदाह्रदानंद, शंखचक्रगदानंद, ।
कोटीनरहरि आनंदतनय कवी भुजीं. ॥ कनक० ॥ ३ ॥ २४

---

१. कृष्णाची कांति. २. सभेच्या अग्रभागीं. ३. लक्ष्मी. ४. कृष्णदेव. ५. दिवसाला. (सूर्याला, असा भावार्थ.) ६. सज्जनाच्या प्राणाचें गृह अशा (सुदाम्या). ७. चांगल्या स्वभावाची. ८. गोटीला. ९. लहान. १०. ब्रह्मदेव आणि शंकर यांहीं करून विनीत असा. ११. ज्ञानानंद.

(श्लोक.)

'कांहीं आठवतें गड्या! शिशुपणीं साळेंतलें खेळणें?
नाना हास्य विनोद, मोद, सगडी कुस्ती करूं, हेळणें; ।
मी तूं हा मज तूज भेद न जगीं, ते मूळ मैत्री भली,
येतें कीं स्मरणासि? जाण सखया! पुण्यें बहू लाधली. ॥ २५

आम्हा भेटी आणिला काय मेवा? तूं भूदेवा! देइं सर्वस्व ठेवा.' ।
जों जों देखे देव कांखेंत बोळा, तों तों त्याचा होतसे जीव गोळा. ॥ २६

मग विभु वसनासी त्याचिया हात घाली;
उकलुनि जंव पाहे, मुष्टि पोहे निघाली; ।
द्विजवर दुबळा तो फार संकोच मानी;
हरि तरि बहु वानी पूर्ण भक्ताभिमानी. ॥ २७

'मजवरि सखया! त्वां स्नेहसंभार केला,
श्रमवरि चिरकाळें येउनी द्वारकेला; ।
शुभ दिन दुसरा हा, आजि वाटे दिवाळी;
न मज गमति पोहे दीधल्या वैभवाली.' ॥ २८

पोहे घेउनि दिव्य पाणिकमळीं, द्वारावतीचा धणी
तो हेमाद्रि सुधाब्धि मानुनि, मुखीं घाली, सुखाची धणी[1]; ।
झाली तृप्ति, म्हणोनि ढेंकर हरी देतां, त्रिलोकावळी
धाली; यादव भूप सर्वहि सभे उद्गार देती बळी. ॥ २९

आश्चर्य आनंद विनोदलीला वाटे सभेमाजि नृपावळीला; ।
देवासही वेड महा द्विजाचें, वाहे उरीं चिन्ह पदांबुजाचें. ॥ ३०

सुदामा ज्या कामा जगदभिपदामा[2] विनटला,
न बोले, ते झोले न सुचवि, न डोळेच उगला; ।
प्रभू तो कीं भूतोद्भवकर अभूतोपम[3] बरा,
सुवाणी वाखाणी, स्तुतिगति पुराणी द्विजवरा. ॥ ३१

कीं 'आपणा थोर विलंब झाला, बसाल कीं जाल?' म्हणे द्विजाला. ।
असा प्रभू तो म्हणतां, तयानें केला नमस्कारचि दांतयानें[4]. ॥ ३२

---

१. तृप्ति. २. विश्वास अभिपददायक अशाला. ३. उपमा ज्याला नाहीं असा, किंवा केवळ कल्पनेनेंच परब्रह्मवस्तूस साकार मानून उपमा उपमेय घेणें असा. ४. तपश्चर्यादिकांचे कष्ट सहन करणारा असा.

देतां शीघ्र निरोप देव, नमितां, भूदेव दे उत्तमा
आशीर्वादुनि साधु वैदिकविधी चाले तया सत्तमा; ।
जाती बोलत, बोळवीत नगरीं, द्वारीं नमस्कारिती;
श्रीगोविंदगदादियादव सभे तत्प्रीति विस्तारिती. ॥ ३३

सर्वांसि थोपुनि पथीं, द्विजराज चाले; श्रीकृष्ण यादव समस्त सभेसि आले; ।
मार्गी म्हणे मुनि मनीं, 'मज काय केलें? देता हरी चिर[1] मला, तरि काय गेलें?'
नारी म्हणे मज घरीं, 'हरिलागिं याचा[2].' याचा असा विदित भाव निरामयाचा[3];
या चालतां मज पथीं श्रम काय झाला; जा लाभ हाचि हरिभेटि दृगंबुजाला[4].' ३५

हळु हळु पथ लंघी; लंघितां गांव खेडें,
निरखुनि जंव पाहे, होतसे चित्त वेडें; ।
पुरुष सरस देखे, आणि योषा[5] सुकेशी;
'पुनरपि अजि आलों काय मी द्वारकेसी ?' ॥ ३६

पाहे खूण, तरू, तटाक, डगरी त्या आपुल्या वाटती;
'कैंचीं येथ सुवर्णरत्नशिखरें ?' तेजें दिशा दाटती; ।
पाहूं कां पुर तें म्हणोनि पुरतें येतां प्रतीती बळें,
द्वारीं वाजति [6]भेरि दुंदुभि, सभा नादें तुरें तुंबळे. ॥ ३७

मानी मंदिर इंदिरालय दुजें, शाळा विशाळा घरें;
द्वारें रत्नमयूखमंडिततरें, भोगागरें नागरें; ।
झालें काय? म्हणे, 'अहा ! घडि घडी माझें तरी झोंपडें;'
'कोठें जाउं ? वसूं? बसूं ?' म्हणतसे मानी मनीं सांकडें. ॥ ३८

द्वारांतुनी निरखितांचि, कुचैलकांता कांतास[7] बाहत उठे कुटिलालकांता[8]; ।
'कांतार[9] हें तंव नव्हे; भुलल्लेत कां जी? कां, जीवनामृत उपेक्षुनि, प्याल कांजी?' ३९
'हे कोण पैं नृपवधूसम दिव्यदेहा ? दे हाच कां मज कंटा[10]' म्हणुनी वदे हा. ।
देहाच रात्र करुनि भुलले तराणीं[11]; राणी म्हणे, 'पुरविली हरिनें शिराणी[12].'॥ ४०
'कैंचें तुला वसन? भूषणरत्नराजी?' 'राजीवनेत्र रिझला पृथुकाचुरा जी ! ।
राजी जया हरि तया न उणेंचि कांहीं; कां हीरकंकण न लेजाति बायकांहीं ? ४१

---

१. चीर, वस्त्र. (येथें वृत्तनियमाकरितां ऱ्हस्व 'चि' केली आहे.) २. याचना करा. ३. श्रीकृष्णाचा. ४ नयनकमलाला. ५. स्त्रिया. ६. नोबती. ७. पतीस. ८. केशांचा अग्रभाग वांकडा म्ह० कुरळ आहे जीच। अशी. ९. घोर अरण्य. १०. कष्टास. ११. तराणा म्हणून गायनांत प्रकार आहे, त्यांत. १२. आशा.

देखूनि देव, न धरा खुण माणसाची; साचीच हे स्थिति घडे, पथही तसाची; ।
साचीच हे जडमनादिक इंद्रियांची, याची न ते विषयिं वृत्ति बुडे जयाची. ॥४२

मातें पाहुनि चित्र काय करितां? कां पां! तुम्हीही असे?'
तों देखे द्विजराज आपण दुजा श्रीकृष्ण झाला असें; ।
माथां मंदिल, दिव्यरत्नकटकें हातीं, गळां हार ते,
तेजःपुंज विराजती दशदिशा ऐशा स्वरूपा रते. ॥ ४३

आनंदला बहु कुचैल, सुचैल झाला; आला भला निजघरासि, अपार धाला; ।
आनंदला सम सदां बहु भाग्य लाहे; आनंदनंदन म्हणे, 'हरिची कृपा हे.' ४४

---

# इतर पुराणांतील आख्यानें.

## गणिकोद्धार.

(श्लोक.)

नामें समस्त दुरितें हरती क्षणानें, नामें महाभय हरे बरवेपणानें; ।
नामीं असा अजि असे महिमा स्वभावें, यालागिं नामगुणकीर्तन नित्य गावें.॥१
निःपाप होय गैणिका, बहुपापराशी; नामें अपार तरती पिडिती परासी; ।
रूपें दिसाचि नग नागवि चांगल्याला; कामी भुले नयनिं देखुनि कामिनीला.
लावूनि वेध, धनसाधन सांग साधी; लक्षूनि लोचनकटाक्षशरेंच बांधी; ।
केले जिणें सधन निर्धन, शैक्त रोगी; काया विकी प्रतिदिनीं, रतिभोग भोगी.

असो; ऐशी योषा, अजि सैकळदोषाकरमुखी,
न जाणे सत्कर्माचरण, शुभधर्मासि विमुखी; ।
न आराधी देवा, न गुरुपदसेवा कधिं करी;
सदा चिंती वित्ता, अति चपळता ते भ्रम करी. ॥ ४

अशीनें घरीं पोशिला एक रांवा; मनीं मानिला फार कांहीं विसावा; ।
तया खेळवी, बोलवी प्रीतिभावा; सदां बाहते, त्याचिया घेत नांवा. ॥ ५

संकेत नाम तरि राम म्हणोनि कीरां ठेवूनि, लालन करी फळदुग्धनीरा; ।
घे नित्य नित्य, निज भृत्य तसाच सेवी; कीं त्याविना सुनयना न निजे, न जेवी.

---

१ झाला आहे. २. वेश्या. ३. सुदृढ, बळकट. ४. स्त्री. ५. पूर्णचंद्रानना. ६. पाठमोरी. ७. रांव्यास. ८. उत्कृष्ट नयन आहेत जीचे अशी स्त्री.

'अंजीर, दाडिम, फळें, बकुळें रसाळें, घे राघवा!' म्हणुनि आवडिच्या हुसाळें।
बाहे तया घडिघडी, पडली सुकाळीं नामाचिया, शुकविमोहित, सर्वकाळीं. ७
'बा रे रामा! राघवा! बोल रामा!; जेवीं रामा!, पिंजरां बैस रामा!; ।
खेळें रामा! वेळ कंठे न रामा!;' ऐसें रामा ते[3] वदे रामनामा. ॥ ८

ऐसे कित्येक गेले दिवस युवतिचे, देहिंचे धर्म ठेले;
क्षीणत्वा पूर्ण आले अवयव अवघे वार्धकें, अर्ध केले; ।
राघोबातें न सोडी; करिं धरुनि निजे; लोभ माया न तोडी;
रामाची नामगोडी मुखिंहुनि न सुटे, धन्य ते हेंच जोडी. ॥ ९

शेखीं तीनें, देह देहावसानीं, धांवा केला मागिल्या त्या दिसांनीं. ।
आले कंठीं प्राण सत्राण; रामा 'रामा रामा' बाहते, ये विरामा. ॥ १०
वाचेसि राम शुकनाम म्हणोनि तीतें आलें स्वभावगतिनें; नटली गतीतें; ।
पूर्णेंदुमंडळसमान विमान रामें जाज्वल्यमान दिधलें विबुधाभिरामें. ॥ ११
बैसूनियां भ्रमभरें गणिका विमानीं, ते चालली, गगन लंघित विश्वमानी; ।
वैकुंठनायक तितें बहुसाल मानी; ते अर्चिली, म्हणुनि, वर्चिल सत्तमांनीं.॥ १२
संकेतनाम पढतां, चढली पदासी; भोगी अपाप निजनायकरूप दासी; ।
भावें जपे, तरि तया न जगांत जोडी; आनंदनंदन सुसंभ्रम हात जोडी. ॥ १३

---

## उमारमासंवाद.

(श्लोक.)

एके काळीं पार्वती आणि पद्मा; सारीपाटा खेळती चित्रसद्मा; ।
डावीं हर्ता बोलती लोकधर्मा. हांसोनीयां काढिती वर्मकर्मा. ॥ १

'कोठें भिक्षुक? सांग गे!' 'बळिगृहीं मागे भुमीदान तो.'
'कोठें तो पशुपाळ?' 'गोकुळीं असे, वत्सें गुरें राखितो.' ।
'सर्पाधीश कुठें असे? वद सखे!' 'निद्रिस्थ शेषावरी.'
'कोठें सांग स्मशानवास करितो?' 'वृंदास्मशानीं हरी.' ॥ २

'इंद्राची अमरावती बळि बळें घे; शक्र यज्ञादिकें
तेव्हां श्रीहरि साह्य होउनि, तया मागे महाकौतुकें; ।

---

१. बकुळीचीं फळें. २. सुंदरी. ३. गणिका. ४. वृद्धदशेनें. ५. पूर्णचंद्रमंडलासारखें. ६. तेजस्वी. ७. ज्ञात्यांला प्रिय अशा रामानें. ८. वरकड. ९. संकेतानें ठेवलेलें नाम. १०. पापरहित. ११. लक्ष्मी. १२. चित्रानें सुशोभित केलेल्या गृहांत. १३. शंकर.

दैत्याच्या वचना जिणोनि, सखये! देवेंद्र तो रक्षिला;
भिक्षा मागुनि शंकरें नृपतिचा सत्पुत्र तो भक्षिला.' ॥ ३
'ऐकें गे सखये! स्वभक्त अपुला जाणोनियां, निश्चयें
त्यातें शोधुनि, तुष्टला अतिशयें पुत्रासि देतां स्वयें; ।
स्त्रीपुत्रासमवेत नेउनि पदीं श्रीशंकरें स्थापिलें;
देतां मौवशिनें स्तनासि हरिनें जीवें कसें भक्षिलें?' ॥ ४
राक्षेसी पुतना स्तनीं विष भरी, मारीन हें अंतरीं;
आली ते शबरी, कृपा बहु परी केली जयीं श्रीहरी, ।
नेली मोक्षपदा, हरी विर्षमता नेणे कदा तो स्वयें;
पोटालागिं नसे, तरी शिवसखे! घे वीष गे! निश्चयें.' ॥ ५
'क्षीराब्धी मथिला सुरासुर इहीं, रत्नें तदा काढिलीं;
दीलीं उत्तम पाहुनी सकळिकां श्रीशंकरें त्या स्थळीं; ।
वांटी त्यासि सुरे, उरे विष तया कोणी न घेती पहा;
अंगीकार करी म्हणोनि सखये! कंठीं धरी शीव हा.' ॥ ६
'पोटालागिं नसे, तरी व्रजपुरीं चोऱ्या करी श्रीहरी;
मागे दुग्ध, दधी बरें, नवनिता, मारी यशोदा बरी; ।
तेव्हां जाउनि, भक्षिली यमुनिची माती किती? सांग गे!
क्रोधें धांवुनि मारितां जननिनें, वासी कसें तोंड? गे!' ॥ ७
'गौळी जे! गिरिजे! तयांसि न कळे सैद्ब्रह्म हा श्रीहरी;
भक्तीनें भुलला, म्हणोनि सखये! भावार्थ चोऱ्या करी; ।
ऐसें कीं न कळे, म्हणोनि वदनीं मातीमिसें दाविलीं
ब्रह्मांडें शतकोटि, तोंड पसरी त्यामाजि तों देखिलीं.' ॥ ८
'ऐकें गे गिरिजे! हैरें वर दिला भस्मासुराला जयीं,
तेव्हां तो सखये! फिरोनि पडला श्रीशंकराला तयीं; ।
तोंडें वासुनियां शिवें स्मरियला श्रीकांत माझा भला;
दैत्या भस्म करोनि सोडवि हरी, तें सांग तूं कीं मला.' ॥ ९
'लक्ष्मी! ऐकसि काळयौवन जधीं पाठीस तो लागला,
तेव्हां श्रीहरीनें शिवास स्तवितां, तत्काळ तो पावला; ।

---

१. श्रियाळराजाचा. २. चिल्लया. ३. पूतनेनें. ४. भेदा, वांकडेपणाला. ५. उत्तमब्रह्म. ६. शिवानें.

कृष्णातें मुचुकुंद आड करितां, दैत्येंद्र तो पावला;
निद्रा मोडित त्यासि भस्म करुनी श्रीकृष्ण तो रक्षिला.' ॥ १०
'बाई! ब्रह्मकपाट पाठिसि जधीं श्रीशंकरा लागलें,
ब्रह्मांडीं फिरला, परंतु न सुटे, विष्णूसि बो[1]भाइलें; ।
ब्रह्म्याला उपदेश देउनि, सखे! रुद्रासि गे! रक्षिलें;
दोघांच्या स्वरुपासि भेद नसतां, सुःशान तें राहिलें.' ॥ ११
विष्णू शंकर दोन भिन्न नसती, सद्ब्रह्मिच्या चित्कळा;
दोघांची नकळे अतर्क्य करणी, ते कोण वर्णी लिळा? ।
शब्दांची कुसरी, विनोद रचिला, संवाद झाला भला;
लक्ष्मी पार्वति भेटल्या अनुभवें, आनंद झाला मला. ॥ १२
लक्ष्मीपार्वतिचा विवाद बरवा गाती, स्वयें ऐकती;
त्यांला विष्णुपदीं उमा अणि रमा नेऊनियां स्थापिती; ।
सत्पुत्रादि कलत्र मित्र सकळीं, आनंद भोगी स्वयें;
भावार्थें वदला अनंदतनयो, सत्यार्थ हा निश्चयें. ॥ १३

---

## मा[2]र्कंडेयाख्यान.

(श्लोक.)

शिव हर मृड शंभो! छंद जैं लागला हो,
सुरवर वर ला[3]हो सर्व सौभाग्य ला[4]हो; ।
अशि सुरस कथा हे वर्णिलीसे पुराणीं;
अजि! तुम्हि परिसा हो! पूर्ण होती शि[5]रोणी. ॥ १
पूर्वीं एक मृकंडुनामक मुनी सत्कर्मधर्माथिला;
कांतेनें प्रिय कांत तो प्रियपणें पुत्रार्थ जो प्रार्थिला; ।
'संतानाविण हें जिणें जड जगीं; संसार निःसारसा
भासे; यास्तव हो स्तवा प[6]शुपती; मागा कुळोद्धारसा.' ॥ २
जाणोनि ह्रद्गत तिचें मुनिराजराजें, 'हे मी सुखी करिन, फार सुतातुरा जे.' ।
तो आचरे गिरिद[7]रींत महातपातें, सोसूनियां कठिण वातहिमातपातें. ॥ ३

---

१. बोलावलें. २. हें प्रकरण मार्कंडेय पुराणांत आहे. ३. पावो. ४. छंद. ५. इच्छा. ६. शिव. ७. पर्वतगुहेंत.

ध्यानीं वसे मुनि उदार सदाशिवाचे; पंचाक्षरीप्रमुख मंत्र जपोनि वाचे; ।
ऐसें पुरश्चरणसंचित फार झालें; शेखीं[1] तयासि निजपुण्य फळासि आलें. ॥ ४
झाला प्रसन्न मुनिमान्य पिनाकपाणी. 'बा! रे! अभीष्ट[2] वर माग' म्हणे सुवाणी.।
'मी तों विरक्त; विभवादि[3] नको; परंतु संतान एक मज दे, कुळहेतुतंतु.' ॥ ५
त्यानंतरें शिव सनातन, कर्मसाक्षी, बोले सखोल तनुअर्ध जया मृगाक्षी[4]; ।
'देईन दान; परि एक विधान भासे; तूं ऐक माग; मग लाग विवेककासे. ॥ ६

साधू, सुंदर, शाहणा, सुत तया सोळाच वर्षें मिती;
जो कां मूढ, कुरूप, तो शतवरी वर्षें असे स्वस्थिती; ।
या दोहींत कसा मनांत रुचला? तो म्यां तुतें दीधला,
झाला थोर तटस्थ ऐकुनि मुनी; दोहींकडे वेधला.' ॥ ७

मग म्हणे मुनिराज, 'कृपानिधी! घरिं विचारुन येइन आवधी; ।
निजवधूसि कसा सुत मानला पुसुन येइन, सांब! शिवा! भला.' ॥ ८

त्वरितगति निघाला, शीघ्र सद्मासि[5] आला;
प्रियवधुसि वराला सांगता सांग झाला; ।
मग सति, पद माथां वंदुनी, प्राणनाथा
कथित सुरस गाथा, सर्व संसार चाथा. ॥ ९

'मोठा रुक्ष[6], विमूढ, रूपरहित, प्राणें जिणें राहती
ते पाषाण धरेसि जाण जड कीं, कल्पांतही पाहती; ।
लोकीं टाकिति थूंक, काक, बक ते दीर्घायुषी सांग ते;
ऐसा पुत्र नको, नको, प्रियतमा! पायांस मी लागतें. ॥ १०

मूर्खाचें वय दुःखदायक; जगीं मातापित्यांचीं मुखें
या लोकीं उजळी कदापि नव्हती; चित्तास कैंचीं सुखें? ।
तो भूभार विकारकारण कडा, सांगावया भागतें;
ऐसा पुत्र नको, नको, प्रियतमा! पायांस मी लागतें. ॥ ११

सारासारविचारपंडित, महाचातुर्यचिंतामणी,
विद्या वेद विनोद वाद बुधता वेदांतबोधा धणी, ।
रूपें सुंदर, देह दिव्य धरिला, थोड्या वयाचा, तरी
वंशोत्तंस[8], अभंग, मंगळनिधी, कल्याणकारी, तरी. ॥ १२

---

१. शेवटीं. २. इच्छित. ३. द्रव्य इत्यादिक. ४. मृगनयना. (स्त्री). ५. घरास. ६. दयारहित. ७. घुबड. ८. कुलभूषण.

धीमंत तो करि सुकर्म निजस्वभावें; कर्में स्वधर्म उजळेल गुणस्वभावें; ।
धर्मेंच मर्म समजेल, तदा भवारी[1] तुष्टेल ईष्टद[2] सदाशिव कष्ट वारी.' ॥ १३

आकर्णोनि सुपर्णसा[3] पुनरपी पूर्वस्थळा पातला;
साष्टांगें प्रणिपात[4] त्या मुनिवरें पादांबुजीं घातला; ।
'दे देवा! मज पुत्र सुंदर, भला, ज्ञाता, सुहृत्तापहा;'[5]
गौरीनाथ, 'तथास्तु' बोलुनि, निजस्थानासि गेला पहा. ॥ १४

आश्रमीं मग मुनी प्रमदेशीं[6] नांदतां गिरिगुहांतरदेशीं, ।
गर्भचिन्ह धरिलें, पति पाहे; तो म्हणे मुनि, 'महेशकृपा हे.' ॥ १५

या रीती नवमास पूर्ण भरतां, सत्पुत्र झाला भला;
तोषावेश विशेष त्या मुनिवरा संसारसा भासला; ।
पाहे पुत्रमुखास, अंतरसुखा लेखा[7] नसे; माय ते
ब्रह्मांडीं न समाय पुत्रविभवें; सांगों कथा काय ते? ॥ १६

मार्कंडेय अशी मृकंडुमुनिनें नामाभिधा ठेविली;
वाढे बाळक, बोबडें जंव वदे, ते वाक्सुधा[8] सेविली. ।
झाले वत्सर[9] पांच, योग्य म्हणुनि केला द्विजाती[10] भला;
झाला धर्मनिधान तो; गुरुकुळीं विद्या भली लाधला. ॥ १७

तर्क[11]व्याकरणादिनाटककळालंकारशास्त्रांतरीं
ज्याचा खेळ, अशी विशाळ झळके प्रज्ञाप्रभा अंतरीं; ।
लीलाप्राय समस्त प्राकृत कथा; वेदांत सिद्धांत ते
हातीं आमलकासमान[12] डुलते; सांगों किती काय तें? ॥ १८

यापरी पुरवितां शिव डोहळे, भोगिती सरस ते सुखसोहळे; ।
लोटतां पळ, घटी, दिन, काळ जी! लागली उभयतांसहि काळजी. ॥ १९

वर्षावरी स्वसुखवर्षत वर्ष जातां, चित्तांत जीतचि उठे बहु हर्ष जातां; ।
माता पिता उभयतां भयतापसंगें, संतप्त गुप्त रुदती बहुत प्रसंगें. ॥ २०

'हा संकटा! कटकटा! विकटा कपाळा! कां दीधला सुत मला? सुरलोकपाळा!'।
तों तो सुखी न गणितांचि अशा भयातें, दैवापुढें हृदय आठवितां वयातें. ॥ २१

---

१. संसाराचा शत्रु. २. इच्छित देणारा. ३. गरुडसा. ४. नमस्कार. ५. सुहृदांचा संताप घालविणारा असा. ६. स्त्रियेशीं. ७. गणना. ८. वाणिरूप अमृत. ९. वर्षे. १०. ब्राह्मण. ११. न्याय. १२. आंवळ्यासारिखे.

मार्कंडेयाकारणें मायबापें झालीं दीनें; शोषिलीं शोकतापें; ।
'वर्षे गेलीं पंधरा आजि याला; एका वर्षा केविं देखों तयाला?' ॥ २२
धरिल धाक मनीं, वदतां तया; बहुत मानिल हा रुदतां भया; ।
म्हणुनि ना रुदती, वदती भिती; उभयतां सहजस्थिति दाविती. ॥ २३
परंतु तें दुःख मनीं न झांके; सर्वेंद्रियां शोकसमुद्र फांके; ।
येती बळें लोचनिं बाष्पधारा; या [1]इंगितें जाणविलें कुमारा. ॥ २४

(सवाया.)

जोडुनि हात, वदे मृदु मात, 'कशास मनांतचि खेद करा?
काय उणें पडलें मजपासुनि?' पाय नमी; विनवी पितरां; ।
कंठ सगद्गद बोलति ते, 'शितिकंठवरें दिधलासि बरा;
संकट घालुनि शंकर दे वर, शंकतसों सकळंकवरा. ॥ २५
कीं उगलीं न वसोंचि घरीं, [2]नवसोनि शिवा, 'सुत देइं म्हणों;'
पुण्य तपेंचि [3]वरेण्य विभूवर पुण्य वदे; गति काय जणों;' ।
'षोडशवार्षिक पंडित, कीं शतवार्षिक मूर्ख, मनास रुचे,
तो दिधला वदतां,' बुधभूषण मागितलेंचि असेंचि सुचे. ॥ २६

(श्लोक.)

रुदित होति [4]त्याप्रति निरूपितां; वदति यापरी माउली पिता; ।
'शिवशिवा असा खेद कासया? करितसां तुम्ही नाहिं नाश यां. ॥ २७
शिव दयाळु जो दे सुसंतती, भजति त्यांचिया रक्षितो तती; ।
अजि तया उणी काय संपदा? विनटतां पदा वारि आपदा. ॥ २८
भवनकानना शोकनाशका शरण जातसें लोकनायका; ।
अभयदान दे तोचि साधका, म्हणुनियां तया कायसा धका? [5] ॥ २९
निशिदिनीं भजा अंबिकापती, [6]भजतया कळीकाळ कांपती;' ।
उभयतां विचारूनि मूल तो अभयते भजे [7]आदिमूल तो. ॥ ३०
पूजानुरक्त, बहु भक्त, विरक्त झाला; चित्तीं जपे सतत सांबपदांबुजाला; ।
मृत्युंजयाविण जगीं भय कोण नासी? निर्धार हा समजुनी नियमी मनासी. ॥ ३१
जपत तपत ऐसा, तो करी तीर्थयात्रा,
धवल शुभ [7]विभूती लावुनी सर्वगात्रा; ।

---

१. अभिप्रायानें. २. नवस करून. ३. श्रेष्ठ. ४. मार्कंडेयास. ५. 'त्याविना नसे अन्यथा गती' असाही पाठ आहे. ६. जुनाट. ७. भस्म.

स्फटिकमणिगणाच्या रम्य रुद्राक्षमाळा
कारें शिरिं निजकंठीं नित्य घाली सुढाळा. ॥ ३२

(सवाई.)

पंडित थोर मृकंडुकुमार अखंड शिवार्चनिं मंडित झाला;
हिंडत हिंडत चंडमहेश क[1]वेरसुतातटिनीप्रति आला; ।
त्याच दिनीं यमगंड मनीं समजोनि, मुनि प्रभुपार्थिवपाणी,
पूजितसे तिळतंदुळबेलफुलें 'शिव शंकर' गर्जत वाणी. ॥ ३३

(चूर्णिका.)

श्रीशंकरपदपंकज[2]भजनांकितांमाजि अग्रेसरें, मृकंडुतपोधनाचिया कुमरें, देह गेह मोह त्यजुनि, एकसरें, सकल विषय विषासमान मानिले विरागावसरें, प्रज्ञेचेनि प्रसरें, श्रीचंद्रचूडचरणनलिनध्यानाविना नाठवे दुसरें, दंडधर प्रचंड भय मानुनि, षोडशवर्षांतिक गंडे[3] समजोनि, तांडवाधीश्वराची अखंड आराधना आरंभिली. ॥ ३४

मंदाकिनीजळतिळतंदुळबिल्वदळीं, मंदारकरवीरइंदीवरबकुळीं, श्रीचंदन-केशरकस्तूरिकादिपरिमळीं, भक्तांमाजी परमबळी, पूजि शांभवलिंग, मानसीं योजी धीर अभंग, गर्जत नामें नीट निसंग, करुणांभोद शंभो ! देव शंकर ! मंगळप्रद असावें. ॥ ३५

ऐशिये अवसरीं, चिन्मयध्यानीं तन्मय होउनि, बैसला मुनिराजकेसरी[4], तंव जाणुनि आयुष्यावसान वारी, जैसें गिरिवरूनि उतरे महाप्रवाह वारी[5], तैसे हाकित टाकित गर्जत आले दूत अचाट, दुर्धर जैसे घोर पिसाट, पाहति पूजापूर्तिचि वाट, तों मुनि झाला शंकरभाट, वर्णित हाजी ! मुनिजनकाजीं मानस द्या जी ! मी भयवाजी येउन प्रार्थितों हरहरा निजनिटिल[6]नयननिर्ग-तज्वलनज्वालाभस्मीकृतस्मरा ! गौरीहरा ! तांडवावसानसंभ्रम तूं जटाधरा ! प्रणतार्तिहरा[7] ! पाहि मां पाहि मां शंभो ! ॥ ३६

(श्लोक.)

आठवोनि विपदा[8] शिव पूजी; अर्पुनी शिवपदांसि वपू जी; ।
आदरेंचि परमा नियमातें जो मनांत पर मानि यमातें. ॥ ३७

हृत्पद्मीं शिवपादपद्म धरुनी, पद्मासनीं बैसला;
जैसा पंकज[9] पद्मपाणियुगुलीं प्रार्थी तसा भासला; ।

१. कवेरनामकपर्वताची कन्या म्ह० कावेरीनदी. २. शंकरचरणकमळ. ३. अवधि. ४. सिंह. ५. उदक. ६. ललाट. ७. नम्र झालेल्यांची पीडा दूर करणाऱ्या. ८. विपत्ति. ९. ब्रह्मा.

त्या काळीं विकराळ सेवक, यथाकाळीं, मुनींद्रावरी
काळें पाठविले; बळें क्षितितळीं त्यां कोण पां! आंवरी? ॥ ३८
आले गर्जत खड्गखेटकगदापाणी; दणाणी धरा;
हातीं झेलित वागुरा निगदिती, 'ओढा, विदारा, धरा;'।
धांवा घेत उफाळती, द्विजवरा ते लक्षिती लोचनीं;
तों भ्याले, शिवमूर्ति देखुनि दिठीं, ध्यानीं जगन्मोहनी. ॥ ३९
दचकती, चकती, धृति सांडिती; प्रबळ ते बळ तेथ न मांडिती; ।
रयमदा यमदास विरामती; मग मनीं गमनीं धरिती मती. ॥ ४०
'पूजासमाप्तिसमयीं दृढदीर्घपाशीं ओढूं' म्हणोनि यमहेर उभेच पाशीं. ।
हें धर्ममर्म जंव जाणवलें द्विजाला, तों तो सदाशिवपदांबुजिं सज्ज झाला. ॥ ४१
भ्याले असें समजुनी शिवपूजनातें, लेखीच ना मुनि मनांत रिपूजनातें; ।
वाचेसि नाम जपतां शिवशंकराचें, सामर्थ्यलेश न चले यमकिंकरांचें. ॥ ४२

(सवाई.)

देखुनि दंग मुनींद्र अभंग, ते जाति विहंग तसे यमधामा;
चार समस्त विचार निवेदिति, 'फार हठेंचि जपे शिवनामा; ।
पार्थिव चंड करींच अखंड, भजे कळभंड तनू स्थिर भावी;'
बोलुनि यापरि ते नमिती करिं, 'यावरि चाकरि काय करावी?' ४३

(श्लोक.)

ऐकतांचि यम क्रुद्ध जाहला; सेवकांप्रति म्हणे सजा हला; ।
आजि सिद्ध करणें द्विजा हला, हें प्रयोजन विना न जाहल्या. ॥ ४४
झाला सकोप; परजाळा मुठाळुनि, भुजालागिं थापटिच करें;
घाला द्विजावरिच घालावया यम निघाला सवेग निकरें; ।
पाला समर्पित कृपाला म्हणूनि तंव पालाणुनी निजहला,
आला मुनीजवळि, आलापितांचि जळिं आलाबुसा उसळला. ॥ ४५
क्रोधें काळ उफाळिला; भुजबळें जाळें झुगारी गळां;
तो झांकोनि दिठी शिवाप्रति मिठी मारी मुनी आगळा; ।
लिंगाही समवेत पाश जडतां हांकारिलें ब्राह्मणें
'शंभो! शंकर! धूर्जटे! पुरहरा! आतां नुपेक्षीं' म्हणे. ॥ ४६

---

१. ढाल. २. पृथ्वी. ३ पाश. ४. बोलती. ५. दृष्टीनें. ६. धैर्य. ७. रेडा. ८. भोंपळ्यासारिखा.

भूताधीश्वर, भक्तवत्सल, भवाराती, भवानीपती,
भोळा शंकर दिव्य तो प्रकटतां, दिक्पाळ त्या कांपती; ।
लिंगापासुनि धिंग पिंगटजटा, प्रोत्तुंगबाहू, करीं
ढक्का, शूल, कपाल, सायक, करी हांसोनि रोषोत्करीं. ॥ ४७

(चूर्णिका.)

ऐशी ऐकुनि दीन वाणी, श्रीमत्पिनाकपाणी लिंगापासुनि धिंग भीमशंकर दुष्कर पिंगटाक्ष उठावे, कोटिपतंगसोज्वळ, अंगीं तुंग भुजंग, माथां तरंगति गंगातरंग, हस्तकिं नाचति दिव्य कुरंग, तेणें देखुनि, यम तृण लेखुनि, पद वक्षःस्थळावरि ताडिला, वसुंधरेवरि पाडिला, आल्हादूनि देवें नृसिंहें प्रऱ्हादापरी रक्षिला, तंव तो मार्कंडेय जयजयशब्दें उदेला, त्रिवार 'चिरं जीव' म्हणुनी संबोधिला, आनंदनंदनें नित्यानंदें भरोनि वारंवार, शिवपदपंकजें वंदिलीं. ॥ ४८

(श्लोक.)

निरखुनि यम डोळां मारिली लात देवें;
क्षण नलगत भूमी पाडिला वामदेवें; ।
सुरवर सुमनांचे वर्षती भार भारी;
मुनि नमुनि उभा तो धीट जैसा ईभारी. ॥ ४९
त्वरितगति पळाले दूत दाही दिशांला;
म्हणति, 'गति अशाची व्यर्थ सेवा कशाला ?' ।
मग नगपतिकन्यामान्य धन्य प्रभूतें,
स्तवुनि निरखितो तैं सूत देवप्रभूतें. ॥ ५०
मृकंडूच्या बाळा धरि हृदयिं काळांतक करें;
म्हणे, 'बा! रे ! वत्सा ! भजनजळमत्स्या! न विसरें; ।
जनामध्यें कांहीं भय लय कदाही तुज नसो;
चिरंजीवी होईं; हृदयिं विषबाधा तुज नसो. ॥ ५१
चिरंजीवी केला स्वशरण मुनी, काळ दमुनी;
तदा आले ब्रह्मादिक सुर, उभे पाय नमुनी; ।
मुखें नानारीति स्तवुनि करिती ते विनवणी;
'महादेवा ! तूतें विहित न दिसे सांग करणी ? ॥ ५२

---

१. उच्च. २. सूर्य. ३. हरिणें. ४. हत्तीचा शत्रु सिंह. ५. पार्वती.

प्रभो ! तूझे आज्ञेविरहित नसे दंड धरिला;
तसा तोही ऐसा प्रहरुनि हरा ! मान हरिला; ।
क्षमा कीजे देवा ! करिं पद ससेवा' विधि वदे;
'तयातें संरक्षीं, सकरुण निरीक्षीं, अभय दे.' ॥ ५३
'मुला मार्कंडेया ! तव नियम सोळाचि वरुषें;
यथाकाळीं काळें म्हणुनि उभिले पाश सरिसें;' ।
म्हणे, 'याचा नाहीं अणुभरिहि अन्याय जगतीं;
तुवां ऐसें केलें तरि वदतसे लोक जगतीं.' ॥ ५४
परिसुनि सुरवाणी तुष्टला शूलपाणी;
वदत मधुर वाणी नित्य आनंदखाणी; ।
'शिवभजन करीती जे जगीं एकरीती,
विषयिं विषयभीती त्यां नसे काळभीती. ॥ ५५
वर्षें षोडश हाचि निश्चय खरा; मिथ्या नव्हे मंद्गिरा;
गेलीं कल्पशतें तरी मुनिवरा ! ऐशीच काया स्थिरा; ।
राहो नित्यपणें;' म्हणे तंव हरा वंदी सुरांचा फरा;
तेव्हां तो नगराज त्र्यंबक बरा वंदोनि गेला घरा. ॥ ५६
मुनीतें बोले हो ! तदुपरि महादेव, 'समजा
न चाले आम्हाशीं भय यम करी काय गमजा ? ।
त्वरें जाईं बाळा ! बहुत श्रमती तात जननी;
तुझ्या नामा बा ! रे ! निशिदिनिं वसे शब्द [3]अननीं.' ॥ ५७
वदोनी असें धाडिलें स्वाश्रमाला; तया पाहतां नाश झाला श्रमाला; ।
धरी माय पोटीं तया बाळकासी; मुखीं वर्णिती त्या जगत्पाळकासी. ॥ ५८
'कसा वांचलासी मुला ! तूं अपायीं ?' वदे तो, 'शिवें वांचवीलें उपायीं.' ।
बहू सौख्य झालें मृकंडूसि पां हें; प्रितीनें तया बाळकालागिं पाहे. ॥ ५९
ऐसें रक्षियलें तयासि समजा त्या शंकरें एकदा;
त्याचें नाम जपा निरंतर तुम्हीं, नेदी श्रमातें कदा; ।
ज्याची कीर्ति न वर्णवेचि सहसा त्या नारदा तुंबरा;
तो आनंदसुत स्वयें हरिहरा [3]अर्जोनि गर्जे बरा. ॥ ६०

---

१. माझी वाणी. २. मुखीं. ३. संपादून.

## शिबिचक्रवर्त्याख्यान.

(श्लोक.)

दीना जनासि करुणानिधि, सत्यवादी, ज्याला भला म्हणति वा[1]रिजसंभवादी; ।
सत्कीर्ति ज्या विभुचि सर्व दिगंतवर्ती, तो सत्वसिंधु विजयी शिबिचक्रवर्ती. ॥ १
श्रीकृष्ण धर्मनिधि धर्मकथाचि धर्मा सांगे; म्हणे, 'शिबिचिया परपार धर्मा ।
नाहीं जगीं; परिस तो इतिहास राया! देहादि मोह भय सर्वहि ओसराया. ॥ २
राजा यज्ञसभेंत यज्ञ करितां, प्राज्ञांचिया मंडळीं
जेथें सुज्ञ मिळालिया, प्रगटला यज्ञेश यज्ञावळी; ।
ज्याच्या दानगुणा नसेचि तुलना; श्रीब्र[2]ह्मवृंदें भलीं
आनंदोनि, 'भला भला' निगदिती संतुष्टता पावलीं. ॥ ३
सत्वाथिला शिबिनृपाळ महायशाचा व्यापी सुघोष अजि देश दहा दिशांचा; ।
यालागिं पा[3]करिपु पा[4]वक ही महीतें आले छळूं, अति अगम्य जगां तिहीं ते. ४
झाला ससाणा सु[5]रसंघराणा; झंकारघोषें प्रगटी कि[6]राणा; ।
अग्नी क[7]पोताकृति तो पुढारां धांवूनि ये त्या शिबिच्या बि[8]ढारा. ॥ ५
अक्षीं लक्षुनि ते क्षणीं क्षितिवरें पक्षीश पक्षीं जया
भक्षाया अतिदक्षसा धृतवि[9]यत्कुक्षीहुनी राजया ! ।
झेंपावे, तंव वक्ष पक्ष हि चळीं कांपे, सभा पावला;
लक्षूनी शिबिदीक्षिताप्रति वदे, 'तूं रक्ष राया! मला'. ॥ ६
मारील हा झडप हाणुनियां ससाणा या दुर्भयींच थरकांपुनि, त्या ठिकाणा ।
आला, पडे शिबिचिया चरणाच पाशीं; बा! कींव ये न तंव काकुळती नृपासी? ७
'अजि कृपाळु बा! कीर्तिकोमळा! हृदयिं सांठवीं आपुल्या मला. ।
वदनिं माझिये दीनता पहा; तुजविना नसे दी[10]नतापहा'. ॥ ८
परिसुनी अशा पा[11]रव्यारवा शिबि म्हणे तया, 'पारव्या! रहा'. ।
नृपतिनें तदा आपले करें वसविला, जसा बाप लेंकरें; ॥ ९
नृपतिमांडिये ये कपोत जो मृग भ[12]यांबुधीं येक पोतें[13] जो; ।
'भिउं नको नको दीन पाखरा! तव रिपू' वदे 'दीन पां खरा.' ॥ १०

---

१. ब्रह्मदेवादि. २. ब्राह्मणसमुदाय. ३. इंद्र. ४. अग्नि. ५. इंद्र. ६. उड्डाण. ७. पारवा. ८. घरा. ९. आकाश. १०. दीनांचा ताप हरण करणारा. ११ पारव्याचा शब्द. १२. भीतिसागरांत. १३. नौका.

खग पडे तदा हीत पावला; तंव रिपू हतोहात पावला; ।
झडप घेत ये वाड पां रवें; पळतसे नृपा आड पारवें. ॥ ११
राजा म्हणे, 'खबुतरा ! भयअंत झाला; माझ्या नसे भय कदां शरणागताला; ।
हा श्येनें तो किति ? यमादि भयंकरांचें नाहीं तुला भय चतुर्मुखशंकराचें. १२
मर्यादेसि टळेल वारिधि जरी, सूर्येंदु तारा गती,
या काळींच ढळेल मेरु शिखरीं चालेल मुंगीगती; ।
मर्त्या देखुनियां पळेल यम तो, वाळेल गंगा जरी,
माझ्या या शरणागता भय नसे कल्पांत झाला तरी. ॥ १३
कदाचित शिणोनियां त्यजिल मेदिनी तो फणी;
कदाचित तृणांकुरा उबगिजेल दिग्वारणी; ।
कदाचित दिवामणी क्षिति निजेल तो भागला;
परंतु भुवनत्रयीं भय कदापि ना तूजला.' ॥ १४
परिसुनि शपथेची राजगंभीरवाणी, मग कपटकपोतें बैशिजे राजपाणी; ।
तंव झडकरि आला यागशाळे ससाणा; क्षुधित बहुत काळें तो उभा दैन्यवाणा. १५
तदा वदे श्येन, 'दयासमुद्रा ! धरूनियां याचक दीनमुद्रा; ।
त्वत्कीर्ति ऐकों जन उद्धराया; म्यां देखिलें आजि विरुद्ध राया ! ॥ १६
तूं धार्मिकोत्तम असें वदताति राजे; ठायीं तुझ्या अति अधर्म नृपा ! विराजे. ।
मी दीर्घकाळवरि पीडितसें भुकेला; माझा कसा हिरुनि घांस हि घात केला ? ॥ १७
एक्या जिवेंचि अशना करुनी विघाता कां बा ! प्रवर्तसि अनेककुटुंबघाता ? ।
माझेचि कां विषयीं आज दया उडाली ? हिंसानदींत तव कीर्ति दिसे बुडाली. १८
आहा कसा वदनिंचा मृदु घांस नेला ? संतृप्त कोण करि यावरि वासनेला ? ।
धर्मा ! असें कपट आधिक वासवासी दैन्यावलंबन करोनि मुखासि वासी. ॥ १९
राया ! कैशी कर्मरेखा कपाळीं ? मातें धर्में त्यागिलें त्या कपाळीं; ।
आले माझे सर्व ही प्राण कंठा; हा वैकुंठा ! हा विधी ! नीलकंठा ! ॥ २०
ऐशी करूनि करुणा करुणालवाला मागे कपोत; मुखिं शब्द करी मवाळा; ।
राजा म्हणे मग तयासि, 'अगा! जिताला नेदीं कदापि मरणा शरणागताला.' ॥ २१
बोले विभू, 'सरस आणिक मांस आणा.' 'तें मी न घें' म्हणुनि, वाहत दीर्घ आणा. ।
श्येनास जी अशन जाण कपोतमांसीं हें निर्मिलेंचि विधिनें पतगोत्तमासी. ॥ २२

---

१. पायां पडे. २. लागलाच. ३. आला. ४. ससाणा. ५. सागर. ६. प्रलय. ७. शेष. ८. दिग्गज. ९. सूर्य. १०. पारवा. ११. राजाच्या हातावर. १२. मृदु.

बोले श्रुती भक्ष कपोत श्येना; आहार त्या वांचुनियां असेना; ।
सर्वज्ञ जी! सर्व तुम्हांसि ठावें; म्यां यासि नेघोनि कसें उठावें? ॥ २३
हा काय रे! सार अपारव्याला घे आणिका त्या मृत पारव्याला ।
आम्हीं तनू ते न शिवों शवाची आज्ञा अशी [1]सारससंभवाची. ॥ २४

(दिंडी.)

नृप बोले, 'जरि देह हा निमाला; जरी येती धनगेहहानि माला; ।
खग नेदींच कपोत हा तयाला; जनीं रक्षूं च, जपोत हात याला.' ॥ २५

(श्लोक.)

'दे आपुली तनु तरी पतगप्रमाण; या ही विना अशन सर्व हि अप्रमाण; ।
पारावतासम भरें निजमांस खंडीं; दाता नसे तुजविना नृपती! त्रिखंडीं'. ॥ २६
खगतनू तुकें मांस भातुकें निजशरीरिंचें पूर्ण जीतुकें ।
परिसुनी असें, लोक कांपती. त्वरित ऊठिला भूमिकापती. ॥ २७
राजा म्हणे, 'याहुनि लाभ काय? तों ऊठिला रुचिर [3]मन्मथभव्यकाय.' ।
धर्माप्रती हरि म्हणे, 'अति धन्य माय रत्नासि त्या प्रसवली; यश तें न माय.'
तेव्हां आणवि तो [4]तुला, त्रिभुवनीं जीला नसे हो [5]तुला;
पक्षी तो जड [6]जीतुला, निजतनूचें मांस दे तीतुला; ।
जोखी तों खग [7]भारला, समपणें नोहेचि तो थारला;
राजा धार्मिक थोरला, म्हणुनियां देहो करी थोरला. ॥ २९
निजोरुजंघांतरिं [8]खड्गधारा खंडी, तदा शोणि[9]तपूर्णधारा ।
भूमीवरी वाहति, पाहती ते अहो! नृपाची अतुल स्थिती ते. ॥ ३०
आक्रोशेंविण, आग्रहाविण, तसा तो काम रागाविना,
कीं स्वाभाविक शांत, तुष्ट हृदयें, चिंता कशी भाविना? ।
देहातें तृणतुल्य भावुनि, करें खंडोनि खड्गाननीं,
जों अर्पी निज मांस, तों [10]वसुमती कांपे जनीं काननीं. ॥ ३१
पारड्यांत निज मांस जों करें अर्पिजे [11]धृतिबळें दयाकरें, ।
तों [12]कुंटी खगतनू जडावली; अर्पि तो वरिवरी हडावली. ॥ ३२
अर्पितां घडिघडी निजमांसा, पाहती सकल लोक तमासा; ।
येचि ना तुक समानपणाला, कीं तदा बसविलें अपणाला. ॥ ३३

---

१. कमलोद्भव ब्रह्मदेवाची. २. मृत झाला. ३. मदनासारखें भव्य शरीर ज्याचें असा. ४.तराजू. ५. उपमा. ६. जितका. ७. जड झाला. ८. तरवार. ९. रक्त. १०. पृथ्वी. ११. धैर्य. १२. कृत्रिम.

राजा प्रसन्न बसला सगळा तुळेसी, देदीप्यमान वदनीं न उणा कळेसी; ।
सारा समान तुळलाचि कपोतभारें; केले जयध्वनि तदा सुरलोकभारें[1]. ॥ ३४
ते देव धन्य म्हणती, 'नृप सत्त्वधीरा! तूं अंबरा पडतया गमलासि धीरा[2].' ।
तोषोनियां, स्तवुनियां, गगनीं फुलांची गंभीर वृष्टि करिती अति मंजुलांची. ३५
'अप्राप्य जो सुरनरां, वर माग राया! घे स्वर्गसंपति करीं गुणसागरा! या.' ।
'कांहीं अपेक्षित नसे, मख[3] पूर्ण कीजे; द्या आहुती केवल[4] अर्पिति पावकीं[5] जे.' ३६
झाले सुखी मखशिखी[6] मघवा[7] मखीं ते; वाखाणिती अखिल कीर्ति सख्या मुखीं ते.।
'सृष्टींत शिष्ट, तरि दृष्टिस सुष्टकर्मी; झालासि दृष्ट मदहृष्टचि पुष्टकर्मी. ॥ ३७
तुळावया धैर्यबळा नृपाळा! खळाकृती भूमितळीं कृपाळा! ।
आलों, निवालों, अति तुष्ट झालों; धालों, तुझ्या सत्त्वरसीं बुडालों. ३८
निकें म्हणुनि, मागुती वरद ते वदों लागती,
नृपाळमहिमागती अमर होति दोलागती; ।
नृपा! सफलकाम हो; त्रिभुवनीं तुझें नाम हो;
अगा! स्वसुखधाम हो; सकललोकविश्राम हो. ॥ ३९
रमावर[8] सुखी करो, समुळ मोहमाया हरो;
भवाब्धिभय ओसरो; भुवनिं भव्य कीर्ती भरो; ।
तुझ्या सुचरितें तरो त्रिजग, दिव्य भाग्यें भरो;'
असे वर सुरीं परोपरि दिले; 'जना उद्धरो.' ॥ ४०
'सदा सुकृत अंकुरो; तुज अभीष्ट सारें पुरो;
मती निजपदीं मुरो, सकळयज्ञदीक्षागुरो!' ।
करोनि अशिं उत्तरें शिखिबिडौजे[9] त्या नंतरें
सुखाउनि निजांतरें त्वरित जाति अभ्रांतरें. ॥ ४१
त्यावरि तो शिबिराज विराजित वाजत गाजत याग करी;
दिव्य शरीर दयानिधि धीर समर्पित आहुति भव्य करीं. ।
गर्जति वेदरवें द्विजराज, असेंच किजे कहिं काळवरी;
राहुनि, भोगुनि, त्यागुनि हें जग, तो मग मोक्षपदासि वरी. ॥ ४२
ऐशी असे अति पुरातन गोष्टि राया! म्यां बोलिल्या नृपतिकीर्ति युधिष्ठिरा! या.।
तैशीच रे तुज असो यशसंपदा ते. आणीक नाहिंत असेच अमूप[10] दाते. ॥ ४३

---

१. समुदायानें. २. आधारा. ३. यज्ञ. ४. घांस. ५. अग्नींत. ६. अग्नि. ७. इंद्र. ८. विष्णु. ९. इंद्र. १०. पुष्कळ.

जो हे कथा परिसतो अतिभक्तिभावें, जीवांमधें परिस तो गमला स्वभावें.
ज्याचा कथारस सुकर्णपथासि पावे, त्याचे जगीं चरण वंदुनियां जपावें. ॥ ४४
आकर्णिती जरि अपार बळ श्रुतीतें कुंतीसुता! परिस त्याच फलश्रुतीतें; ।
सायुज्यमुक्ति मग अर्पिल त्यासि माळा; कामादिमोहरिपुंचा निरसे उमाळा. ४५
धर्मासि धर्मगुण यापरि शब्द धर्मी सांगे मुकुंद गुणसुंदर थोर धर्मी. ।
ते आणिती चतुर जाणपणें मनाला, आनंदनंदन कवी विनवी जनाला. ॥ ४६

## पदसंग्रह.[२]

### भगवत्स्तुतिपर पदें.

#### पद १ लें.

गौरीहरतनया! गुणालया! । गजवदना! गणराया! ॥ ध्रुवपद. ॥
स्वामी! मज तारीं सुखसद्मा! । नमन तुझे पदपद्मा! ॥ गौरीहर० ॥१॥
विद्यादायक तूं विघ्नहरा! । विनायका! श्रुतिसारा! ॥ गौरीहर० ॥ २ ॥
आनंदतनय म्हणे हेरंबा! । पालितविश्वकदंबा! ॥ गौरीहर० ॥ ३ ॥

#### पद २ रें.

गणराज गजानन गावा हो! ॥ ध्रुवपद. ॥
सिंदुरचर्चित शुंडविराजित । मोदक हातिं पहावा हो! ॥ गणराज० ॥१॥
विघ्नविनाशक बुद्धिप्रकाशक । तो वरदायक ध्यावा हो! ॥ गणराज० ॥२॥
आनंदात्मज चिंतितसे तुज । हा भवसिंधु तरावा हो! ॥ गणराज० ॥३॥

#### पद ३ रें.

जय जय रघुवीरा! रणधीरा! । रविकुळमंडणहीरा! ॥ ध्रुवपद. ॥
राक्षसजलदसमीरा! । निजजनकरुणापूर्णगभीरा! ॥ जय जय० ॥ १ ॥
कनकरुचिरशुभचीरा! । मुनिजनमानसपंजरकीरा! ॥ जय जय० ॥ २ ॥
आनंदतनयवजीरा! । पदयुगझळझळितमंजीरा! ॥ जय जय० ॥ ३ ॥

#### पद ४ थें.

दाखवीं दिव्य पाय दयानिधे रामा! ॥ ध्रुवपद. ॥
हीन दीन आस तुझी कास पूर्ण आम्हां, ।
धरावया पाहतसें अगा घनश्यामा! ॥ दाखवीं० ॥ १ ॥

---

१. उत्तम, परिसासारखा. २. यांत कित्येक पदें फार अशुद्ध मिळालीं, तीं निरुपायास्तव तशींच छापावीं लागलीं.

माय, बाप, बंधु, गोत्र, मित्र, तूंचि आम्हां; ।
तुजवीण कोण असे सांग सख्या रामा ! ॥ दाखवीं० ॥ २ ॥
सखया, आनंदतनय म्हणे, गुणग्रामा ! ।
क्षीणभाग हरीं त्वरें पुसोनियां घामा. ॥ दाखवीं० ॥ ३ ॥

पद ५ वें.

भुवनीं मज रंका नाथा ! । नाहिं दृश्य कोणी त्राता; ॥
सखया घनकांता रुक्मिणिनाथा ! । तुजवांचुनि आतां. ॥ भुवनीं० ॥ १ ॥
श्रमलों भवगहनीं भ्रमतां, । सहसा सांपडलों ममता, ॥
सरिचा वाहे मी झालों सरिता । तुजवांचुनि आतां. ॥ भुवनीं० ॥ २ ॥
धांवें वृंदारककांता ! । कांता जन अंबक कांता; ॥
रक्षि श्रीआनंदतनय एकांता । तुजवांचुनि आतां. ॥ भुवनीं० ॥ ३ ॥

पद ६ वें.

ये रे ये रे राघोबा ! माझ्या ॥ ध्रुवपद. ॥
त्रिविधतापशमन चापबाणपाणी रे ! ।
विविधतापदमन आत्मसौख्यखाणी रे ! ।
स्तविति बाप बाप देव दिव्यवाणी रे ! ।
जलजनयन जलधिशयन जलजरुचिर जय जय राघोबा० ॥ १ ॥
विपुलबाहु हतसुबाहु पूर्णकामा रे ! ।
निखिललोकशरण शोकहरण रामा रे ! ।
अतुलकीर्ति पुण्यमूर्ति गुणग्रामा रे ! ।
प्रणतसदय मृदुलहृदय कृतचिदुदय जय जय राघोबा० ॥ २ ॥
अमरवर्यवरद सूर्यवंशभोजा रे ! ।
समरकार्यनिपुण धूर्य पावें वोज्या रे ! ।
सदा आनंदतनयनमितपदसरोजा रे । !
स्वसुखसदन शशिसुवदन सरसरदन जय जय राघोबा० ॥ ३ ॥

पद ७ वें.

प्रभु भास्करकुळिंचा । हा हा प्रभु भास्करकुळिंचा. ॥ ध्रुवपद. ॥
क्रमिता रिसवानरदळिंचा, । दमिता मदराक्षसफळिंचा, ।
शमिता भवभीषण भजकावळिंचा, ॥ हा हा प्रभु भास्कर० ॥ १ ॥

हंता दशकंदरधुळिचा, । रंता नतबद्धांजुळिचा, ।
यंता जो सकळा चिन्मयमुळिचा, ॥ हा हा प्रभु भास्कर० ॥ २ ॥
फळ जो मुनिमानसअळिचा, । मुळ जो दशरथनृपबळिचा, ।
मुळ जो आनंदतनयकदळीचा, ॥ हा हा प्रभु भास्कर० ॥ ३ ॥

**पद ८ वें.**

रामचंद्र कविचकोरचंद्र वंदिला. ॥ ध्रुवपद. ॥
रामचंद्र धरुनि मनीं, । कामजनित ताप हरुनी, ॥
कामनाविहीन पूर्ण । धामपदारूढपणें ॥
या मनासि काम नाणिला; ॥
रामराम जप जपोनि दोष खाणिला ॥
हा महाभवांबुनिधी बा उलांडिला ॥ रामचंद्र० ॥ १ ॥
हे कृपाळ हे दयाळ । हे सुशील सत्वशीळ ॥
हे विशाळ………… । ……………… ॥
……………………हे सुमंगला ॥
निशिदिनीं हृदयीं जपोनि कोमला. ॥
चरण धरुनि शरण मी तुज घनःश्यामला ! ॥ रामचंद्र० ॥ २ ॥
नको प्रमुख प्रमुख कर्म, । नको लौकिकादिधर्म ॥
जोडतसे महा शर्म । सांपडलें एक वर्म ॥
…………………गुरुकृपें मला ! ॥
याचि रिती आम्हां निजध्यास लागला. ॥
म्हणुनि विहित असे हाचि मार्ग चांगला. ॥ रामचंद्र० ॥ ३ ॥
जय जय रघुवीर । असा घोष करिती वीर ॥
याचि रवें पडे नीर । यमदमादिकांस धीर ॥
नव्हे म्हणुनि नुरति यातना ॥
दुरित जाय नाम घेतां वदनकेतना ॥
आनंदतनय नमन करी फणींद्रकेतना ! ॥ रामचंद्र० ॥ ४ ॥

**पद ९ वें.**

दीनबंधु ! पालय शौर्यसिंधु ! ॥ ध्रुवपद. ॥
दीनबंधु नदीनतटशय वीनवहन नवीनघनरुचि पीनभुजयुग हीन भविं बहु शीणलों प्रणमीतसें तुज । दीनबंधु० ॥

ध्वांतहरकुलजातकांतक कांतलंबितकुंतलांत सुमंतसचिवानंत संतत संतरक्षक दांत सीताकांत मुनि सुशांत जलजभ्रांतमधुपानंतविनुत सुदंत बहु विषयांतरीं मी गुंतलों तत्प्रांत दाखविं । दीनबंधु० ॥ १ ॥

कंजचरणनिकुंजसंचरमंजुभाषण अंजनाद्रिनिभंजना नतरंजना भवभंजना श्रितपंजरा सुरकुंजरंजनिरंजनामरकंजसंभवपूजनास्पद तूं जनार्दन! पाव विद्युत्पुंजपट मृत्युंजयप्रिय ! । दीनबंधु० ॥ २ ॥

रुक्षवरमखदक्षजलजनिभक्षणोद्धतराक्षसाधिपशिक्षकाजत्रिभुक्षसनुत रुक्षकपिगण येत निजजनमोक्षदाखिललक्षणांचित लक्ष्मणाग्रज ! ये क्षणीं मज रक्ष त्रिजगत्कुक्ष त्र्यंबकभंजना आनंदसुत विभु । दीनबंधु० ॥ ३ ॥

## पद १० वें.

सार्वभौमा ! निजजनपूर्णकामा ! ॥ ध्रुवपद. ॥

सार्वभौम अपूर्वरुचिपर खर्वनयन तुं सर्वचालक पर्वशशिमुख पर्वतांगक सार्वी सर्व तुं भर्वसा मज । सार्वभौमा० ॥

मित्रकुलजपवित्रनृपवरनेत्रशतसितपत्र दिनकरपत्रिवर वरपत्रिविलसितगात्र जलनिधिपात्र किलवशत्रुविदलितशत्रुकुल शशिवक्र दशरथपुत्र रघुविर क्षत्रधर्म चरित्र चित्रविचित्र जन सर्वत्र वर्णिति । सार्वभौमा० ॥ १ ॥

वातसुतनुत पूतचरित निशीतशरधर पीतवसना भ्रांत जननीतात नवजलजातदृग्जाकांत राशय चातकांबुद भूतनिकरातीत त्रिभुवनशीतकर साकेतनगर जनातसुखकर पातकांतक हात दे मज । सार्वभौमा० ॥ २ ॥

अंबुजाननकंबुनिभ जलशंभु सुखकर तुंबरादिकदंबविनुत पयांबुनिधिशय जंबुरुचिकलवैभुजिसु नितंब नविनकदंबरुचिर चिदांबरा कनकांबरा करुणांबका भवशंबादि दिगंबरा आनंदसुत विभु । सार्वभौमा० ॥ ३ ॥

## पद ११ वें.

हरि! मज तारीं दिना । तुजविण जाऊं शरण कोणा ? ॥ ध्रुवपद. ॥

विप्रकुळांत मी जन्मुनि व्यर्थचि । पाहें पाहें तूं मलिना. ॥ हरि मज० ॥ १ ॥

मोहमदें मन भ्रमितचि होउनि । नाहिं केलें तुझे ध्याना ॥ हरि मज० ॥ २ ॥

कोटिअपराध करूनि क्षमा हरि! । देईं भेटी तूं सुलिना. ॥ हरि मज० ॥ ३

आनंदात्मज बाळक लाडकें । जाणुनि माय रुसेना. ॥ हरि मज ०॥ ४ ॥

## पद १२ वें.

ब्रह्मादि वंदिती ज्याचे पाय । तो माधव ॥
गोपाळांचे संगें खेळों जाय । तो माधव ॥ ध्रुवपद. ॥
इंद्रादि नेणती ज्याची थोरी । तो माधव ॥
गौळियांचे घरी करी चोरी । तो माधव ॥ १ ॥
ब्रह्मांडाच्या कोटी ज्याचे पोटीं । तो माधव ॥
यशोदेची बाळ लीला मोठी । तो माधव ॥ २ ॥
संसारवृक्षाचें निजबीज । तो माधव ॥
गोपी हृदयीं आलिंगिती सहज । तो माधव ॥ ३ ॥
ज्याचे तेजें भवभानु झांके । तो माधव ॥
आनंदतनयहृदयीं ठाके । तो माधव ॥ ॥ ४ ॥

## पद १३ वें.

गोविंदा ! गोपाळा ! कृष्णा ! गोपीजननाथा ! ।
गोवर्धनधर गोरसरसिका ! गोड तुझी गाथा. ॥ ध्रुवपद. ॥
अहिपतिशयना ! अंबुजनयना ! अपारगुणराशी ।
असुरविदारा ! अमरोद्धारा ! अखिलांतरवासी ॥
अद्भुत तेजोराशी देवा ! लागों पायांसी. ॥ गोविंदा० ॥ १ ॥
पापविनाशक पावननामा ! पालितनिजदासा ! ।
पामरजनपरिपालनचतुरा ! पंकजिनीहंसा[1] ! ॥
तारिं मला भवपाश विदारुनि तूं पैय[2] मी मासा. ॥ गोविंदा० ॥ २ ॥
माधवराया ! मानुषवेशा ! मुनिमानसहंसा ! ।
माझे सर्व मनोरथ पुरवीं मोहमदध्वंसा ! ॥
मागितला आनंदसुतें वर यदुकुलअवतंसा. ॥ गोविंदा० ॥ ३ ॥

## पद १४ वें.

धांव धांवण्या ये धण्या ! जड अजड देखण्या रे ! ॥ ध्रुवपद. ॥
तूजवीण कोण कान्हा हरी भवतापा ? ।
पतितपावन बापा ! ॥ धांवें अजड देखण्या रे ! ॥ धांव० ॥ १ ॥

---

१. कमळिणीनें युक्त हंसा. २. उदक.

करतळदलकनकरुचिररमणीयनेत्रा ! ।
कमलदलायतनेत्रा ! ॥ धांवें अजड देखण्या रे ! ॥ धांव० ॥ २ ॥
आनंदतनय म्हणे पाव रघुनाथा ! ।
आम्हा आतां तारीं अनाथा ॥ धांवें अजड देखण्या रें ! ॥ धांव० ॥ ३ ॥

पद १५ वें.

नंदहृदानंद चिदानंद माधवा ! ॥ ध्रुवपद. ॥
नंदतनय अभय देइं सुंदरारविंद तनय ॥
इंदिरारमण ! तुझा छंद वसो मना घनानंद भाग्यवृंद दातया ॥
मंदराख्यनगोद्धरण जगद्धातया ! ॥ नंद० ॥ १ ॥
पाय तुझे पाहतांचि जाय दैन्य सुख हृदयीं ॥
ध्याय म्हणुनि वदति मुनिराय जगत्रयविलास मायबाप तूं दयानिधी ! ॥
उपाय हाचि भाग्य तुझें चरणसंनिधीं ॥ नंद० ॥ २ ॥
कंजकुसुमतात दनुजभंजनार्तिकाम विजित ॥
अमर पूजिति रंज्वलोज्वलप्रभा निरंजनाख्यरूपधारणा ॥
मंजु पाव लोकनाथ भयप्रतारणा ॥
आनंदतनय शरण तया जगत्कारणा ॥ नंद० ॥ ३ ॥

पद १६ वें.

ये रे ये रे गोविंदा ! रामा ! ॥ ध्रुवपद. ॥
विकसितवारिजातमंदमधुरहासा रे ! ।
सजलजलदभव्यनिराभासा रे ! ।
गोपगोधनादि गोपिकाविलासा रे ! ।
उडुपतिमुखें जननि वदति दुडदुड गति झडकरि ॥ ये रे० ॥ १ ॥
विविधभूषणादि गोपिवाला रे ! ।
निविडन कोमला विहाम धाला रे ! ।
मृदुलभाषणादि शोषणा कृपाळा रे ! ।
त्रिभुवनपति तुजसि जपति विधि सुरपति अनुदिनिं ॥ ये रे० ॥ २ ॥
निजानंद म्हणे तूंचि पूर्ण ठेवा रे ! ।
व्रजानंददायी शेषशायी देवा रे ! ।
करी भावें आनंदतनय सेवा रे ! ।
नमुनि चरण म्हणे शरण चुकविं मरण करि मग ॥ ये रे० ॥ ३ ॥

**पद १७ वें.**

खंडपरशु हृत्सरोज चंडकर हरी. ॥ ध्रुवपद. ॥

खंडपरशु हृत्सरोज चंडकीर्ण निगमवेद्य पुंडरीकचरण दनुज दंडणें प्रचंड दोरदंडयुगुल कुंडलश्रवा ! ॥

कुंडलीशशयन जगन्नाथ माधवा ! ॥
चंड धनुर्धर कृपांबुराशि राघवा ! ॥ खंड० ॥ १ ॥

तारकादिनाथवदन तारकारिबल स्वजन तारकांत चतुर कांतारसदन त्रिशिरखरविदारणा सुदारसुंदरा ! ॥

सारसाक्ष पार न तुज विद्युत मंदरा ॥
थार दे तवांघ्रियुगुल विपुलकंधरा ! ॥ खंड० ॥ २ ॥

तप्तशांत कुंभवसन सप्तऋषी सुतपदाब्ज सप्ततुरगदीप्ति जनीं गुप्त वससि न तुजविना आत्ममतें क्लृप्त तुज असे ॥

सुप्त होउनी उरगराजमंचकीं वसे ॥
तृप्त करी चित्त मम भवसुधारसें ॥ खंड० ॥ ३ ॥

मीनकेतजनक सुखद मीनल्यात तवांघ्रियुगुल चपल मीन मानसादि मीन भवत मीन घालुनी ॥

वीनवहन दीनवचन श्रवणिं परिसुनी ॥
आनंदाख्यतनय म्हणे पाव ये क्षणीं. ॥ खंड० ॥ ४ ॥

**पद १८ वें.**

माझा पांडुरंग मायबाप धणी सुहृद. ॥ ध्रुवपद. ॥
विटेवरी उभा नीट । दनुजदर्मिं महाधीट. ॥ माझा० ॥ १ ॥
राधारुक्मिणीकांत । बुधानंद सदा शांत. ॥ माझा० ॥ २ ॥
भक्तां भय कदा न दे । आनंदतनय वदे. ॥ माझा० ॥ ३ ॥

**पद १९ वें.**

ये रे ये रे मल्लारीराया ! । मला तारीं. ॥ ध्रुवपद. ॥
विप्र पीडिताति दैत्य कर्मदोषा रे ! ।
रुद्र पातला तयांसि सदां रोषा रे ! ।
सेना गर्जताति 'उदय उदय' घोषा रे ! ।
अर्जिति तुज निर्जर नभिं गर्जति मुखिं हर हर मल्लारीराया !॥ ये रे० ॥१॥

कृपासिंधु दीनबंधु निर्विकारा रे ! ।
महीपाळ महाकाळ खड्गधारा रे ! ।
मणीमल्लमहामल्लसंहारा रे ! ।
ढकलुनि हय प्रगटसि जय न धरिसि भय जय जय मल्लारीराया ! ॥ ये रे० ॥२॥
करिति भक्त भात शाख भरित रोटी रे ! ।
करिति गैदारोळ अर्भकांदि मोटी रे ! ।
लोक येळकोटि म्हणती लक्ष कोटी रे ! ।
वंदन करि सुंदर आनंदतनय घडि घडि मल्लारीराया ॥ ये रे० ॥३॥

### पद २० वें.

पवनतनय परमविनय रामसेवनीं. ॥ ध्रुवपद. ॥
उपजतांचि अर्कबिंब घेतलें करीं ।
फळ विभावितां विरिंचि सोडवी प्रयत्न करुनि स्तवुनि सज्जनीं. ॥ पवन० ॥ १
अंबुधी तरोनि जाय जंबुचे पुरीं ।
जंबुमाळि दमुनि अर्पि जनकजेसि मुद्रिका अशोकउपवनीं. ॥ पवन० ॥२॥
काळनेमि दमुनि आणि द्रोणपर्वता ।
वांचविलें लक्ष्मणासि लाधली सुपुत्र माय धन्य अंजनी. ॥ पवन० ॥ ३ ॥
कल्पतरूतळीं विराजमान तो हरी ।
मुख्य पाय सद्गुरुचे वंदुनि आनंदतनय चिंतितो मनीं. ॥ पवन० ॥ ४ ॥

---

## उपदेशपर पदें.

### पद २१ वें.

बरवें समजा रे! उमजा रे! । कां करितां गमजा रे! ॥ ध्रुवपद. ॥
मायामय जग सारें, । अवघें दो दिवसांचें वारें. ॥ बरवें० ॥ १ ॥
दारा धन सुत पोरें । अवघीं नागवणीसम चोरें. ॥ बरवें० ॥ २ ॥
धरुनी पथ परभारें । तरला आनंदतनय विचारें. ॥ बरवें० ॥ ३ ॥

### पद २२ वें.

ब्रह्मविचार करा । गडे हो ! ॥ ध्रुवपद. ॥
नश्वर मानुनि हें भववैभव, । पाहुनि मोह तरा. ॥ गडे हो० ॥ १ ॥

---

१. मोठी आरोळी.

श्रीगुरुचें चरणामृत सेवुनि, । कांहीं विराग धरा. ॥ गडे हो० ॥ २ ॥
आनंदतनय म्हणे हें निज चिंतुनि, । मीपण हें विसरा. ॥ गडे हो० ॥३॥

### पद २३ वें.

कां रे! नाठविशी कमलनयन वासुदेव? ॥ ध्रुवपद. ॥
जपति जया संत सनक, । सकळजना जननिजनक. ॥ कां रे० ॥१॥
कलुषहरण, विमलचरित, । करुनि निजानंदभरित. ॥ कां रे० ॥ २ ॥
विचरे आनंदतनय । हृदयिं धरुनि नंदतनय. ॥ कां रे० ॥ ३ ॥

### पद २४ वें.

बोला रे! राम बोला रे! ॥ ध्रुवपद. ॥
बोला हलतालरवें, तोला मृगरागरंग । सोला निगमार्थ मनीं डोला रे! ॥बोला०॥१॥
बोला धनधान्यरिती, फोला मग विषयगती । झोला निरसेल काळटोला रे॥बोला०२
खोला या दिठि वत्ती, ओलावा धरि शक्ती । आनंदसुतकविच्या बोला रे ॥बोला०३

### पद २५ वें.

पाय गुरूचे धरा । लवकर. ॥ ध्रुवपद. ॥
तत्वमसी महावाक्य विचारुनि । जिवींचें जीवपण हरा. ॥ लवकर० ॥ १ ॥
शोधुनियां श्रुतिशास्त्रपुराणें । हा भवसिंधू तरा. ॥ लवकर० ॥ २ ॥
आनंदसुत प्रभु लक्षुनि अंतरीं । लावा अनुभवतुरा. ॥ लवकर० ॥ ३ ॥

### पद २६ वें.

क्षणही विषयसुखातें नेघ. ॥ ध्रुवपद. ॥
नश्वरसुख हें शाश्वत कैंचें? । जेविं जळावरि रेघ. ॥ क्षणही० ॥ १ ॥
होती जाती लोक विलोकीं । गगनीं जैसा मेघ. ॥ क्षणही० ॥ २ ॥
आनंदात्मज बोले भावें । ब्रह्मकुळाचळ वेंघ. ॥ क्षणही० ॥ ३ ॥

### पद २७ वें.

स्मर प्राणिया! रघुराया । किती भ्रमसी संसारीं वायां. ॥ ध्रुवपद. ॥
मायामृगजळ गोत्रज सारे । कोणाचें धन सुत जाया? ॥ स्मर० ॥ १ ॥
माय बाप बंधु भगिनी सर्वही । कोणाची न स्थिरकाया. ॥ स्मर० ॥ २ ॥
आनंदात्मज हरीच्या चरणीं । रंगोनि गेला आप ठाया. ॥ स्मर० ॥ ३ ॥

### पद २८ वें.

याहोनि लाभ काय विचारोनि पाहीं. ॥ ध्रुवपद. ॥
देह गेह मोह मनामाजि नसो कांहीं । संतसमागमें सुखा अपांगोनि राहीं ॥ या० ॥ १ ॥
वात ताप वर्ष शीत यथाकाळीं साहीं । परावरीं भेट होइल सुखा उणें नाहीं ॥ या० २
सखया आनंदतनय म्हणे बरें पाहीं । धर्म अर्थ काम मोक्ष येती लवलाहीं ॥ या० ॥ ३

### पद २९ वें.

लागा रामपदीं लाज हरुनि काज करुनि. ॥ ध्रुवपद. ॥
त्यजुनि सकळ कारभार । फिरसी किति दारोदार. ॥ लागा० ॥ १ ॥
हरिकथनीं डोल बोल । विना सकळ बोल फोल. ॥ लागा० ॥ २ ॥
आनंदतनयगिरा । परिसुनि हरिकथनिं फिरा. ॥ लागा० ॥ ३ ॥

### पद ३० वें.

हें डंब कशाला ? । ध्यायीं जगदीशाला. ॥ ध्रुवपद. ॥
देखुनि सुंदर मन्मथशाला । गुंतशि व्यर्थ अशाला. ॥ हें डंब० ॥ १ ॥
द्रव्यमदें ताव देशी मिशांला । मोहिशी कामपिशाला. ॥ हें डंब० ॥ २ ॥
वेश्येच्या नृत्यासि लावि मशाला । दाटुनि घेतो विषाला. ॥ हें डंब० ॥ ३ ॥
दया नाहीं यमकाळपुरुषाला । सांगावें काय अशाला ? ॥ हें डंब ॥ ४ ॥
आनंदतनय आनंदें बोले । त्यागुनि शालदुशाला. ॥ हें डंब० ॥ ५ ॥

### पद ३१ वें.

रत, हरिपदकमलकंद सेविं मनोभ्रमरा ! ॥ ध्रुवपद. ॥
दुष्ट दैत्य दमुनि देत निजभक्तां थारा, ।
द्रुततर मनिं धरुनि भाव सांडिं भवपसारा. ॥ रत० ॥ १ ॥
शुकसनकादीक मुनि जपति ज्या आधारा, ।
सुरवर मुनि गाति मुखें नित्य निराकारा. ॥ रत० ॥ २ ॥
पावन पदरजें करुनि गौतममुनिदारा, ।
निशिदिनिं आनंदतनय गाय वेदसारा. ॥ रत० ॥ ३ ॥

### पद ३२ वें.

पाउलापाउलीं निजमनीं आळवा सांवळा हो ! ।
बाळा त्या गोपाळा हृदयीं कवळा वेळोवेळां हो ! ॥ ध्रुवपद. ॥

दाराधनमति सारा मग तुम्हि वारा या संसारा हो ! ।
**ना**रायणसुखसारावांचुनि वारा न करी थारा हो ! ॥ पाउला० ॥१॥
भंगा कलिमलसंगा हृदयीं आलिंगा **श्री**रंगा हो ! ।
रंगा मनिं भवसंगा टाकुनि अंगा काळविहंगा हो ! ॥ पाउला० ॥ २ ॥
तुंदा या मतिमंदा त्यजुनी निंदा कुश्चळधंदा हो ! ॥
वंदा या **आ**नंदात्मजसुखकंदा **नं**दानंदा हो ! ॥ पाउला० ॥ ३ ॥

### पद ३३ वें.

आहा हें काय बरें मानवा ! । संतचरणीं अभिमान वां. ॥ ध्रुवपद. ॥
भुललासी निरखुनियां कामिनी । मोहगगनाची यामिनी ॥
तेचि ते म्हणूनि सौदामिनी । कैसी सुंदर गजगामिनी ? ॥ आहा० ॥ १ ॥
उकडे हा पिंड जठरजांतरीं । नरकमूत्राचे अंतरीं, ॥
ऐशियाचा मोह तूज ये जरी । तरी तूं पडसी भवपंजरीं. ॥ आहा० ॥ २ ॥
रेतरक्तबिंदु जठरिं गोठती । त्यासिं हस्तचरण फूटती, ॥
कितीएक दिवस तेथें लोटती । जननिं यातना बहु वाटती. ॥ आहा० ॥३॥
अस्थिचर्मरक्तमांसपिंड रे ! । महादुरितांचें कुंड रे ! ॥
काळ भक्ष तनू मांसखंड रे ! । अवघें दो दिवसांचें बंड रे ! ॥ आहा० ॥४॥
**आ**नंदतनय विभू माउली । आम्हां सकळांची साउली; ॥
तीतें भजतांना लाज वाटली । तुझी मति काय खुंटली ? ॥ आहा० ॥५॥

### पद ३४ वें.

भज मन **र**घुविर प्रीति । तूं मनुजा सांगूं मी तुजला किती रे ! ॥ ध्रुवपद. ॥
दुर्बुद्धिजननी असुरि संपदा नये नये ये रीती ।
संग सोडुनी निसंग होई धरि वेगें सत्संगती रे ! ॥ भज० ॥ १ ॥
**अ**योध्याधीश हा विधी हरुष जो **स**नकादिक वंदिती ।
दृढतर अंतरिं स्मरतां त्याशीं पावशी उत्तमगती रे ! ॥ भज० ॥ २ ॥
नरतनु दुर्लभ समजुनि ऐशी नये नये मागुती ।
नकळे तुजला म्हणउनि शिकवी **आ**नंदतनय या रीती रे ! ॥ भज० ॥३

### पद ३५ वें.

मर मर रे ! प्राण्या व्यर्थ नरदेह गेलें. ॥ ध्रुवपद. ॥
लक्ष योनि चौऱ्यांशी । फिरोनि नरदेहा येसी ॥

---

१. वद्दा.

ऐसा कैंचा पुण्यरासी । वायां अनहित केलें. ॥ मर मर० ॥ १ ॥
अनंतपुण्याचा हा नरदेह । प्राप्त झालासे निःसंदेह, ॥
म्हणसी तूं माझें धन गेह । हेंचि विघ्न वोढवलें. ॥ मर मर० ॥ २ ॥
दशवर्षीमाजी बाळ । तारुण्यांत अनवाळ ॥
वृद्धपणीं टपे काळ । हातोहात वय गेलें. ॥ मर मर० ॥ ३ ॥
बैसोनियां राज्यासनीं । भिक्षा मागे इच्छे मनीं, ॥
तैसा नरदेहा येउनी । जन्ममरण मागितलें. ॥ मर मर० ॥ ४ ॥
गंगातीरीं तृषाक्रांत । तैसा तूं कां होसी भ्रांत ? ॥
आनंदतनय म्हणे गेला प्रांत । नाम नाहीं आळविलें. ॥ मर मर० ॥ ५ ॥

## पद ३६ वें.

रामनामाची गती कोण जाणे? । जाणताती कैलासपती राणे. ॥ ध्रुवपद. ॥
किटकपक्षादी मोक्षपदा जाती । तेथ इतरांची कोण कथा गा ! ती? ॥ राम० ॥ १ ॥
व्याधें वधितां मुखासि म्हणे 'रामा !' । ते निमिषमात्रें चढे मोक्षधामा. ॥ राम० ॥ २
घेतां रामाचें नाम ग्रामद्वारीं । धन्य झाली ते महीमान्य नारी. ॥ राम० ॥ ३ ॥
अजामेळादी पूर्ण पापराशी । नामसंकेतें पुण्यलोकवासी. ॥ राम० ॥ ४ ॥
मंत्र माझ्या शिकविला मायबापें । म्हणे आनंदतनय माझि गेलिं पापें. ॥ राम० ॥ ५

## पद ३७ वें.

देव करील दया । तयावरी ॥ ध्रुवपद. ॥
स्वपर म्हणोनि मती न धरि चराचर, । निर्मळ भाव जया. ॥ तयावरी० ॥ १
रक्षक जो सकळां कमळापति । जाणोनि न धरीं भया. ॥ तयावरी० ॥ २ ॥
आनंदतनय म्हणे, हरिचे कीर्तनीं । काशिप्रयागगया. ॥ तयावरी० ॥ ३ ॥

## पद ३८ वें.

जन्मुनि उगले कां मरती ? । निजसुख मानुनी कामरती. ॥ ध्रुवपद. ॥
कांतालंपट दिनरजनी, । षट्पद जैसा दिनरजनी. ॥ जन्मुनि० ॥ १ ॥
जाणति गृहधनपरिवारा, । नेणति गुरुचा परि वारा. ॥ जन्मुनि० ॥ २ ॥
स्नाना जाती जन काशी, । विसरुनि जननीजनकासी. ॥ जन्मुनि० ॥ ३ ॥
आनंदतनय म्हणे नरकाया । नेशिल कां तूं नरका या ? ॥ जन्मुनि० ॥ ४ ॥

## पद ३९ वें.

जो नर नटका, । हरि वदनीं नयेचि घटका. ॥ ध्रुवपद. ॥
निमा जामा फिरकी पगडी माजी शोभे पटका, ।
मखमालि पैंजार पायिं चालतां मोठा वाजे चटका. ॥ जो नर० ॥ १ ॥

उष्ण वरान्नें सघृतशर्करा भोजनिं गोधुमकुटका, ।
अतिथि आलिया विन्मुख होउनि आपणचि करितो गटका. ॥ जो नर० ॥ २ ॥
मृदुशय्येवरी तरुणीपत्नीसंनिध बाब्या चिटका, ।
लौकीकास्तव कथेसि जाउनि प्रेमें डोले लटका. ॥ जो नर० ॥ ३ ॥
जिव्हाशिश्नपरायण त्यावरि कळिकाळाचा फटका, ।
हंसत हंसत **आ**नंदतनय म्हणे कैशी होईल सुटका, ॥ जो नर० ॥ ४ ॥

### पद ४० वें.

वरि दिसतो बरवंटा, । हृदयीं पाहतां वरवंटा, ॥
विद्याभ्यास करीना ठंठा । जगीं तोचि करंटा. ॥ १ ॥
पढोनि श्रुतिशास्त्रनिघंटा, । निंदेस्तव वाजवि घंटा, ॥
जन्मुनि व्यर्थ करीना गट्टा, । जगीं तोचि करंटा. ॥ २ ॥
विद्या पढे पाठ अचाटा, । म्हणोनि जिवीं धरितो ताठा, ॥
विनवी **आ**नंदतनय त्या भाटा, । जगीं तोचि करंटा. ॥ ३ ॥

### पद ४१ वें.

याहुनि गारुड काय? । दिसे तें ॥ ध्रुवपद. ॥
शोणित रेत मिळतां पोटीं । निघती करशिरपाय. ॥ दिसे तें० ॥ १ ॥
बाळ आधीं, तारुण्य मधीं, मग । वार्धक येउनि जाय. ॥ दिसे तें० ॥ २ ॥
**आ**नंदात्मज वळखुनि हे खुण । मूळ जगाचें गाय. ॥ दिसे तें० ॥ ३ ॥

### पद ४२ वें.

तैसा लोक पिडे । विषयीं. ॥ ॥ ध्रुवपद. ॥
अंबुमधीं प्रतिबिंब विलोकुनि । सिंह सकोप भिडे. ॥ विषयीं० ॥ १ ॥
बांधोनियां घर जाचति आपण, । जैसे कोशकिडे. ॥ विषयीं० ॥ २ ॥
**आ**नंदात्मज बोले भावें । हा भवसंग चिडे. ॥ विषयीं० ॥ ३ ॥

### पद ४३ वें.

गुज त्यासि पुसा रे! । हो हो गुज त्यासि पुसा रे! ॥ ध्रुवपद. ॥
वरले जन लंघुनि थोरें, । भरले ब्रह्मीं परभारें, ॥
सरले जननादि जया येरजारे ॥ हो हो गुज त्यासि पुसा रे! ॥ १ ॥
खचले कामादि पसारे, । पचलें मनकल्पित वारें ॥
रचिले जिहिं सद्गुरु तुला रे! ॥ हो हो गुज त्यासि पुसा रे! ॥ २ ॥

उभती निजबोध फरारे । निघती स्वरुपींच जरा रे! ॥
विनवी **आ**नंदतनय कवि बा रे! ॥ हो हो गुज त्यासि पुसा रे! ॥ ३ ॥

**पद ४४ वें.**

या घोर संसारीं सुख कैंचें बापा? ॥ ध्रुवपद. ॥
गर्भमळांतरीं अर्भक होउनी । दुर्धर पावसी तापा. ॥ या घोर० ॥ १ ॥
बाळपणीं मूढ, चाळक यौवनीं, । भाळती त्या **सु**मचापा. ॥ या घोर० ॥ २ ॥
वार्धकीं राग विवर्धित दुस्तर । वृद्ध हाणी **यम** थापा. ॥ या घोर० ॥ ३ ॥
**आ**नंदनंदन साधन जाणुनी । मागती भक्तिप्रतापा. ॥ या घोर० ॥ ४ ॥

**पद ४५ वें.**

ऐका हो अद्भुत देणें त्या एका **भ**गवंताचें. ॥ ध्रुवपद. ॥
नेणें पूजा नेणें सेवा, । शरणागत मी[1] आलों देवा! ।
म्हणतां देउनियां निजखेंवा । दिधलें स्थान सोन्याचें. ॥ ऐका० ॥ १ ॥
केवळ मुग्धाचिये धाटीं । आळीं घेतां दुग्धासाठीं ।
दिधली क्षीराब्धीची वाटी । बाळक[2] धालें विप्राचें. ॥ ऐका० ॥ २ ॥
उचीं बैसायाच्या काजा । निघतां विपिना गाजावाजा ।
केला अढळपदींचा राजा[3] । निरखी अजुनी जन साचें. ॥ ऐका०॥३॥
भेटी नेले पोहे मुष्टी । तेणें देवा झाली तुष्टी ।
आली सौभाग्यासी पुष्टी । झालें कल्याण दुबळ्याचें. ॥ ऐका० ॥ ४ ॥
बोले **आ**नंदाचा बाळ । होती मुक्याचे वाचाळ ।
पांगुळे लंघिति पर्वतमाळ । होईल पीयूष विखाचें. ॥ ऐका० ॥ ५ ॥

**पद ४६ वें.**

त्यांचा संग नको मजलागीं; । त्यांच्या तोंडा लागो आगी, ॥ ध्रुवपद.॥
वरिवरि वचनें लागति गोड, । अंतरीं दुर्बुद्धीचा मोड. ॥ त्यांचा० ॥ १ ॥
भजतां श्री**रा**माचे पाय । मध्यें करिती अंतराय. ॥ त्यांचा० ॥ २ ॥
घेउनि सौजन्याचें सोंग । साधिति जारणमारणयोग. ॥ त्यांचा० ॥ ३ ॥
भजनीं दावुनियां विश्वास । व्यसनीं घालिति जे विश्वास. ॥ त्यांचा० ॥४॥
अखंड जननिंदेतें ध्याय । **आ**नंदतनय वदे कविराय. ॥ त्यांचा० ॥ ५ ॥

---

१. बिभीषणाची उक्ति. २. उपमन्यु. ३. ध्रुव.

### पद ४७ वें.

कैसें ही कीर्तन करितां । कल्याण बरवें आहे. ॥ ध्रुवपद. ॥
वाल्मिकि उफराट्या नामानें । पावन झाला वक्तामानें; ।
पतित पुत्राच्या अभिधानें । तरला संसार लवलाहें. ॥ कैसें० ॥ १ ॥
शुका पढवीतां पापिणी । केला परमात्मा तो ऋणी; ।
चढली वैकुंठा कुंटिणी । केवढें कौतुक हें पाहें. ॥ कैसें० ॥ २ ॥
शुद्धा बुद्धी नसतां ज्ञान, । विताळ ईश्वर करितां गान, ।
तारक नामाचें महिमान । आनंदात्मज गुण लाहे. ॥ कैसें० ॥ ३ ॥

### पद ४८ वें.

आत्मारामीं मन भरलें, । स्वात्मसुखें मग आभरलें. ॥ १ ॥
विलास····भरणाचा । सरला चाळा करणाचा. ॥ २ ॥
हरला भ्रम जन मरणाचा, । प्रसाद श्रीगुरुचरणाचा. ॥ ३ ॥
सरता मीपण वळसा रे ! । गमला भव मृगजळसा रे ! ॥ ४ ॥
माना माना दर सरला, । मायापुरही वोसरला. ॥ ५ ॥
आत्मकसीं जिव उतरला, । आनंदनंदन कवि तरला. ॥ ६ ॥

### पद ४९ वें.

होणाऱ्या प्रारब्धासि काय यत्न चाले ? ॥ ध्रुवपद. ॥
जेथें जेथें जे जे काळीं । जें कां लिहिलें असेल भाळीं, ।
तें तें न टळे हो वेल्हाळी! । कोण टाळी भविष्या. ॥ होणाऱ्या० ॥
यत्नेंचि सर्व साधिती संतसाधू. ॥ ध्रुवपद. ॥
यत्नें जाती कर्मे सिद्धी, । यत्नें विस्तारिती बुद्धी, ।
यत्नें होय कार्यसिद्धी, । रिद्धिसिद्धी योग हा. ॥ यत्नेंचि० ॥ १ ॥
पीयूषाचे खाणारेही । देववैद्य ज्याचे गेहीं ।
अमृताचा राजा पाहीं । चंद्र तोही क्षयरोगी. ॥ होणाऱ्या० ॥ २ ॥
मिती सोळाचि वर्षांची । मार्कंडेया होती साची; ।
परि तो यत्नें कळा ज्याची । स्थिर झाली चिरकाया. ॥ यत्नेंचि०॥३॥
पूर्वी जें जें कीजे कर्म । तें तें भोगावें हा धर्म; ।
म्हणती देवाचें हें वर्म । कैचें शर्म कर्तव्या ? ॥ होणाऱ्या० ॥ ४ ॥
जाणा द्वारावतिचा राजा । मनोभाव पुरविल माझा, ।
बोले सुदाम याची भाजा । स्तविलें आनंदसुतें. ॥ यत्नेंचि० ॥ ५ ॥

## पद ५० वें.

साधु घराप्रति आले रे! । भलें सार्थक झालें. ॥ ध्रुवपद. ॥
दसरा आजी हेचि दिवाळी; । स्वात्मसुखें मन धालें रे! ॥ भलें०॥१॥
सर्व जयंत्या आजचि आल्या; । अंतर संतिं निमालें रे! ॥ भलें०॥ २ ॥
आनंदात्मज बोले ज्याचे । संगें देव पाहिले रे! ॥ भलें० ॥ ३ ॥

## पद ५१ वें.

त्रिभुवन व्यापुनि झाला थोर. ॥ ध्रुवपद. ॥
जगभुजगाचा भास उडाला, । कळला चिन्मय दोर. ॥ त्रिभुवन० ॥१॥
ब्रह्मसनातन स्थान निरखुनि । मानूं कैंचा चोर. ॥ त्रिभुवन० ॥ २ ॥
आनंदात्मज आनंदाई । येतां चुकला घोर. ॥ त्रिभुवन० ॥ ३ ॥

## पद ५२ वें.

अशाला आशा नाचविते. ॥ ध्रुवपद. ॥
याविषयीं धरी धाविनली मती । लावि मना चवि ते. ॥ अशाला०॥१॥
निष्कपणास्तव शुष्कपणें गिरा । शुष्कवना चविते. ॥ अशाला० ॥२॥
आनंदात्मज बोले भावें । बुद्धी नाचविते. ॥ अशाला० ॥ ३ ॥

## पद ५३ वें.

येरवीं ब्रह्मसनातन साच. ॥ ध्रुवपद. ॥
जोंवरि भ्रम हा नांदे हृदयीं । भासे लोकां साच. ॥ येरवीं० ॥ १ ॥
सर्पाभास गुणावरि तैसा । खेळत भूतें पांच. ॥ येरवीं० ॥ २ ॥
आनंदात्मज विवरुनि बोले । सर्व मनाचा नाच. ॥ येरवीं० ॥ ३ ॥

## पद ५४ वें.

संतकृपा फळली । आजि हे. ॥ ध्रुवपद. ॥
वित्तवधूहुनि चित्त निघालें । बुद्धि निजीं वळली. ॥ आजि हे० ॥१॥
योगसुखें भवरोग रुचेना । ज्ञानकळा कळली. ॥ आजि हे० ॥ २ ॥
आनंदात्मज बोले मात । ब्रह्मपणें ठसली. ॥ आजि हे० ॥ ३ ॥

## पद ५५ वें.

जगवीर विरागी । हो हो जगवीर विरागी. ॥ ध्रुवपद. ॥
क्रमिती गति उंच निलागी, । दमिती विषयेंद्रियतांगी, ।
शमिती मन उन्मनिलागी. । हो हो जगवीर विरागी. ॥ १ ॥

करिती मति संतति जागी, । धरिती निजनिर्गुणमार्गी, ।
वरिती विजयश्री विहितसुयोगी. । हो हो जगवीर विरागी. ॥ २ ॥
रमतां महिनिधिचे भोगीं । ममताज्वरही तनरोगी, ॥
नमितो आनंदतनय योगी. । हो हो जगवीर विरागी. ॥ ३ ॥

## पद ५६ वें.

भासे आजि दिठी जनि वनिं घनचिदानंद. ॥ ध्रुवपद. ॥
धरुनी निजरूपधणी । करिता गुरुराजधणी. ॥ भासे० ॥ १ ॥
नेतो भवभान लया । येतां भवसुखालया. ॥ भासे० ॥ २ ॥
कथिजे आनंदसुतें । त्रिजगत्पटब्रह्मसुतें. ॥ भासे० ॥ ३ ॥

## पद ५७ वें.

त्याला इहलोकीं परलोकीं । गति नाहीं अवलोकीं. ॥ ध्रुवपद. ॥
ज्याचा जिव भवचाकीं । भंवत न राहे पथि हा स्वांकी. ॥ त्याला० ॥१॥
न भजे देवी एकीं । ज्याच्या वदनीं नाम न ये कीं. ॥ त्याला० ॥ २ ॥
रमला धनवधु जो कीं । आनंदतनय म्हणे जडचाकी. ॥ त्याला० ॥ ३ ॥

## पद ५८ वें.

रंगनाथचरणयुगुलिं रंग मानवा ! ॥ ध्रुवपद. ॥
रंग सतत सदन सुत कुरंगदृशा कनकरत तरंग जलतरंग घनमतंगसम पहा.॥
पतंगसुत भुजंग तुज अनंग करिल हा. ॥
दंग होउनि संग न धरिं भविं वृथा अहा ! ॥ रंगनाथ० ॥ १ ॥
मानसाढ्य जाड्य षडरि मान हरुनि सकळ जनिं समान भाव धरि चल पवमान सदभिमान त्यजुनि वर्ततां जनीं, ॥
मानवांत श्रेष्ठ तुतें मानिती मुनी. ॥
मान तोलती विमान वहन पाहुनी. ॥ रंगनाथ० ॥ २ ॥
साररहित कठिण संसारजळीं बुडसि कां? अपार जनीं दुःख फार मानितोसि वेदसार सारसाक्ष विसरुनी. ॥
सा रसांनिमित्त वससि वदन पसरुनी. ॥
आनंदाख्यतनय म्हणे भ्रम निवारुनी. ॥ रंगनाथ० ॥ ३ ॥

## प्रासंगिक पदें.

### पद ५९ वें.

[1]खंजनाक्षी त्या मंजुतरा वाणी । एकिमेकी बोलती पद्मपाणी. ।। १ ।।
'[2]बाइ ! कैसें आश्चर्य आजि झालें? । जनकरायाच्या घरा भाग्य आलें.।।२।।
थोर दैवाची जाण सिताबाई, । घरा आला नोवरा शेषशायी. ।। ३ ।।
कोटि कामाची कांति जया लाजे, । धन्य जोडा हा जानकीसि साजे.।।४।।
पूर्वपुण्याची आजि गमे सीमा, । चिदानंदाचि राममूर्ति किं मा.' ।। ५ ।।
भूमिकन्येसी पूर्णकाम कामी । खेळ खेळे आनंदसुतस्वामी. ।। ६ ।।

### पद ६० वें.

साजणी गे! माझे मनिंचें हितगुज हें ऐकें बाई ! ।। ध्रुवपद. ।।
लाज काय धरुनी आतां, भय लौकिक करणें काई; ।
वेधलेंच मानस माझें, न चळे हें दुसरे ठायीं; ।
चाल ।। होइन रामाची दासी । भावें वंदिन पादासी ।।
चाल पहिली ।। स्वशिरा मी ठेविन पायीं. ।। साजणी० ।। १ ।।
कां महेशचाप चढाया पण केला माझ्या तातें? ।।
रामचंद्र ओढिल कैसा नवपल्लवकोमलहातें? ।।
चाल ।। नवसा तुम्हि सांबशिवातें, । नवसारसलोचन यातें, ।।
चाल पहिली ।। नुचलो परि वरिलें आपुले ठायीं. ।। साजणी० ।। २ ।।
या मनासि आला माझ्या शरकार्मुकपाणी राजा; ।।
कामनाचि दुसरी नाहीं, कृतनिश्चय झालें भाजा; ।।
चाल ।। सकळा तुम्ही गाजावाजा । न करा माते सवदा जा. ।।
चाल पहिली ।। नमितें मी तुमच्या पायीं. ।। साजणी० ।। ३ ।।
पाहतांचि राघव डोळां मन तन्मय झालें माझें; ।।
लाहतांचि प्रेमविसांवा मज झाली न जगीं लाजे; ।।
चाल ।। रमतें मन देव न रामीं. । मननीं मन देव नरा मी. ।।
चाल पहिली ।। म्हणतो आनंदसुताचा स्वामी. ।। साजणी० ।। ४ ।।

---

१. सीतास्वयंवराच्या प्रसंगीं रामचंद्र सभेंत बसले असतां त्यांस पाहून सीतेच्या सख्या आपापल्यांत म्हणतात. २. सीता आपल्या सख्यांस म्हणते.

### पद ६१ वें.

देवें[1] जाणे हा भाव सख्ये ! माझा, । जीविं जडला सप्रेम **रा**मराजा. ॥ १ ॥
आंगिं भरलें माझिया **रा**मवारें, । **रा**मरूपीं रंगलें चित्त सारें. ॥ २ ॥
आजि पुरली ताहान डोळियांची । मूर्ति पाहतां श्री**रा**मराजयाची. ॥ ३ ॥
काय सांगूं ? हा लाभ थोर झाला । गीत गातां **आ**नंदतनय धाला. ॥४॥

### पद ६२ वें.

ऐकें[2] राया ! । दे रघूत्तम**रा**मजाया. ॥ ध्रुवपद. ॥

नैकिलेंचि तुं ऐक पुनरपि **कै**कईकुमरैकजीवन गै करील तुझ्या वधीं स्वसुखैकघनजगदेक **रा**घव. ॥ ऐक राया ॥

नीरनिधितटधीर कपिवरवीर तडकसमीर तळपत दूरदृष्टि न सूर धरि निदसूर पण हरिसूर कुलनृपहीर चुकवि गभीर नातरिं हीर मोडिल तीर हाणुनि झूरसी तरि भूरमावर भूरि चूर करील झडकरि. ॥ ऐक राया०॥१॥

कूड कपट न हूड सहकुळ बूडशी, **प्र**भु सूड घेइल पूढतीं अति ऊड करिन न झूड भज **श**शिचूड नतपदकीड बहुपरिपीडनें तनुनीड नसतहि दीड दिवस निबीड कपिगण भीडती गिरिवाड वायु झडाड वरुषति. ॥ ऐक राया० ॥ २ ॥

पापभय धरिं ताप परि परि थापटुनि मति यापरी तुज चापधर शर थाप हाणुनि धाप न निघत माप हारिल आप समजकलाप न करिं जनापवाद हि शाप उमजुनि हाप योजिशि बाप हृदनत तापवी **आ**नंदसुत विभु. ॥ ऐक राया० ॥ ३ ॥

### पद ६३ वें.

[3]सोडिं आतां व्याकुळ झाला प्राण. ॥ ध्रुवपद. ॥
फिरवुनि नेत्रां पसरुनियां मुख । कसा सांगेल कोण ? ॥ सोडिं० ॥ १ ॥
मारूं आली **नं**दमुलाशीं । मजवरि आलें विंदाण. ॥ सोडिं० ॥ २ ॥
**आ**नंदात्मजबोलें केलें । जैसें नेफळ जाण. ॥ सोडिं० ॥ ३ ॥

---

१. हें सीतेचें भाषण आहे. २. बिभीषणाचा रावणास सीता रामचंद्रास परत देण्याविषयींचा उपदेश. ३. पूतना सुंदर स्त्रीचें रूप धराण करून कृष्णास विषदुग्धपान करविण्यासाठीं गोकुळांत आली असतां कृष्णानें तिचें रक्त शोषण केलें त्यावेळचा तिचा आक्रोश.

## पद ६४ वें.

[1]माझा कृष्ण देखिला काय ? । कोणि तरि सांगा हो ! ॥ ध्रुवपद. ॥
हातीं घेऊनियां फूल । आंगणिं खेळत होतें मूल; ।
घरांत सारवित होत्यें चूल, । तंव मज भूल पडियेली. ॥ माझा० ॥ १ ॥
भाळीं शोभे पिंपळपान । आंगीं मेघाऐसा जाण, ।
ज्यातें म्हणती श्रीभगवान । योगी यागी वितरागी. ॥ माझा० ॥ २ ॥
संगें घेउनियां गोपाळ । फिरत असे आळोआळ, ।
चरणीं भूषणें खळाळ । गळां माळ झळाळी. ॥ माझा० ॥ ३ ॥
ऐशी काकूलती माय । घरोघरीं पुसों जाय, ।
आनंदतनय कविराय । त्याचे पाय वंदीतो. ॥ माझा० ॥ ४ ॥

## पद ६५ वें.

[2]वंदूं गोविंदा हरि, वंदूं मुकुंदा हरि, वंदूं स्वानंदा हरि, नारायणा! ॥ध्रुवपद.॥
इंदुवदन नवसिंदुरपदयुग अंदू हंसकमणीभूषाकरा ! ॥ वंदूं० ॥ १ ॥
यावें हृदयिं समजावें अधररस भावें भोगुनि सुख द्यावें हरि ! ॥ वंदूं० ॥ २ ॥
राजीवपदयुग राजी सकळ आम्हीं राजी होउनि नव राजी म्हणों. ॥ वंदूं० ॥ ३ ॥
अंभोजधरनुत दंभोलिकर मृदुरंभोरुयुग करुणांभोनिधे ! ॥ वंदूं० ॥ ४ ॥
पाकारिनतगुण राकारमणमुख लोकोद्धरण अवलोकू मला. ॥ वंदूं० ॥ ५ ॥
ऐशा गोकुळबाळा कैशा वदति तेथें जैशा कोकिळवाणी तैशापरी. ॥ वंदूं० ॥६॥
आनंदसुत विभु आनंद पाहुनि आनंदता स्वयें आनंदला. ॥ वंदूं० ॥ ७ ॥

## पद ६६ वें.

[3]वेणु वाजे । युवतिकरेणु माजे. ॥ ध्रुवपद. ॥

वेणु परिसुनि वेणुगणगत रेणुकादिकरेणु हरिपदिं जाणुनी वनदेवताघननमित विनमितमेणशावनि. ॥ वेणु वाजे० ॥

भृंगकुल सुमसंग न करि विहंगम करि कुरंग चकित तरंगरहिततरंगिणीजल तंगलेचि पतंग रथग तुरंग धरणि सुरंग त्यजिति भुजंग रव मृदु रंग परिसुनि रंगशयन अनंगशतलसदंग विनट तदंग सुरनर. ॥ वेणु वाजे० ॥ १ ॥

नीलजलधर नीलसुरपति नीलभूषण नीलतटिनीकूलजन अनुकूल कनक-दुकूल सप्रतिकूल मदहर मूलपुरुष समूल भवहर मूल तो चिर मूल सद्वधु भूलवि

---

१. यशोदा कृष्णास शोधिते. २. गोपी कृष्णास उद्देशून म्हणतात. ३. कुंजवनांत कृष्णानें वेणु वाजविला त्या समयाचें वर्णन.

व्रजभूललीमविभुल्लता द्रुमभूलपोत्कर. ॥ वेणु वाजे० ॥ २ ॥
मंदमधुरिमरंदमय सुखकंद मुरलि अमंद वाजवि मंदगमनानंद करि हरि मंदरो-द्धर मंदविहसित चंदनागरु संदधान सनंदनादिक वंदितांघ्रि छंद करि हरिनंद हृदयानंद कवि आनंदसुत विभु. ॥ वेणु वाजे० ॥ ३ ॥

**पद ६७ वें.**

[1]वृंदावनिं वाजवि मुरली हरि मंजुल कुंजविहारी. ॥ ध्रुवपद. ॥
ऐकतांचि मुरलीरव[2] तो महिसहित अहिपति[3] डोले, ।
कोकिलादि शुक बक मैना काननीं शब्द न बोले, ।
खुंटलाचि रविरथ गगनीं, वायू तो मार्ग न चाले. ॥
चाल ॥ वृक्षाचें पत्र न हाले । अप्सरादिनृत्य निमालें ॥
गंधर्व थक्कित झाले. ॥ वृंदावनिं० ॥ १ ॥
लुब्धुनियां मग मृग गाई व्याघ्रांवरि टाकिति माना, ।
गर्जना मेघ न करिती नाचती मयूरी जाणा, ।
होत्या ज्या वंध्या ललना प्रसवति त्या पुत्रनिधाना. ॥
चाल ॥ थक्कितमधिं नाना । सुर न करिती अमृतपाना ॥
विसरले मुनि जपध्याना. ॥ वृंदावनिं० ॥ २ ॥
गुंजारव विसरुनि भ्रमर मुरलींत झाले मग्न, ।
सोडुनियां पतिसुत गोपी लाविती हरिशीं लग्न. ।
........................................ ॥
चाल ॥ नेत्रांत ज्याचे अग्न । जो जनासि करिं निर्विघ्न ॥
झालें हरिशीं लग्न. ॥ वृंदावनिं० ॥ ३ ॥
विंचरितां एकी वेणी मस्तकीं राहिली फणी, ।
नाहतांचि एकी उठली केंशांतुनि वाहे पाणी, ।
वाटे कैलासाहुनि पातला पिनाकपाणी[4], ॥
चाल ॥ गंगा आणि यमुना दोन्ही । ........................ ॥
लागल्या मुरलीध्याना. ॥ वृंदावनिं० ॥ ४ ॥
ऐशिया आपल्या सकळी जवळी जाणुनि हृषिकेशी[5], ।

---

१. कृष्णानें मुरली वाजविली त्या प्रसंगाचें वर्णन. २. ध्वनि. ३. शेष. ४. शिव. ५. हृषीकें म्ह० इंद्रियें त्यांचा स्वामी. (कृष्ण.)

आंवरली मुरली तेव्हां देहभान आलें त्यांशीं, ।
विस्मित होउनि वदतां **आ**नंदसुत प्रमूशीं. ॥
चाल ॥ ऐसा तूं कैसा होशी? । हें तुझें कोण बा सोशी? ॥
........................... ॥ वृंदावनिं० ॥ ९ ॥

## पद ६८ वें.

[1]**मं**दनतात मनमोहन मुरली वाजवी कुंजवनीं, ।
सारिगमपधनिसी गायन करितो सप्तसुरावरुनी. ॥ ध्रुवपद. ॥
नानाछंदें बहुआनंदें नाचती सौंगाडे, ।
टाळविणा मृदंग पंडित वाजविति **ह**रिपुढें. ॥
अशापरी हा क्रीडा करितो गातो निशिदिनीं. ॥ सारिगम० ॥ १ ॥
देव विमानीं बैसुनि गगनीं म्हणती जय **कृ**ष्ण, ।
लीलावतारी सुरवरमुनीचें मन हें रंजन. ॥
कुंकुमतिलक बहु अतिचतुरी मस्तकीं रेखोनी. ॥ सारिगम० ॥ २ ॥
सोळासहस्र नारी भोगुनि म्हणती ब्रह्मचारी, ॥
दैत्य संहारुनि **पू**तना शोषिली, **शू**र्पनखा मारी. ॥
दिनानाथा हें ब्रिद तुज ऐसे लक्ष्मी भोगुनी. ॥ सारिगम० ॥ ३ ॥
गाई चारी **य**मुनेतीरीं संगें गोपाला, ॥
ब्रिजासहित मुख चुंबिती नाना परी त्या ब्रिजबाला; ॥
तें सुख देखुनी **आ**नंदतनय वाजवी मधुरध्वनी. ॥ सारिगम० ॥ ४ ॥

## पद ६९ वें.

[2]भुलल्या त्या **नं**दगोपतिबाळा, । बाळा वेल्हाळा, ॥
चपळा **ह**रि लालन सकळा विमळा, । त्या विकसितकमळा.॥ध्रुवपद.॥
हृदयीं धरिती त्या **आ**त्मारामा । रामा सकामा, ॥
**का**माचा तात तो बरवा, **मा** । वामांगीं श्यामा, ॥
श्यामा त्या दानवदमनोद्दामा । दामा श्री**रा**मा, ॥
**रा**मानुज भजति त्यजिति कामा । कामा अतिकामा. ॥ भुलल्या० ॥ १ ॥
येती श्री**कृ**ष्णपदाब्ज नमाया । माया त्यजाया, ॥
जाया गोपतिच्या कोमळकाया । काया अर्पाया, ॥

---

१. तोच प्रसंग पुनः वर्णितात. २. मुरलीचा ध्वनि ऐकतांच गोपींची काय दशा झाली तिचें वर्णन

पायांचें रज तें आलिंगाया । गाया विविधा या, ॥
धाया निजमनीं भेटति बाह्या । या **याद**वराया. ॥ भुलल्या० ॥ २ ॥
ऐशा लुब्धल्या गोकुळकांता । कांतारीं कांता, ॥
कांताभा टाकुनियां शशिकांता । परि द्रवति नितांता, ॥
.............................. । ................ ॥
दाता **आन**ंदसुत प्रभु शांता । रमताति अनंता. ॥ भुलल्या० ॥ ३ ॥

**पद ७० वें.**

[1]तें चिरे[2] माझें टाकुनि दे रे! ॥ ध्रुवपद. ॥
उशिर कीं झाला मला । जाऊं दे घराला ।
देत्यें मीं सर्व नग घे रे! ॥ तें चिर० ॥ १ ॥
सासु बुरी मोरी । नणद हटेरी ।
घरीं मज आहे बहु भें रे! ॥ तें चिर० ॥ २ ॥
**आन**ंदसुत म्हणे । शिकविलें आम्हा ।
जाइन मीं त्वरें **म**थुरे रे! ॥ तें चिर० ॥ ३ ॥

**पद ७१ वें.**

(सौरी.)

तारीं **र**घुराया! । लागेन तुझ्या पायां. ॥ ध्रुवपद. ॥
जातिभ्रष्ट झाली सौरी हिंडे दारोदारीं, ।
सोंवळें उचलोनि जगा दावि डौर उजवे करीं. ॥ तारीं० ॥ १ ॥
हटका दादला पादरी बाईल जांवई देखोनि हांसे, ।
वरचि सून नागवि नाचे, पोटचें पोर पिसें. ॥ तारीं० ॥ २ ॥
चिपडा व्याही शेंबडी विहिण दोघां प्रीति मोठी, ।
विहिण लाजुनि हडतें पाहे व्याही नासिक चाटी. ॥ तारीं० ॥ ३ ॥
ऐशी सौरी मौजा करी डौर छंदें नाचे, ।
ध्यान लागो **रा**मपायीं **आन**ंदतनय साचें. ॥ तारीं० ॥ ४ ॥

## संस्कृत पद.

**पद ७२ वें.**

स्मर **सी**तारमणं मानस! । भज **रा**धारमणं मानस! ॥ ध्रुवपद. ॥

---

१. यमुनेच्या तीरीं गोपींची वस्त्रें कृष्णानें हरण करून कदंबाच्या वृक्षावर बसला असतां गोपी म्हणतात. २. वस्त्र.

लीलाभंगितशिवकोदंडम् । बालालिंगितनिजभुजदंडम् ॥ स्मर० ॥ १ ॥
विदरितराक्षसराजिवतंसम् । मारितमायामोहितकंसम् ॥ स्मर० ॥ २ ॥
खंडितसर्वनिशाचरदर्पम् । दंडितदुर्धरकालियसर्पम् ॥ स्मर० ॥ ३ ॥
सूरकुलावलिमंडणभूपम् । असुरकुलोद्धृतबल्लवरूपम् ॥ स्मर० ॥ ४ ॥
आनंदात्मजवरदं रामम् । श्रीनंदात्मजनिजसुखधामम् ॥ स्मर० ॥ ५ ॥

## हिंदी पद.

### पद ७३ वें.

शंकरजी! मैं बाल तुमारो दया करो महाराज रे! ।
पतीतके तुम करुनासागर आज रखो प्रभु! लाज रे! ॥ ध्रुवपद. ॥
खाना पीना सुखसें सोना धामधूमकी लाज रे! ।
इस दुनियांमे पैदा हो कर येहि किया सब काज रे! ॥ शंकरजी०॥१॥
अपना अपना कर कर आखर जनम गमाया सारा रे! ।
भजनपुजनकी बात नही कछु गया नमनका फेरा रे! ॥ शंकरजी०॥२॥
चरनकमलपर शरन आया जो दगा न देते फेर रे! ।
श्रवन सुनी यह बात बडोकी घेर लियो प्रभुद्वार रे! ॥ शंकरजी०॥३॥
व्याघ्रचर्मपर जटा बढाला नंदीपर संवार रे! ॥
आनंदात्मज धून लगी है शिवशिव मूलाधार रे! ॥ शंकरजी० ॥४॥

## स्फुट सवाया.

विश्वकदंब कुटुंब तुतें म्हणती कनकांबर जी रघुनाथा!
कामज मात्र उपेक्षिसि गर्जति नाम तुझें पतितोद्धर गाथा; ।
काय अशी बिरुदावळिची तुज चाड नसे भयमोचन रामा!
सांठवुनी अपराधसहस्त्रहि पोटसिं भेट मला सुखधामा! ॥ १
आंगणिंची अतिहीन लता अमरद्रुमसंपतिहूनि पवाडे,
लोष्ठ खडे अवघेचि महामणि होतिल ते अमरावतिवाडे, ।
कूप उचंबळतील सुधारसिं, सूर्यरथासम ढातिल घोडे,
श्रीहरिची उदयासि दया जरि ये तरि कायसि गोष्टि न जोडे? ॥२
देखुनियां तरुणीकुचमंडळ दांत उगाच युवा विचकी,
लक्षुनि ते नयनांचळ चंचळ लोचन आपणही मिचकी; ।

पीवर तो कटिभाग विलोकुनि काममदें उगला चुचकी,
लागलियां चट तेच सदा मग होय परोपरिंचा उचकी. ॥ ३
प्रार्थिलियाविण दुःख तसें सुख निश्चित ऐसें जयासि कळे,
त्याचेंचि एक मुकुंदपदीं स्थिर होउनि चित्त कधीं न ढळे; ।
श्रीहरिभक्तिच दुर्लभ वांचुनि होणार तें न कदापि टळे,
यत्न तयासि वृथा करितां वय चाळणिचें जळ तेंवि गळे. ॥ ४

---

## विषयपंचक.

(श्लोक.)

कांतारीं मधुरस्वरें शबर तो गातां मृगी लुब्धली,
येतां सन्मुख पारधी मग वधी शब्देंच जे स्तब्धली; ।
कीं एकाच अशा स्वकर्णविषयीं भ्रांते मती नेणती.
पांचाही.................. .................. ॥ १
देखा दीप समीप देखुनी उठे आलिंगनालागुनी
पावे भंग पतंग आग जळतां पंखीं शिखा लागुनी; ।
एक्या रूपगुणेंच कीं कटकटा ऐशा दशा बाणती.
पांचाही.................................. ॥ २
कांजी कुंजरपुंज रंति न फिरे त्यातें धराया नरीं
नेल्या सन्मुख ते करेणु धरिणि खाणोनि गुप्तांतरीं; ।
तीच्या स्पर्शगुणेंच एकपण तें पाषाणा ते जाणती
पांचाही .................................. ॥ ३
ढाळी ढीवर मांस मंडित जळीं तेव्हां जळां प्रांजळीं,
तो मासे रुतति गळ्यांत तरती जाती जिवे त्यास्थळीं; ।
एक्या या रसनेंद्रियास्तव रसें दुःखोत्करें बाणती,
पांचाही.................................. ॥ ४
कासारांतर कंजकोश जठरीं किंजल्क अघ्राणुनी,
भ्रांतीनें भ्रमर भ्रमोन पडती संध्यामुखीं नेणुनी; ।
एक्या गंधगुणेंचि बंधन घडे जातूनीयां हाणती,
पांचाही.................................. ॥ ५
एवं पहा विषय पांचही जाचकर्ते, जाणोनि लोक पडती भवशोकगर्तें, ।
म्हणोनियां करणपंचक रामपायीं आनंदनंदन म्हणे भीडवा उपायीं. ॥ ६

---

# आनंदतनयकृत पदांची सूची.


| पद. | पृष्ठें. |
|---|---|
| अशाला अशा नाचविते ... ... | ८५ |
| आत्मारामीं मन भरलें ... ... | ८४ |
| आहा हें काय बरें मानवा ... ... | ८० |
| ऐक राया दे रघूत्तमरामराया ... | ८८ |
| ऐकाहो अद्भुत देणें ... ... ... | ८३ |
| ऐसी देखिली द्वारका... ... ... | ५१ |
| कनकचैल हरि कुचैलपाउलें... ... | ५२ |
| कां रे नाठविसी कमलनयन ... ... | ७८ |
| कैसेंही कीर्तन करितां ... ... | ८४ |
| कोठेंहो कोठें बाळ ... ... ... | ३८ |
| कोण तूझ्या मनासि येतो ... ... | १५ |
| खंजनाक्षी त्या मंजुतरा वाणी ... | ८७ |
| खंडपरशु हृत्सरोज ... ... ... | ७६ |
| गणराज गजानन ... ... ... | ७० |
| गोविंदा गोपाळा कृष्णा ... ... | ७४ |
| गौरीहरतनया गुणालया ... ... | ७० |
| गुज त्यासि पुसा रे ... ... ... | ८२ |
| जगवीर विरागी ... ... ... | ८५ |
| जन्मुनि उगले कां मरती ... ... | ८१ |
| जयजय रघुवीरा रणधीरा ... ... | ७० |
| जो नर नटका ... ... ... | ८१ |
| तारीं रघुराया लागेन तुझ्या ... ... | ९२ |
| तें चिर माझें टाकुनि... ... ... | ९२ |
| तैसा लोक पिडे... ... ... ... | ८२ |
| त्याला इहलोकीं परलोकीं ... ... | ८६ |
| त्यांचा संग नको ... ... ... | ८३ |
| त्रिभुवन व्यापुनि झाला ... ... | ८५ |
| दाखवीं दिव्य पाय ... ... ... | ७० |
| दीनबंधु पालय... ... ... ... | ७२ |
| देव करील दया ... ... ... | ८१ |
| देव जाणे हा भाव ... ... ... | ८८ |
| धांव धांवण्या ये धण्या ... ... | ७४ |
| नंदहृदानंद चिदानंद ... ... ... | ७५ |
| पवनतनय परमविनय... ... ... | ७७ |
| पाउलापाउलीं निजमनीं ... ... | ७९ |
| पाय गुरूचे धरा लवकर. ... ... | ७८ |
| प्रभु भास्करकुळिंचा ... ... ... | ७१ |
| बरवें समजा रे उमजा रे. ... ... | ७७ |
| बोला रे राम बोला रे ... ... ... | ७८ |
| ब्रह्मविचार करा गडेहो. ... ... | ७७ |
| ब्रह्मादि वंदिती ज्याचे पाय ... ... | ७४ |
| भज मन रघुविर प्रीति. ... ... | ८० |
| भासे आजि दिठी. ... ... ... | ८६ |
| भुलल्या त्या नंदगोपति. ... ... | ९१ |
| भुवनीं मज रंका नाथा. ... ... | ७१ |
| मदनतात मनमोहन. ... ... ... | ९१ |
| मर मरे प्राण्या. ... ... ... | ८० |
| माझा कृष्ण देखिला काय. ... ... | ८९ |
| माझा पांडुरंग मायबाप. ... ... | ७६ |
| या घोर संसारीं. ... ... ... | ८३ |
| याहुनि गारुड काय दिसे रे. ... ... | ८२ |
| याहोनि लाभ काय. ... ... ... | ७९ |
| येरवीं ब्रह्म सनातन. ... ... ... | ८५ |
| येरे येरे गोविंदा रामा. ... ... | ७५ |
| येरे येरे मल्लारीराया ... ... ... | ७६ |
| येरे येरे राघोबा माझ्या. ... ... | ७१ |
| रत हरिपदकमलकंद ... ... ... | ७९ |
| रंगनाथचरणयुगलिं ... ... ... | ८६ |
| रामचंद्र कविचकोरचंद्र. ... ... | ७२ |
| रामनामाची गती. ... ... ... | ८१ |
| लागा रामपदीं लाज हरुनि ... ... | ७९ |
| वरि दिसतो बरवंटा ... ... ... | ८२ |
| वंदू गोविंदा हरि. ... ... ... | ८९ |
| वृंदावनिं वाजवि. ... ... ... | ९० |

| पद. | पृष्ठें. | पद. | पृष्ठें. |
|---|---|---|---|
| वेणु वाजे युवतिवरेणु माजे. ... ... | ८९ | स्मर प्राणिया रघुराया. ... ... | ७८ |
| शंकरजी मैं बाल तुमारो ... ... | ९३ | स्मर सीतारमणं. ... ... ... | ९२ |
| संतकृपा फळली. ... ... ... | ८५ | हरिपदिं लागा मागा ... ... ... | ५० |
| साजणी गे माझे मनिंचें. ... ... | ८७ | हरि मज तारीं दीना ... ... ... | ७३ |
| साधु घराप्रति आले ... ... ... | ८५ | हें डंब कशाला. ... ... ... | ७९ |
| सार्वभौमा निजजनपूर्णकामा ... ... | ७६ | होणाऱ्या प्रारब्धासी ... ... ... | ८४ |
| सोडिं आतां व्याकुळ झाला ... ... | ८८ | क्षणही विषयसुखानें नेघ. ... ... | ७८ |

# आनंदतनयकृत काव्यांचें परिशिष्ट.[1]

## मृगीचरित्र.

(श्लोक.)

ऐका सुंदर काहणी चतुर हो ! भक्ताचिया वाहणी
ज्याची होइल शाहणी मति तया स्नेहें हरी नाहणी; ।
संसारांबुधिपोहणीं सदृढ तो योगाद्रिआरोहणीं
पावे सद्गति बोहणी सचितया ज्ञानामृतें दोहणी. ॥ १

अहो ! एका रानीं तृणगणशिराणी[2] धरुनिया
चढे प्रौढापाणी हळुहळुच पेणी करुनिया; ।
तया तैशाकाळीं शबरही[3] व्यहाळीस[4] उठिला
फिरे माळोमाळीं धरुनि दृढ जाळीस मुठिला. ॥ २

कुरंगी[5] तदा देखिली त्या किरातें, धराया तितें योजिलें अंतरातें; ।
दिशा सर्व रोधावया वागुरांनीं[6] पळेना तसा यत्न साधूनि रानीं. ॥ ३

तेणें साधुनि बांधिल्या दृढतरा दोहींकडे वागुरा,
वन्ही चेतविला पुढें मग निघे पाठी गती भंगरा, ।
व्याघ्रातुल्य वनांत सर्व कुतरीं हुंकारुनी प्रेरिलीं
टण्कारोनि धनुष्यही लगबगां व्याधें मृगी घेरिली. ॥ ४

बळें वोढितां चाप वाजे करारां, कुरंगी विलोकूनि कांपे थरारां; ।
पळाया पुढें लक्षिलें तों तडाडा शिखी[7] पेटला, ज्वाळ होती धडाडा. ॥ ५

दोहीं पार्श्वीं भीत पाहे कुरंगी देखी शेखीं[8] पेटला सव्य[9] अंगीं; ।
नाहीं कांहीं मार्ग वेगीं पळाया, पाहे बाहे[10] पांडसें आकळाया. ॥ ६

तो बोले चकिताशयें, बहु भयें, बाळें चळीं कांपती
कंठीं कंठ मुखा मुखीं मिळविती, पोटातळीं लोपती, ।

---

१. आमच्या संग्रहांतील आनंदतनयकृत काव्यें सर्व छापून गेल्यावर आमच्या हातीं जीं आणखी काव्यें, पदें आणि छापलेल्या काव्यांतील अधिक उपलब्ध झालेली कविता आली त्यांचा समावेश या परिशिष्टांत केला आहे. २. आवड. ३. व्याध, पारधी. ४. क्रीडा. (व्याहाळ—अरण्य. व्याहाळी= अरण्यक्रीडा, पारध.) ५. मृगी. ६. मृग बांधण्याची दोरी. ७. अग्नि. ८. डाव्या. ९. ओरडे. १०. वत्स.

ऐणी[1] एकही देख पाउल न ये, ते पूर्णगर्भा असे;
चिंताक्रांत नितांत होवुनि अशी पाहे मुला लालसें[2]. ॥ ७
आले संनिध सारमेय[3] शबरें जों वोढिला बाण तो
तों पावे हरणी प्रसूत समयो कल्पांतसा बाणतो[4], ।
तेव्हां त्या घनसंकटीं घनवटा पुण्यप्रभावें तिणें
स्वामी आठविला कृपानिधि जगद्बंधु[5] म्हणे, ‘शांति ने. ॥ ८
कृष्णा ! कंजदळेक्षणा[6] ! कुवलयश्यामा ! कृपासागरा !
तारीं दीनजना त्रितापशमना[7] ! स्वानंदपूर्णागिरा ! ।
बाहे वो म्हण धाव हा ! कटकटा या संकटापासुनी
स्वामी ! सोडविं, सोयऱ्या ! सदय हो, दुःखाश्रमांपासुनी’. ॥ ९
धांवा हा करितां असा अमृतसा वेल्हाळ वैकुंठिंचा[8]
विश्वव्यापक वेदवंद्य वरदा आराध्य हृत्पीठिंचा. ।
जाला तुष्ट, तदां च कष्ट हरिले, ते स्पष्ट ऐका कसा
जाला प्रीत सुखाविना लव नसे एणीस आणीकसा. ॥ १०
वेढा घेवुनि वोढितां धनु टणत्कारें गुणीं तूटलें,
ज्वाळा लागुनि वागुरांग जळतां तें स्थानही सूटलें, ।
वन्हीतप्तबिळांतुनी शशकुळें चौताळतां व्याकुळे
जाती त्यावरिही समस्त कुतरीं भुंकूनियां संकुळें. ॥ ११
वेगें मेघ अकाळ वृष्टि करितां ज्वाळा विझाल्या तदा,
कांतारीं[9] वणवा कुरंग कणवा केला असे एकदां; ।
गेली भीति सुखप्रसूति मग ते पावे धरारंगणीं
जाती होय कुरंगिणी सविनयें कृष्णासिं लोटांगणीं. ॥ १२
तया स्थाना गेली शिशुसहित स्वानंदगतिनें
अनाथाच्या नाथा श्रवण करितां पुण्य मतिनें, ।
‘सुनौका नामाच्या धरुनि उतरा पातकनद्या’
करी ऐसा बोध प्रगट गुरु आनंदतनया. ॥ १३

---

१. मृगी. २. आवडीनें. ३. कुतरे. ४. भासतो. ५. परमेश्वर. ६. कमलपत्रनयना. ७. आधिभौतिक, आध्यात्मिक, आणि आधिदैविक अशा तीन तापांचें शमन करणारा. ८. गृह. ९. वनांत.

## महाबळचरित्र.[1]

(श्लोक.)

ऐका कथा भागवतांत भाकी जो माइना भूमिपटा नभा कीं।
जो सच्चिदानंदस्वरूप साचा तो नंदधामीं[2] धरि रूप साचा. ॥ १

प्रगटुनि मथुरेला गोकुळीं क्रीडणार्थी
क्रिडत पशुपगेहीं[3] दावि नानापदार्थी;।
शिशुपरि करि लीला जे कळा आकळेना
विधिहरपुरयोगी शोधितां ही कळेना. ॥ २

नंदांगणें समिप तल्प कि देवदेव बालत्व कोमलतनू धृतवासुदेव, ।
येरीकडे स्थितभयाभित कंस मोठा, शोधा विरा हरि दितीजकुळास[4] खोटा.॥३
ऐकूनि हे असुर वाक्य महाबळाचा नामाथिला दनुज दैत्य महाबळाचा ।
शब्दें वदे नृपतिला, 'अति गर्व थारे, शोधूनि साधिन मुकुंदहि सर्वथा रे!॥४

(दिंड्या.)

कंसराया! ना करीं खेद आतां, शस्त्रपाणी परजुनी तुंकी[5] माथा, ।
असे गोकुळिंचा शिशू जगत्राता, दुजा बंधूही बलीराम भ्राता. ॥ ५
दुष्ट वाढे जो तो उपाव आधीं, दनुज रोषें बोलोनि माज बांधी, ।
योजि जो तो चतुरा काय साधी विलोकीतां हरवली दैत्यमांदी' ॥ ६
नमस्कारी कंसासि महारोषें गर्जताहे आसूर महाघोषें. ।
वीरवाणी परिसोनि राय तोषें भ्रांत प्राणी श्रमताति महद्दोषें. ॥ ७
'विडा वेगीं उचलोनि वीर थोरा जाय वेगी हा नीच नंदपोरा, ।
वीरमंडळींत आजि तुझा होरा मारि बळिया तो धन्य गर्व तोरा.' ॥ ८

(श्लोक.)

संतोषोनि मनीं भुपाळ बहु दे वस्त्रें तया भूषणें,
'जाई सत्वर, मारिं घोर अरितें, घे घे बरें ऊसणें, ।
माझे अंतरिं फारसा भरंवसा या दैत्यभारीं तुझा.'
ऐसा गौरव राव देत, तंव हा ठोकी उभारी भुजा.॥ ९

---

१. महाबल हा दनुपुत्र दानवांतील एक. हें आख्यान नारदपुराणांत आहे, असा या काव्याच्या अखेरीस उल्लेख आहे त्यावरून कळतें. २. गृहीं. ३. गोपांच्या घरांत. ४. दैत्य. ५. हालवी.

(पद.)

'या जगिं मी रणशूर । महाबल. ॥ ध्रुवपद. ॥
तृणवत् हें जग, सर्व सुरासुर, । करिन क्षणांतचि चूर. ॥ महाबळ०॥ १॥
मजसम धीरवीर न दिसेची । संग्रामीं अतिक्रूर. ॥ महाबळ० ॥ २ ॥
आनंदात्मज गर्वबळें तो । निरखि परासि मजूर.' ॥ महाबळ० ॥ ३ ॥ १०

(श्लोक.)

वदोनि त्वरें वंदिलें कंसराया, निघे गोकुळा भेदबुद्धि कराया, ।
यमूनाजळीं स्नान सारीत वेगा, धरी देह कापट्यवेषें नवे गा! ॥ ११
टिळा टोपी माळा करुनि करिं पंचांग बरवें,
वपू विप्राची हो! जॅनदिठिस का शुद्ध मिरवे; ।
अलंकारें शोभे विलसति वरी शुभ्र वसनें,
हृदीं कापट्याचें विष, परि जपे नाम रसनें. ॥ १२
प्रवेशे गोग्रामीं, जन सकळ आश्चर्य करिती,
नमस्कारूनीयां चरणयुगळालागिं धरिती. ।
तयांचे माथा तो स्परशुनि करां काय वदतो,
'चिरंजीवी व्हा जी! शिव करि तुम्हां स्वस्थ पद तो.' ॥ १३

(पद.)

'या जगीं तुम्हिच बहु बरवे जी! ॥ ध्रुवपद. ॥
गोकुळिं राहुनि गोपाळाचे, भजनीं रजनीं मन मिरवे जी! ॥ तुम्हिच० ॥
कुळ तारुनि तरलेत सखे हो! । आणिक साधन का करवे जी! ॥ तुम्हिच० ॥
आनंदात्मज वदे भवसागर। शिवराघवविण ना तरवे जी!' ॥ तुम्हिच० ॥ १४

(श्लोक.)

रसिक मृदु गिरा हो! बोलुनी त्या जनांला
'अजि प्रभुगृहीं जावें कामना या मनाला.' ।
हरषुनि गवळी त्या नंदधामासि नेती,
कथिति गुज नृपाळा, 'विप्र हा दिव्यज्योती.' ॥ १५

---

१. देव आणि दैत्य. २. फितूर. ३. देह. ४. लोकांच्या दृष्टीस. ५. वाणीनें. ६. गोकुळीं. ७. संसारसमुद्र. ८. वाणी. ९. इच्छा. १०. अनुपमकांति.

(पद.)

सुभट भट बरवा आपुले ग्रामीं, पातला. ॥ ध्रुवपद. ॥
सदय हृदय रवि उदय सरीचा, पदक्रम पाठक स्वामी. ॥ पातला० ॥ १ ॥
संगरहित शुभ अंग विराजित, अभंग मन निष्कामी. ॥ पातला० ॥ २ ॥
मंद मंद मृदु छंद वदे । आनंदतनय गुणग्रामीं. ॥ पातला० ॥ ३ ॥ १६

(श्लोक.)

साष्टांगें नमुनी मुनीसि नृप दे बैसावया आसना,
पूजा सारुनियां वदे, 'अजि द्विजा! का अंतरीं वासना, ।
प्रकटावें निजगूज काय मनिं तें अर्पूं यथाशक्तिनें'
हासोनी मुनि नष्ट दुष्ट कपटी दे उत्तरा युक्तिनें. ॥ १७
'झाली भूपतिवंशवृद्धि तुमतें पाहावया बाळ तो
सामुद्रीक विचार लक्षणविधी वर्तू अजी काळ तो; ।
जन्माची घटका सुदीन अथवा दुर्दीन हा चालतो,
हें ज्योतिष्य बृहस्पतीस न कळे, घे मौन वाचाळ तो. ॥ १८

(पद.)

तिथी वार नक्षत्र घटित मज सकळ कळे राया! ।
योग कर्ण व्याकर्ण वर्ण जन येति विचाराया. ॥ ध्रुवपद. ॥
ज्योतिष्याचे मान करुनि गूमान[1] विप्र करिती, ।
तानमान अवसान धरुनि, जुगदान जगीं फिरती ॥
रवि शशि ग्रह ग्रहणाचें गणित दृढ हृदयीं धरिती ।
वदनिं वदुनि जन भोंदुनि आपुला प्रपंच भरभरती. ॥
चंद्र कथुनि मग महेंद्र गृही घर घरटी करित वाया. । योग कर्ण० ॥१॥
परि जन्माचे घटित लव पल त्रुटित योग घडला ।
कवण क्षेत्र नक्षत्र सूत्र तो धरुनि बिंदु पडला, ॥
नवग्रहांचा मेळ कवण ते वेळ धरुनि दडला, ।
हें नकळे शास्त्रार्थ शोधितां विप्रांच्या वडिलां. ॥
सडला मद बहुतांचा शिणल्या पढपढोनि काया. । योग कर्ण० ॥ २॥
या कर्माची रेश कळे तो विशेष गुरु ज्ञानी, ।
नातरि पोट भराया ग्रंथा पढती अभिमानी; ॥

---

१. गर्व, व्यथाभिमान, डौल.

शुभाशुभ जाणीव नसे तो नर पशुपावाणी[1] ।
रानीं हिंडुनि उदर भरी त्या परीच ते प्राणी ॥
कवि **आ**नंदतनय दृढ होवुनि धरि सद्गुरुपाया. ।योग कर्ण० ॥३॥ १९

(श्लोक.)

आणा मुलालागिं निरीक्षणासी, सांगेन शूभाशुभ लक्षणासी.' ।
पंचांग तों ऊकली तो करानें, वाची नृपासंनिध नीकरानें. ॥ २०
आनंदोनि मनांत **नं**दसति[2] तैं 'आणीं' म्हणे 'तानया
दावी दावि भटासि शीघ्र अग! हा तो आपला कान्हया.' ।
वोसंगा कवळोनि बैसत मुलां तेव्हां **य**शोदा सती
गोपी गोप बरे **मु**कुंदमुख तें पाहोनियां हांसती. ॥ २१
आले गोकुळिंचे सभासदहि ते ऐकावया सद्गुणा,
हृत्पद्मीं[3] प्रिति फार सार श्रुतिचा[4] त्या पाहती चिद्घना[5], ।
नारी सुंदर शाहण्या बसति त्या **नं**दांगनेसंनिधी[6]
तेव्हां **मां**भळभट्ट[7] गर्जुनि तया शास्त्रार्थ सांगे विधी. ॥ २२
'याची जन्मतिथीच अष्टमि असे, नक्षत्र हे रोहिणी,
मास श्रावण, वद्य पक्ष, न बरा हे द्वाड जी गोहणी, ।
वारहि शुद्ध नसे निषिद्ध बुध हा सर्वाग्रहीं षंढसा
त्याचा हा गुण बाळकासि समजा होईल हा लंडसा[8]. ॥ २३
तिथी आठवी आटवी सर्व सृष्टी, पित्यानें मुखा पाहवेनांच दृष्टी, ।
असे रोहिणी सर्व दारांस खोटी, मदा नासवी नष्ट कापथ्य पोटी. ॥ २४
शिनळ **ह**रिसरीचा नापुरीं दूसरा जी,
अगुणि मुल अम्हाचे बोल ना वीसरा जी! ।
करिल दधिपयाची चोरि गोपाळगेहीं
देह धरि इहलोकीं ठायिंचा जी! विदेही. ॥ २५

(पद.)

**नं**दा! मूल बरवें न दिसे, । **गं**गार्पण करवी यातें. ॥ ध्रुवपद. ॥
वदुं मि कोठवरी गुण घोर, । जन्मले मुळचे मुळींच पोर, ।
त्यागणें हाचि उपाय थोर, । नातरि तव घरिचें धन ढोर, ॥

---

१. गवळ्यासारखा. २. नंदाची भार्या. ३. हृदयकमळीं. ४. वेदाचा. ५. कृष्णास. ६. नंदाच्या बायकोपाशीं. ७. कपटवेषी विप्र. (राक्षस महाबल.) ८. ठक.

जाइल, जीव न राहिल, घरिचा बाइल जितुकि, दादुला न लाहिल करुनि सोवळी, गोपगोवळी खाइल लोणिपयातें. ॥ नंदा० ॥ १ ॥
चोरटा चहुरंगी बलचंड । बंड असुराचे करिल शतखंड ।
दंडधर भयहारक विधिअंड । पाळिता, न शिणे वज्र वितंड, ॥
रुंडमाळधर पुंडमणी हा गुंडुनि घे परि त्रिपुंड्र भाळीं झकउनि चाळी खंडखंड ब्रह्मांड मांडवी विधि ही न लपवी ययातें. ॥ नंदा० ॥ २ ॥
क्षेत्री कुळसह भस्मीभुत । करणे यास्तव हा अद्भुत ।
प्रगटला कुलनाशक तव सुत । निश्चय कथिलें पूर्वील श्रुत ॥
गुंतुनि मायापटलीं मुलगा ठेविशि तरि निर्मूल करिल कुल मुळमुळ पाहु नको कुळ गोकुळ जाळिल यास्तव देइं तिळांजुळ दुष्ट वदे आनंद-तनय सदया ते. ॥ नंदा० ॥ ३ ॥ २६

(श्लोक.)

काळा रंग अभंग कार्य करिता, कोळें[1] कुळाचें करी
त्यागी बा शिशु या उनाड घरिचा धाडीच गंगातिरीं. ।
पाडी गोकुळ हे उजाड, अवघे झाडील हीं माणसें,
काडी घेवुनि जागवी अहह! हे दुर्गूण सीमा नसे. ॥ २७

भुजा चारि या चारि मार्गीच लोकां अरे! लावि हा कां बरें हे, विलोका. ।
करी सख्य यासीच त्या हा भिकारी, करी निश्चयें शब्द हा नाभि कारी. ॥२८

(पद.)

नका नका घरिं ठेवूं नका, मुलगा हा फुकाचा नसे बरा. ॥ ध्रुवपद. ॥
लटिक नेटका गोपगोपिका पक्का चोर किशोर[2] खरा ।
जुकार बहु श्रुति फुत्कार करिती विकार न कळति सुरासुरा ।
थुका मुखावरी पडे चुका जरी भजन आनंदसुत विभुवरा. ॥नका०॥ २९

(श्लोक.)

तस्मात् त्याग करा, विचार बरवा नाहीं नृपा ! दूसरा
वाराबाच अनर्थ अर्थ, इतुका या पुस्तकींचा खरा' ।
द्विजवाचा परिसूनि काच हृदयीं मानीच कीं नंद तो ।
वाच्यांशा अरिच्या हरी परिसतां स्वांतींच[3] आनंदतो. ॥ ३०

---

१. सत्यानाश. २. मु . ३. मनांत.

कुटिल ते भटशब्द नृपा खरे भासता विषम जे विषसा खरे, ।
मूढ गूढ समजे नच गायकी काय यासि करुं आजि उपाय कीं. ॥ ३१

त्यागावा कुळिंचा सुपुत्र तरि हो ! येईल वंशा उणे,
ठेवावा घरिं हा अशूभ कथिलें देईल दुःखा दुणें, ।
साशंकीत पिता असा तव प्रभू आज्ञापितो स्थावरा,
हाणा सर्व पदार्थ हो ! द्विजवरा जिवा परी नावरा. ॥ ३२

धावे तदा सर्व प्रपंच ठेवा, येवूनियां ताडिति त्या भुदेवा; ।
येरी तळी पाट कपाट लावी, कराप्रती कर्वति सर्व दावी. ॥ ३३

उखळ येवुनिया खळ सेखरी, निखिल मौन त्यजी तव वैखरी, ।
शंख विप्र करितात वलाटनी, लाटिती थटथटाच उलाटनी. ॥ ३४

मुसला आवेश विशेष बरा तनु धावडी धुम्मसि नीबरा ।
बहुकाष्ठ चपेट बसे तनुतें, सिखि जाळित खांडमिशा हनुतें. ॥ ३५

(पद.)

**मा**भळभट मी, मज मारुं नका. ॥ ध्रुवपद. ॥
भविं भुलुनिया गोकुळिं आलों । मारुनिया काया सारुं नका. ॥ **मा**भळ० ॥
परजित आयुध सहजिच वरजा । सुरजन वृत्तिसि हारुं नका. ॥ **मा**भळ० ॥
**आ**नंदात्मज म्हणे दुर्जन तो । तारा अथवा तारुं नका. ॥ **मा**भळ० ॥ ३६

(श्लोक.)

जाती द्विजा संनिध जात जाती, जातीवरी पालटली द्विजाती ।
फेरा फिरावा तरि ऊफराटा खुंटा शुशुल्पीत हि घेत ताठा. ॥ ३७

ताडनासि करिती ग्रह वीसरे, दनुज सर्व महाबळ वीसरे, ।
कृषिकिचे हळ वोखर ती फणी गरगरा फिरुनि हाणिति गोफणी. ॥ ३८

(पद.)

मार बसे अनिवार प्रभुचा. ॥ ध्रुवपद. ॥
भवगारीं गुंतुनियां भ्रमला । नेणुनि सारासार. ॥ प्रभुचा० ॥ १ ॥
प्रकृति असुर पुरुषार्थ न समजे । सार्थ सार विचार. ॥ प्रभुचा० ॥ २ ॥
**आ**नंदात्मज निजगुज जिविचें । जाणति ना च गवार. ॥ प्रभुचा० ॥३॥ ३९

(श्लोक.)

फुटकें मडकें अटकेंत गळा, उरिं साहन आदळतो सगळा ।
रुधिरें तनु सेंदुरसी डवरे, पळतां पडतो वरि मांडवरे ! ॥ ४०
जातां बंद कपाट, वाट न दिसे, तो चाट तेथें पडे,
आक्रंदोनि रडे, बहू चरफडे, गोखुंट तेव्हां दडे; ।
केला गर्व झडे, सुटे झडझडे वायू, शिखा ऊपडे,
पोथी सूत्र सधोत्र जात करिंचें दीसे जना बापुडे, ॥ ४१
हासती सकळ गोवळबायका, का अगाध करणी यदुनायका ।
निर्जिवें सजिव जाहलि काय का, दावितो अभिनवेच उपायका. ॥ ४२

(पद.)

नव लाव कसा हरिचा नव लाव कलावी. ॥ ध्रुवपद. ॥
हें जग जोगवी जो गडी जागवी लाववी तो मनिंचा, ।
भोगवि भोग सुयोग युगायुगीं आघविया धनिचा, ।
नागवि नाग नगारिरिपु छळितो वर नागिणिचा, ।
भागवि भोग विभागुनिया भुतगुणनत आननिंचा. ॥ नव० ॥ १ ॥
जीव जगांत घडीत घडी उघडी न दिसे करणी, ।
आकाश विकासुनि त्यांत प्रभंजन[1] तोय शशी तरणी[2], ।
मुळ मेळवुनी कुळ स्थापित दैवत तार शशी तरणी, ।
हरणीहर अब्जज उद्भवि आपण लिप्त न आचरणी. ॥ नव० ॥ २ ॥
नभ स्तंभविणाच उभे अवनी जिवनावरि ते तरते, ।
बीज आहाळितां नुपजे उपजे जिव आगिचि या वरते, ।
दश इंद्रिय स्वस्थ सुषुप्ति तई मन येकचि बावरते, ।
धरि आनंदनंदन आवडिनें हरिपाय शिरा वरिते. ॥ नव० ॥ ३ ॥ ४३

(श्लोक.)

गौळी गोकुळिचे तया हटकिती, 'कां पातलासी खळा !
झाला कृष्णअवतार त्यासि कथिलें नानाविधानें कळा, ।
येथिल दैवतरे बहू खरपरे कर्तृत्व खूणा अशा
जाई जाइ पळोनि सत्वरगती लंघोनि दाही दिशा'. ॥ ४४

---

१. वायु. २. सूर्य.

(पद.)

भटजी निबर निट कांस कसा. ॥ ध्रुवपद. ॥
सगुणा अगुण वदचना भले, भलते साहवेल कसे सहसा ॥ भटजी० ॥ १ ॥
ब्राह्मण तूं नर साच खरारे, कपटी **दा**नव कीं सहसा ॥ भटजी० ॥ २ ॥
**आ**नंदात्मज नोळखिला तो, गोकुळिंचा प्रभु ब्रह्मठसा ॥ भटजी० ॥ ३ ॥ ४५

(श्लोक.)

तेव्हां काकुलतीस येवुनि वदे, 'द्या जीवदानासि जी!
गात्रें चूर्ण उरांत रक्त भरलें हें नाशिलें मांस जी! ।
प्राणाची च मला निरास दिसते, वेढूं कसा वास जी
व्याघ्राचे वदनांत ऐण[1] पडतां त्यागी कसा घास जी!' ॥ ४६
वाणी असी ऐकुनि **नं**द बोले, 'देवा क्षमावे अपराध केले ।
गोपाळ गोपी करुणेश्वराची, वाणीसि गाणी कृत ईश्वराची'. ॥ ४७

(पद.)

अजि सकुमारा! **नं**दकुमारा! मारा मना करावा जी! ।
पडला स्ववाक्यशब्दें बंधन पावत जैसा रांवा जी! ॥ ध्रुवपद. ॥
अपराधी अपराधी धिग् धिग् धी[2] भुलली या विप्राची, ।
पुन्हा न येईल आता विधिनता, सान मानी क्षुद्राची. ॥ अजि० ॥ १ ॥
चुकला चटोर परि तूं कठोर न करीं न करी मानस ते ।
सहसा विनती न करो परि हे रूप विप्राचें कां नसतें? ॥ अजि० ॥ २ ॥
नतजनवचना परिसुनि **ना**रायण मारी त्यासी मना करि, ।
**आ**नंदात्मज प्रभुगुणवर्णनीं पूर्ण सर्व कामना करी. ॥ अजि० ॥ ३ ॥ ४८

(श्लोक.)

वेगीं पळालाच **म**हाबळी तो, दुष्टांप्रती **मा**धव हा छळीतो ।
**द्वै**पायनाचे अइकूनि बोला, आनंद **आ**नंदसुतासि जाला. ॥ ४९
नसे हे कथा भाकिली भागवतातें, मनीं विस्मयो वाटला भागवतातें; ।
तरी वर्णिली **ना**रदाचे पुराणीं, जनीं पाहुनी पूर्ण कीजे शिराणी[3]. ॥ ५०

---

१. मृग. २. बुद्धि. ३. आवड, इच्छा.

# गोरसक्रीडा.

(पद.)

श्रुतकीं श्रुतकृत हरिची करणी । करिता सत्सुख अंतःकरणी. ॥ ध्रुवपद. ॥
श्रुति स्मरती श्रुति गाति जयातें । ध्यावा तो भवतमतरणी. ॥ श्रुतकीं० ॥ १ ॥
धृति धात्या दे सृष्टी रचाया । भृति वृत धरिजे त्या चरणीं. ॥ श्रुतकीं० ॥ २ ॥
वृत्त कथिता आनंदतनय कवी । मग्न निमग्न शुभाचरणीं. ॥ श्रुतकीं० ॥ ३ ॥ १

(श्लोक.)

श्रीमत् ब्रह्मावतार पंचकद्वयामाजी प्रभू आठवा,
योजी रम्य गुणाकृतीसि सगुणा ये त्या रुपा आठवा; ।
पाजी प्रेमरसा नतासि सहसा सारांश ज्ञानी तया
मी वाणी गुण गाउनी श्रुति तव्हा ऐका म्हणे श्रोतियां. ॥ २

व्रजीं धाकुटा थोर वृंदारकाचा, स्रजी सागरीं डोल मंदारकाचा; ।
असा तो प्रभू बाळ नंदालयीं हो, लिला दाखवी माय महिमा लई हो. ॥ ३
मुलें सानसीं मानसीं गोपिनाथा, गडी आवडीती भिडीचे सुनाथा; ।
'चला' त्या मुलांतें म्हणे विश्वताता, 'मला फावला हेतु सांगीन आतां.' ॥ ४

(पद.)

चला चोरुनि गोरस खाउं गड्या! ॥ ध्रुवपद. ॥
हिंडुनि धुंडूं गोप हवेल्या । लवंडु दवडुं दहिंदुधसुगड्या ॥ चला० ॥ १ ॥
करुं उघड्या लुगड्याच्या गोपी । विगडुनि ठेविति मद झगड्या ॥ चला० ॥ २ ॥
शिक, शिकवी, आनंदतनय कवि । मुल म्हणती सुख लाहुं गड्या! ॥ चला० ॥ ३ ॥ ५

(श्लोक.)

अहीरा हरि प्रेरुनी हा विचार, करूं चालिले चोरिचे चोर चार; ।
निशी आंत वेशींत गोपगृहीं तो, प्रवेशीत अंतर्गृहीं अग्रहीतो. ॥ ६
दधीरातबे बाळकां वेध लावी, मधीं राहुनी चिद्बुद्धीभेद दावी; ।
बधीरा करी गोपगोपींसि माया, विधी सांपडेना कधींही दमाया. ॥ ७
असा लाविता गोपुरीला दरारा, चुके दाम गौळी प्रभूच्या करारा; ।
तुपा वीकणें खुंटलें या व्रजाचें, नृपा सांगती हा हरी नीवृजाचे ॥ ८

---

१. संसाररूप काळोखास सूर्यासारखा. २. गवळ्याला.

(पद.)

तव किशोरनंदा फंद करी. ॥ ध्रुवपद. ॥

थोर पराक्रमी पोरपणीं हा । गोरस चोरुनि छंद धरी ॥ तव० ॥ १ ॥

जाउनि याला जावे धराया । दृशिं[1] धुळ फुंकुनि अंध करी ॥ तव० ॥ २ ॥

आज्ञा द्यावी सुज्ञा आमुते, प्राज्ञा घालू गंधकरी ॥ तव० ॥ ३ ॥

आनंदात्मज प्रभु गवसेना, पद बोधाविण मंद करी ॥ तव० ॥ ४ ॥ ९

(श्लोक.)

वदे नंद, 'कां माल द्या चोरपोरां, करा बंद मारा धरा चोर पोरा, ।
वरा कारबारा हिरा वेठला तो, नरा पारक्याला बरा भेटला तो'. ॥ १०

असी गौळिये ऐकुनी नंदवाणी, गृहा जावया वृत्ति आनंदवाणी, ।
स्वयें अंतरीं शिक्षणें गोपराया, बहू गर्वसा कां नये कोप राया? ॥ ११

विंदाना कृष्णजीच्या समजुनि मनिं ते जागती यामिनी ते
बंधाना गोरसाचा बळकट करणें सांगती कामिनीतें ।
संधाना देव ऐशा समजुनि मनिं तो हर्षला बाळ संगें
मंदाना गोपबुद्धी धरुं हरि म्हणती गौळि बाळ प्रसंगें. ॥ १२

अधम नर समाजामाजि त्या गोकुळींच्या,
वसत मदभरें हो हंकृतीनें कुळाच्या; ।
वदत मम गृहातें वासुदेवास ये जो
कृतफळ तुज वोपूं फारसे दुग्ध पेजो. ॥ १३

म्हणे दार त्याची धरा आजि यातें, अहो या जगीं थोरसा माज यातें, ।
भुजा बांधुनी नंदधामासि न्यावा, विचारी प्रभून्याय अन्याय न्याया. ॥ १४

नगे मी ये गेहा अशुभ तव देहा घडवितो,
मला वांधी ऐसा मनुज न विधाता घडवितो; ।
अहंकारें थोरें तुमगुन मला पोर करिता,
तुम्हा दक्षाशिक्षा समजुनि परब्रह्म करितां. ॥ १५

मुरारी तया ताडुनी शब्दघातें, घरा ये तवे नातुडे जो तिघांतें; ।
शिवा कंजजा[2] वासवाला[3] कळेना, कदा भाविकावीण जो आकळेना. ॥ १६

कोणे एक दिशीं निशींत हरिची द्वेपीत गौळी निजे
कांतासंगतिरंग सारुनि सुखें अंतःपुरीं हो निजे; ।

---

१. डोळ्यांत. २. ब्रह्मदेवाला. ३. इंद्राला.

संधी जाणुनि शंभुचा प्रियसखा ये सत्वरीं मांडि ते
दोघे झोपवि लोपदृष्टि करुनी कैशा रिती नाडिते. ॥ १७

व्रजाची तया थोर वाढीव दाढी, धरोनी बळें वेणिग्रंथीस पाडी; ।
न तूटो न पेटो न सूटो कदापि, करा खड्गधारा द्विसी रासि दापी. ॥ १८

श्रमित उभय होती मन्मथाचे विलासें
निजचर कुमतीनें पाठिसी लाविलासे ।
अकळ करुनि युक्ति जाय गोविंद वेगा
उपरिचरित तेंही सांग सांगों नवे गा ! ॥ १९

अरुणउदय होतां चेइली गोपराणी,
प्रियकर प्रियवादें जागवी ते करानीं. ।
'दिनमणि उदयातें पावते स्वामिराया !
अजुनि धरितसां कां वेणी? सोडा करा या.' ॥ २०

'मला भाससी तूं मदोन्मत्त गाढी, स्वहस्तें कशी वोढिसी आजि दाढी? ।
तुझा काम कां शांतिलागीं न पावे, अगे ! काहिया लौकिकाला दिपावे?' ॥ २१

वदे कांता रोषें, 'गवसुनि कसे केश धरितां?
दिसेनाजी ! डोळां कुटिल विषयचाळाचि करितां. ।
करांबूजें पाहे त्रिकट दिधली गांठ कुरळीं
अजी ! कैसी जी ! हे विकट तुमची हीट कुरळी?' ॥ २२

(पद.)

'अग मुरदाडे ! दाढी सोड. ॥ ध्रुवपद. ॥
वदसिं मसीं कां वेणिसि धरली । हळु हळु वदसी गोड.' ॥ अग० ॥ १ ॥
'करुनि कुचाळा ! कोप तसा. ॥ ध्रुवपद. ॥
दाढी वेणी बांधुनिशानी, करणी लोपतसा.' ॥ करुनि० ॥ १ ॥
'झणि तुज त्यागुनि जाइन म्हणुनि । करणी केलिस कोड.' ॥ अग० ॥ २ ॥
'आत्मस्थिति गोपतिसम जाणा । मज आरोप तसा.' ॥ करुनि० ॥ २ ॥
'आनंदात्मज गुणगण हरिचे । मृतरसपीयुष गोड.' ॥ अग० ॥ ३ ॥
'आनंदात्मज हरिरस त्यजितां । होत निरोप तसा.' ॥ करुनि० ॥ ३ ॥ २२

(श्लोक.)

बैसे तवें कामिनि कांत मागें, लागे बळे कर्म निवांत मागें, ।
तीव्रा नखें सोडि परी सुटेना, तो मूढ नेणेच मुकुंद टोणा. ॥ २४

तदा वेशिंचे वासिकां देत हाका, अजी गुंतले केश कैसे पहा का. ।
त्वरें पातले आळिचे गोप सारे, बळें दाविती आपुली नोक सारे. ॥ २५
एकीं ग्रंथि विदारितां निज बळें शक्ती करा ते त्यजी,
युक्ती शस्त्र सुदोनि छेदिति तवे धाराकरी नित्यजी; ।
एकीं लावुनि जातवेद[1] पाहता जाळी न तो केश तो,
टाळूं संकट पाहती परि नव्हे साधी हृषीकेश तो. ॥ २६
शस्त्रा ना तुटती, नखा न सुटती, वैश्वानरू दाहिना,
होते जे जन थोर सान सरिते ते सर्व शक्तीहिना, ।
जाली लाज जनींच मानुनि मनीं आक्रंदती वोहरे,
'गे बाई! अघटीत संकट गती कवणे रिती वोहरे? ॥ २७

(पद.)

बाई! हे हरिची अवखुण गे! जाणितली कीं लवखुण गे! ।
आत्म ज्ञानें वळखुन गे! पाहे ना तरि करि खुण गे! ॥ ध्रुवपद. ॥
ब्रह्मा हर नेणत माया, भानु जसा नेण तमा या, ।
ज्या रूपीं मिळती नत माया, त्याच्या ह्या हिकमति माया. ॥ बाई० ॥ १ ॥
नंदालयिं न्या झगडा गे, त्याविण न चुके रगडा गे, ।
आजि हरीचा पगडा गे, इतरा न सुटे धगडा गे. ॥ बाई० ॥ २ ॥
कर जोडोनी हरिविण गे, कां जन अवघे शिणवा गे, ।
तो याविण का मिन वागे, आनंदसुतपदीं लिन व्हागे. ॥ बाई० ॥ ३ ॥ २८

(श्लोक.)

निगदित चतुराते नेटकी ज्ञान वाणी
सकळिक नरनारी होति सज्ञान वाणी. ।
समइच समुदाई बंदिकी जे पुढारा
मुकलित मनिं गौळी येति नंदा विढारा. ॥ २९
हासे नंद विलोकुनी खदखदा हें काय ये सोंगसें,
आले पौरिक घेवुनी वदति ते जी हे कसे ढोंगसे; ।
'जो नंदा नवलाव नयनिं निरखा हे गांठ कैशी कसी
बांधीली स्वबळें ढळे न सहसा कवणा असी चौकसी?' ॥ ३०
बोले राव, 'असेल तद्गृहिंचि हे देवाचि ही अवखुणा,
जोडा हात पहात कां बसतसां? आम्हास दावा खुणा. ।

---

१. अग्नि.

नोहे जी! नृपती सती अनिपति प्रीती निजे दातया ।
आला कोण अचाट गांठ दिधली हें ठाउकें ना तया. ॥ ३१

(पद.)

कर्माचा योग चुकेना राया! भोगेविण राया. ॥ ध्रुवपद. ॥
कर्में रवि शशि नभिं फिरती तारा, विधि होय चितारा, ।
कर्मे परब्रह्मचि ये अवतारा, भव उद्भव तारा. ॥ कर्माचा० ॥ १ ॥
कर्में वासवा भगांकित केलें, नर अंकित केले, ।
कर्में लंकेशवैभव गेलें, मुनिचे भव गेले. ॥ कर्माचा० ॥ २ ॥
ऐसा कर्माचा अद्भुत मारा, ना येत सुमारा, ।
आनंदात्मज प्रभु सांग कुमारा, प्रभु वारी कुमारा. ॥ कर्माचा० ॥३॥

(श्लोक.)

कृतकर्मोद्भव सांकडें निपजलें सर्वांपरी वांकडें
हस्तें लावुनि कांकडे निरखितां भस्मेच नाकाकडे, ।
लौकीकासि कडेस लाउनि सडे आलोंच देवाकडे,
टाळा संकट बाकडे खडकडे अन्याय लावा कडे. ॥ ३३
येती काकुळती कुळीन कुळिंचे गौळी तया पौळीचे,
मौळी स्थापुनि नंदपादयुगुली जवळीक त्या शौरिचे, ।
रूपातें अवलोकुनी ग्लांती वदती ऐशी ययाची क्रिया
आणा सत्य मनासि गोकुळपती सांगा मती अक्रिया. ॥ ३४
आलिंगूनि सुतासि हास्य वदनें बोले यशोदापती,
रे ! सोडीं कुरळा गळा तरुतली बाळा अरे दंपती; ।
अन्यायी जरि जाहलीं शतवरि हे आपलीं लेकरें
पालावी बहु द्रव्य देति तुजला हे आपलाले करें. ॥ ३५
पित्याची मृदू बाल भावीक गोठी, परीसूनि हासे चिदानंद पोटीं; ।
अजी! हे मला बांधुं इच्छी बळें जी, जयाची तया कल्पना कीं फळे जी.॥३६

(पद.)

हे बांधूं इच्छी मातें अजि । ताताता. ॥ ध्रुवपद. ॥
भारी बळयाला आजी । फावले अंगाला काजी ।
राजीव रे या समाजी । आताता ॥ हे बांधूं० ॥ १ ॥

पाजी हे गोरसा पाजी । गाजी वाजी दारामाजी ।
म्यां जी कां सांगणें दाजी । माताता ॥ हे बांधूं० ॥ २ ॥
आनंदनंदनबाजी । प्रभु सांगे ऐकें बाजी ।
ज्ञानें वोळखाजी । आताता ॥ हे बांधूं० ॥ ३ ॥ ३७

(श्लोक.)

आतां पुरे दंड, सुतान कोपा, कोप अशादीन पुतान कोपा ।
कोपारका, आप्त तुते असेना, सेना आणि रावसमानसे ना. ॥ ३८

(पद.)

तुझे कोपे कैसे जगजीवे बा, जगजिवना ! ।
तारी अथवा मारी गति नाहीं तुजवीणा.॥ ध्रुवपद. ॥
महामोह मदेमने मानो ना तुज देवा ।
जाल्या श्रम देहीं बहु बा तोही करितो सेवा. ॥ तुझे० ॥ १ ॥
किवतुते मोठी जिव जिव वितोसि मायपोटी ।
निव आठविणा म्हणे मी मी हे टेवी खोटी. ॥ तुझे० ॥ २ ॥
आनंदें नंदननंदे बोधुनी केला साधा ।
आनंदनंदन म्हणे वदोनि सुख साधा. ॥ तुझे० ॥ ३ ॥ ३९

(श्लोक.)

श्री भक्तवत्सल प्रभू भवतापहर्ता कर्ता सुरक्षण सुरा दनुजप्रहर्ता ।
या पाहुंद्या मज पुढें कशि गांठ केशीं, द्याया तुम्हा अणि तया सरि गाठ कैसी.॥
पुढें दार ते दादुला पाठि लागे, बरा संग हा धातया पाठि लागे; ।
कृपे पाहतां जाहली वेगळाली, व्रजा जी अभीमानबुद्धी गळाली. ॥ ४१
अधवदन विलापे चालिले आत्मगेहा, ।
जन वदति हरी हा या जगीं आत्मगेहा; ।
कणव करुनि कृष्णें सोडिलें आजि यातें
पुरजन सहनारी राहणे राजि यातें. ॥ ४२
दावोनिया चरित लोपवि गोपती तो, वाणी जया निशिदिनींच तरा पतीतो; ।
तो पूर्ण ब्रह्म भरला व्रजलोक छंदी, आनंदनंदन कवी सिरिं पाद वंदी.॥ ४३

## नवरसचरित्र.

(श्लोक.)

श्री[1]यादवेंद्रचरितामृतपानसेवा, संसारि ज्या कुमति त्या मृत पानसे वा, ।
जेवा किं जी करुन पाक हरीरसाचा, ठेवाल मोक्षसदनांत शरीर सांचा. ॥ १

सशारी कन्येचा तनय सुत राया सुवचनें
प्रबोधी संतोषें श्रवणपुटिं ते शब्दरचनें, ।
जयाची माया हे भुवन भुलि लाऊनि फिरवी
न मानातें पावे विधि हर शशी [2]वासव रवी. ॥ २

ताराया सुजना जनार्दनमना, मानी विधीभाषणा,
झाला [3]आनकदुंदुभीनृपतिचा [4]तान्हा अरीशासना; ।
[5]प्रगटावें स्वगुणासि, गोवन गणा संगें क्रिडावें वना, ।
भावोनी असि [6]भावना, त्वरित ये नंदाचिया भूवना. ॥ ३

(पद.)

खेळे [7]ब्रह्मभूपाळ । [8]व्रजिं त्या नंदि[9]तें नंद नृपाळ. ॥ ध्रुवपद. ॥
शरणाचे [10]भवभयहरणातें । वरणा येत कृपाळ. ॥ व्रजिं त्या० ॥ १ ॥
अदट धिटास दटाउनि गोपी । वरि घालिति अमुपाळ. ॥ व्रजिं त्या० ॥ २ ॥
बालक कवी आनंदतनय गुण । चाळक तूं विभुपाळ. ॥ व्रजिं त्या० ॥ ३ ॥ ४

(श्लोक.)

[11]कालिंदीतटिं [12]गोमटी व्रजगटी घेवोनि संगें हरी
दावी गो[13]वळसा विलास सुरसा नांदे हरी [14]मोहरी, ।
आलापोनि स्वरा [15]सरांग सहसा छत्तीस भार्यांतरी
गातां तर्क वितर्कभाव उठती गोपीचिया [16]अंतरीं. ॥ ५

सारावा घरचा विचार, घरचा राचा नसे मानसा,
चारावा रस वासुरांस न सुचे, लावी गुरां रानसा, ।
पोरा चाचर चाकरासि कथुनी दारा समूदायसीं
जाती त्या [17]नवपंकजाक्षि [18]ललना, वाणू कथा कायसी ? ॥ ६

---

१. कृष्णचरित्रसुधापान. २. इंद्र. ३. वसुदेवाचा. ४. पुत्र. ५. दावावें, प्रकट करावें. ६. विचार. ७. ब्रह्मांडपालक. ८. गोकुळांत. ९. आनंदयुक्त. १०. संसार. ११. यमुनातीरीं. १२. सुंदरी. १३. गवळ्यासारखा. १४. मोहित करी. १५. रागयुक्त. १६. मनांत. १७. नूतन कमलनेत्रा. १८. स्त्रिया.

१६ आ० स्फु०

(पद.)

चाला गे ! वनवासा । स्थळिं ज्या जगजीवन वासा ।
कामरिपु वणवासा । अंतरिं लागे. ॥ १ ॥
जरि लाजाना जन बोला । तरि साजा साजण बोला ।
पर जासा जन बोला । बोलति बाई ! ॥ २ ॥
या नंदतनयाला । वंदा द्या तनयाला ।
आनंदतनय याला । निजपद दावी. ॥ ३ ॥ ७

(श्लोक.)

पंथीं····कथित गूणही वेळ वांचे मंथी भवाब्धि, करिं वाद्यहि वेळवाचें, ।
वंदीति ज्यासि शिरसा सुर वाड लाडे, वंदी भुजेसि करु सासुरवाड लाडे. ॥८
पोटीं ठसाउनि····निश्चितसा भरोंसा, संसार कुश्चित तयासि भरो भरोसा, ।
वाटे यथार्थ तरि जातिच काननातें, निंदीति एक सति त्या शशिआननातें.॥९
'कांगे ! रानीं जातसा रान वाटे, दुष्कर्मीं या व्हाल हैराण वाटे ।
देवें जोडा जोडिला त्यासिं भोगा, केंवी गुंता या हरीच्या सुभोगा.'॥ १०

(श्लोक.)

'धिग् धिक् कर्म ! कुळासि नासुनि परब्रह्मींच झाल्या पिशा
काशाला वदनें जनीं मिरवितां? लंघून जा जग्दिशा ? ।
सासुर्वास नसेच लाज तुमतें आतांचि ना पारकी
विष्यासक्तचि होवुनी रमतसां, केंवी तनू पारकी ? ॥ ११
नंदाचा सुत चोरटा धटधिटा दाटावितो उद्धटा
वाटावा विट वाइटा, परि खंटाटोपी दिसे गोमटा ।
मोठा थोट लबाड आणि लटका कांटाळवाणा खटा
कट्टा सर्व झटांत, का कटकटा झाल्या कशा लागटा ?' ॥ १२

(पद.)

'सुमतिमति कागमति गमता. ॥ ध्रुवपद. ॥
आगमनिगमका मति उमग न गमता । सुगम सुगम मनीं लाउनि ममता.॥ १ ॥
अगुण गुणागुण लाउनि गुणता । सगुण सगुणसा गुण कां श्रमतां ? ॥ २ ॥
नंदन तुज उमजुनि नुमजविता । आनंदसुत प्रभु समजुनि भजता.' ॥३॥ १३

---

१. वाचेनें. २. संसारसमुद्र. ३. वेळूचें. ४. मस्तकानें. 'शिरसा' ही 'शिरस्' शब्दाची तृतीया आहे. ५. मोठे, थोर. ६. कुत्सित, निंदित. ७. त्रस्त, पीडित. ८. जोडपें, स्त्रीपुरुषयुग्म. ९. वेश्या. १०. उपद्यापी. ११. सुंदर. १२. वेदशास्त्रें.

(श्लोक.)

दुरुक्ती युक्तीनें वदुनि, निज शक्तीस मिरवी,
नसे भक्तीचा तो लव मनिं बया वृत्ति फिरवी; ।
अहंकारें थोरें गजबजित घोरे भलतिसी
नसे ठावा कीं हा [1]जलधितनयावल्लभ तिसी. ॥ १४

'या बऱ्या परतुनी सदनासीं काळिमा तुमचिया वदनासीं ।
लाउनी करविती [2]कंदनासी मूरवी हुळहुळ्या मदनासी.' ॥ १५

उत्तरें वदुनिया [3]निकरानें घेतला उदककुंभ करानें, ।
जाय नायक घरासि विरामा शंकल्या बहु मनीं [4]व्रजरामा. ॥ १६

होता कुंजवनांत कामजनिता तो कामिनीच्या [5]जथा
माथा वंदुनि पाय स्फुंदुनि यथा तेथेंचि तो ऊलथा. ।
कथिला त्या प्रमदांसि बोलति, 'वृथा आतां जिणें सर्वथा'
ऐकोनी हरि 'थांब थांब' वदला जो दाविता [6]चित्पथा. ॥ १७

(पद.)

'वारिसि ना विपदा, तरि सखया! काय जिणें संसारीं? ।
तारिसि ना सुपदा देउनियां आम्हां दीना [7]कंसारी. ॥ ध्रुवपद. ॥
सांडुनियां संसारपसारा धरिलें तुज हातीं, ।
याहि वरी गांजिताती दुर्जन विलोकुनि लोक पाहाती. ॥ १ ॥
दुष्कृतिच्या सुकृति मिळतां ही, दुष्कृति वदती वांया, ।
काया वांया श्रमवुनि काया जाइच ना [8]भवमाया.' ॥ २ ॥
दीनवदन [9]वनिता वदतां तो दीनबंधु समजावी, ।
आनंदात्मजविभुची सत्ता [10]लीनपणें उमजावी. ॥ ३ ॥ १८

(श्लोक.)

वदत [11]मृदुगिरा तो सार वेदोदरींचा, 'सकळ हरिन निंदा दुष्टती सुंदरींचा.' ।
भजसि निजजनाच्या कारणें रूपडें हे अघटित घटनार्थां धारणें कीं घडे हें. ॥ १९

व्यापिली मदभरें [12]प्रमदा ते, माझिया तुम्हि तुम्हा श्रमदाते, ।
गाजवीत फिरते नवतीते साजवीत न वरे नव तीते. ॥ २०

जधीं जाय ते माहिरा गोपदारा, तधीं जाणवा [13]पेंधिया चोपदारा; ।
वनीं वेणुच्या जेंवि वन्हीच पेटे तईं दाखऊं थोर माया [14]चंपेटे. ॥ २१

१. लक्ष्मीचा पति. २. युद्धास. ३. आग्रहानें, जोरानें. ४. गोकुळांतील स्त्रिया. ५. समुदाय, जमाव. ६. ज्ञानमार्गास. ७. कृष्णा, ८. संसाररूप मोह. ९. स्त्रिया. १०. नम्रभावें. ११. कोमल वाणीनें. १२. तरुण स्त्री. १३. कृष्णाचा मित्र. १४. हात, झपाटा.

(पद.)

लाडिस नाडिन गे ! ॥ ध्रुवपद. ॥

गाढि लबाडिक बाडि न वदली । धांगडि धाडिन गे ! ॥ १ ॥

धाडि धसाडीस नाडिन उमजे । चाडिसि पाडिन गे ! ॥ २ ॥

जाडिवसाडी **आ**नंदतनयप्रभु । भवरस मांडिन गे ! ॥ ३ ॥ २२

(श्लोक.)

सघन सकृप बोला तोष पावोनि दारा,
बहुबहुत बरा जी ! दंभ तीचा विदारा; ।
नमुनि पद विलासा रंभिती संभ्रमानें
विलसति [1]व्रजबाळा [2]मन्मथाच्या भरानें. ॥ २३

जो सज्जन जनिंचा कृपाळ बरवा भूपाळ वैकुंठिंचा
जो आराध्य कपाळ पाणि मनिंचा [3]वेल्हाळ सत्कांठिंचा, ।
जो दासा कनवाळ, नाद सकळा निग्मांग पड्‌ घंटिचा
तो गोपाळ सतोष नाचत तवे सोडी जुडा गुंठिचा. ॥ २४

(पद.)

नाचत गोपगडी । मुरलीचे छंदें. ॥ ध्रुवपद. ॥

द्वयकरिं द्वयकर कवळित [4]ललना । मधें कृपाकर घालित फुगडी. ॥ १ ॥

पीत घटीसि धरी हरि करपुटीं । नारि विराजिति अभिनव लुगडीं. ॥ २ ॥

**आ**नंदसुतकवी [5]अभिनव मानुनी । ठेवित हरिपदीं शिरसह पगडी. ॥ ३ ॥ २५

(श्लोक.)

मध्ये **मा**धव [6]अंगनाद्वय धरी मध्यांगना दोंकडे
आपण् होवुनि एकला बहु रुपें दावीतसे रोकडे. ।
आम्ही फार, मुकुंद एक, परि हें हे आठवेना तया
गोपी गोप सख्या करीं धरुनियां त्या नाचती [7]अद्वया. ॥ २६

ऐसा [8]रास विलास [9]सारुनि मुखें [10]लावण्णिच्या दीपिका
आज्ञा मागुनि चालिल्या स्वसदना त्या सर्व ही गोपिका ।
गेली यावरि, गोपिनाथ सकळां गोपांसि आज्ञा करी
'जालीरे ! सह [11]सांजवेळ सरिसी गाई वळा लौकरी'. ॥ २७

---

१. गोपबालिका. २. मदनाच्या. ३. प्रिय. ४. स्त्रिया. ५. नवल, कौतुक. ६. दोन स्त्रिया. ७. श्रीकृष्णा. ८. नृत्यक्रीडा. ९. करुन, उरकून. १०. सौंदर्याच्या ज्योति. ११. संध्याकाळ.

गाई ठेवुनि गोठणीं यदुपती आला स्वयें मंदिरा,
प्रक्षाळीत पदा करें करुनियां सेवी सदा इंदिरा; [१]।
माता दे दधिवोदनासि वदते 'ताता! भुकेलासि रे!' [२][३]
पोटीं बाळक भावि त्या चरणिं ज्या ब्रह्मादिकाचीं शिरें. ॥ २८ [४][५]
पहाटेसिं हरि गोवळबाळा घेवुनी जंव निघे नरपाळा, ।
देखिली पथि सुनिंदक नारी दुग्धमाखण दधी विकनारी. ॥ २९ [६]
दिसे साजिरें कुंकु ईचे कपाळीं, असे माहिरा जावयाचीच पाळी; ।
'गडेहो! नका आजिचे दीस धंदा, इला दावणें चोज कांहीं मुकुंदा! ॥ ३०
गेली तातगृहास गौळिण, तदा श्रीकृष्ण लीला करी,
गोपींचा भ्रम वारुनी गतिस दे सद्भक्तिला लौकरी; ।
घेतो अष्ट निविष्ट एक रुपडें जोडा तिचे गेहिंचा
तैंचा रूप गुणें उणा न सहसा जो पालटा देहिंचा. ॥ ३१
काळा वर्ण, विशाळ कर्ण, नयना एकाच तेजावळी,
तो जैसा कुरूप चिद्रुप तसा रूपें धरी जावळीं ।
हातीं घट्ट, शरीर घट्ट, प्रथमे येकाचि ये सासुरा,
जामातासि निरीक्षुनी स्वसदनीं सन्मानि तो सासुरा. ॥ ३२
क्षाळुनी पदासि विष्टरासि देत प्रीतिनें, [७]
बैसला उगाचि आसनीं उदासवृत्तिनें; ।
देखतां स्वभाव तो मृदु श्वशूर त्या वदे,
'तूमचे स्वअंतरासि क्रोध काय ठाव दे?' ॥ ३३
'कामासि मामा! त्यजुनी स्वधामा, आणीतसां, चित्त नव्हे द्विधामा, । [८]
मातें पुसीना न पुसेचि माते, माते प्रमत्ते धरिनाचि माते. ॥ ३४
न्यावें घरा क्रोध किजे क्षमा जी!' तों दूसरा देखत चक्षुमाजी; ।
सासे वदे, 'कां असि धाडवीता, हे लाडकी आणुनि लाडवीतां?' ॥ ३५

(सवाई.)

माजघरांत तिजा वर जावुनि वोढित नारकरास बळानें,
पाडुनि दारवट्यांत दटावित हाणित थाप मुखांत सेळानें; । [९]
'फार घडीघडि येउनि धांगडीसी फिरसी····तरणी तें,
कोण गडी लुगडी घडि देत कसी उघडी घडिसी करणी ते.' ॥ ३६

---

१. लक्ष्मी. २. दहींभात. ३. बाळा. ४. मानी. ५. मस्तकें. ६. लोणी. ७ दिवशीं.
७. आसन. ८. आपल्या घराला. ९. बळानें, झपाट्यानें.

(श्लोक.)

तो गोप कांतेसि म्हणे, 'मुलीला गे! वोढितो कोण? भुले भुलीला.' ।
ते पाहतां तीन उभे तिठाई, तीघां प्रती वाक्य वदे धिटाई. ॥ ३७
देखुनी उभयतां चेकती ते, भासती जिवन वेंचकती ते ।
सारिखी तनु अभिन्न तिघाई, आपणांत करिती अति घाई. ॥ ३८
जेथें व्रजाची सकळीक मांदी, आली उभी बाहिर आणि सांदी, ।
'पाहा कसे हो! नर कोण काकी, कां झोंबती ईस बळें ऍकाकी?' ॥ ३९
तों चवथा चवताळुनी वधु बळें वोढी म्हणे, 'बायको
माझी हे, तुम्हि कोण? कोठिल? कळी कां वोढतां नायको.' ।
पोंचारी तंव पांचवा, 'अजि! अजी चालाचि पंचायती
तेथें होइल न्याय तोचि बरवा, लाहे वधू आयती.' ॥ ४०
येती गोकुळिंच्या समस्त युवती ऐकोनि तो कांहवा
धापा देतचि धांव घेतचि रिघे त्या संगमीं साहवा. ।
पांचां वारुनि 'साच मीच' म्हणतो, 'यातें अजी राहवा,'
गौळी बोलति, 'जी! निवाड बरवा होईल तो पाहवा.' ॥ ४१
ते हांसती खदखदां जन हात वाजी, साचे सरीच प्रगटे नर सातवा जी! ।
नाहीं जगांत सरसी नर मंडळी ते, एका स्त्रियेसि वरली वर मंडळी ते. ॥४२
'सारीं रूपें स्वस्वरूपासमान, द्यावा कैसा एक रूपास मान? ।
शंभू स्वायंभू नकारी निवाडा, आम्हां मर्त्यां त्याहुनि काय वाडा?' ॥ ४३
झोटी वोढित आठवा नवरि हे सोडा अरे! सात हो!
नव्हा मुख्य उगाच शंकित मुखा स्पर्शोनिही हात हो ।
आहे ती नव नोवरे परिकरें हे केलि जों नोवरी
आतां काय करील हेतु नकळे कौणा गडे नो! वरी? ॥ ४४
महादुःखें बाळीसहित जननी तात रडती,
'दिली तैं एकातें नवजण दिठीं केंवि पडती?' ।
तदा प्रौढा नारी कथिति तिचि ती दुष्ट करणी
सदा निंदी लीला प्रभु विचरिजे त्या प्रकरणीं. ॥ ४५
इणें द्वेषिला कृष्ण दुष्टापराधें, कसें पाविजे श्रेय श्रेष्ठापराधें? ।
खरा सोहळा आजि दावी सतीचा, बरा भासवी मेळ द्वारीं पतींचा. ॥ ४६

---

१. हें मुलीचें नांव. २. भय पावली. ३. स्त्रीवर्ग. ४. बोले. ५. गोंधळ, कोलाहल. ६. कल्याण, यश. ७. थोरांचा अपराध केल्यानें.

'अगे! वोळखेया नवा कोण तूझा? तया दे वपू, केंवि लावीसि झूंजा? ।
जरी वाटती आठ सोंगें उडावीं, तरी गांठ या आठव्यासीं पडावी!' ॥ ४६

ऐसा बोध विबोधितां युवति ते दाक्षायणातें त्यजी
जी! जी! **श्री**पति! सर्व मायिक प्रभू तूं या जगीं सत्य जी! ।
माझी मंदमतीच पातकि अती, मी पामरी पाव तूं;
पावन् नाम खरें करींच सखया! घे सत्वरीं धांव तूं. ॥ ४८

(पद.)

जगजिवना जिवबी धावरे!, भवजलधि नलगे थावरे! ।
मन दशदिशाला वावरे, परि **ह**रि! तुं माया माव रे! ॥ ध्रुवपद.॥
मति भ्रमित मदानें थोरसी, अतिलाभाला मी चोरसी ।
बिडालक[1] जैसे गोरसीं, आतां सत्वरि मिळवी सौरसी. ॥ १ ॥
अभिमानें मानें आपणा, भ्रम रज्जु जेंवि साप ना ।
तद्भावें येणें आपणा, निरसे हात मज गव्यापणा ॥ २ ॥
विद्वज्जनवचना कर्णिता, सख्या! **ज**लनिधीतनया पर्णिता ।
गतिप्रद उत्तम आचरणितां, सुखी **आ**नंदतनय कवि वर्णितां.॥३॥४९

(श्लोक.)

जो **शं**भू जपिंचा घनस्वरूपिंचा आद्यू जगद्रोपिंचा,
योगी हृत्कुपिंचा सुतोय बरवा सर्वात्मता गौरिचा, ।
अग्नीभव धुपिंचा सतेज दिपिंचा सद्भाव आटोपिचा,
होते निंदिति निंद्य यद्यपि **ह**री केंवा करी गोपिचा. ॥ ५०
लोपोनि आठरूप दावित एकलाची, ने स्वगृहासि गति धन्य तया लिलांची. ।
ते कोणते नव हि मानव सांगिजेती, संतानुमान मनिंच्या गति पांगिजेति.॥५१
पहिला जीव दुजा शिवाचि त्रिगुणी तो तीसरा नोवरा
चारी देह खरेच पंचविषय जो या जिवा भोवरा ।
साही दुष्ट विकार सप्तम तुम्ही धातू धरावी मना
अष्टौ काम रसा नवासि समजा ते हे अशी भावना. ॥ ५२
ऐसा विलास रचुनी निववीत गोपी, तीची हरोनि कुमती सुमतीस थोपी, ।
दावोनि रूप लपवी अजि धन्य माया, **आ**नंदनंदन प्रभूपदीं या नमाया.॥५३

---

१. मांजर. २. दुग्धीं.

# आनंदतनयकृत पदांचें परिशिष्ट.

## भक्तिपर पदें.

### पद १ लें.

जय जय जगदंबे ! ॥ ध्रुवपद. ॥
वरदे रुचिराधरबिंबे ! । शरदिंदुशुभाननबिंबे ! ।
वर दे! मज आदिशिवे! प्रतिबिंबे! ॥ जय जय० ॥ १ ॥
परि परिपालन भक्तकदंबे! । परमेष्ठीमूळ तदंबे ।
करी बो! मज पावन चारुनितंबे ! ॥ जय जय० ॥ २ ॥
कडिये लाविन हेरंबे ! । थडिये मज पाव त्रिलंबे ।
घडिये आनंदतनय न विसंबे. ॥ जय जय० ॥ ३ ॥

### पद २ रें.

कल्याणं कुरु कार्मुकपाणे ! कौसल्यानंदा ! ।
कंजभवादिककल्पकतरुवरकलिहरसुखकंदा ! ॥ ध्रुवपद. ॥
सीतावदनसरोज[1]मधुव्रतशिक्षितदशवदना ! ।
शीतांशु[2]प्रभकोमलनखमुखशतशिरजितमदना ! ।
सीमविरहितोद्दामपराक्रमसिंहोत्तमकदना ! ।
शीलं शुभमिह देहि सनातनशिवमुखसुखसदना ! ॥ कल्याणं० ॥१॥
पाथोनिधि[3]कृतपाषाणप्लव[4]पाकांतकपोशा ! ।
पाणिविराजितचारुशिली[5]मुखपार्थिवकुलतोषा ! ।
पापजनावलिपावनसुचरितपादोद्धृतयोषा ! ।
पाहि परात्पर पुरुष ! मामिह पातकजलशोषा ! ॥ कल्याणं० ॥ २ ॥
तारेशांतक ताराधिपमुख तारकमणिहारा ! ।
तालविभेदन तामरसेक्षण[6] तामससंहारा ! ।
तापसमुनिजनतापनिवारण ताटिकोद्धारा ! ।
तारय मामानंदसुत प्रभो तात दीनोद्धारा ! ॥ कल्याणं० ॥ ३ ॥

### पद ३ रें.

श्रीरामा मंगळधामा मंजुळनामा ।
दशरथनंदन दशमुखभंजन दशशतकरकुलललामा[7] ! ॥ ध्रुवपद. ॥

---

१. कमल. २. चंद्रप्रभ ३. समुद्र. ४. होडी. ५. बाण. ६. कमलनेत्र. ७. सूर्यवंशभूषणा.

शिव जाणे तव गुणमहिमा रे! निगदितनामा, ।
लव जाणे तव पदमहिमा रे! द्विजवरवामा[1], ।
स्मरति निमिषभरि निरतिरहित जरि तरतिल जड जिव सकामा. ॥ १ ॥
भुजविक्रम तव गुणचापा रे! अवगत बापा, ।
समजे तुज जलनिधिभूपा रे! स्मरसि स्वरूपा, ।
रदन किमपि दळ विदरिति रिपुकुळ पदतळ नमुनि च तमामा. ॥ २ ॥
समजें तुज निजजनबंधू रे! दशमुखसिंधू ।
तव हृदयें सख्यासरसिंधू रे! करुणासिंधु ।
जोडुनि करयुग कोड करुनि आनंदतनय करि प्रणामा. ॥ ३ ॥

## पद ४ थें.

चाल सजणा राजिवनयना[2]! । तुजवांचुनि सर्वेहि श्रम ना. ॥ ध्रुवपद.॥
लटकिया प्रपंचपायीं गुंतूनियां काय करावें ।
दुर्लभ कीं तनु मानवी हे जन्मुनियां व्यर्थ मरावें ।
दारादिक सुत खाणारीं यास्तव परवित्त हरावें ।
सरतां आयुष्य अशेष[3] कालगृहीं करणें क्रमणा. ॥ चाल० ॥ १ ॥
लालुच लाविलि तईं इंद्रिय हे कामादिक विकार[4] यांहीं ।
त्यागिलि ते उत्तम कर्में भजनादिक सद्विद्याही ।
विषयाच्या निजसंपर्कीं खुंटविल्या निष्ठा त्याही ।
विचरितांचि ऐशा संगें नानापरि शेवटीं श्रम ना. ॥ चाल० ॥ २ ॥
तव पदीं मारुनि मुरकुंडी बसलों निश्चय धरुनीयां ।
एकवटोनि अघवीं करणें[5] धरली दृढ मन मारुनीयां ।
तारीं अथवा मारीं मलाही हा मायाभ्रम वारुनीयां ।
आनंदतनय कवि विनवी येंई येंई बा सीतारमणा! ॥ चाल०॥ ३ ॥

## पद ५ वें.

घालूं मी कवणा भार? । तुजविण रामा हो! ॥ ध्रुवपद. ॥
मायिक[6] संपद सर्वेहि सोयरे । ना कोणी आधार. ॥ तुजविण० ॥ १ ॥
मीं पडलों भवसागर[7]डोहीं । कोण करिल भवपार? ॥ तुजविण० ॥ २ ॥
आनंदसुत म्हणे तुजवांचोनि । नेणें आणिक सार. ॥ तुजविण० ॥ ३ ॥

---

१. अहल्या. २. कमलनेत्रा. ३. सर्व. ४. लोभ मोह मत्सर इत्यादि. ५. इंद्रियें. ६. मिथ्या, असत्य. ७. संसार.

### पद ६ वें.

जय नंदकुमारा ! ॥ ध्रुवपद. ॥
ये गा! तनुनिर्जितमारा[१]! । ये गा ! मुनिलक्षसुमारा! ।
ये गा! सुखदायक अतिसकुमारा! ॥ जय० ॥ १ ॥
यमुनातटपुलिनविहारा ! । कमलाकरकौस्तुभहारा ! ।
शरणागतपालन अघ[२]परिहारा! ॥ जय० ॥ २ ॥
भववारिधि[३]पारउतारा ! । बहुधाकृत धृतअवतारा ! ।
सदया आनंदतनयदातारा ! ॥ जय० ॥ ३ ॥

### पद ७ वें.

अजि मज वनमाळी ! सांभाळीं । नमितों तुज निजभाळीं.॥ ध्रुवपद. ॥
दि[४]ठी करुनि कनवाळीं, । करकमळें मज कुरवाळीं. ॥ अजि० ॥ १ ॥
तुजविण प्रभु! ये काळीं । न दिसे प्रेमी प्रेमसुकाळी. ॥ अजि० ॥ २ ॥
न घालीं विषय पाहाळी । आनंदतनयप्रभुसी न्याहाळी. ॥ अजि० ॥३॥

### पद ८ वें.

ये दयाळा सदय हरी ! ॥ ध्रुवपद. ॥
तुजविण कोण हरिल शिण अंतरिं । प्रगट निकटे भयसंकट संहरी. ॥ १ ॥
कमलनयन फणिशयन कृपानिधि! । निरखुनि रजतमगुणगण परिहरी.॥२॥
नंदसुता! आनंदसुता तव । छेद सदा भव[५]बंधन दुर करी. ॥ ३ ॥

### पद ९ वें.

सदया ! येईं उदारा रे !। अजि नंदकुमारा ! ॥ ध्रुवपद. ॥
सदया ! हे तुझी कीर्ति पुराणीं । यमुनातीरविहारा रे ! ॥ १ ॥
कालियफणिफणनाट्यमनोहर । पदद्वय दावीं सकुमारा रे ! ॥ २ ॥
आनंदसुत प्रभु सद्गुणवर्या ! । ललितलीला अपारा रे ! ॥ ३ ॥

### पद १० वें.

श्रीरंगा ! ये रे ! ये रे ! ॥ ध्रुवपद. ॥
अंबऋषीकार्यास्तव घेसी दशअवतार फेरे, ।
जलचरवनचररूप त्यागुनी उरले दर्शन दे रे! ॥ श्रीरंगा० ॥ १ ॥
गोपाळांसहित वळसी वत्स वृंदावनिं दनुजा रे ! ।
अवलोकुनि वत्सासुर कपटी त्राहाटुनि यमुनामोह रे! ॥ श्रीरंगा० ॥२॥

---

१. स्वशरीरानें जिंकिला आहे काम ज्यानें असा. २. पाप. ३. संसारसागर. ४. दृष्टी. ५. संसारपाश.

श्रमलासी हयशासन करितां म्हणतां 'होरे होरे,' ।
क्षणभरि **पां**डुनंदन हस्तीं देउनि तुरंगदोरे. ॥ **श्री**रंगा० ॥ ३ ॥
**का**ळयवन रिपु आला म्हणउनी पळशी कांपत **मु**रारे ! ।
अभित होउनि निर्भय **आ**नंदतनया आळंगीं रे! ॥ **श्री**रंगा० ॥ ४ ॥

**पद ११ वें.**

भज मानस भज मानस **गौ**रीबालं । कटिवेष्टितव्यालं. ।
शुंडासहगंडविराजितभालं । शशितिलकविशालं ।
रक्तोत्पलवत् करतलकालं । भवभयनाशनपरमकृपालं ॥ १ ॥
लंबोदरलंबितमणिमयमालं । वंदित[1]सुरपालं ।
दूर्वांकुरमृ[2]गमददिव्यकपोलं । धृतनीरं[3]जनालं ।
धिकूतान् धिकूतान् धिमिकिट तान् किट किट किट धिमिकिट तांडवशीलं॥२॥
वीणास्वरसंगीतमृगतालं । ताडितकरतालं ।
गायंतं मधुरावाणीमूलं । निरसितभवजालं ।
श्रवणें सद्गुरु **आ**नंदनंदन पदरज तोषिति भजनें सार्वकालं ॥ ३ ॥

**पद १२ वें.**

भज **रा**घवपाया. ॥ ध्रुवपद. ॥
धरिसी किति मनीं कामा या । युवती रतिसहित रमाया ।
त्यजुनियां सकळहि दुस्तर माया. ॥ भज० ॥ १ ॥
दृढहो नामामृत गाया । क[4]लुषांबुधिंतून निघाया ।
चुकवाया कृ[5]तांत दुस्तर माया. ॥ भज० ॥ २ ॥
सं[6]सारानळ शमवाया । कैवल्यपद पावाया ।
वदतो **आ**नंदतनयकविराया. ॥ भज० ॥ ३ ॥

---

## उपदेशपर पदें.

**पद १३ वें.**

**नं**दाचा सुत गा । गडे हो ! ॥ ध्रुवपद. ॥
घडिघडि मोडी ब्रह्मांड हृदयीं । एवढा अद्भुत गा ! ॥ गडे हो० ॥ १ ॥

---

१. इंद्रम्. २. कस्तूरी. ३. कमल. ४. पापसागरांतून. ५. यम. ६. अग्नि.

नाममण्याची माळ मनानें । प्रेमें गुंफी सुत गा ! ॥ गडे हो० ॥ २ ॥
आनंदसुत म्हणे भव[1] भजकांचा[2] । वीक्षणें करि हुत[3] गा ! ॥ गडे हो ०॥

### पद १४ वें.

भज रे मन प्राण ! गोपाला. ॥ ध्रुवपद. ॥
बालाणेरभोक्तिक(?) काला । हालाविष अमृत प्याला ।
घाला नेण्यूं या स्वात्मसुखाला. ॥ भज रे० ॥ १ ॥
सालाविद तंतुचि नाला । वाला जगचित्रपटाला ॥
भ्याला देखुनि स्वजउरगाला. ॥ भज रे० ॥ २ ॥
आला गेला ना सरला । भरला हा शब्दचि उरला ॥
लीला आनंदतनय प्रभुजीला. ॥ भज रे० ॥ ३ ॥

### पद १५ वें.

भज भज गोविंदं. ॥ ध्रुवपद. ॥
तनुभाकृति मन्मथनिंदं । मंदस्मितमुखारविंदं ॥
राधावदनाब्जमरंदमिलिंदं. ॥ भज० ॥ १ ॥
चरितामृतनंदितनिंदं । वृंदारकपरमानंदं ॥
वृंदावनपुलिनविलासच्छंदं. ॥ भज० ॥ २ ॥
ललनासुखरतिनिष्पंदं । कलिताखिलपातकमंदं ॥
नितरामानंदतनयसुखकंदं. ॥ भज० ॥ ३ ॥

### पद १६ वें.

बालं भावयतं कुंवलयदलनीलनिभं.[4] ॥ ध्रुवपद. ॥
दमितसकलदनुजदलं शमितविषयहलाहलं. ॥ १ ॥
फलितसुकृतनयनफलं कलितकलाकुतूहलं. ॥ २ ॥
आनंदतनयबलं दीनमनोमीनजलं. ॥ ३ ॥

### पद १७ वें.

सकुमार दयानिधि रे ! । भज रे ! ॥ ध्रुवपद. ॥
सकुमार दयाघन मारमनोहर[5] मेघशरीर हरी ।
रिपुभंजन कंजविलोचन[6] सज्जनचित्तसुधालहरी ।
वनवारणतारणकारण तो रणरंगण वीर हरी ।
शरणागतपालन लोलमलामरणादि मलासि हरी नृहरि. ॥ १ ॥

---

१. संसार. २. भक्तांचा. ३. दग्ध. ४. कमलपत्रनीलसमम्. ५. मदनासारखा सुंदर. ६. कमलनयन.

धृतमंदर सुंदरमंदसितस्मितनिर्जितशीतकळा ।
मुरमर्दन देव जनार्दन तोचि अलिप्त जना सकळा ।
अतिसोदर वेणुतता कलिताधर दारितदैत्यबळा ।
करि त्यापरि भव्यनुति क्षितिजापतिच्या परि दीर्घमती सबळा. ॥ २ ॥
कमलाकर शंकर चित्तचकोर सुधाकर लोकपति ।
अतिमंजुलता सुर कोकिल बोलति सिद्ध तुतें जपति ।
मज पाव हरी न दिसे दुसरी गति वारि भवार्थिरति ।
नर याचि रिती वदती तरि दास आनंदसुतप्रभुचे तरति. ॥ ३ ॥

## पद १८ वें.

प्राण्या! सावध रे! सावध रे! । सासि करुनि सहसा वध रे! ॥ ध्रुवपद. ॥
इंदुमुखी रति निंदी । वंदीं गुरुवरपदारविंदीं. ॥ प्राण्या० ॥ १ ॥
अनुदिनिं मानस रोधीं । तनु धन विषयसुखासि विरोधीं. ॥ प्राण्या० ॥ २ ॥
नंदसुतीं मति टिकवीं । आनंदनंदन कवि गुज सिकवी. ॥ प्राण्या० ॥३॥

## पद १९ वें.

शाबास भला रे! ॥ ध्रुवपद. ॥
तृण सकळी काळ धरा रे! । गणसी हरिभक्ति करा रे! ।
वदनीं गोविंद हरे मुरारे! ॥ शाबास० ॥ १ ॥
परिमाणपणें जळ गारे । परि मानसीं वस्तु जगा रे! ।
परमाद्भुत वाजवी नामनगारे ॥ शाबास० ॥ २ ॥
सेवीं गुरुपदांबुजा रे! । जेवीं प्रियसुधांबुधारे ।
विनवीं आनंदतनय कवि बा रे! ॥ शाबास० ॥ ३ ॥

## पद २० वें.

धरावा साधुसमागम तो. ॥ ध्रुवपद. ॥
याहुनियां निजलाभ जगत्रयीं । नाहिंचसा गमतो. ॥ धरावा० ॥ १ ॥
ज्याकरतां हृदयांत ठसावे । देहीं आगम तो. ॥ धरावा० ॥ २ ॥
आनंदात्मज विभु तो मानी । स्थावरजंगम तो. ॥ धरावा० ॥ ३ ॥

## पद २१ वें.

ऐसें करिं कांहीं, करिं काहीं । लाधली नरतनु पाहीं. ॥ ध्रुवपद.॥
देह मी भ्रांतिच नासे । अद्वय अक्रिय[1] ब्रह्म प्रकाशे. ॥ ऐसें० ॥ १ ॥

---

१. कर्महीन, क्रियाशून्य.

अतवितजाया भासे । स्वप्नीं राज्यपदारुढ बैसे. ॥ ऐसें० ॥ २ ॥
जंव न पडे **यम**पाशें । आधिंच सावध होउनि बैसे. ॥ ऐसें० ॥ ३ ॥
धरिं विद्वज्जनकासे । तर हा भवसागर उल्हासें. ॥ ऐसें० ॥ ४ ॥
गुरुचरणीं मन स्पर्शे । **आ**नंदसुतप्रभु हृदयीं गवसे. ॥ ऐसें० ॥ ५ ॥

## पद २२ वें.

दृढ धरीं चंचळ हें मन गा! ॥ ध्रुवपद. ॥
साधन करितां साधन योगें । न मनीं हे मन गा! ॥ दृढ० ॥ १ ॥
जीवशिवातें भेद नसे कई । जैसा हेम नेगा. ॥ दृढ० ॥ २ ॥
**आ**नंदात्मज बोले कांहीं । धन सुत हेम न गा. ॥ दृढ० ॥ ३ ॥

## पद २३ वें.

हें काय केलें रे! । वय वांया गेलें रे! ॥ ध्रुवपद. ॥
ध्यात धना मन ध्यानींच ठेलें । कामसुखासि भुकेलें ॥ हें० ॥ १ ॥
कोण असें तुझें कर्म उदेलें । नेणपणें सुख गेलें. ॥ हें० ॥ २ ॥
**आ**नंदतनय म्हणे भोगियलें । आशापाशें गोवियलें. ॥ हें० ॥ ३ ॥

## पद २४ वें.

**रा**मा **कृ**ष्णा **गो**विंदा **गो**पाळा । वेळोवेळां वाचेसीं लागो चाळा. ॥ ध्रुवपद. ॥
कोटी धेनु सत्पात्रें दिधल्या दाना । ग्राम कोटी आराम रचले नाना ।
या मैदानीं तो धर्म दिसे साना । नामस्मरणें महिमा सत्य जाणा. ॥ १ ॥
**गं**गास्नानें तेव्हांची कोटी केली । दानधर्मादिक पुण्यें तेथें ठेलीं ।
योगयागादिक कर्में सिद्धि नेलीं । ऐशीं नामें वाचेसी जेव्हां आलीं. ॥ २ ॥
याचि मंत्रें **ना**रदादि गाती गाणीं, । याचा महिमा तो जाणे **शू**ळपाणी, ।
नामापासीं कैवल्यमुक्तखाणी । बोले भावें **आ**नंदतनय वाणी. ॥ ३ ॥

## पद २५ वें.

शोधीं आपणा साजणा! । त्यजुनि रिपु सा जणा. ॥ ध्रुवपद. ॥
गर्वमदें किति धरसिल ताना । उगाचि नटसि उताणा ॥ शोधीं० ॥ १ ॥
होउनियां वश मन्मथबाणा । रचिसि विषयलंबाणा. ॥ शोधीं० ॥ २ ॥
**आ**नंदतनय म्हणे गुरुराणा । वंदुनि वेदपुराणा. ॥ शोधीं० ॥ ३ ॥

---

१. संसारसमुद्र. २. अलंकार. ३. सहाजण (कामक्रोधादिक). ४. ताठा.

### पद २६ वें.

देवाधिदेव देखियला डोळां. ॥ ध्रुवपद. ॥

देवरमण वसुदेवतनय सति देवकि ह्न्मनीं देवर साचा
देवरसरस सदेव जनाक्षुनि देवकीविदे वदे रमतीचा. ॥ १ ॥

ताराधिपमुख धाराधरनिभ मारासम[1] सकुमारा कृतअरि-
भारा दमुनि समारा जितधनु नाराचकितचि नारायण हरि. ॥ २ ॥

आला हृदयिं सुशाला गृहिं वनमालाधर बहु धाला जिव मग
हालाहलसम[2] झाला विषय मनाला सुदिन बहाला जिवलग. ॥ ३ ॥

बंधहरण बलिबंधन दलितकबंधपयोनिधिबंधनपटु दश-
कंधरमुखरिपुकंधरपवनसुनंदन आनंदसुत म्हणे हो वश. ॥ ४ ॥

### पद २७ वें.

राजराज विहगराजवहन राज तो. ॥ ध्रुवपद. ॥

इंद्रनीलनीलकाय, इंद्रवरद, धीर सर्व इंद्रियांत प्रगट नटत, इंद्रियां अलिप्त जो मुनींद्र त्यासि परम धुंडिती ।

विरक्त भरें देह कृशें करुनि धुंडिती ।

विचारिजेल सकळ मुखीं शास्त्रपंडितीं. ॥ राजराज० ॥ १ ॥

दर्पकागकांति रुचिर, सर्पभूषणासि सेव्य, सर्पराजसौख्यसदन, दर्प दानवांत म्हणुनि, अर्पितातित सुर नभीं फुलें ।

समर्पितातित भक्तजन शरीर आपुलें ।

सर्पराज अनळ तेही भान हरपले. ॥ राजराज० ॥ २ ॥

पंचबाणतात निखिल, पंचभुता तयासि, पंचवक्त्रगांत पूर्ण, संचला जगत्रयांत प्रपंचभंजन ।

विवंचिताचि हृदयिं उभा दनुजमर्दन ।

आनंदसुत कवि उदार संतरंजन. ॥ राजराज० ॥ ३ ॥

### पद २८ वें.

गाईन आवडिनें । तयातें. ॥ ध्रुवपद. ॥

जेथुनि हें जगडंबर जृंभित । होत निमे घडिनें. ॥ तयातें० ॥ १ ॥

ज्याच्या संनिधी न करणें गुणी। धांवत तांतडिनें. ॥ तयातें० ॥ २ ॥

जागृतिस्वप्नसुषुप्तीनदीमधें । क्रीडतसे थडिनें. ॥ तयातें० ॥ ३ ॥

---

१. काम. २. विषासारखें.

ज्याचे हे जगती जगदांतरीं । व्यापक चित्त कडिनें. ॥ तयातें० ॥ ४ ॥
आनंदात्मज तारियला भुवी । कीर्तनसांगडिनें. ॥ तयातें० ॥ ५ ॥

### पद २९ वें.

अद्वयानंद शौरी । गोविंद गोपचारी. ॥ ध्रुवपद. ॥
श्रीरंग रंग मूर्ती । घननीळ नीळकांती ।
मुखि चंद्र चंद्र ज्योती । सुंदरे शालशांती ।
आपाद वैजयंती। कुंडलें वोप[1] देती ।
मस्तकीं कुरळपंक्ती । श्रुतिभृंग रुंजताती. ॥ १ ॥
कटितटीं कांसियला । अतिपीतपट्ट पिंवळा ।
भुजदंड शुंड जैशा । रेखिल्या चित्रशाळा ।
श्रुतिवल्लभूषणाच्या । बांधिल्या ब्रीदमाळा ।
नूपुरें तोडरेसीं । गर्जती चरणकमळा. ॥ २ ॥
शिखिपिच्छ[2] मुगुटाचा । जो शिरीं टोप घाली ।
केशरी कस्तूरीचा । रेखिला टिळक भाळीं ।
आकर्ण नयन खोदी । कर्णिका कर्ण साळी ।
सांवळी मूर्ति शोभे । सुगंध उटी पिंवळी. ॥ ३ ॥
बांधिली वीरगुंठी । मणिगुंजहार कंठीं ।
वीषाण[3] कक्षिपुटीं । वरि शंखचक्रकाठी ।
वाजवी मंजुळ वेणु । देऊनि बिंबवोष्टी ।
आनंदतनय प्रभुसी । जरि पाय लागो सृष्टी. ॥ ४ ॥

### पद ३० वें.

ते नर तारियले श्रीमुकुंदें । चरणा शरण रिघाले. ॥ ध्रुवपद. ॥
मकरें[4] निजरद[5]निकरें करि[6]पद निकरें धरितां छंदें ।
'हरि रे!' म्हणतां हरिनें भय परिहरिलें जगदानंदें. ॥ ते नर० ॥ १ ॥
कुरुकुमरें[7] सती कुरळीं[8] धरिता कुरूप चढे मतिमंदे।
बाहे तव प्रभु लाहे तव पद लाहे परमानंदें. ॥ ते नर० ॥ २ ॥
ध्रुव वनिं रिघतां ध्रुवपद दिधलें जोडुनि करारविंदें[9] ।
आनंदनंदन या संसारीं तारियलें गोविंदें. ॥ ते नर० ॥ ३ ॥

---

१. शोभा. २. मोर. ३. शिंग. ४. नक्रानें. ५. दांत. ६. गजाचे पाय. ७. दुःशासनानें. ८. केश. ९. हस्तकमळें.

### पद ३१ वें.

धिग् धिग् मति त्याची. ॥ ध्रुवपद. ॥
न धरी जो स्थिति कनवेची । धृतिचें ब्रिद कंकण वेची ।
विषयी कृपणापरि जो कण वेची. ॥ धिग्० ॥ १ ॥
आशा बहु धरुनि धनाची । समजेना गति निधनाची ।
गोष्टी त्या करितो सन्निध नाची. ॥ धिग्० ॥ २ ॥
न रुची हरिगुरुचरणाची । नाहीं कर्माचरणाची ।
न रुची आनंदतनयशरणाची. ॥ धिग्० ॥ ३ ॥

### पद ३२ वें.

जगिं तोचि विलासी. ॥ ध्रुवपद. ॥
संसार हि सार जयासीं । भार्या पाहतां गुणराशी ।
जीचें तनमनधन पायांपासीं. ॥ जगिं० ॥ १ ॥
होतां दिनकरउदयासी । [१]अभ्यंग करुनि स्नानासी ।
घाली षड्रस रुचिर भोजनासी. ॥ जगिं० ॥ २ ॥
जाणे पतिच्या सुमनासी । आनंदें वर्तत तैसी ।
धन्य आनंदतनय म्हणे त्यासी. ॥ जगिं० ॥ ३ ॥

### पद ३३ वें.

अभिनव हे नव हो ! । मानव हो ! ॥ ध्रुवपद. ॥
गुणरूपमानस मानसमानसे । एकहि न दिसे सानव. ॥ मानव० ॥ १ ॥
न दिसे जन या परिचे पाहतां । [२]सुर नर [३]किन्नर दानव. ॥ मानव० ॥ २ ॥
आनंदात्मज प्रभुची लीला । एक प्रभु सेना नव. ॥ मानव० ॥ ३ ॥

### पद ३४ वें.

करूं काय अशाला ? ॥ ध्रुवपद. ॥
स्वगृहीं मणिमंडितशाला । असतां बहु शाल विशाला ।
विचरे परसदनीं उगाचि कशाला ? ॥ करूं० ॥ १ ॥
न भिये [४]तमनिबिडनिशाला । फिरतां [५]व्रज दशहि दिशाला ।
म्हणती हरतो पयदधिशाला. ॥ करूं० ॥ २ ॥
झुलवी विधि बुधसदशाला । भुलवी मनिं मृगेंद्रशाला ।
कथितो आनंदसुताख्य यशाला. ॥ करूं० ॥ ३ ॥

---

१. तैलादिमर्दन. २. देव. ३. यक्ष. ४. अत्यंत काळोख्या रात्रीला. ५. गोकुल.

**पद ३५ वें.**

मर मर तिहि लोकीं. ॥ ध्रुवपद. ॥
मायामय जगत विलोकीं । मानी श्रुति शाश्वत लोकीं ।
कैंचा कुठुनि मी उद्भवलों कीं. ॥ मर मर० ॥ १ ॥
कामाद्रीवरि चढलों कीं । क्रोधाग्नीं बहु कढलों कीं ।
दंभादिक चोरीं नागवलों कीं. ॥ मर मर० ॥ २ ॥
जननीजठरीं श्रमलों कीं । वायां वनवन भ्रमलों कीं ।
आनंदसुतनामीं ना रमलों कीं. ॥ मर मर० ॥ ३ ॥

**पद ३६ वें.**

मग कैंची शंका? ॥ ध्रुवपद. ॥
ध्यातां रघुवल्लभ लंका- । नाथांतक मनिं आलंका ।
धूतां निपटुनिया पातकपंका[१]. ॥ मग० ॥ १ ॥
दमितां बळ देहाहंका- । राचे या भ्रमलसदंका ।
पाहतां सममतिनें राया रंका. ॥ मग० ॥ २ ॥
धरितां चळमानस कंका । वरितां विरसील सुटंका ।
परिसा आनंदतनयवाग्डंका. ॥ मग० ॥ ३ ॥

**पद ३७ वें.**

त्याला शिव कैसा शिव कैसा । तन्मय झाला ऐसा. ॥ ध्रुवपद. ॥
लटिका दृश्य पसारा । जाणुनि तटला या वेव्हारा.॥ त्याला० ॥ १ ॥
मीपण भान उडालें । तेथें तूंपण सहज बुडालें. ॥ त्याला० ॥ २ ॥
त्रिपुटी[२] गेली वांया । आनंदतनय म्हणे रे सखया ! ॥ त्याला० ॥ ३ ॥

**पद ३८ वें.**

या विषयाची काय गोडी रे ! ॥ ध्रुवपद. ॥
कपिलजनक शुक विपिनें[३] धरित मति । तपि बसुनी मन कपिस म्हणवुनी. ॥ १
हाटक युवती तनु अटक करिल मन । घुटकिल म्हणवुनि चटकहि न धरी. ॥ २
त्यजुनि विषयरस भजुनि हरि सेरस[४] । विजनीं विलस आनंदतनय म्हणे. ॥ ३

**पद ३९ वें.**

तसा हरि आम्हां सांपडला. ॥ ध्रुवपद. ॥
[५]नेती नेती म्हणुनि जयाप्रती । वेद सख्या जडला. ॥ तसा० ॥ १ ॥

---

१. पातकरूप चिखलाला. २. ज्ञान, ज्ञाता आणि ज्ञेय. अथवा ध्यान, ध्याता, आणि ध्येय. ३. अरण्य. ४. गोड. ५. न इति न इति=असा नव्हे, असा नव्हे.

स्तवितां शेष विशेष विलज्जित । आथरुनि दडला. ॥ तसा० ॥ २ ॥
आनंदात्मज सद्गुरुवचनें । तच्चरणीं जडला. ॥ तसा० ॥ ३ ॥

### पद ४० वें.

म्यां काय सांगावें ? । नाम भावें ध्यावें. ॥ ध्रुवपद. ॥
संतसमागमीं संत बसावे । अंतरिं त्यांचि वसावें. ॥ म्यां० ॥ १ ॥
स्वामि ! तुझे पदपद्मीं नमावें । स्वात्मसुखेंचि रमावें. ॥ म्यां० ॥ २ ॥
आनंदतनया हें वर्म ठावें । होवुनि रंगिं उठावें. ॥ म्यां० ॥ ३ ॥

### पद ४१ वें.

मीपण हेंचि पिसें । जिवासी. ॥ ध्रुवपद. ॥
आपपया सकळांतरिं निश्चळ । चित्त चळे कपिसे. ॥ जिवासी० ॥ १ ॥
ज्ञानाविणें पाहणें नयनाविणें । जैसे मोर पिसे. ॥ जिवासी० ॥ २ ॥
आनंदात्मज बोले ब्रह्मचि । खेळे भोरपिसे. ॥ जिवासी० ॥ ३ ॥

### पद ४२ वें.

योगी असला रुसला । ब्रह्मपदीं बसला. ॥ ध्रुवपद. ॥
गजरथमंदिरशाला । त्याला सांगों काय कशाला ? ॥ योगी० ॥ १ ॥
कनककलशकुच बाला । न रुचति वितरागीया बाला. ॥ योगी० ॥ २ ॥
वसनालंकृतिमाला । पटला विटला भवभ्रमाला. ॥ योगी० ॥ ३ ॥
स्मरोनि अधोक्षजाला[1] । आनंदतनय मनीं स्थिर जाला. ॥ योगी० ॥ ४ ॥

### पद ४३ वें.

सुटलें मन माझें मन माझें । केलें सद्गुरुराजें. ॥ ध्रुवपद. ॥
लागे सहज समाधी । तेथें विषय कसा हा बाधी. ॥ सुटलें० ॥ १ ॥
अद्वयपदिंचा योगी । झाला ब्रह्मसुखाचा भोगी. ॥ सुटलें० ॥ २ ॥
आनंदात्मज बोले । चिन्मयरूपें तन्मय डोले. ॥ सुटलें० ॥ ३ ॥

### पद ४४ वें.

रघुपति दीनजनां कनवाळ. ॥ ध्रुवपद. ॥
शत्रुवरानुजपदिं जो लागे । दे सुख त्या चिरकाळ. ॥ रघुपति० ॥ १ ॥
चरणरजेंची ते जड दगडाची । झाली वधु वेल्हाळ. ॥ रघुपति० ॥ २ ॥
हेतुविना आनंदतनयप्रभु । तारितसे महिपाळ. ॥ रघुपति० ॥ ३ ॥

---

१. विष्णूला.

### पद ४५ वें.

तांडव नृत्य करी । **ग**जानन. ॥ ध्रुवपद. ॥
सकळहि देव सभेसी आले । मध्यें **शिवगौ**री. ॥ **ग**जानन० ॥ १ ॥
**नारद तुं**बर गायन करिती । **ब्र**ह्मा ताल धरी. ॥ **ग**जानन० ॥ २ ॥
**आ**नंदात्मज म्हणे **ग**जवदना ! । भवभय दूर करीं. ॥ **ग**जानन० ॥ ३ ॥

### पद ४६ वें.

हा कोण धिंगा रे ! । **श्री**रंगा गा रे ! ॥ ध्रुवपद. ॥
नेणुनि दुर्घट काळभुजंगा । भोगिसी वैभवसंगा. ॥ हा कोण० ॥ १ ॥
येउनि रामकथारस रंगा । आदरितोसि अनंगा. ॥ हा कोण० ॥ २ ॥
**आ**नंदतनय म्हणे अंतरंगा । झोंबसि संसारसंगा. ॥ हा कोण० ॥३॥

### पद ४७ वें.

रसने ! नीलनीरद सुंदर निरुपम शीलसादर गायीं. ॥ ध्रुवपद. ॥
वळघुनि दुस्तर ठाया । किति वटवट करिशिल वायां ? ।
क्षणभरि तरि गुरुपायां । स्मर सतत न होसिल वायां. ॥ रसने० ॥१॥
विसर सकळ भवगाथा । मनिं समजुनि तन्मय चाथा, ।
सरस गुणालयनाथा । भज सतत नमुनि पद माथां. ॥ रसने० ॥ २ ॥
वदसि सुधामय बरवी । तरि वरद कृपे जग भरवी, ।
मरणभयोत्कर चुकवीं । मति **आ**नंदसुत कवि शिकवी. ॥रसने०॥३॥

### पद ४८ वें.

आधीं मन आवरिं हें अनिवार. ॥ ध्रुवपद. ॥
दंड कमंडलु व्याघ्र कडासन । मुंडन हे अविचार. ॥ आधीं० ॥ १ ॥
काय कराल विभूतिविलेपन । शिष्यकुळें परिवार. ॥ आधीं० ॥ २ ॥
गारुडिया **आ**नंदसुत प्रभु । पाय धरी सुकुमार. ॥ आधीं० ॥ ३ ॥

### पद ४९ वें.

**रामा कृष्णा गो**विंदा **गो**पाळा । वेळोवेळां वाचेसी लागो चाळा.॥ध्रुवपद.
कोटी धेनु सत्पात्रें दिधल्या दाना, । ग्रामकोटी आराम रचले नाना, ।
या मैदानीं तो धर्म दिसे साना, । नामस्मरणें महिमा सत्य जाणा.॥**रामा**०॥१॥
**गं**गास्नानें तेव्हांची कोटी केली, । दानधर्मादि पुण्यें तेथें ठेलीं, ।
योगयागादि कर्में सिद्धि नेलीं, । ऐशीं नामें वाचेसी जेव्हां आलीं. ॥**रामा**०॥२

याचि मंत्रें नारदादि गाती गाणीं, । याचा महिमा तो जाणे शूळपाणी, ।
नामापाशीं कैवल्यमुक्तिखाणी । बोले भावें आनंदतनय वाणी. ॥ रामा०॥३॥

## पद ५० वें.

ते नर तारियले श्रीमुकुंदें । चरणा शरण रिघाले. ॥ ध्रुवपद. ॥
मकरें निजरद, निकरें करी पद, निकरें धरितां छंदें ।
'हरि रे !' म्हणतां हरिनें भय परिहरिलें जगदानंदें. ॥ ते नर० ॥ १ ॥
कुरुकुमरें सति कुरळीं धरितां, कुरुप चढे मतिमंदें ।
बाहे तंव लाहे तव पद लाहे परमानंदें. ॥ ते नर० ॥ २ ॥
ध्रुव वनिं रिघतां ध्रुवपद दिधलें जोडुनि करारविंदें ।
आनंदनंदन या संसारीं उद्धरिलें गोविंदें. ॥ ते नर० ॥ ३ ॥

## पद ५१ वें.

रामा ! काय कवतुक पाहसि झडकरी पाय दाखविं आतां पाय. ॥ध्रुवपद.॥
धन सदन प्रमदांनीं । मन हरिलें दंभमदांनीं ।
जननिजनक जीवदानी । मज जवळी न येत निदानीं. ॥ रामा० ॥ १ ॥
विषयविषानळ जाळी । बहु सतत जडे भवजाळीं ।
विचरे काम विहाळी । मज विषमपणेंचि निहाळी. ॥ रामा० ॥ २ ॥
कलुषतमांतक पाहे । असि करिं करिं परम कृपा हे ।
आरतें उचलुनि वाहे । आजि आनंदसुत कवि बाहे. ॥ रामा०॥३॥

## पद ५२ वें.

किति तुज विनवूं वारंवार ? ॥ ध्रुवपद. ॥
संग न माने या विषयाचा । देइं पदांबुजिं थार. ॥ किति० ॥ १ ॥
नाहीं तुजविण नाथा रामा । पाहें सदयें फार. ॥ किति० ॥ २ ॥
आनंदात्मज आदिपूरुषा । मागें मंगलहार. ॥ किति० ॥ ३ ॥

## पद ५३ वें.

हरि ! दर्शन मला हरि ! दे रे रे ॥ ध्रुवपद. ॥
पतितपावन नाम दयानिधे । सत्वर धांवुनि ये रे रे ॥ हरि० ॥ १ ॥
अनाथाचा नाथ जरी तूं । साच करीं ब्रिद रे रे रे ॥ हरि० ॥ २ ॥
आनंदात्मज आळवितो तुज । करिं करुणाकर रे रे रे ॥ हरि० ॥३॥

### पद ५४ वें.

लवकरि धांव सख्या यदुराया! ।
अति संकट दुर्घट कोण समर्थ हराया ॥ ध्रुवपद. ॥
या भवसागरीं बुडतों मी पाहीं । सत्वर ये उतराया ॥ अति० ॥ १ ॥
काय करूं मज कांहीं कळेना । ध्यान तुझेंच कराया ॥ अति० ॥ २ ॥
बाळक आनंदतनय न वसे । मायातिमिर तराया ॥ अति० ॥ ३ ॥

### पद ५५ वें.

शिव शिव देवा! आतां नुपजेंचि कदा ।
जिव बहु माझा श्रमला तुज ध्यायिं सदा. ॥ ध्रुवपद. ॥
जननीगर्भदरींत परोपरी बुद्बुदसा मी घडलों ।
मुख पाणी पदें फुटतां फारचि अडलों ।
तनु मोहमदें मूत्रमळीं सांकडलों ।
भय घे नुसतें हे नऊ महिने जडलों । लटकें न वदें ॥ शिव०॥ १ ॥
पडतां भूमितळीं मग तेथुनि मोहन मूर्च्छा आली ।
मज बाळपणीं स्तन्यरसीं रुचि झाली ।
.................................... ।
सुखदु:खगणीं प्रौढदशा जों आली । भुलवी रमणी. ॥ शिव० ॥२ ॥
नानारोगवियोगभयें जड आक्रमितां हे काया ।
जड पंचभूतीं झिजतां न सुटे माया ।
मन हे निगुतें भ्रांति फिटे जे वायां ।
म्हणवुनि तूतें आठविलें रघुराया! । आनंदसुतें. ॥ शिव० ॥ ३ ॥

### पद ५६ वें.

भजरे! गोपालं । मानस! ॥ ध्रुवपद. ॥
भज गोपालं भजत कुचेलं । त्रिजगन्मूलं दितिसुतकालं. ॥ भज० ॥ १ ॥
आगमसारं योगविचारं । भोगशरीरं भुवनाधारं. ॥ भज० ॥ २ ॥
कदनकठोरं कलशविदूरं । मदनकुमारं मधुसंहारं. ॥ भज० ॥ ३ ॥
नतमंदारं नंदकिशोरं । हतचाणूरं हंसविहारं. ॥ भज० ॥ ४ ॥

### पद ५७ वें.

नयनीं शंकर देखिला । निष्कामबोधें नयनीं पहातां देव, भयें झालें माझें वाव, शंकर निजजनशंकर[1] रविसुतकिंकर निकरभयंकर. ॥ ध्रुवपद. ॥

---

१. स्वभक्ताचें कल्याण करणारा.

कैलासनिवास करी, कैलास शंभु संहारी, शैलजामान वहिरी, जो लाहे अवतारधारी, भानुकोटितेज लोपले, वर्णुं मी काय? ब्रह्मांड भरुनि योकले, भानुपर्यंत विष्णुनें जें रुप देखिलें, भानु हे ऐसे ध्यानीं सुलभ रेखिले, चुंबिता जटाजूटीं, वाहे स्वर्गी गंगा बिंदु झळाळी मौळीतटीं, अष्टमीचा दिव्यइंदु, त्रिविधा तापे तापल्याकारणे दीनबंधु, खळ दयाळा भाळी डोळा वाहे शौर्यसिंधु. अनंगहंत संतलागुनि सनावन सभावी, निजरूपीं त्रिभुवन समावीं, मति त्याचे चरणीं नेमावी, करुणामृत वरुणीलयपदा शरणागत भरणास तारी. ॥१॥

कर्पुरासारिखी वाणी, सर्पमाला वक्षस्थानीं, सर्पांचीं कुंडलें कानीं, शोभताति [१]सानिसानि, चंचल चपल हलती, प्रफुल्लित पुष्पें करवीर चंपक मालती, प्रचंड रुंडमाळा कंठीं हडीं डोलती, मेखळा मणी किन किरणां कण बोलती, सुगंध गंध लाविलें सर्वांगीं शुभ्र वर्ण खडखडित कटी हस्तिचें सुप्रावर्ण शार्दूलचर्म करि विने जिंकिले सुवर्ण निरुपम ऐसे वर्णवे ना नाम मेघवर्ण आकर्ण नेत्र मित्र शशि अति दीप्ति फाके देखुनि कांति मुनि टाकति निर्भय एकांति सांब दिगंबर शंबर रिपुहत्त अंबरिं तुंबर स्तविती असे. ॥ २ ॥

अंकीं घेऊनि आनंदी, पर्वतासंनिभ नंदीवरि आरुढतां नंदीशेषादिकब्रह्मानंदीं, हेरंबकुमरहस्तकें, स्पर्शुनि शिवपद वंदिताति मस्तकें, भक्ताचिलंदेत छिनजापरि चातकें, मार्कंडेयाचीं गेलीं जन्ममृत्युपातकें, लाऊनि ताळीं बैसतां उठिला, ऐसा शंभु काळसंहार योजना गर्जिति, समरंभु प्रमेयगणधुमधुम अस्फरिती, कंबुइंद्रादिसुर शिवपद वंदिताति, अंबु विमानिंहुनि शिवहर पुरहर किन्नर गर्जति, वाचति संगे भूताळी, करि वाहत शुद्ध नपाळीं, ध्यानीं व्यापी लोभती पाळीं, शिववेष्टात ऐसा वेताळी, मृकंडुतनय अखंड विनवी आनंदसुतविभुपदकमळीं. ॥ ३ ॥

## पद ५८ वें.

धन्य दशरथरायजी त्रैलोक्यामाजी । धन्य दशरथराय धन्य ते कौसल्या माय । मोठी त्रिभुवनकोटी मैथन पोटीं तो हरि सांठविला. ॥ ध्रुवपद. ॥

बाळपणीं चापपाणी दाखवी शौर्याची खाणी, गर्जोनि अभंगे ठाणीं, ताटिका विंधिली बाणीं [२]मुनिवरमख पाळिला, निपुणपणें गगनीं मारिची मारिला, क्षणिक काळें रिपुदळवृंद खिळिला, विजनीजनीं तद्वय लवहि

---

१. लहान लहान. २. विश्वामित्र मुनीचा यज्ञ.

टाळिला, खंडिले रामें सुबाहुचे महा बाहुदंड, [1]कोदंड चंड नृपति मंडळी केली खंड, अखंड कीर्ती वर्णिती जयाचे विरुदंड, वैदेहि देहि आनंदाब्ज ध्वनि भरला उदंड, घेऊनि माळा चमकत ठमकत रघुवीरकंठीं अर्पितां मुनि हर्षले, सुर नानापुष्पें वर्षले, दनुजाचे धोमे घर्षले, नृपपायीं वंदुं स्पर्शले, तो हा दिनमणिकुळव दणदणीं अगणित गुण धनी अवतरला. ॥ १ ॥

आठवुनि व्यासबाजे, निर्जरांचीं[2] केलीं काजें, सज्जनासि योगीराजे, दिधली निर्भय काजें, राजीवनयनें[3] राघवें वीर विराजे, संहारिली लीला राघवें एकेचि बाणें विध्वंसिले वीरपुंगव त्रिशिराखरदूषणादिवृंद आघवे. विचित्ररंग कनक तुरंग अंग भंग, रचोनि वधु विरहदु:खांत अंगसंग, जगदांतरंग जिवाहुनि केले अंतरंग, वधोनि वाळिसुग्रीवादि कपि धिंगधिंग. लौकिकरिति, योजुनि शतमिति, योजन जलनिधिमध्यें पर्वत तारिले, परपारीं वानर सारिले, तरुगुल्मीं राक्षस मारिले, शरजाळीं विक्रम वाटिले. अद्भुत घनरण धरणीं निपुणपण शरगण सणसण सुटति असे. ॥ २ ॥

रणा माजवी तो रण, पुंख बाणी मेघवर्ण, मेघनादें कुंभकर्ण, सर्वांआधीं पक्वपर्ण. न्यायें पडती रणमंडळीं, दशवदनवदन काळिमा खंडली, राक्षसमांसें तृप्त न होती, भरत मंडळी गर्जी, जे नभीं दुर्जर द्रुहिणा खंडिली, वैदेही[4] दिव्यदेहिं भेटे रामा निष्कलंका, शरणागता बिभीषणा समर्पिली लंका, लंघोनि गेली दिक दिशा बाहेरि भव्य शंका, त्रैलोक्य विजयी देव वाजविती नभीं डंका, कोदंडपाणी[5] पुष्पविमानीं पुष्पकीं बैसुनि नित्यानंदें दाटला, निज भता बंधु भेटला, असुखाचा सिंधु आटला, भक्तां आनंद वाटला, तो चरितार्णव दाखवि नव नव आनंदसुत विभु वर्णी ज्या. ॥ ३ ॥

## पद ५९ वें.

वसुदेवाचें भाग्य थोर हो! वाणुं मी काय? वसुदेवाचें भाग्य थोर, ज्याचे पोटीं लक्ष्मीवर, घेऊनि मानव जन्महि मुनिजन रंजन भंजन हो. ॥ ध्रुवपद. ॥

ऐका बाई! याचें चोज, अंगाखालीं सर्पराज, नाभीमाजी शोभे कंज, ज्याचे पोटीं विश्वसृज्, ऐसा तो महाराज, हो!, बोलणें ज्याचें वेदासि नेणवे गुज हो! वर्णिती वाचे भुजंगेश पावे लाज हो! जन्मावे याचे, लोकासिं पावे याज हो!

---

१. चाप. २. देवांचीं. ३. कमल. ४. सीता. ५. चापहस्त.

रक्षावा साधु संहारावा दुर्जनाचा वृंद[1], साधावा धर्म हाचि तया लागला छंद, मनुष्य यातें म्हणति कैसे? लोक बुद्धीमंद, अवतार लीला युगायुगीं जाला आनंद, गोपाळमेळीं खेळत खेळत बाळवेषें येणें गाडा मोडिला, वृक्षदंड झोडिला, बकासुर ताडिला, अघासुर पाडिला, गोपीजनमनमोहन घनघननीळ फणिफण दंडियेले. ॥ १ ॥

आणिक याचें बा! नवल, पोटामाजीं ब्रह्मगोळ, होति जाति सर्वकाळ, लोकां भासे तान्हें बाळ. मातीचा गोळा भक्षिला, नाहीं म्हणवुनि मुख पसरितां लक्षिला, तो बंभाडाच्या कोटी लागल्या कुक्षिला. असो आतां बोटावरि उचलली शिला, गोपाळ याचे संगतीनें झाले पुण्यशील, व्यभिचारकाजें उद्धरिला गोपिकांचा मेळ, शोभत कंठीं सुंदर ते वैजयंती माळ. कैलासवासी शंकर शंकर[2] म्हणवुनि हृदयीं सद्भावेसीं ध्यातो भा, गंधर्वहि गाती भा, भक्तांलागीं ने धांमा[3], अगोचर रूप भा योगी सुख भोगी संकट कलीवर परिहारी करी महिमा. ॥ २ ॥

नानावेषधारी हाव, देवा जाणवेना भाव, तेथें आम्हां कोण ठाव, बोली ना तुडेचि देव. ऐसा तो महानुभाव[4] हो! बोलणें ज्याचें वाटे संसार वाव हो! जागृती येतां स्वप्नासि कैंचा ठाव हो! ब्रह्मांड व्यापी आकारा नाहीं ठाव हो! काय मी सांगूं? तो हा झाला यशोदेचा बाळ, गोकुळीं गोप मिळवुनि खेळतो हा खेळ, गोपालबाला भुलवी घालुनिया मोहजाल, चारित्रें नाना दाऊनि उद्धरि ब्रह्मगोल. विचित्र लीला सुंदर मंदिर वसुदेवाचें नानापरि दावितो, लोका कारी परि तो, सन्मार्गातें लाविती वैकुंठाप्रति धाडितो, नंदानंदन रिपुकुळकंदन आनंदनंदन वंदितो. ॥ ३ ॥

---

## प्रासंगिक पदें.

### पद ६० वें.

विश्वामित्रा[5] स्वामी! । राम देईंच ना मी. ॥ ध्रुवपद. ॥
हें राज्य अवघें तुम्हांसि देतों । मी ही समागमें येतों. ॥ राम०॥ १ ॥
काळासि भय ज्या राक्षसांचें । त्या तुल्य बळ कैंचें? ॥ राम० ॥२॥

---

१. समूह. २. सुख करणारा. ३. गृहा. ४. उदारमति. ५. विश्वामित्र रामलक्ष्मणांस मागण्याकरितां आला असतां दशरथ म्हणतो.

केला नाहीं कांहीं अभ्यास येणें । मुलें बहु तानें. ॥ **राम०** ॥ ३ ॥
**आनंदनंदनप्रभु** उदारा । हा आमुचा थारा. ॥ **राम०** ॥ ४ ॥

**पद ६१ वें.**

राजसभा[1] डौरे । स्वयंवरीं. ॥ ध्रुवपद. ॥
**भू**मिसुतामुख[2] देखुनि भंवते । भूप जसे भंवरे. ॥ स्वयं० ॥ १ ॥
दाखविती दीमाख परोपरी । लाविति लाघव[3] रे! ॥ स्वयं० ॥ २ ॥
आले राक्षसयक्षसुरादिक । दानव मानव रे! ॥ स्वयं० ॥ ३ ॥
**आ**नंदात्मज विभु सर्वोत्तम । नवरा अभिनव रे! ॥ स्वयं० ॥ ४ ॥

**पद ६२ वें.**

अततततत[4] धनु विशाळ मोठें. ॥ ध्रुवपद. ॥
बत्तिस दशशत विरांसि नुचले । तें वोढिति नेटें. ॥ धनु० ॥ १ ॥
सभेपुढें नृप समस्त देखुनि । ते चाविति बोटें. ॥ धनु० ॥ २ ॥
**आ**नंदनंदनप्रभुसी सोपें । येरासि तें खोटें. ॥ धनु० ॥ ३ ॥

**पद ६३ वें.**

कमलनयन[5] घनश्यामतनू हो! ॥ ध्रुवपद. ॥
चंद्रानन **र**घुराज विराजे । हस्तकिं कांचनबाण धनू हो! ॥ कम० ॥ १ ॥
नासिक सरळ विशाळ सुधाधर । कुंदरदन[6] अतिरम्य हनू हो! ॥ कम० ॥ २ ॥
**आ**नंदात्मजरविकुळभूषण । जन्म विभूषवि भ्रम शमवी हो! ॥ कम० ॥ ३ ॥

**पद ६४ वें.**

हा[7] आमुचा यजमान । या जगीं. ॥ ध्रुवपद. ॥
**कौ**सल्याहृदयाब्ज दयानिधि । नाहीं जयासमान. ॥ या जगीं० ॥ १ ॥
**सा**केताधिप[8] तो करुणाघन । करि शरणागतमान. ॥ या जगीं० ॥ २ ॥
**आ**नंदात्मज तो करि चाकरी । देउनि जीवजमान. ॥ या जगीं० ॥ ३ ॥

**पद ६५ वें.**

रघुराज[9] जिवीं वरिला । सये! कृतनिश्चय हा धरिला. ॥ ध्रुवपद. ॥
मज मानवला नवरा नवनीरद[10]नीलमणीसरसा ।
वनराजितराजसभेंत सभाजनवीक्षणीं केसरिसा[11] ।

---

१. स्वयंवरप्रसंगीं सीतेचें सभेंत येणें. २. सीतेचें मुख. ३. चातुर्य. ४. शिवचापाचें वर्णन. ५. रामाचें स्वरूपवर्णन. ६. दांत. ७. सीतेचें भाषण. ८. अयोध्येचा स्वामी. ९. सीतेचें दासीशीं भाषण. १०. मेघ. ११. सिंहसा.

उडुमाजि सुधाकर देवि! पुरंदरकाननीं कल्पकसा।
सखि! त्याविण भूपगणीं न गणीं मनीं सांग विकल्प कसा सहसा. ॥रघु०॥१॥
जरि राघव हा नवरा न वरीं तरि लाघव काय दुजें?।
पण आपण राम जिणो न जिणो तरि वोढुनि चाप भुजें।
मज दाशरथीच पती जगती तव राजगती नव जे।
जन कोणि म्हणो न म्हणो गुण निर्गुण रामपदीं न लजे न लजे. ॥ रघु०॥२॥
बहु काय वदों धन काय विना मज काय घडी न तगे।
जनकासि रुचो न रुचोचि जगज्जनकासिच मी न तगे।
तव पाय धरीन उपाय करा अपायचि हा न लगे।
म्हणे आनंदनंदन माउलिये सखि! बोलसि तूं भलि गे! भलि गे!॥ रघु० ॥ ३ ॥

## पद ६६ वें.

निति[3] जनकाप्रति काय वदावी। हा पण आपण कां पण दावी?॥ध्रुवपद.॥
कैंची हे विषकार्मुकवल्ली। कां जनकें सदनांत पुजावी? ॥ निति० ॥ १ ॥
राक्षस दानव दैत्य बळाचे। वोढी चाप असी मति ठेवी. ॥ निति० ॥२॥
आनंदनंदन बोले भावें। सीता रामपदीं मन ठेवी. ॥ निति० ॥ ३ ॥

## पद ६७ वें.

रघुवल्लभ कार्मुक वोढी। कडकड मोडी. ॥
जनिं वनिं डगमग खगमृगिं लगबग करि जसि डगडिग गडगड. ॥ १ ॥
दुमदुमिले प्रतिरव भारे। अंबर सारे ॥
दचकति दिग्गज वचकति भूभुज सचकित फणिवर फडफड. ॥ २ ॥
चळकांपत सुभट नृपाळीं। बसली टाळी ॥
करि रव दडबड त्रिभुवनिं गडबड दडपिली दशमुखबडबड. ॥ ३ ॥
विक्रम हा अद्भुतरामीं। मंगळधामीं ॥
वर्जुनि भवभय गर्जुनि कवि आनंदतनय करि बडबड. ॥ ४ ॥

## पद ६८ वें.

रामसखा रुसविलास। कां वसविलास। वनिं तो येईल कसा?॥ध्रुवपद.॥
काळगृहीं वसविलास। पति फसविलास। वचनीं हरिण जसा. ॥ १ ॥

---

१. नक्षत्रांत. २. चंद्र. ३. शिवधनुर्भंगाचा जनकानें पण केल्यामुळें सीता बापास दोष देते. ४. धनुष्य. ५. रामानें शिवचापाचा भंग केला तो प्रसंग. ६. आकाश. ७. राजे. ८. मोठे वीर. ९. रामास वनास पाठविल्यावर दशरथाचें कैकेयीशीं भाषण.

विकल्प हृदयीं धसविलास । कटिं कसविलास । वल्कल वस्त्र वसा. ॥ २ ॥
आनंदसुत भवविलास । त्यजि चिद्विलास । नवसुनि आणिन असा. ॥३॥

**पद ६९ वें.**

कसि गति झाली माझे जिवाला । माझा राम झाला मजहुन वेला.॥ध्रुवपद.॥
कशि भरउ भरीं करूं मी भवाला । जळो जळो करणें का विभवाला. ॥ १ ॥
लव पल त्रुटि क्षण जीव निवाला । जेंवि जळाविण मीन ठायींच निवाला. ॥२॥
स्तवित तया दशशतजिभवाला । आनंदसुत कवि नवसि भवाला. ॥ ३ ॥

**पद ७० वें.**

राम दिसेना नयनीं या. ॥ ध्रुवपद. ॥
लव पल त्रुटि युगसम दिन जातो । नीज नये निशि शयनीं या. ॥१॥
भरती भरता हे चवऱ्यासीं । फिरका फिरती अयनीया. ॥ २ ॥
आनंदसुतप्रभु कैकयी दवडी । भूपति गोउनि पैनीया. ॥ ३ ॥

**पद ७१ वें.**

योगियांच्या रानीं घेतला कीं जोग. ॥ ध्रुवपद. ॥
योगी योग जयासाठीं । करिताती आटाआटी ॥
दृढ धरूनियां पोटीं । स्तविताती जोग. ॥ १ ॥
भवभव भोगी त्यागी । शिणताति महाआगीं ॥
तया नयेचि विभागीं । नव्हे समजोग. ॥ २ ॥
युगायुगीं सोंगें भिंगी । घेवोनीया नानारंगीं ॥
आनंदनंदन संगी । रंजवीत जोग. ॥ ३ ॥

**पद ७२ वें.**

राघव गमन करी ज्या मार्गे त्या मार्गानें जाइन मी ।
गर्गमुहूर्तें प्रयाण रामा श्रुतिवर्गानें गाइन मी. ॥ ध्रुवपद. ॥
मम मातेचे कृतापराधें प्रभु गेला काननवाटे ।
दुष्टेनें कष्टविला अग्रज न पाहावें आनन वाटे ॥
चरणीं चालत धरणीवरि झणि राघवासि रुतती कांटे ।
अभिश्राप मजवरि बैसे कीं अतिमोहें हृदय दाटे ॥
चरणसरोजें दृष्टीं पाहिन परमसुखातें पावेन मी । गर्गमुहूर्तें० ॥ १ ॥

---

१. कौसल्येचा शोक. २. वेगळा. ३. ऐश्वर्याला. ४. शेष. ५. कौसल्याशोक. ६. रामानें वल्कलें धारण केलीं त्या प्रसंगींचें वर्णन. ७. भरताचा शोक. ८. वडील बंधु. ९. मुख. १०. कमळें.

जळोजळो राज्यादिक संपत्ति अतिवैभवासि का करणें? ।
भोगुनि भोगवि योग रमापतिसीं बरवें त्याहुनि मरणें ॥
जपतपसाधन न घडे तरि हें कशासि जड नरतनु धरणें? ।
स्मरणें रघुनंदनासि वदनीं त्याचे रणि देउनि धरणें ॥
निंदिति जन हे सर्वेहि त्यांचे कुशब्द बरवे साहिन मी। गर्गमुहूर्तें०॥२
श्रवण मनन मनीं निजध्यास अतित्वरा करुनि चालिन पंथीं ।
अनाथनाथ कृपाल दयाघन वर्णितताति कवि बहु ग्रंथीं ॥
त्याच्या पायां पडुनी चरणीं रामार्पण करणें विनती ।
चाल गृहा रघुराया! मम अन्याया न करुनियां गणती ॥
विनयें विनवि आनंदतनय कवि नामामृतांत दाहिन मी । गर्गमुहूर्तें०

**पद ७३ वें.**

धन्य झाली ते वनीं भिल्लभाजा । जिनें केला संतुष्ट रामराजा. ॥ १ ॥
फळें देतां चाखोनि गोड गोड । रामचंद्रें सेविलीं कोड कोड. ॥ २ ॥
आजि पुरली तहान डोळियांची । मूर्ति पाहतां श्रीरामराघवाची. ॥ ३ ॥
भाव भक्तीचा लाभ मशीं झाला । गीत गातां आनंदतनय धाला. ॥ ४ ॥

**पद ७४ वें.**

गोकुळ धन्य जगीं । अहो! तें. ॥ ध्रुवपद. ॥
ऐसें सुखसौभाग्य नसे कधीं । देवनरीं भुजगीं. ॥ अहो० ॥ १ ॥
वैकुंठाधिप खेळे ज्या स्थळीं । व्यापक जो त्रिजगीं. ॥ अहो० ॥ २ ॥
आनंदात्मज विभुनें वरिला । गाति तया शुभगी. ॥ अहो० ॥ ३ ॥

**पद ७५ वें.**

निज रे निज बाळा गोपाळा! । जो जो रे! वेल्हाळा! ॥ ध्रुवपद. ॥
रचितां दीर्घ चराचरमाळा । भागलासि कनुवाळा! ॥ निज० ॥ १ ॥
नानाविध अवतार कृपाळा! । घेतां तुज श्रम झाला. ॥ निज० ॥ २ ॥
आनंदसुत विभुचा गुणचाळा । सेजे न लगे डोळा. ॥ निज० ॥ ३ ॥

**पद ७६ वें.**

भाग्य मोठें त्या गोपीगोपाळांचें. ॥ ध्रुवपद. ॥
विश्वव्यापी तो बैसे त्यांचे अंकीं । निर्मळरूपी आंगणीं रांगे पंकीं. ।

---

१. शबरीनें वनांत रामास उच्छिष्ट बोरें दिलीं त्या प्रसंगींचें वर्णन. २. कृष्णजन्माचे वेळीं गोकुळाचें वर्णन. ३. यशोदा कृष्णाचा पाळणा हालवितांना गाते. ४. गोपगोपींच्या भाग्याचें वर्णन. ५. चिखलांत.

उदार मोठा, परि धुंडतो गोरस शिंकी । ज्याच्यासंगें क्रीडतां [1]दानव जिंकी. ॥१॥
जगदाधारा बाहती 'बाळा बाळा !' । निर्विकारा बोलती 'काळा काळा.' ।
[2]निगमागमा करिताती चाळा चाळा । निजकर्म्या भेटती वेळोवेळां. ॥ २ ॥
[3]शब्दातीता गौळणी देती गाळी । त्रिभुवननाथा यशोदा माय पाळी. ॥
निश्चळआत्मा हिंडतो गोकुळआळी । नाचत वाहे आनंदतनय टाळी. ॥ ३ ॥

## पद ७७ वें.

[4]अघटित घटित ज्या विभुची माया. ॥ ध्रुवपद. ॥
त्या यदुराया मी वंदिन पाया । निरसुनियां भवमाया. ॥ १ ॥
[5]दुरित हरित चरितांबुधि ज्याचा । त्याचेची गुण गाया. ॥ २ ॥
अजर अमर अक्षय सुखदाता । आनंदसुत कविराया. ॥ ३ ॥

## पद ७८ वें.

खेळे[6] माधव खेळे ग माय ! । खेळे माधव खेळे. ॥ ध्रुवपद. ॥
खेळे येउनि त्यावेळेसी । का घाली डोळे । सेवी [7]नवनितगोळे ॥
रागें रागें मडकें फोडी उष्णदुधें जव [8]पोळे. ॥ खेळे० ॥ १ ॥
काठी कलशाखालीं [9]दाटी । धार पडे जंव मोठी । लावी अंजुळ [10]होटीं ॥
तो पय सेवित लोचन लावित दावित महिमा मोठी. ॥ खेळे० ॥ २ ॥
कांहीं मनिं भय नाहीं । कांहीं खाय दुधाच्या साई । [11]क्षीरवारिधिशायी ॥
आनंदनंदन करितो वंदन त्या हरिच्या निजपायीं. ॥ खेळे० ॥ ३ ॥

## पद ७९ वें.

[6]चाल गे ! निज गेहा सखी । अवसरू मज गे ! हा सखी ! ॥ ध्रुवपद. ॥
अंतःकरण करि अतिकोमल । अंतःपुरशयनाप्रति [12]अविकळ. ॥ १ ॥
मारिल तुज मज येउनि सासू । युक्त नव्हे ये स्थळिं रहिवासु. ॥ २ ॥
काय गा हे थोरी । हरि ! धरिसी [13]गोवळपोरी. ॥ ध्रुवपद. ॥
सासुआदिजन गृहासि सकळा । धनि मी च नेणसी तुं अबळा. ॥ चाल गे० ॥
उचित नव्हे धरणें पदरासी । अंतर कीं निजसंसारासी. ॥ काय गा हे० ॥
आनंदसुत विभु म्हणे तुं वरिसी । क्षण ही न लगे गत [14]भवनदी तरसी. ॥ चा०

---

१. असुर. २. वेद आणि शास्त्रें. ३. शब्दांनीं वर्णन करण्यास अशक्य अशा. ४. कृष्णवर्णन. ५. पाप. ६. कृष्णलीलावर्णन. ७. लोण्याचे गोळे. ८. भाजे. ९. बळानें दवडी, घाली. १०. ओंठाला. ११. क्षीरसागरीं शयन करणारा. १२. प्रसन्न. १३. गवळ्यांच्या मुली. १४. संसाररूप नदी.

## पद ८० वें.

निजभावें तुज मागें । सखिमन निष्ठुर न करावें. ॥ ध्रुवपद. ॥
कामाचीये वेळेमाजी । आणुं नको मज वाजी ।
सोडी सोडी कर यदुराया रे! ॥ निज० ॥ १ ॥
जाणुनि कामाची वेळ । केला सये! तुझा मेळ ।
कां गे! ऐशा दाखविसी घाया गे! ॥ निज० ॥ २ ॥
अंतरलें घरदार । दूर होइल संसार ।
करितां सलगि तुझ्या पायां रे! ॥ निज० ॥ ३ ॥
जावें संसाराचें दुःख । यावें कवळ्याचें सुख ।
दावोनि आलिंगी तुझी काया रे! ॥ निज० ॥ ४ ॥
हात लाऊं नको उरीं । जाऊं दे मजला दुरीं ।
वोढिसि कां मी तों परजाया रे! ॥ निज० ॥ ५ ॥
पर ऐसें माझें नाम । भेटावया आलों काम ।
नेणसि कां? टाकीं मोहमाया गे! ॥ निज० ॥ ६ ॥
आनंदनंदन प्रभु । बोलतां मानिला लाभु ॥
आली मग रतिसुख द्याया गे! ॥ निज० ॥ ७ ॥

## पद ८१ वें.

तव यादवरावो. ॥ ध्रुवपद. ॥
कोण दुजा पहुडे तरुणीसीं । पाहे जो नवला वो! ॥ तव० ॥ १ ॥
हळु चालत शब्द न होतां । आली ते जंव पाहों. ॥ तव० २ ॥
परम नवल धरुनी निरसी जे । आनंदसुत कवि देवो. ॥ तव० ॥ ३ ॥

## पद ८२ वें.

वनमाळी[3] गोपीबाळी । दोघें शोभती एकेवेळीं ।
देखतांचि मति थकित होउनी देहभावातित वेल्हाळी. ॥ ध्रुवपद. ॥
मन्मथ सुंदर चिन्मय माधव सन्मति मोहन नीलतनु ।
ती रतिसन्निभ कीरगिरा नवनीरंजनेत्रयुगाकृतिकेली. ॥ १ ॥
सत्य सनातन नित्य निरंजन कौस्तुभकंधर लोकपती ।
पीनकुचा लघु मीन सुचंचल मानवती अभिधान नव्हाळी. ॥ २ ॥

---

१. कृष्णलीलावर्णन. २. दुसऱ्याची बायको. ३. कृष्ण. ४. देहभानरहित. ५. सुंदर स्त्री. ६. पोपटासारखी वाणी. ७. कमल. ८. पुष्ट.

तो स्मर हे रति, तो घन हे विज[1], तो तरुनायक हेचि लता, ।
मानवरूप धरानत होउनि आनंदनंदन वंदित भाळीं. ॥ ३ ॥

**पद ८३ वें.**

निजवरीं[2] कोंडिला परमात्मा ।
शुकमुख मुनिजन जया धुंडिती अखंडैकरस आत्मा ॥ १ ॥
सर्व गगन सहोदर व्यापक सर्वांतर गुणराशासी ।
जो हरि भुवनपतिगोकुळिचा झाला पूर्णमिरासी[3] ॥ २ ॥
निगमा[4] जे पद सुगम नव्हे कई आगमवाणी[5] चिमणी ।
तो हरि पशुपपुरीं[6] मनुजापरी झाला जारशिखामणि ॥ ३ ॥
अचळअमळकमलोद्भवजनकही[7] सर्वजगाचा चाळक ।
आनंदसुत विभु चक्रगदाधर तो नंदाचा बाळक ॥ ४ ॥

**पद ८४ वें.**

हे[2] कांहीं कर्म चरे. ॥ ध्रुवपद. ॥
तरुणीकुचयुग करुनि नखांकित । हरिले मंदर धरे. ॥ १ ॥
दंतवसनिं[8] भगवंत करी क्षत । कुंतल वीदधरी करे. ॥ २ ॥
आपुली मांडी आपण उघडितां । त्रयपाचकी अवचेरे. ॥ ३ ॥
परवधु शयनीं धरुनि चलदलके । वरिले मंदरधरे. ॥ ४ ॥
आनंदसुत विभु हा नंदनंदन । अफार विचरे घरे. ॥ ५ ॥

**पद ८५ वें.**

कृष्णासि[2] लावीं शिक नंदमामा । कोण तृष्णा याचि हे अधिक नंदमामा ॥ १ ॥
ऐसा कां सुता दे लाड नंदमामा । नेणो कैसा कोण हा पवाड नंदमामा ॥ २ ॥
पुत्राचे हे नेणे गुण नंदमामा । खेळे चित्र ऐसी सांगो खुण नंदमामा ॥ ३ ॥
अपुलीस मानी उणे नंदमामा । दीर्घ कोपेल सांगता दुणे नंदमामा ॥ ४ ॥
आनंद मानितो कुसि नंदमामा । देखुनि आनंदसुतविभुसी नंदमामा ॥ ५ ॥

**पद ८६ वें.**

[2]बोले यशोदा वाणी । किती वदसी निष्ठुर वाणी ।
सुनेसहित निजपाणी । आणि धरुनि पंकजपाणी[9] ॥ १ ॥
सांग तये सये अरती । हरि आणिसी तरि तु न परती ।
..........................। नाहीं जगींच पर आचरती ॥ २ ॥

---

१. वीज. २. कृष्णलीलावर्णन. ३. वतनदार. ४. वेदांला. ५. शास्त्रवाणी. ६. गोकुळांत. ७. ब्रह्मदेवाचा पिता. ८. ओंठावर. ९. कमलहस्त. (कृष्ण.)

तंव गोपी बोले मामी । हरि नाणिन तरि अधमा मी ।
आणियला जरि धामीं । तरि वदतें शपथ विधामी. ॥ ३ ॥
हरी म्यां खरा करुं जावें । तुम्ही मामासह न निजावें ।
असें वदोनि चमके भावें । म्हणे वचन यथार्थ उभावें. ॥ ४ ॥
धांवत आली सदना । पथि हांसति सुंदररदना ।
वधु अनेक मिळती कदना । निरखाया पंकजवदना. ॥ ५ ॥
उघडों जाय कवाडा । नुखलेचि न होय निवाडा ।
आज हरिचा धन्य पवाडा । खिळि लाउनि धरला वाडा. ॥ ६ ॥
असि दाउनि अगाध लीला । हरि उघडी भ्रांतिखिळिला ।
मग घेउनि सह वधु गोपाळा । धरि आनंदसुत कविपाळा. ॥ ७ ॥

## पद ८७ वें.

हरहर ऐसें कोण सोशी । अहो यशोदे! ॥ ध्रुवपद. ॥
आईक निवाडा धरुनि वाडा सदना वाडा हाणीत कवाडा ।
सोडित श्वश्रु कोण पवाडा. ॥ १ ॥
निशि ती काळी घोंगडि काळी घेउनि काळी येतां काळी ।
सेवित दधिघृत पडत सुकाळी. ॥ २ ॥
मी सुखवाशी शरण शिवाशी वाजी भवाशी पीडित जीवाशी ।
आनंदसुत प्रभु त्रिजगन्निवासी. ॥ ३ ॥

## पद ८८ वें.

कां लाड देशी हो! कान्हयातें बाई! ॥ ध्रुवपद. ॥
चोर मनांत किशोर दिसे परि । थोरपणें करि घाई. ॥ कां लाड० ॥ १ ॥
मुग्ध दिसे वरि मुग्ध वधू वरी । दुग्धदधी खाय साई. ॥ कां लाड० ॥ २ ॥
आनंदसुत विभु न धरी भवभय । मानुनी फार धिटाई. ॥ कां लाड० ॥३॥

## पद ८९ वें.

लावी थानीं भुलोनिया यशोदेचा बाळ. ॥ ध्रुवपद. ॥
घेतला तो पूतनेनें । माळ म्हणोनि महाव्याळ. ॥ लावी० ॥ १ ॥
आणि कैसी मानी काशावधी । इंगळ आळुमाळ. ॥ लावी० ॥ २ ॥
बाळभावें लाळ घोटी । अंकीं बैसवी महाकाळ. ॥ लावी० ॥ ३ ॥

---

१. गृहीं. २. दंत. ३. कृष्णलीलावर्णन. ४. सर्प.

राक्षसी ते साक्षेपानें । कवळी कनकमति जाळ. ॥ लावी० ॥ ४ ॥
आनंदसुत म्हणे आदीनाथें । नेली शोषुनि विक्राळ. ॥ लावी० ॥ ५ ॥

### पद ९० वें.

[1]चाल लौकरी कोमल करि मन हाल नेणसि तीचे हरी रे! ॥ ध्रुवपद. ॥
तुजविण [2]कुवलयनयना । मनिं तुलितेक्षण लव नयना ।
विजितभ[3]वा तुज भय ना । परि विरह स[4]ळिसी शयना. ॥ चाल० ॥ १ ॥
शोधुनि मार सुमारा । धन सोडित शर करी मारा ।
सोसिल कसि सकुमारा? । उठ सोडवि नंदकुमारा! ॥ चाल० ॥ २ ॥
जक बहु झाली रमणी । अतिजड जसि लाळहि चिमणी ।
[5]मकरकेतनोद्भ्रमणी । मुखिं म्हणति अमनी अमनी. ॥ चाल० ॥ ३ ॥
लगटुनि स्तवन करा धा । तुम्ही लवकरि हरि आराधा ।
म्हणत सख्यां प्रति राधा । अजि मनिं न धरुनि अपराधा. ॥ चाल० ॥ ४ ॥
कवळी क[6]जदलाक्षी । जिव करीं धरिला शिवसाक्षी ।
आवडी तव पद लक्षी । आजि आनंदसुत विभु लक्षी. ॥ चाल० ॥ ५ ॥

### पद ९१ वें.

[1]सकळकळाभिराम कांत नये काय करूं? ।
विकळ हृदय होय सये! सांग किती धीर धरूं? ॥ ध्रुवपद. ॥
सर्व सखा सदय शांत म्हणति संत ज्यातें ।
तोचि आजि कठिण कासयासि कसा पार तरूं? ॥ सकळ० ॥ १ ॥
म्हणति महालोल तसी फोल मात झाली ।
डौल कसा नेणवेचि जाण मनस्ताप हरूं. ॥ सकळ० ॥ २ ॥
नंदमहानंद आनंदसुत स्वामी ।
भेटउनि नीट धन्य वाट करी भांग भरूं. ॥ सकळ० ॥ ३ ॥

### पद ९२ वें.

[1]जा विनवा तुम्ही नंदकुमारा. ॥ ध्रुवपद. ॥
काय करूं कोठें जाउं सये वो! । काय जाहा करी सायकमारा. ॥ जा० ॥ १ ॥
कामजनक मनिं कां मज रुसला । कामजनितभवतापनिवारा. ॥ जा० ॥ २ ॥
हारमणीस जहार मणी मज । हा रविसा करि चंद्र उबारा. ॥ जा० ॥ ३ ॥
आनंदात्मज आदि गुराचा । योग हरील वियोगदरारा. ॥ जा० ॥ ४ ॥

---

१. कृष्णलीलावर्णन. २. कमलनेत्रा. ३. संसारा. ४. छळिसी. ५. मदन. ६. कमलपत्राक्षी.

### पद ९३ वें.

[1]सोसुं किती सांग वो बाई ! ॥ ध्रुवपद. ॥

केवळ गोविंदासाठीं केला चांग भांग वो ! । देव नये विधि मारे भांग वो ! ॥
कठिण कां झाला स्वामिकटा दिसदीन वो ! । [2]तेटिनि आटल्या जसा मीन वो ! ॥
विश्वासलें तुतें सये ! विचार हा थोर वो ! । आश्वासूनी आणा समोर वो ! ॥ ३
घडि युगसी जाते घनकृती वीनवो ! । वडिल तूं निरसी माझा शीण वो ! ॥ ४
आनंदनंदन प्रभु आळंगिता धन्य वो ! । मानसीं चिंति ना माझ्या अन्य वो ! ५

### पद ९४ वें.

घडि घडि काय सांगूं । दात्रा यदुराय पाय. ॥ ध्रुवपद. ॥
पळमुहूर्त युगासम जाते । कंठुं कसी मी माय. ॥ घडि० ॥ १ ॥
स्मर की हरी मज सायक मारी । लागती निष्ठुर घाय. ॥ घडि० ॥ २ ॥
आनंदात्मज विभुच्या योगें । मानस माझें धाय. ॥ घडि० ॥ ३ ॥

### पद ९५ वें.

[3]देइं देइं दान रमानायका ! । किती चाळविसी बायका ? ॥ ध्रुवपद. ॥
एकि म्हणे पैल माझी चूनडी । येरु इतर दावि लुगडीं ॥
वाढवेळ नको करूं ऊघडी । अहो पुन्हा नये हे घडी. ॥ देइं० ॥ १ ॥
एकि म्हणे पैल माझें साउलें । ज्यांत लिहिलें बहुत बाहुलें ॥
कृष्ण दावि दुजें निळें राहुलें । हरि ! बरवें तुज फावलें. ॥ देइं० ॥ २ ॥
चंद्रकळा मागतांचि दे सुगें । येरी हंसुनि राहिल्या उगें ॥
सकळ वधू नमिति तेव्हां पदयुगें । हरि ! नको ठकउं वाउगें. ॥ देइं० ॥ ३ ॥
कृष्णरूपीं वेधियेल्या बल्लवी । दृष्टि करुनि चरणपल्लवीं ॥
निजापांगें भुलवी मोठा लाघवि । मोठा लाघवी तो पालवी. ॥ देइं० ॥ ४ ॥
टाकि एक एक वसन गोपति । गोपी नेसुनियां हांसती ॥
आनंदतनय विभूप्रति पाहति । सुखें रमति अहो महामति ॥ देइं० ॥ ५ ॥

### पद ९६ वें.

[4]पतिश्री पतिते तुम्हि मागा जा. ॥ ध्रुवपद. ॥
घोर दरिद्रदशा अवलंबुनी । कुटुंबविटंबनीं वागा जा. ॥ १ ॥

---

१. कृष्णलीलावर्णन. २. नदी. ३. गोपीवस्त्रहरणाच्या प्रसंगाचें वर्णन. ४. सुदामास कृष्णाकडे जाण्याकरितां त्याच्या स्त्रीची विनंति.

थोर बढाई घरिंच गजावी । गडगडोनि गुण आगाजा. ॥ २ ॥
सांग विचार कथा घरचा कीं । द्या वर्णान्न हि मागा जा. ॥ ३ ॥
**आ**नंदात्मज प्रभुसहकामिनी । सांग पुसे म्हण सांगा जा. ॥ ४ ॥

**पद ९७ वें.**

[1]अहाहा [2]अदृष्टा ! दुरित प्रवृष्टा ! किती श्रमविसि मज दुष्टा रे ! ॥ ध्रुवपद. ॥
मास पूर्ण गर्भाचे भरले पक्षि न पाहति वाट रे ! ।
क्षुधाक्षीण मम दीन बालकें नेणति नीडोद्घाट रे ! ॥ अहाहा० ॥ १ ॥
खाती जीव जिवाला याहुनि नाहीं अन्य उपाय रे ! ।
विधि अन्न नेला भंगुनि करितो उलटा न्याय रे ! ॥ अहाहा० ॥ २ ॥
माझा अंश न देउनि राजा मजसीं करितो हाट रे ! ।
**आ**नंदनंदन विभोसी सांगा माझा हा बोभाट रे ! ॥ अहाहा० ॥ ३ ॥

१. शिविआख्यानांतील ससाण्याचें भाषण. २. दैवा.

## पद ९८ वें.

तो श्यामसुंदर धनुष्यवाला । सखे! करावा सखा तयाला. ॥ ध्रुवपद ॥
शाण्णव कुळिंचे नृप हे जमले । उगाचि कां हे येथें आले ।
या रावणाचें भय मज गमलें । धनुष्य उचलिल हा काळ मेला. ॥ १ ॥
शिवधनुष्य हें अफाट मोठें । राम सकुमार मोडतिल बोटें ।
या रावणाचें लक्षण खोटें । गर्वरहित करी हा काळ मेला. ॥ २ ॥
आदिभवानी भुतें आणुनी । धनुष्यावरी बैसवि तेक्षणीं ।
त्या रावणाची करी गर्वहानी । गर्वरहित करी हा काळ मेला. ॥ ३ ॥
आनंदतनय हरीस्मरणीं । चरणीं ठाव मागे तेक्षणीं ।
श्रीरामासीं माळ घालोनी । आनंद झाला जनक नृपाला. ॥ ४ ॥

## आरती.

जयदेव जयदेव वंदे गोपालं ।
मृगमदशोभितभालं भुवनत्रयपालं. ॥ ध्रुवपद. ॥
निर्गुणसगुणाकारं संहृतभूभारं ।
मुरहरनंदकुमारं स्मरहरसुखकारं ।
वृंदावनसंचारं कौस्तुभमणिहारं ।
करुणापारावारं गोवर्धनधारं. ॥ जयदेव० ॥ १ ॥
मुरलीनादविलोलं सप्तस्वरगीतं ।
जलचरस्थलचरवनचरगोचरसद्गीतं ।
स्तंभितयमुनातोयं अगणितवरचरितं ।
गोपीमुनिजनमोहनकारं श्रीकारं. ॥ जयदेव० ॥ २ ॥
रासक्रीडामंडितवेष्टितवृजललनं ।
मध्य तांडवमंडितकोमलदलनयनं ।
कुसुमाकारितरंजितमंदस्मितवदनं ।
फणिवरकालियदमनं पक्षेश्वरगमनं. ॥ जयदेव० ॥ ३ ॥
अभिनवनवनितचोरं विधृतदधिगोलं ।
लीलानटवरखेलं नवकांचनशीलं ।
विधृतलक्षणशीलं विधृततरुमोलं ।
आनंदसुतपरिपालं वंदे गोपालं. ॥ जयदेव० ॥ ४ ॥

## पद ९९ वें.

श्रीरामा जयरामा जय जय रामा ।
वदे विधि शिव तुझ्या स्तवितों नामा ॥ ध्रुवपद. ॥
जन्मुनियां रघुवीर रविकुळ भूषविलें ।
रक्षुनि मख ताटिकेप्रति संहारिलें ।
ब्रह्मसुते[1] स्वपदाब्जें वनिं उद्धरिलें ।
त्र्यंबककार्मुक भंगुनि महिजे[2] वरिलें. ॥ श्रीरामा० ॥ १ ॥
ताताज्ञेप्रति पाळुनियां मग जाय वना ।
घेउनि संगें सीतासह लक्षुमणा ।
शत्रुघ्ना भरताच्या अनुताप मना ।
त्या शोकें अजनंदन[3] पावे निर्धना[4]. ॥ श्रीरामा० ॥ २ ॥
वेष्टुनियां मृगचर्म कटी अरण्य अटी ।
राहुनियां जनस्थाना[5] वसे पंचवटीं ।
कनककुरंग[6] अवलोकुनियां त्यातें निवटी[7] ।
येऊनि हरी जानकीतें रावण कपटी. ॥ श्रीरामा० ॥ ३ ॥
वाळी मर्दुनि सुग्रीवाप्रति दे रमणी ।
मेळविले बहुत कपि रीस वनीं ।
धाडुनि मारुति शोधी त्रिभुवनजननी ।
जाळुनि लंका शेंपुट विझवी जीवनीं[8]. ॥ श्रीरामा० ॥ ४ ॥
बांधुनि सेतू सत्वर तो जलधी तरला ।
मर्दुनि रावण आणी आपुली अबला[9] ।
भक्त बिभीषण भावें पदिं स्थापियला ।
येउनि शीघ्र अयोध्ये विजयी जाहला. ॥ श्रीरामा० ॥ ५ ॥
पाठ करी इतुकें नर जो ऐके ।
श्रीरामायण सुंदर शत कोटि निकें ।
श्रवण तयाला घडेल वाल्मिक मुखें ।
आनंदात्मज बोले ध्या स्वात्मसुखें. ॥ श्रीरामा० ॥ ६ ॥

---

१. अहिल्या. २. सीतेला. ३. दशरथ. ४. मरणा. ५. नाशिकास. ६. सुवर्णमृग. ७. मारी. ८. पाण्यांत. ९. स्त्री.

**पद १०० वें.**

निशिदिनीं ध्यान तयाचें जडलें हृदयीं ।
नाम तयाचें जपतां सुख होय तयीं. ॥ ध्रुवपद. ॥
मुगुटीं कोटि दिवाकर तेज प्रकाश सुढाळ ।
रत्नकिळावरि जडिल्या बहु दीप्ति झळाळ ।
मोरपिसें वेष्टियलीं अति श्याम तमाल ।
केशर कस्तुरी तिलक रेखिला भाळ. ॥ निशि० ॥ १ ॥
कुंडलें तळपती मकराकृति ते श्रवणीं ।
पूर्ण प्रकाश मनोहर शोभा वदनीं ।
कमलदलाची उपमा साजे नयनीं ।
रतिपति पाहुनी रूप हें लज्जित मनीं ॥ निशि० ॥ २ ॥
कौस्तुभमणि अति सुंदर तो विलसे कंठीं ।
कनककमळ तुळसीच्या माळा निजकंठीं ।
चर्चियली तनुवरी ते श्रीखंडउटी ।
पाहतां रूप ऐसें हें भवभय निवटी ॥ निशि० ॥ ३ ॥
हृदयावरी ते विप्रपदांकित चिन्ह धरी ।
शंख चक्र अब्ज गदा पहा दिव्य करीं ।
नाभी विशाळ त्रिवलि विराजित उदरीं ।
कटितटीं क्षुद्र घंटा गर्जति गजरीं ॥ निशि० ॥ ४ ॥
पीतपटीं पहाटक (?) तेंवि प्रकाश भला ।
चरणीं तोडर वांकी नखिं चंद्रकळा ।
ध्वजवज्रांकित चिन्हें पहा पादतळा ।
चिन्मयनंदन[1] तेथें भावें रमला ॥ निशि० ॥ ५ ॥

---

१. चिन्मयनंदन म्हणजे आनंदनंदन असेंही होऊं शकेल.

# आनंदतनयकृत काव्यांवर आणखी टीपा.

## विश्वामित्राभिगमन.

श्लोक.

१ चिंतामणि–चिंतित वस्तु देणारा मणि.
दुर्मदरक्षोवृंदाचिया–दांडग्या राक्षसांच्या समूहाच्या.
तपन–सूर्य.
मुकुलित–मिटलेलें.

२ सहस्रकर–सूर्य.
किसलय–फांदीची कोंवळी पालवी.
रुचिर–सुंदर.
कुवलयदल–कमळाचें पत्र.
तळपति–चमकति.
मघमघित–घमघमीत. (येथें वर्णविपर्यय झाला आहे.)
अर्गळा–दाराचा अडसर, बिडी.

३ निजृंभमाण–विकास पावणारा.

४ आपादमाथां–पायांपासून मस्तकापर्यंत.

५ लोला–चंचल.
डोलापरी–झोंपाळ्यासारख्या.
नीलालका–काळ्या केंसांच्या (स्त्रिया).

६ हेममय–सुवर्णाच्या.

७ अभिराम–मनोहर.
अरविंद–कमळ.
षोडशोपचारें–आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन, स्नान, वसन, यज्ञोपवीत, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, प्रदक्षिणा, नमस्कार आणि पुष्पांजळि अशा सोळा उपचारांनीं. अन्यमताप्रमाणें—आसन, स्वागत, पाद्य, अर्घ्य, आचमनीयक, मधुपर्क, आचम, स्नान, वसन, आभरण, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य आणि वंदन या सोळा उपचारांनीं.

८ सुरसरिताजल–गंगोदक.
प्राज्ञ–चतुर, शाहणा.

१२ बाणजालें–शरसमूहानें.

१८ साकेताधीश–साकेत+अधीश–अयोध्यापति–दशरथ.

२० निर्धूतभव–निर्धूत=त्यक्त, भव=संसार. ज्यानें संसार टाकला तो.

२१ रक्षोगणा–राक्षसांच्या समुदायाला.
मार्गण–बाण.

२२ रजनीचर–राक्षस.

२५ पांड–जमिनीचें मोजण्याचें प्रमाण.

२६ धरा–पृथ्वी.

२९ गाधेयकरीं–विश्वामित्राच्या हातांत.

## ताटकावध.

१ सुमित्र–सौमित्र, लक्ष्मण.

४ गोपुर–शहराचा दरवाजा.

७ बोभाटती–आरोळी मारतात.

११ थाट–समुदाय.

१२ कराल–भयंकर.

१३ कुंजर–हत्ती.
कटकटा–हाय हाय.

१४ अवाळेपरी–आंवळ्याप्रमाणें.
अंबरीं–आकाशांत.
अट्टाहासुनि–क्रोधादि आवेशानें मोठ्यानें हसून.

१४ पट्टणीं–नगरांत, अमरावतींत.

१५ तूण–भाता.

## विश्वामित्रयज्ञरक्षण.

२ वनतती–वनराजि, वनाची रांग.

द्विषद्वधु–शत्रुभार्या. (ताटका.)
शक्रमानें–इंद्राप्रमाणें.
४ देवावली–देवांची पंक्ति.
अत्युन्नता–अतिशयित उंच.
६ क्षिती–पृथ्वी.
शाद्वल–कोंवळ्या गवतानें हिरवाचार झालेला प्रदेश.
कुड्मळ–कळे.
गुल्म–झाडी, झुडपी.
९ तपनरूप–सूर्यासारखे.
१० राजीवेक्षण–राजीव+ईक्षण–कमल+नयन.
११ पुंज–समूह.
अलिंचे–भ्रमरांचे.
बर्हीं–मोर.
द्विज–पक्षी.
शिवा–भालू.
कुंभी–हत्ती.
१४ नीराजना–देवास आरती ओंवाळणें, पूजन.
१७ शिखीसमक्षा–अग्नीच्या समोर.
२० आजानुबाहु–उभा राहिला असतां सहज गुडघ्यांपर्यंत ज्याचे हात पोंचतात तो.
चंड–तीव्र, भयंकर.
२१ स्तोम–समूह.
बाणोत्करीं–बाणसमूहीं.
कोदंड–धनुष्य.
२२ दुभे–प्रसवे.
२३ झांकोळले–व्यापले.
दाहि दिशा–दशदिशा; पूर्व, अग्नेय, दक्षिण, वायव्य, पश्चिम, नैर्ऋत्य, उत्तर, ईशान, भूमि आणि आकाश.
संदोह–समूह.
कार्मुक–धनुष्य.
२५ गुढारल्या–सज्ज झालेल्या, सैन्ययुक्त.
२८ वारण–हत्ती.
३० निसुर–बेधडक, निःशंक.
३१ पडप–प्रतिष्ठा, अभिमान.
रिपुनिकर–शत्रूंचा समुदाय.
विशिख–बाण.
शिखिसम–अग्नीसारखी.
रदनिकरें–रद+निकरें–दांत+समूहें.
३४ चित्तचकोरचंद्रा–चित्तरूप चकोरपक्ष्याला चंद्रासारखा आनंद देणारा. चंद्राला पाहून चकोर आनंदित होतो आणि चंद्रकिरणांवर त्याची उपजीविका चालते अशी कविप्रसिद्धि आहे.
३५ निष्टंक–समग्र, परिपूर्ण, यथासांग.

## सीतास्वयंवर.

१ साचार–सत्य, खरोखर.
वाचावली–शब्दावली.
८ हेमाद्रि–मेरुपर्वत.
हेम–सोनें.
आभरण–अलंकार.
१३ ऋषिथाट–मुनिसमुदाय.
१६ गमनाशय–येण्याचा हेतु.
चांग–चांगलें.
१७ दुरित–पाप.
२३ हडपेकर–विडा देणारा. (हडप=पानदान.)
कंदर्पाचा–मदनाचा.
दस्त–शेला, दुपेटा.
दुतारी–दोन तंतू एकत्र करून विणलेला.
३४ सायकासन–धनुष्य.
३५ कटकटा–हाय हाय.
३७ नदी–नद्या ह्या सागराच्या स्त्रिया होत,

या समजुतीस अनुसरून हें वर्णन आहे.

४४ मद्दोर्दंड–माझे भुजरूप दंड.

४९ सुभट–उत्तम वीर, योद्धा.

५० सप्तद्वीपपती–सात द्वीपांचे राजे. सप्तद्वीपें:–'जम्बूप्लक्षाह्वौ द्वीपौ शाल्मलीश्चापरो द्विज । कुशः क्रौंचस्तथा शाकः पुष्करश्चैव सप्तमः ॥' (विष्णुपुराण).

५६ सोम–चंद्र.
द्विरद–हत्ती.
सितांशु–चंद्र. ('विश्वामित्रयज्ञरक्षण' श्लोक ३४ पहा.).

५९ उरग–सर्प.
पतंगराज–गरुड.
कमठ–कांसव.
सशरसित–बाण आणि दोरी यांसहित.
भेरी–नगारे. (ह्याचे अनेक प्रकार आहेत.)

६१ राजीवाक्षा–कमलनेत्र.
कशी–बांधी.

६२ मृदुभा–कोमल कांति.

६३ उफाळला–उडाला.

६५ तुकुनि–हालवून, उचलून.

७१ कडासन–तपस्विजनाचें व्याघ्रचर्माचें आसन.
कृष्णाजिन–मृगचर्म.

७२ गोरटी–गौरवर्ण.
गोमटी–सुंदरी.

८० अंबुजनयना–कमलेक्षणा.

## शबर्याख्यान.

५ अबलांचे–स्त्रियांचे.

११ बाहीं–बाहुनें, भुजानें.



## सेतुबंध.

२ अत्युद्भटा–अत्यंत मोठी.

१२ कुळपर्वत–हे मोठमोठे सात पर्वत आहेतः—'महेंद्रो मलयः सह्यः शुक्तिमान् ऋक्षपर्वतः । विंध्यश्च पारियात्रश्च सप्तैते कुलपर्वताः ॥.'

१४ धराधर–पर्वत.

१७ सुरत्नांगदा–उत्तम रत्नें आणि अंगद (बाहुभूषण) यांनीं युक्त.

२६ चकोर मी–पृष्ठ २१ पद्य ५६ आणि पृष्ठ ११ पद्य ३४ पहा.

२७ शास्त्रें–सहा शास्त्रें, चार वेद, आणि अठरा पुराणें.

३३ चारु–सुंदर, मनोहर.

३७ उलाट–उडी.

## बालचरित्र.

१ भारती–वाणी.

१२ योषिता–स्त्री.

१३ वोसणसी–बरळसी. (वोसळणें-बरळणें.)

१४ मुखांबु–तोंडावरील उदक.

## पूतनावध.

१ दुर्धर–दांडगी.

३ अंशुमाळी–सूर्य.
श्रीवनमाळी–वनमाला ज्यानें घातली आहे तो. वनमाला=कंठांत घातली असतां पायांपर्यंत पुरणाऱ्या मालेस 'वनमाला' असें नांव आहे. 'आजानुलम्बिनी माला सर्वर्तुकुसुमोज्ज्वला । मध्ये स्थूलकदंबाढ्या वनमालेति कीर्तिता ॥.'
कलिल–मूर्च्छा, भ्रमिष्टपणा.
पुंडरीकनयन–कमलनयन.
कुंडलीशशयन–कुंडली+ईश+शयन–साप+स्वामी+शयन करणारा–शेषशायी कृष्ण.

अंडजराजवाहन—गरुडवाहन.
६ अनवरत—सतत.
दुरित—पाप.
१० उमाळा—उद्भव.
अग्रहार—दान दिलेली जमीन.
साहा—सहा शत्रु—काम, क्रोध, लोभ, मोह, मत्सर आणि मद.
११ दानववल्लभारी—कंसारी.
१५ नीरंजना—परमात्मा, परब्रह्म.
१८ रुळे—लोंबे.
पंकजाक्षी—कमलनयना.
२७ भजक—भक्तजनरूप मानससरोवराचा राजहंस. (राजहंसास मानससरोवर प्रिय आहे असा कविसंकेत आहे.)
३४ पाखाळोनि—स्वच्छ करून.
३६ महासुरीची—मोठ्या राक्षसीची.
३७ रदना—दांत.
वैखरी—वाणी.
साना—लहान.
४० अपोशन—आपोशान—भोजनाच्या अंतीं अथवा आरंभीं उदक प्राशन करणें.
४१ घुटघुटुनि—गिळून.
सत्राण—बळानें, जोरानें.

## कंदुकाख्यान.

५ पशुपयुवति—गवळण.
१५ पशुपाळयोषा—गवळण.
१८ राजी—पंक्ति.
१९ शिरजोरी—जबरदस्ती.
बजागी—भांडखोर.
२१ चैलांचळीं—वसनाच्या पदरांत, लुगड्याच्या पदरांत.

## कृष्णचरित्र.

८ उरोभवें—उरोजें, स्तनें.
११ पहुडलीं—निजलीं.
१५ परपूरुष—परका मनुष्य; (पक्षीं) परमात्मा.
३६ करी—हत्ती.

## सुदामचरित्र.

१ रसना—जिव्हा.
ब्रह्मण्यदेव—विष्णु.
६ सगडी—शेगडी.
१३ मलयज—मलयपर्वतापासून येणारा.
नवनिधि—महापद्म, पद्म, शंख, मकर, कश्यप, मुकुंद, कुंद, नील आणि खर्व.
१६ होरा—मुहूर्त, समय.
१७ माजीं—कटीं.
२२ वामांगीं—डाव्या बाजूला. स्त्रियांनीं नवऱ्याच्या डाव्या बाजूला असावें असें शास्त्र आहे.
२६ भूदेवा—ब्राह्मणा.
३७ तुरें—वाद्यें.
३८ इंदिरालय—लक्ष्मीस्थान.
मयूख—किरण.
भोगागरें—विलासमंदिरें.
सांकडें—संकट.
४१ राजीवनेत्र—कमलाक्ष.
पृथुकाचुरा—पोह्यांचा चूर.
४४ धाला—तृप्त झाला.

## गणिकोद्धार.

२ कामिनीला—स्त्रियेला.
५ बाहते—बोलाविते, हांक मारते.
६ नीर—उदक.

## उमारमासंवाद.

१ सारीपाट—सारंगपाट.
२ पशुपाळ—पशु रक्षणारा शिव.
सर्पाधीश—सर्पाचा स्वामी. (शिवाच्या

अंगावर सर्पाचें वेंटाळें असतें म्हणून सर्पाधीश.)

वृंदा–वृंदा ही जालंधर नामक असुर होता त्याची स्त्री. ही मोठी पतिव्रता होती. म्हणून तिचे पुण्यानें सुरासुरयुद्धांत जालंधराचा पराजय होत नसे. ह्यामुळें विष्णूस संकट पडून जालंधर युद्धांत गुंतला असतां विष्णूनें जालंधराच्या रूपानें येऊन वृंदेच्या पातिव्रत्याचा भंग केला. ह्या पातकानें जालंधर युद्धांत मरण पावला. पुढें वृंदेला जेव्हां हें विष्णूचें कपट समजलें तेव्हां तिनें 'तुला स्त्रीवियोग होईल' असा त्याला शाप दिला; त्याप्रमाणें रामावतारीं त्याला सीतेचा वियोग झाला. पुढें वृंदा जालंधराबरोबर सती गेली, पण विष्णूला तिचा वियोग सोसवेना, म्हणून तिनें सती जाण्यापूर्वी त्याला सांगितलें कीं, 'मी सती गेल्यावर माझ्या चितेवर तुळस उत्पन्न होईल, तिजशीं तूं विवाह कर म्हणजे तुझें वियोगदुःख शांत होईल.' त्याप्रमाणें त्यानें केल्यावर त्याची शांति झाली, अशी कथा आहे. ह्या कथेचे धोरणानें उमा रमेस लावून बोलली आहे. (नवनीत.)

३ शक्रयज्ञादिकें–शक्राकडून केलेल्या यज्ञक्रियेनें.

मागे–त्रिपाद भूमिदान मागे.

दैत्याच्या–बळिराजाच्या.

४ शोधुनि–सत्व पाहून, परीक्षा पाहून.

५ शबरी–रामायणांतील प्रख्यात भिल्लीण. हिनें वन्यफळें भक्षणास देऊन रामाचें आतिथ्य केलें होतें.

७ वासी–उघडी, पसरी.

८ भावार्थ–भक्तिभाव पाहण्यासाठीं.

९ वर दिला–ज्याच्या मस्तकीं हात ठेवशील त्याचें भस्म होईल हा वर. असा शिवाचा वर मिळतांच भस्मासुर शिवावरच उलटून त्याच्याच मस्तकीं हात ठेवूं लागला. तेव्हां शिवानें विष्णूचा स्तव केला; त्यावेळीं विष्णूनें बटूचा वेष धरून भस्मासुराला भाषणानें संतुष्ट करून वराची परीक्षा पाहण्याकरितां तूं आपले मस्तकावर हात ठेवून पहा म्हणून सांगितलें. त्याप्रमाणें भस्मासुरानें करतांच त्याचें भस्म झालें, अशी कथा आहे.

१० काळयौवन–(कालयवन.)हा एक मोठा दैत्य यवनांचा राजा होता. ह्यानें यादवांवर स्वारी केली, तेव्हां कृष्णाचें आणि त्याचें मोठें युद्ध झालें; पण तो अजिंक्य आहे असें कृष्णास वाटल्यावरून कृष्ण पळाला. तेव्हां कालयौवनही त्याच्या पाठीस लागला. त्या वेळीं कृष्ण पळतां पळतां ज्या गुहेंत मुचकुंद निजला होता त्या गुहेंत शिरला. आणि मुचकुंदाचे आड लपून बसला. मागून कालयौवन आला, त्यास मुचकुंद निजला होता. हाच कृष्ण असें वाटून त्यानें त्यास लाथ मारली. तेव्हां मुचकुंदानें जागें होऊन कालयौवनाकडे क्रोधानें पाहिलें. तों लागलाच कालयौवन दग्ध झाला, अशी कथा आहे.

ही कृष्णाचे रक्षणाची युक्ति कृष्ण शिवास शरण गेला तेव्हां सांगितली. (नवनीत.)

मुचकुंद–हा सूर्यवंशी इक्ष्वाकुकुळांतला राजा होता. ह्यानें देवदैत्यांचे युद्धांत देवांस साहाय्य केल्यावरून त्यांचा जय झाला. तेव्हां देवांनीं संतुष्ट होऊन मोक्षाशिवाय पाहिजे तें माग म्हणून त्यास सांगितलें. तेव्हां तो नुकताच युद्धश्रमानें थकला होता, म्हणून निद्रा करण्यास निवांतस्थल आणि माझे निद्रेचा भंग करील त्यास माझ्या दृष्टीपातानें मृत्यु हें वरदान मागितलें. देवांनीं तें लागलेंच दिलें, अशी कथा आहे. (नवनीत.)

१२ कुसरी–कौशल्य.

## मार्कंडेयाख्यान.

२ सत्कर्मधर्माथिला–सदाचार आणि सद्धर्म यांविषयीं आस्था बाळगणारा.

प्रियपणें–प्रेमपूर्वक, प्रेमानें.

निःसारसा–निरर्थक.

कुलोद्धारसा–कुळाचा उद्धार करील असा.

४ पंचाक्षरी मंत्र–'नमः शिवाय' हा पांच अक्षरांचा मंत्र.

पुरश्चरण–मंत्रजप.

५ कुळहेतुतंतु–वंशस्थितीचें साधन.

६ विधान–प्रकार.

११ कडा–पतनास कारण.

१६ तोषावेशविशेषसा–अत्यंत आनंद ज्यांत आहे असा (संसार).

१८ प्रज्ञाप्रभा–बुद्धीचें तेज.

२१ विकटा कपाळा–दुर्भाग्या.

२५ सकळंकवरा–जो वर दिला तो सकळंक म्हणजे दूषित, संकटमय आहे म्हणून अशा वराला.

३० भजतया–भजणाऱ्याला.

आदिमूल–जगतांचें आदिकारण शिव.

३३ चंडमहेश–चंडमहेशाच्या देवालयास आला.

यमगंड–मरणकाळ.

पार्थिव–मातीचें केलेलें लिंग.

३४ एकसरें–एकदम.

विरागावसरें–वैराग्याच्या समयीं.

नलिन–कमळ.

तांडवाधीश्वराची–शिवाची.

३५ करवीर–पांढरे कण्हेरीचें फूल.

इंदीवर–कमळ.

३६ वारीं–समयीं.

काजीं–कार्यात.

भयवाजी–भयच आहे वाजी (घोडा) असा मी. भयानें त्वरित शरण आलेला मी.

नयननिर्गतज्वलनज्वालाभस्मीकृतस्मरा-नेत्रांतील अग्नीनें जाळून टाकिलें आहे स्मरास (कामास) ज्यानें असा (शंकर.)

तांडवावसान–नृत्यकलेची परम सीमा.

पाहि मां–माझें रक्षण कर.

३८ पद्मासनीं–पद्म नामक आसन घालून.

पद्मपाणियुगुलीं–हातांत कमळ घेऊन आणि हस्तद्वय जोडून.

प्रार्थी–प्रार्थना करतो असा. पूर्वीं एकदां शिवाचा अंत लावण्याकरितां ब्रह्मदेव वरतीं व विष्णु खालतीं असे गेले होते. तेव्हां ब्रह्मदेवाला शोध लागला नसतां शोध लागला असें त्यानें खोटें सांगि-

तलें; म्हणून शिवांनें 'तूं अपूज्य होशील' असा ब्रह्मदेवाला शाप दिला. (त्यावरून आतां पृथ्वीवर ब्रह्मदेवाला कोणी पूजीत नाहीं.) त्या वेळीं ब्रह्मदेवानें शिवाची हात जोडून प्रार्थना केली, अशी कथा आहे. (नवनीत.)

३९ दणाणी–दणाणली.

ध्यानीं–मार्कंडेयाचें ध्यान शिवाकडे लागलें आहे असें पाहून भ्याले.

४३ चार–हेर.

कळभंड–गोंसाव्यांतील एक पंथ आहे.

४४ आजिसिद्ध–हला (रेडा) आजिसिद्ध करणें (करा) द्विजा(वर) हला (हला) जाहल्या विना हें प्रयोजन (कार्य) न (व्हावयाचें नाहीं)–असा अन्वय.

४५ मुठाळुनि–हातीं धरून.

पाला–बेलाचीं पत्रें.

कृपाला–शिवाला.

पाळाणुनी–खोगीर घालून.

हला–रेड्याला.

आलापितांचि–बोलतां बोलतां, अत्यंत त्वरेनें.

४७ धिंग–धिप्पाड.

रोषोत्करीं–अत्यंत कोपानें.

४८ पिनाकपाणी–शिव.

दुर्धर–दुर्धर.

उठेला–उठला.

चिरंजीव–दीर्घायु हो.

५० प्रूत–पुष्कळ.

सूत–स्तुतिपाठक (मार्कंडेय.)

५१ करणी–यमाचें आचरण.

५३ तोही–तो यमही.

५४ अगती–गतिहीन, निरुपाय.

५५ एकरीती–एकनिष्ठपणानें, एकाग्रमनानें.

विषयि–विषयासक्त झालेल्या जनाला.

५६ तो–सुरसमूह.

नगराज–कैलासाधिपति शंकर.

## शिबिचक्रवर्त्याख्यान.

२ ओसराया–शेवटास जाण्यासाठीं.

४ सत्वाथिला–सत्वसंपन्न.

१४ उबगिजेल–उपेक्षील, कंटाळेल.

१८ अशन–भक्षण.

२६ पतगप्रमाण–पक्ष्याएवढी.

२७ तुकें–पारड्यांत.

३० निजोरुजंघांतरिं–आपल्या मांड्या आणि पोटरी यांमध्यें.

४० भवाब्धिभय–संसाररूप सागराचें भय.

४५ सायुज्यमुक्ति–मुक्ति चार आहेत. ज्या देवतेची उपासना करावी तिजमध्यें मिळून लीन होणें ती सायुज्यमुक्ति. सलोकता, समीपता आणि सरूपता ह्या तीन इतर मुक्ति.

उमाळा–उद्भव. श्लोक ४४–४५ यांत प्रस्तुत कथाश्रवणाची फलश्रुति सांगितली आहे.

## पदसंग्रह.

१ सद्म–घर.

४ गुणग्राम–गुणांचा समूह.

५ भवगहनीं–संसाररूप अरण्यांत.

वृंदारककांता–देवांचा आवडता स्वामी, देवाधिदेवा.

६ त्रिविधतापशमन–आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक अशा

तीन प्रकारच्या तापांचें शमन करणारा.

९ ध्वांत–काळोख.

कुंतल–केंस.

नुत–स्तविलेला.

१० सितपत्र–हंस.

पत्री–पक्षी.

निशात–तीव्र, पाजळलेला.

शीतकर–चंद्र.

१३ अवतंसा–भूषणा.

१४ आयत–लांब, दीर्घ.

१५ अरविंद–कमळ.

१६ वारिजात–कमळ.

उडुपति–चंद्र.

१७ सरोज–कमळ.

पुंडरीक–कमळ.

कांतार–अरण्य.

सारस–कमळ.

शातकुंभ–सुवर्ण.

सप्ततुरग–सूर्य.

१९ निर्जर–देव.

मल्लारी–मल्लदैत्याचा शत्रु, खंडोबा.

येळकोटि–एळकोट–खंडोबाचे भक्त देवापुढें जेव्हां तळी उचलितात तेव्हां एळकोट असा मोठ्यानें उच्चार करतात. तळी–खंडोबाचे भक्त एका पात्रांत पान, सुपारी, भंडार (हळद), खोबरें इत्यादि भरून, त्याचें नाम घेऊन उचलितात ती.

२० विरिंचि–ब्रह्मदेव.

२२ भववैभव–संसारांतील संपत्ति इत्यादि थोरपणा.

विराग–वैराग्य.

२४ कलुष–पाप.

२५ 'तत्त्वमसि'–'तें तूं आहेस' हें उपनिषदांतील वेदांताचें महावाक्य.

२८ अपांगोनि–बाळगून, धरून.

परावरीं–परलोकीं.

३३ यामिनी–रात्र.

सौदामिनी–वीज.

३५ लक्षयोनि चौऱ्यांशी– २० लक्ष वृक्षयोनि, ११ लक्ष कीटकयोनि, ३० लक्ष पशुयोनि, ९ लक्ष जळचरयोनि, १० लक्ष पक्षियोनि आणि ४ लक्ष मनुष्ययोनि मिळोन ८४ लक्ष योनि.

४४ सुमचाप–काम.

४५ खेंवा–आलिंगना.

धाटीं–रीतीप्रमाणें.

गाजावाजा–लोकप्रसिद्धि, गवगवा.

दुबळ्याचें–सुदामाचें.

पीयूष–अमृत.

४६ अंतराय–विघ्नें, अडचणी.

जारणमारण–चेटक, जादूगिरी.

४७ उफराट्या–उलट; वाल्मीकीनें रामनामाचा जप 'राम' असा न करतां 'मरा' असा केला आणि पावन झाला अशी कथा आहे.

पुत्राच्या–नारायण नामक पुत्राच्या.

शुका–पोपटा.

कुंटिनी–वेश्या, गणिका.

४८ आत्मारामीं–जीवात्म्याच्या ठायीं.

करणाचा–इंद्रियांचा.

४९ वेल्हाळी–सुंदरी, प्रिये.

शर्म–सुख.

५० जयंत्या–दशअवतारांच्यासंबंधें प्रतिसांवत्सरिक जयोत्सवाच्या दिवसाला जयंती असें म्हणतात. चैत्र

शुद्ध ३ पराण्हीं मत्स्यजयंती, वैशाख शुद्ध १५ सायंकाळीं कूर्मजयंती, भाद्रपद शुद्ध ३ पराण्हीं वराहजयंती, वैशाख शुद्ध १४ सायंकाळीं नरसिंहजयंती, भाद्रपद शुद्ध १२ मध्यान्हीं वामनजयंती, वैशाख शुद्ध ३ माध्यान्हीं परशुरामजयंती, चैत्र शुद्ध ९ माध्यान्हीं राजजयंती, श्रावण वद्य ८ मध्यरात्रीं कृष्णजयंती, आश्विन शुद्ध १० सायंकाळीं बौद्धजयंती आणि श्रावण शुद्ध ६ सायंकाळीं कलंकीजयंती.

५५ उन्मनी–मनाचा लय होतो अशी पांचवी अवस्था.

५८ कुरंगदृशा–मृगनयना.

सारस–सहा रस. मधुर, आम्ल तिक्त इत्यादि.

६५ दंभोलि–वज्र.

राकारमण–चंद्र.

युवतिकरेणु–तरुणी हीच हत्तीण.

विहंगम–पक्षी.

६८ सौंगाडे–सोबती.

व्रिजबाला–गोकुळांतील स्त्रिया.

७३ सोना–निजणें.

## विषयपंचक.

१ कांतारीं–अरण्यांत.

शबर–व्याध.

२ शिखा–दिव्याची ज्योत.

५ कंज–कमळ.

## मृगीचरित्र.

२ पेणी–गति.

६ शेखीं–शेवटीं, अखेरीस.

९ कुवलय–चंद्रविकासी कमळ.

१० वेल्हाळ–प्रिय.

एणीस–मृगीस.

१२ कणवा–दया.

## महाबळचरित्र.

१ माइना–मावेना.

४ नामाथिला–नामसंपन्न.

६ मांदी–पेटी.

८ होरा–समय, मुहूर्त.

३० काच–कचर, धास्ती.

४१ चाट–चावट, चाटळ.

४३ आहाळितां–पोळितां.

दश इंद्रिय–पांच ज्ञानेंद्रियें (कर्ण,चक्षु, रसना, नासिका, त्वचा) आणि पांच कर्मेंद्रियें (हस्त, पाद, पायु (गुद), उपस्थ, वाचा मिळून दहा इंद्रियें.

## गोरसक्रीडा.

२ पंचकद्वय–दहा (अवतारांमध्यें.)

३ वृंदारकांचा–देवांचा.

५ सुगड्या-सुघडें, पात्रें.

विगडुनि–लपवुनी.

१२ विंदाना–चातुर्या, विलासाला.

१६ नातुडे–नाटोपे, न मिळे.

१७ निजे–आपुल्या (अंत:पुरांत.)

२० चेइली–जागृत झाली.

२२ कुरळ–केंस.

२३ मुरदाड–मुडदार, मृतप्राय, अप्रयोजक (मनुष्य इत्यादि.)

२४ तत्रें–आवेशानें.

२६ जातवेद–अग्नि.

हृषीकेश–कृष्ण. (हृषीक+ईश=इंद्रिय+स्वामी.)

२७ वोहरें–वधूवर (ओहर.)

वोहरें–सरे, संपे.

२८ धगड–पति, जार.

२९ बिढारा–गृहा, बिऱ्हाडा.

३० नवलाव–आश्चर्य.

३३ सांकडें–संकट.

३५ पालवीं–पल्लवीं, पदरीं.

३६ चिदानंद–ज्ञानानंद.

४२ कणव–दया.

**नवरसचरित्र.**

५ सराग–रागयुक्त राग–गायनांतील गाण्याचा प्रकार. हे राग छत्तीस आहेत आणि रागिण्याही तितक्याच आहेत. भैरव, सारंग, कल्याण, हिंदोल, दीपक, अडाणा, कलिंगडा इत्यादि राग आहेत.

१२ कटकटा–हायहाय.

३९ सादी–हांक मारी, बोले.

४८ दाक्षायणी–ज्याच्या कानांत सुवर्णाचीं कुंडलें आहेत असा ब्रह्मचारी ब्राह्मण.

४९ पर्णितां–परिणय (विवाह) करतां.

५२ त्रिगुणी–सत्त्वरजस्तमोगुणयुक्त.

चारी देह–स्थूलदेह, लिंगदेह (सूक्ष्मदेह), कारणदेह आणि महाकारणदेह.

पंचविषय–शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध असे पांच विषय आहेत.

साही दुष्ट विकार–काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर.

सप्तम–शरीरांतील सात धातुः—रस रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा आणि शुक्र.

अष्टौ–आठ भाव.

रसा–नव रस आहेतः–शृंगार वीर, करुणा, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स आणि शांत.

**पदें (परिशिष्ट).**

१ परमेष्टी–ब्रह्मदेव.

३ ल[illegible]ाम–भूषण.

१४ स्रज–पुष्पांची माळा.

उरग–साप.

१५ मरंद–पुष्परस.

मिलिंद–भ्रमर.

वृंदारक–देव.

नितराम्–अत्यंत.

१७ सित–शुभ्र.

सुधाकर–चंद्र.

२९ आपाद–पायांपर्यंत.

वैजयंती–मालाविशेष. (विष्णूचें [illegible]षण).

३१ निधनाची–मरणाची.

३२ षड्रस–मधुर, आम्ल, खारट, कडु तुरट आणि तिखट असे सहा रस

३८ हाटक–सोनें.

४४ वधु–अहल्या.

५५ पंचभूतीं–पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश हीं पंच महाभूतें

५९ कंज–कमळ.

[library stamp] १४५०७